**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत देण्यात आलेला प्रस्ताव**

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये दोन प्रस्ताव आलेले आहेत. पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, डॉ. दीपक सावंत, श्री. अरविंद सावंत आणि ॲड. अनिल परब यांनी दिलेला आहे. हा विषय नियम 289 चा कसा होतो यासंदर्भात सन्माननीय सदस्यांना काही सांगावयाचे असल्यास थोडक्यात सांगावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या महाराष्ट्र मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या वृत्तीने, प्रवृत्तीने प्रश्न निर्माण झालेले आहेत आणि म्हणून त्यांनी मंत्रिमंडळात राहावे की नाही हा माझा प्रश्न आहे. म्हणून आज मी हा विषय आपल्यापुढे मांडलेला आहे. कालच वक्फवर चर्चा करीत असताना संबंधित मंत्र्यांनीच वक्फचा भूखंड गिळला आहे असे मी सप्रमाण सांगितले आणि त्यांच्या उत्तरात त्यांनी ते मान्यही केले की, मी भूखंड घेतला होता आणि परत दिला. मी आबांना असे म्हणालो की, चोराने मुद्देमाल जरी परत दिला तरी चोरीची शिक्षा ही करावीच लागते. माननीय मुख्यमंत्री त्यांना त्यासंदर्भात शिक्षा कधी करणार हा नंतरचा भाग आहे. पण आज तर आणखी एक अतिरेक झाला. संबंधित मंत्र्यांनी आपल्या पोलिसांना मारले त्याचे वृत्तांत आम्ही वाचले. आणखी काय काय केले आहे ते पुढे येतच राहील. परंतु आज ही जी जबरी प्रवृत्ती मंत्रिमहोदयांमध्ये आलेली आहे त्याचा परिणाम म्हणजे आजच नागपूरची जी बातमी आलेली आहे त्याचा खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे. नागपूरमध्ये शासकीय तंत्र निकेतनचा बंगला मंत्र्यांनी बळकावला. त्यांना या मुंबईमध्ये एक निवासस्थान दिलेले आहे. त्याचा ते उपभोग घेत आहेत. तरी सुध्दा नागपूरमध्ये एखादा बंगला मंत्रिमहोदयांनी बळकावणे आणि त्या संस्थेची गैरसोय निर्माण करणे, त्या संस्थेच्या उच्चपदस्थांची आणखी गैरसोय निर्माण करणे ही तर मंत्रीपदाची आणि मिळालेल्या अधिकाराची अवनीती आहे असे माझे मत आहे. मंत्र्यांनी जबाबदारीने वागावे. हा सुसंस्कृत महाराष्ट्र आहे. फुले, आंबेडकर आणि शाहूंचा महाराष्ट्र आहे. माननीय उपमुख्यमंत्री म्हणत आहेत की, सगळयांचा महाराष्ट्र आहे. आपण बरोबर बोलला. आपणा सगळयांचा महाराष्ट्र आहे ही भावना बळावल्यामुळे, मीच मालक आहे असे मंत्र्यांचे म्हणणे झाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. दिवाकर रावते .....

झालेली आहे. आम्हाला कालपर्यंत हे मान्य होते आणि आजही मान्य आहे की, फुले, आंबेडकर, शाहूंचा महाराष्ट्र म्हणजे एक आदर्श निर्माण करणारा महाराष्ट्र तुमच्या सरकारच्या आणि मंत्र्यांच्या कृतीतून लोकांपुढे गेला पाहिजे. आपण जे बोलला ते बरोबर आहे. आपला महाराष्ट्र आहे ही प्रवृत्ती आल्यामुळे त्याचा अर्थ त्यांना कळला नाही. पण आपण ज्या सुसंस्कृत वातावरणातून आला आहात त्याचा आपण दुरुपयोग करत नाही. त्यामुळे मंत्र्यांनी हा बंगला बळकावणे हा अत्यंत दुर्दैवी भाग आहे. म्हणून याची आज तातडीने चर्चा झाली पाहिजे. सरकारमधील एक मंत्री अशा प्रकारे वागत असेल तर ते अत्यंत गैर आहे. त्यांनी नैतिकता स्वीकारुन मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला पाहिजे. किंबहुना याचा जाब सरकारने जनतेला दिला पाहिजे. या भावनेतून मी हा प्रस्ताव आणलेला आहे. ही चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. इतर कोणत्याही प्रश्नांपेक्षा बेताल मंत्री जर असे वागत असतील तसेच अन्यही काही गोष्टी आहेत पण बाकीच्या प्रश्नांना कोठे न्याय मिळणार नाही. कोणत्याही गोष्टीला न्याय मिळणार नाही आणि "हम करे सो कायदा" ही प्रवृत्ती बळावलेले मंत्री उद्या आम्हाला, विरोधी पक्षाला आणि जनतेला जुमानणार नाहीत. अशी प्रवृत्ती असल्यामुळे ही चर्चा ताबडतोब होणे आवश्यक आहे. ही चर्चा घ्यावी अशी मी आपल्याला नम्र विनंती करतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील मंत्रिमंडळाची मंत्री परिषद आहे. या मंत्री परिषदेमध्ये कॅबिनेट दर्जाचे मंत्री आहेत आणि कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्यांना सुध्दा आचारसंहिता आहे. एका कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याकडे किती बंगले असावेत, त्यांनी किती बंगले वापरावेत, यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे आहेत. आणि हे सर्व ठोकरुन जर एखादा मंत्री अशा शासकीय बंगल्यामध्ये वर्षानुवर्षे राहात असेल, सहकुटुंब सहपरिवार राहात असेल आणि त्याच भागात स्वत:चा बंगला असूनही त्या बंगल्यात राहावयाचे नाही आणि शासकीय बंगल्यात राहावयाचे ही शिस्तभंगाची फार मोठी कृती आहे. यादृष्टीने खरे म्हणजे माननीय मुख्यमंत्र्यांनी याची नोंद घेतली पाहिजे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेब उपस्थित आहेत. आपणही या सदनाचे सदस्य आहात. यादृष्टीकोनातून मंत्री परिषदेतील एक मंत्री जर असे वागत असतील तर त्यांना त्यांच्या कार्याची दिशा समजावून देण्याची,

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 12:05

(श्री. मधुकर सरपोतदार....

त्यांच्या कार्याची कक्षा समजून देण्याची आणि कोड ऑफ कंडक्ट या शब्दांचा त्यांना अर्थ समजून सांगण्याची आवश्यकता आहे. एखाद्या आमदाराने आमदार निवासातील खोली जर एखादा महिना जास्त वारपली तर ती खोली जबरदस्तीने ताब्यात घेतली जाते. परंतु मंत्रिमंडळातील एक मंत्री एक बंगला अनधिकृतपणे वर्षानुवर्षे, सहकुटुंब, स्वत:चे निवासस्थान असताना वापरत आहेत. असे असताना देखील त्यांच्या बाबतीत कोणतीही कारवाई केलेली नाही म्हणून आम्ही नियम 289 अन्वये शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा प्रस्ताव दिलेला आहे. अन्यथा या गोष्टीकडे शासनाने लक्ष दिले नसते. म्हणून नियम 289 अन्वये आजचे सभागृहापुढील सर्व कामकाज तहकूब करुन या विषयावर चर्चा घडवून आणवी. या विषयावर सन्माननीय सदस्य आपले विचार व्यक्त करतील. संबंधित मंत्री महोदयांना देखील यासंदर्भात खुलासा करण्याची परवानगी द्यावी जेणे करुन मंत्री महोदयांना कोड ऑफ कॉण्डक्टची माहीत आहे की नाही याचा देखील खुलासा होईल. धन्यवाद.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये या ठिकाणी प्रस्ताव दिलेला आहे. हा कोड ऑफ कॉण्डक्टचा विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार यांनी वस्तुस्थिती सांगितली आहे. हा बंगला सन 2000 पासून माननीय मंत्री महोदयांच्या ताब्यात आहे ही फार मोठी गंभीर बाब आहे आणि त्यामुळेच नियम 289चा प्रस्ताव देण्यात आलेला आहे. हा बंगला उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्या अखत्यारितील आहे. मागे सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांचे सामान आमदार निवासातील खोली मधून बाहेर काढण्यात आले होते. तर मग या मंत्र्यांचे सामान बाहेर का काढले नाही ? या सभागृहामध्ये सभागृहाचे संवेदनाशील नेते उपस्थित आहेत. त्यांनी वृत्तपत्रातील बातमी वाचल्यानंतर ते काही तरी घोषणा करतील असे वाटले होते. परंतु तसे त्यांनी काही केले नाही. या मंत्री महोदयांनी त्यांच्याच पक्षाच्या मंत्र्यांचा बंगला बळकावला आहे. हा बंगला मंत्री महोदयांनी ताबडतोबीने खाली केला पाहिजे. हा कॅबिनेट मंत्रांचा प्रश्न असल्यामुळे आजचे सभागृहापुढील कामकाज तहकूब करुन या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे जेणे करुन ही बाब राज्यातील जनतेला देखील समजेल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातमीच्या आधारावर सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला आहे. मंत्र्यांनी आणखी एक बंगला वास्तव्यासाठी वापरला अशा प्रकारची माहिती सदनामध्ये देण्यात आली आहे. जर शासनाची एखादी मालमत्ता अशा पध्दतीने एखाद्या निवृत्त कर्मचा-याने वापरली, निवृत्त विधानसभा किंवा विधानपरिषद सदस्यांनी वापरली तर त्याबाबतीत स्पष्ट नियमावली आहे. म्हणून मंत्री महोदयांनी बंगला वापरला आहे का, बंगला किती दिवस आणि कोणत्या नियमाखाली वापरला यासंबंधीची माहिती निश्चितपणे घेण्यात येईल आणि एक आठवडयाच्या आत या प्रकरणी या सदनामध्ये खुलासा करण्यात येईल.

**सभापती** : तांत्रिकदृष्टया आज जो नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे त्यानुषंगाने आजच्या कामकाजपत्रिकेवर कोणताही विषय नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी प्रस्तावाच्या संदर्भात प्रतिपादन केलेले आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी शासनाची भूमिका विशद केलेली आहे. मी या प्रस्तावाला अनुमती नाकारीत आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे या विषयाच्या संदर्भातील संपूर्ण माहिती शासनाने सदनासमोर ठेवावी. आवश्यकता असल्यास या विषयावर कोणत्या पध्दतीने चर्चा करता येईल किंवा कोणते आयुध वापरता येईल यासंबंधी मी माझा निर्णय वेगळया पध्दतीने देईन.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती**......

दुसरा एक नियम 289 अन्वये जो प्रस्ताव आहे तो प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री.कपिल पाटील,जयंत पाटील,जैनुद्दीन जव्हेरी यांनी दिलेला आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय,काल संध्याकाळी बोरीवली येथे बाभई नाक्यावरती "लक्ष्मी छाया " नावाची 20 वर्षांपूर्वीची जुनी इमारत पत्त्यांचा इमला कोसळावा तशी कोसळलेली आहे. अतिवृष्टी सुरु झाली की मुंबईमध्ये अनेक इमारती कोसळतात पण तशा प्रकारची इमारत ही नव्हती. काल रात्री घटनास्थळी माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वित्त मंत्री, पालक मंत्री, आयुक्त देखील उपस्थित होते,या सर्व मंडळींनी तेथील ते भयावह दृश्य पाहिलेले आहे.

डॉ.दीपक सावंत : घटनास्थळी काल मुंबईच्या महापौर देखील उपस्थित होत्या.

श्री.कपिल पाटील : होय. घटनास्थळी काल मुंबईच्या महापौर देखील उपस्थित होत्या.

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे एकलव्य आहेत, त्यांना फक्त माननीय मुख्यमंत्रीच दिसतात.

**सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी आता सभागृहामध्ये मात्र माझ्याकडे बघून बोलावे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये देखील एकलव्याप्रमाणे माननीय सभापतींकडेच लक्ष द्यावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, काल रात्री बोरीवली येथील लक्ष्मीछाया ही इमारत कोसळण्याच्या घटनेमुळे अनेक निरपराध माणसांचा की, ज्यांचा काहीही दोष नाही त्यांचा नाहक बळी गेलेला आहे व अशा प्रकारे जिवित हानी मोठयाप्रमाणात झालेली आहे. सभापती महोदय, सदर इमारत कोसळल्याच्या निमित्ताने एक फार मोठी बाब सभागृहाच्या समोर येत आहे, म्हणून या प्रस्तावावर चर्चा होणे आवश्यक आहे. या इमारतीच्या तळमजल्यावरती एक ज्वेलर आहे त्याने आपल्या दुकानामध्ये दुरुस्ती कामासोबतच जे खोदकाम केले, त्याच्यामधून ही बाब समोर आलेली आहे. या ज्वेलरने केलेल्या कामामुळे या बिल्डींगचे कॉलम्स व पिलर्स पोकळ झाले होते आणि त्यामुळे सगळे मजले एकाच जागी पडले फक्त एक पाण्याची टाकी जी होती ती बाजूला फेकली गेली. इमारतीमधील दोन विंग एकाच जागी कोसळून पडलेल्या आढळून आल्या. मुंबईमध्ये आणि उपनगरामध्ये अनेक ज्वेलर्सने त्यांच्या तळमजल्यावरील दुकानांमध्ये बेकायदेशीर तळघरे तयार

श्री.कपिल पाटील......

तयार केलेली आहेत,पाच ते सहा फूट खाली खोदकाम करुन एक पोटमाळा तयार करावयाचा आणि त्याच्यामध्ये एक तळघर तयार करावयाचे हे तळघर तयार करणारे कामगारही अतिशय वाईट अवस्थेत काम करीत असतात,ही अतिशय गंभीर अशा प्रकारची बाब या इमारतीच्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आलेली आहे. केवळ या इमारतीचाच हा मुद्दा नाही तर मुंबईतील व उपनगरातील अनेक इमारतींना अशा प्रकारचा धोका संभवू शकतो, म्हणून या गंभीर प्रश्नावर आजचे कामकाज बाजूला ठेवून चर्चा झाली पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री.जयंत पाटील व मधुकर चव्हाण आपल्याला या विषयावर जर काही बोलावयाचे असेल तर त्याची संधी यानंतर आपल्याला देण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मुंबईमध्ये एखादी इमारत कोसळल्यानंतर त्या बिल्डींगखाली चिरडून माणसे मृत पावणे हा नेहमीचाच एक प्रयोग होत चालला आहे. बोरीवलीमध्ये जी इमारत पडली तेथे सन्माननीय उपमुख्यमंत्री साहेब देखील होते. ही इमारत कोसळली त्या पाठीमागे एक नाही तर अनेक कारणे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी ज्याप्रमाणे तळमजल्यावरील ज्वेलर्सच्या गुप्त तळघरांबाबत सांगितले, त्याप्रमाणे ज्यांची तळमजल्यावर दुकाने आहेत, ते तेथे खोदकाम करुन तळघरे काढतात आणि महानगरपालिकेची शासकीय अधिकारी जे आहेत ते या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करतात किंवा तडजोड करतात आणि लोकांचा जीव धोक्यामध्ये येईल अशा प्रकारच्या अनेक घटना मुंबईमध्ये घडतात तसेच, या मुंबई शहरामध्ये अशा प्रकारचे भुयारी मार्ग,खोल्या तयार झालेल्या आपल्या आढळून येतील. बोरीवलीची ही इमारत कोसळल्याच्या घटनेमध्ये बळी गेला तो तेथे 20 वर्षांपासून राहणा-या लोकांचा. या इमारतीपैकी अर्ध्याच्या वर इमारत तर संपूर्णत : भुईसपाट झाली व तेथे राहणारे तरुण वृध्द,लहान मूले आणि एक तर आठ महिन्याचे कोवळे मूल या सर्वांचा बळी गेला अशा पध्दतीने मुंबई व उपनगरामध्ये या दुर्घटना घडत असतांना खरे म्हणजे शासकीय यंत्रणेने या सर्व गोष्टींवर जेवढे लक्ष पुरवावयाला पाहिजे तेवढे त्यांच्याकडून पुरविले जात नाही व दुर्लक्ष केले जाते हे दुर्लक्ष फक्त एकाच माध्यमातून होते ते माध्यम म्हणजे भ्रष्टाचार. मुंबईमध्ये आज "पैसा द्या आणि काहीही करा" असा प्रकार चाललेला आहे, त्याचा परिणाम म्हणजे मुंबई शहर हे अक्षरश: डबघाईला आलेले आहे, अशा दुर्घटना रोज मुंबईमध्ये घडतांना दिसतात आणि या अनुषंगाने हा जो नियम

C - 3



JPK/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम एम. ....... 12:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार......

289 चा जो प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील व इतर यांनी दिलेला आहे त्यावर या सभागृहामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. सदर घटना घडावयास जे लोक कारणीभूत आहेत त्यांना योग्य ती शिक्षा होणे आवश्यक आहे. भविष्यकाळामध्ये महानगरपालिका अशा गोष्टींवर काटेकोरपणे लक्ष ठेवले पाहिजे व असे प्रकार पुन्हा मुंबईमध्ये घडणार नाहीत, अशा प्रकारचा दिलासा या सदनाला मिळण्याची आवश्यकता आहे. म्हणून या प्रस्तावाचा मी जास्त महत्व देऊन त्याची लवकरात लवकर चौकशी व्हावी, अशी माझी विनम्र विनंती आहे.

यानंतर श्री.कानडे......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मुंबई आणि ठाणे शहरात घाऊक नागरिकरणाचे जे धोके दिसत आहेत त्यामध्ये बोरिवलीची घटना हा एक धोका आहे. मुंबई शहरामध्ये असे प्रकार आता नवीन राहिलेले नाहीत. घटना घडल्यानंतर पेपरमध्ये बातमी येते 25 गेले,30 गेले,35 गेले पण दुसऱ्या दिवशी लोक परत कामावर जातात. दोन शहरांमध्ये माणुसकीचे नाते संपत चाललेले आहे. अनधिकृत बांधकामे होतात त्याबद्दल या सार्वभौम सभागृहात अनेक वेळेला चर्चा होते. मुख्यमंत्री आश्वासन देतात कारण त्यांच्याच अखत्यारित नगरविकास खाते आहे. मुख्यमंत्री सांगतात की जेथे जेथे अनधिकृत बांधकाम होईल किंवा स्ट्रक्चरल बदल करण्याचे परस्पर प्रयत्न केले जातील तेथे संबंधित अधिकाऱ्याला जागच्या जागी सस्पेंड करु. परंतु आजपर्यंत अशा प्रकरणांमध्ये एकही अधिकारी सस्पेंड झालेला नाही. गेल्या पाच वर्षामध्ये ठाणे शहरामध्ये इमारती कोसळून झालेल्या अपघातांमध्ये जवळजवळ 150 माणसे मृत्युमुखी पडलेली आहेत. अनधिकृत बांधकामे बेफामपणे चालू आहेत. मुंबईमध्ये तीच परिस्थिती आहे. अशा घटनांमध्ये राजकारण्यांना दोषी धरले जाते आणि अधिकारी मात्र नामानिराळे राहतात. ठाणे आणि मुंबई शहरामध्ये अनधिकृत बांधकामे चालू आहेत. बांधकाम चालू असताना बिल्डींग इन्स्पेक्टरने तेथे जाऊन चौकशी करावयाची असते. स्ट्रक्चरल बदल केला काय हे पहावयाचे असते. सिमेंट,रेती,वाळू किती प्रमाणात वापरली जात आहे हे पाहण्याची गरज आहे. 11 महिन्यात 10 स्लॅबचे बांधकाम होते. क्यूरींग होत नाही. मुंबईचे शांघाय करण्याचे प्रयत्न होत आहेत परंतु 50 वर्षानंतर या मुंबई शहरामध्ये माणूस राहील किंवा नाही अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणून याप्रश्नावर काय करावयाचे याचा निर्णय घेणे आवश्यक आहे. या घटनेत 20 जण मरण पावले त्यांना नुसती श्रध्दांजली वाहून चालणार नाही. या महत्वाच्या विषयावर चर्चा व्हावयाला पाहिजे अशी माझी आपणांस विनंती आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदसय, अतिशय महत्वाची सूचना माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी मांडली आहे. काही दिवसापूर्वी माटुंगा येथील नवरे इमारत कोसळली होती. तसेच काही वर्षापूर्वी खेरवाडी येथील गोविंद टॉवर ही इमारत कोसळून अनेकांचा मृत्यू झाला होता. मुंबईमध्ये 10x10 च्या खोलीमध्ये चार फळया टाकून पोटमाळा काढण्याचा प्रयत्न केला तर अधिकारी संबंधितांना नोटिसा बजावतात आणि त्यांच्यामागे ससेमिरा लावतात. मुंबई शहरामध्ये मोठमोठे टॉवर उभे राहिले आहेत. त्याच्यामध्ये स्ट्रक्चरल डॅमेज होते अशा ठिकाणी अधिकाऱ्यांवर

......2

कारवाई होत नाही. नवरे बिल्डींग पडली त्यावेळी साश्रूनयनांनी आपण मृतांना श्रध्दांजली अर्पण केली. अनेक ठिकाणी स्ट्रक्चरल बदल केले जातात. यासाठी कायद्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. खून,मारामाऱ्या,दरोडे यासाठी जशी आयपीसी कलमामध्ये शिक्षेची तरतूद आहे त्याप्रमाणे अशा घटनांमध्ये जे बळी गेले असतील त्याबाबतीत संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यासाठी कायद्यात बदल करण्याची आवश्यकता आहे. चर्चेच्या उत्तरामधून काही तरी नवनीत निघाले पाहिजे. बेफामपणे बदल केले जात आहेत. नवीन इमारती बांधल्यावर दोन बेडरुम, तीन बेडरुमच्या ब्लॉकमध्ये भिंती पाडून स्ट्रक्चरल बदल केले जातात. बीम,स्लॅब तोडले जातात. मुंबई सगळयांची आहे. परंतु बांधकाम करताना नियम मात्र पाळावयाचे नाहीत. म्हणून याविषयावर चर्चा करावी अशी माझी आपणांला विनंती आहे. अतिशय महत्वाच्या अशा विषयावर योग्य ती वेळ ठरवून तात्काळ चर्चा सुरु करावी अशी मी आपणांस विनंती करतो आणि माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्याला मी सहमती दर्शवून माझे दोन शब्द संपवितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. काल बोरिवलीमध्ये दुर्देवाने इमारत कोसळण्याची घटना घडली. अजूनही पुरेसा पाऊस सुरु झालेला नाही. मुंबईमध्ये दरवर्षी अशा प्रकारे इमारती कोसळतात आणि लोक मृत्युमुखी पडतात,शेकडो जखमी होतात. 20 वर्षापूर्वी बांधलेली इमारत एवढया लवकर कशी पडते आणि पाऊस नसताना पडते हे बरोबर वाटत नाही. इमारत पडली त्याठिकाणी ढिगारे उपसण्याचे काम सुरु आहे. मृतांचा आकडा शेवटपर्यंत किती जाईल हे सांगता येणार नाही. अशा प्रकारच्या अनेक इमारती या क्षेत्रामध्ये आहेत. खाली ठोकळा ठोकला तरी वरच्या मजल्यापर्यंत आवाज जातो आणि अशा इमारती पडण्याची शक्यता आहे....

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

19-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) E.1

SGB/ KGS/ MAP/ 12:20

श्री.पांडुरंग फुंडकर..........

म्हणून सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी मांडलेल्या या प्रस्तावावर शासनातर्फे निवेदन करुन भागणार नाही, तर या गंभीर विषयावर सविस्तर चर्चा होण्याची आवश्यकता आहे. भविष्यात अशा प्रकारे इमारती पडणार नाहीत म्हणून महानगरपालिकेने दखल घेण्याची आवश्यकता आहे. लक्ष्मी छाया ही इमारत कोसळली याची संपूर्ण चौकशी होण्याची गरज आहे. त्यासाठी आपण चर्चेला मान्यता द्यावी अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, एका गंभीर प्रश्नाकडे या सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे. काल बोरीवली येथील बाभई भागातील लक्ष्मी छाया या इमारतीचा निम्मा भाग कोसळला. मी घटनास्थळी रात्री उशिरा भेट दिली. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील भेट दिली. एकंदरीत तेथील चित्र अतिशय विदारक आणि हृदयद्रावक होते. या इमारतीमध्ये 24 फ्लॅट व तळमजल्यावर 9 दुकाने होती. ए विंगमधील 12 फ्लॅट कोसळले. लक्ष्मी छाया ही इमारत 1978-79 साली बांधण्यात आली होती.

सभापती महोदय, या मुंबई शहरामध्ये 1940 पूर्वी बांधलेल्या आज सुध्दा अनेक इमारती अस्तित्वात आहेत. अशा अनेक इमारती पडू शकतात, ज्यांचा डेंजर झोनमध्ये समावेश केलेला आहे. त्या इमारतींसाठी दुरुस्ती मंडळ निर्माण केले आहे. हे खरे आहे की, या मंडळाचे काम संथ गतीने सुरु आहे. एक तर निधीचा प्रश्न आहे. दुसरी गोष्ट म्हणजे रहिवासी सुध्दा योग्य पध्दतीने सहकार्य करीत नाहीत. ट्रान्झिट कॅम्पमध्ये पाठविल्यास तेथे जायची त्यांची तयारी नसते. या डेंजर झोनमधील इमारतींबाबत अडचण आहे. प्रत्येक वर्षी पावसाळा सुरु झाला की, एखादी इमारत कोसळून जीवितहानी होते. त्यावर फार गांभिर्याने चर्चा केली जाते. पावसाळा संपला की, पुन्हा रहिवाशांचे तेथे जीवन सुरु होते आणि थोडे दुर्लक्ष होते. डेंजर झोनमधील इमारतींची जी यादी तयार करण्यात आली, त्या यादीमध्ये या इमारतीचा समावेश नाही. 1978-79 मध्ये ही इमारत बांधण्यात आली होती. अचानकपणे ही इमारत कोसळल्यामुळे एकूण 24 जण ठार झाले आणि आणखीही काही डेड बॉडीज मिळण्याची शक्यता आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी निवेदनाला प्रतिवाद करण्यासाठी उभा नाही. सन्माननीय उपमुख्यमंत्री म्हणाले की, रहिवासी ट्रान्झिट कॅम्पमध्ये जाण्यास तयार नाहीत. डेंजर झोनमध्ये असलेल्या इमारतींची यादी तयार केली आहे. ही यादी मुंबई शहरातील जुन्या इमारतींची आहे. उपनगरातील इमारतींसाठी कायदा तयार केला पाहिजे अशी मागणी करुनही कायदा तयार केला जात नाही. म्हणूनच या विषयावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे. या चर्चेतून अनेक गोष्टी बाहेर येतील. मुंबई शहरासाठी कायदा वेगळा आहे. उपनगरासाठी कायदा नाही. आज उपनगरातील अनेक चाळी आहेत, त्यांची मागणी आहे की, आम्हाला अस्तित्वात असलेल्या कायद्यामध्ये सामावून घ्यावे. उपनगरातील 1940 पूर्वीच्या इमारतींना सेस लागू नाही.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी त्यांच्या मताशी सहमत आहे. एखाद्या घटनेमध्ये 24-24 माणसे मृत्यूमुखी पडतात आणि आणखी काही डेड बॉडीज मिळण्याची शक्यता आहे, इतकी माणसे मृत होत असतील तर यापेक्षा दुसरा महत्वाचा प्रश्न असू शकत नाही. या प्रश्नावर धोरणामध्ये काही बदल करावे लागणार असतील तर ते करावे लागतील. काही उपनगरे समाविष्ट करावयाची असतील तर त्याचाही विचार गांभिर्याने करावा लागेल. कोणत्याही राजसत्तेचे जनतेच्या जीविताचे रक्षण करणे यापेक्षा दुसरे महत्वाचे काम असू शकते असे मला वाटत नाही. कालच्या घटनेत 24 व्यक्ती ठार झाल्या, 16 जण गंभीर जखमी झाले. त्यातील 4 लोक आयसीयूमध्ये ॲडमिट आहेत. पोलिसांनी अकस्मात मृत्यूचा गुन्हा क्र.55/07 अन्वये नोंदविला आहे. पवई आय.आय.टी.यांच्याकडे ढिगाऱ्याचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. महानगरपालिकेकडून सुध्दा नमुन्यांची तपासणी करण्यात आली आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

आता पर्यंत ढिगारे उपसण्याचे 50 टक्के काम झाले असून 50 टक्के काम बाकी आहे. बाकीचे सर्व काम सोडून, चौकशी सोडून रेस्क्यू ऑपरेशन सुरु आहे. कारण ढिगा-या खालून लोकांचे "आम्हाला वाचवा, आम्हाला वाचवा" असे मोबाईल वरुन फोन येत आहेत. शास्त्रीय दृष्टिकोनातून फायरब्रिगेड, मुंबई महानगरपालिकेतील त्या त्या क्षेत्रातील तज्ञ लोकांचे मार्गदर्शन घेऊन मदत घेतली जात आहे व ढिगा-या खाली जे जिवंत लोक आहेत त्यांना बाहेर काढण्याचे काम प्राथम्याने सुरु आहे व त्यासाठीच रेस्क्यु ऑपरेशन सुरु आहे. या दुर्घटनेमुळे ज्या लोकांना रुग्णालयात ॲडमिट केले आहे त्यांच्यावर शासनाच्या वतीने पूर्णपणे औषधोपचार सुरु आहे. या दुर्घटनेमध्ये जे लोक मृत्यू पावले आहेत त्यांना शासनातर्फे मदत घोषित करण्यात आलेली आहे. या ठिकाणी इमारत पडल्यामुळे जी दुर्घटना झाली त्यामुळे या ठिकाणी हा विषय उपस्थित करण्यात आलेला आहे. या शहरातील जुन्या इमारती असो किंवा उपनगरातील जुन्या इमारती असो त्याच बरोबर केवळ जुन्याच इमारती कोसळतात असे आपण गृहीत धरीत असू तर ही पडलेली इमारत 1978-79 मध्ये बांधण्यात आली होती. ही इमारत डेंजर झोन मधील सुध्दा नव्हती असे असतानांही ही इमारत पडून दुर्घटना झ ालेली आहे. अशा इमारती का कोसळत आहेत याबद्दल सरकारला विचार करावा लागणार आहे. ही इमारत कोसळण्यामागे या इमारतीच्या स्ट्रक्चरला भाडेकरुनी, मालकांनी किंवा शॉप मालकांनी धक्का लावला होता का, त्यामध्ये काही बदल करण्यात आले होते का याची सुध्दा आपल्याला चौकशी करावी लागणार आहे. जे लोक स्वत:चे घर घेतात ते त्यामध्ये काही तरी बदल करीत असतात. फ्लॅटमध्ये बदल करु नये यासाठी शासकीय यंत्रणाही अस्तित्वात आहे परंतु काही बडया लोकांपुढे ही यंत्रणाही नांगी टाकत असते आणि नको ते बदल लोक आपल्या फ्लॅट मध्ये करीत असतात. हा बदल करतांना पिलरला धक्का लावला जातो, पिलरच्या खालचा मलबा काढला जातो व त्यामुळे इमारतीला धोका निर्माण होत असतो. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात या सदनात सविस्तरपणे चर्चा करण्यास सरकार तयार आहे. या चर्चेमधून जर सदस्यांकडून काही सूचना आल्या तर यासंदर्भात सर्वंकष धोरण ठरवतांना त्याचा उपयोग होऊ शकेल. यासर्वंकष धोरणामुळे ही इमारत का पडली, ही इमारत पडण्यामागचे कारण कोणते होते, या घटनेला जबाबदार कोण आहेत अशा सगळया बाजुने विचार करुन, तपासणी केली जाईल व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

श्री. आर.आर.पाटील....

यामध्ये जे दोषी असतील असतील त्यांना कडक शिक्षा केली जाईल व भविष्यात अशा प्रकारची चूक करण्याची कोणी हिंमत करणार नाही अशा पध्दतीने चौकशी करुन संबंधितांना दोषी धरुन निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मागे सुध्दा खेरवाडी येथील गोविंद टॉवरची इमारत कोसळली होती त्यावेळी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी समिती नेमून यासंदर्भात अहवाल दिलेला आहे. या अहवालामध्ये कोणकोणत्या सूचना करण्यात आल्या होत्या त्याचाही आपल्याला उपयोग होऊ शकेल. तसेच यासंदर्भात जो अहवाल आलेला आहे तो मात्र इम्प्लीमेंट होत नाही. या अहवालाचा आपल्याला निर्णय घेण्यामध्ये बरीच मदत होऊ शकेल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मालाड येथील लिबर्टी इमारत सुध्दा अशाच पध्दतीने पडलेली आहे.

**सभापती** : ज्यावेळेस या विषयावर चर्चा होईल त्यावेळेस आपण आपले विचार मांडावेत.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी एक एक मुद्दे न मांडता जेव्हा चर्चा आयोजित केली जाईल तेव्हा सन्माननीय सदस्यांनी आपले विचार सविस्तरपणे व्यक्त केले तर शासनाला सुध्दा यासंदर्भात सर्वंकष धोरण आखून सविस्तर निवेदन करता येईल.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, या सभागृहात अनेक सिनिअर सदस्य आहेत. प्रा. बी.टी. देशमुख साहेब हे सुध्दा या सदनाचे सिनिअर सदस्य आहेत. या सभागृहात सर्व सन्माननीय सदस्य प्रथा-परंपरा पाळत असतात. कोणी सन्माननीय सदस्य बोलत असेल तर मधून कोणी क्रॉस करीत नाही किंवा सदस्य बोलत असतांना खिशात हात घालून आपले विचार व्यक्त करीत नाहीत. सभागृहात येंतांना डोक्यावर टोपी किंवा फेटा घातला असेल तर तो सभागृहात काढावयाचा नसतो. परंतु येथे मघाशी सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सांवत सभागृहात आले होते तेव्हा त्यांच्या डोक्यावर भगवा फेटा होता व जागेवर बसून त्यांनी आपला फेटा आपल्या ड्राव्हरमध्ये ठेवला.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.जुन्नरे... 12:30

श्री.छगन भुजबळ....

तेव्हा आपण त्यांना आदेश द्यावेत की, त्यांना तसे करता येणार नाही. त्यांनी पुन्हा डोक्यावर फेटा घातला पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.छगन भुजबळ यांनी सभागृहातील संकेताबद्दल सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत हे सूज्ञ आणि समंजस सदस्य आहेत. ते सभागृहात फेटा घालून आलेले आहेत, तेव्हा त्यांनी फेट्याचा मान राखावा अशी माझी इच्छा आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत सभागृहात फेटा घालून आले तर त्यांना तो काढता येणार नाही. त्यांनी फेटा काढला असेल तर त्यांना परत कसा घालता येईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी ज्या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे तो विषय आजच्या कामकाजावर नसल्यामुळे तांत्रिकदृष्टया हा प्रस्ताव मान्य करता येणार नाही. त्यामुळे मी नियम 289 अन्वये दिलेली सूचना स्वीकारीत नाही. परंतु त्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत गंभीर असल्यामुळे त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे. तेव्हा मी या विषयावर नियम 97 अन्वये चर्चा घेण्याचे ठरविले आहे.

आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.मधुकर सरपोतदार व अन्य सदस्य यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी मला विनंती केल्यानुसार नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर आज चर्चा होणार नाही. या प्रस्तावावर मंगळवार, दिनांक 24 जुलै, 2007 रोजी चर्चा घेण्यात येईल.

तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री.धोंडीराम राठोड आणि सुधाकर गणगणे यांचा गतसत्रातील प्रलंबित प्रस्तावावरील चर्चा व्हावयाची आहे. या प्रस्तावावर सात-आठ सन्माननीय सदस्यांची भाषणे झालेली आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांचे भाषण सुरु असताना ही चर्चा थांबविण्यात आली होती. त्या ऑन लेग आहेत. त्यांचे भाषण संपल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे भाषण होईल व त्यानंतर मंत्र्यांचे उत्तरादाखल भाषण होईल. त्यानंतर 97 अन्वये चर्चा घेण्यात येईल. ही चर्चा मंत्र्यांच्या उत्तरासह अडीच तासात पूर्ण करायची आहे.

..2..

19-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) G-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नियम 97 अन्वये चर्चेच्या अगोदर अर्धा-तास घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अर्धा-तास चर्चा ठरल्याप्रमाणे घेण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की..........

**सभापती** : मी निर्णय दिलेला आहे. आता मी प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करतो.

.....3..

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्याच्या पोलीस महासंचालकांच्या कोट्यावधी रुपयांच्या मालमत्ता खरेदी-विक्रीची चौकशी**

**(1) * 29327 श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.केशवराव मानकर , श्री. जगदीश गुप्ता , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. संजय केळकर , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. अरविंद सावंत , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. दिवाकर रावते** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोट्यावधी रुपयांच्या मालमत्ता खरेदी विक्री व्यवहारा मध्ये वादग्रस्त ठरलेले राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या मालमत्ता व्यवहाराची चौकशी करण्याची घोषणा मा. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी माहे, एप्रिल, 2007 च्या शेवटच्या आठवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्यानुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली अप्पर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग आणि लाचलूचपत प्रतिबंधक विभागाचे महासंचालक यांची त्रिस्तरीय चौकशी समिति नेमण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, समितीला आवश्यकतेनुसार कोणालाही चौकशीसाठी बोलावयाचे अधिकार देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, सदरहू समितीने एका महिन्यात आपला अहवाल शासनाला सादर करण्याचा आदेश दिला आहे, हे खरे आहे काय,

(5) असल्यास, समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, असल्यास शिफारशी काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

श्री.आर.आर.पाटील : (1) राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या मालमत्ता व्यवहाराची चौकशी करण्याची घोषणा माननीय उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी दिनांक 13 एप्रिल, 2007 रोजी केली आहे, हे खरे आहे.

(2) होय.

(3) होय.

(4) होय. तथापि दिनांक 17 मे 2007 पासून ही मुदत एक महिन्याने वाढविण्यात आली होती.

(5) सदर अहवाल नुकताच प्राप्त झाला असून शासन स्तरावर या अहवालाची छाननी करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29327......

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक चारच्या सुधारित उत्तरात म्हटले आहे की, " ..... दिनांक 17 मे, 2007 पासून ही मुदत 1 महिन्याने वाढविण्यात आली होती." या संदर्भात असे आदेश होते की, या संपूर्ण प्रकरणाचा अहवाल समितीने शासनाला एक महिन्यात सादर करावा. असे असताना एक महिन्याची मुदत वाढवून देण्यात आलेली आहे. पुढील उत्तरात असे म्हटले आहे की,"सदर अहवाल नुकताच प्राप्त झाला असून शासन स्तरावर या अहवालाची छाननी करण्यात येईल." तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, शासनाकडे जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्यामध्ये सकृतदर्शनी काय दिसून आले आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, समितीला एक महिन्याची मुदत वाढवून देण्याचे कारण म्हणजे सर्व कागदपत्रांची व रजिस्टर यांची छाननी करायची होती. त्यासाठी समितीने दहा बैठका घेतल्या होत्या. एक महिन्यात पूर्ण डिटेल चौकशी होणे शक्य नसल्यामुळे एक महिन्याची मुदत वाढवून देण्यात आलेली आहे. समितीने तीन दिवसांपूर्वीच म्हणजे दिनांक 16 जुलै, 2007 रोजी शासनाकडे अहवाल सादर केलेला आहे. त्या अहवालाची छाननी करण्यास विभागाला एक-दोन दिवस लागतील. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अहवालात सकृतदर्शनी काय आढळून आले असा प्रश्न विचारलेला आहे.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29327....

श्री.आर.आर.पाटील....

त्यावेळी प्रॉपर्टीज् खरेदी करण्यात आल्या, अशा पध्दतीचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. परंतु सकृतदर्शनी असे आढळून आले आहे की, प्रॉपर्टीज् खरेदी करण्यात आल्या नव्हत्या. परंतु काही प्रॉपर्टीज् खरेदी करण्यासाठी ॲडव्हॉन्स देण्यात आला होता. तसेच, काही गोष्टीबाबतीत समितीला योग्य पुरावे आढळून आले नाहीत. तथापि, या अहवालाच्या बाबतीत शसनाचे योग्य मत होण्याच्या दृष्टीने या अहवालाची पूर्ण छाननी व्हावी लागेल. एका आठवडयाच्या आत अहवालाची छाननी पूर्ण होईल की, ज्यामध्ये प्रश्नांची सविस्तर उत्तरे सदनासमोर ठेवण्यात येतील. एवढी मोठी व्याप्ती असतानासुध्दा या समितीने अहवाल पूर्ण केलेला आहे. छाननीसाठी एका आठवडयाचा पिरिअड असून अधिवेशनापूर्वी या अहवालामध्ये काय शिफारशी करण्यात आल्या, त्यातील कोणत्या शिफारशी गृह विभागाच्या आहेत, ही सगळी माहिती सदनापुढे ठेवण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, एक महिन्यात चौकशी केली जाईल अशाप्रकारचे आश्वासन त्यावेळी सदनामध्ये दिल्यानंतर आपण समिती स्थापन केली. या समितीसमोर आपण टर्म्स् ऑफ रेफरन्स काय दिले होते ? प्रथम या समितीमध्ये तत्कालीन मुख्य सचिव होते, त्यांची बदली झाल्यानंतर नवीन सचिव आले. त्या नवीन सचिवांनी या टर्म्स् ऑफ रेफरन्समध्ये काही बदल केले का ? असल्यास, ते कोणते ? नेमक्या टर्म्स् ऑफ रेफरन्स कोणत्या ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी ज्यावेळी अहवाल आपल्यासमोर ठेवेन, त्यावेळी टर्म्स् ऑफ रेफरन्सचा उल्लेख त्यामध्ये निश्चितपणे असेल. या सगळया प्रकाराच्याबाबतीत ज्यावेळी विधानसभा आणि विधान परिषद सभागृहामध्ये स्थगन प्रस्ताव उपस्थित झाला, त्यावेळी जे प्रश्न उपस्थित झाले त्याबाबतीत टर्म्स् ऑफ रेफरन्स म्हणून देण्यात आल्या. त्या व्यापक प्रमाणात होत्या. यासंदर्भातील चौकशीची मुदत मात्र केवळ एक महिन्यांची दिली होती. ही सगळी चौकशी करण्यासाठी ज्या टर्म्स् ऑफ रेफरन्स देण्यात आल्या होत्या, त्याला खूप कालावधी लागला असता. ही सगळी चौकशी पूर्ण करण्यासाठी इतर चौकशाप्रमाणे कित्येक महिने व कित्येक वर्षे लागली असती. याठिकाणी शासनाच्या वतीने समितीला टर्म्स् ऑफ रेफरन्स देण्यात

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29327....

श्री.आर.आर.पाटील.....

आले होते. ते असे की, विधानसभा आणि विधान परिषद या दोनही सदनामध्ये सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले होते, त्या प्रश्नांची सखोलपणे चौकशी करावी, अशाप्रकारे आपण टर्म्स् ऑफ रेफरन्स मुख्य सचिवांना दिले होते. यामध्ये कुठलाही प्रश्न डिलीट करु नये अशा सूचनाही मुख्य सचिवांना देण्यात आल्या होत्या.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अधिवेशन संपण्यापूर्वी अहवालाची छाननी करुन माहिती सभागृहासमोर येईल. परंतु त्यावेळी आम्हास प्रश्न विचाण्यास संधी राहील की ती माहिती फक्त पटलावर ठेवण्यात येईल ? मला असे वाटते की, त्यावेळी आम्हाला बोलण्याची संधी मिळाली तर आम्ही आता प्रश्न विचारणार नाही. कोणाच्या मुलाकतीनंतर ते बोलले, श्री.गायके यांनी जे स्टेटमेंट दिले, त्यावर विश्वास ठेवला की नाही, असे अनेक प्रश्न आम्हाला विचारावयाचे आहेत. आता आपण अहवालाची छाननी करणार आहात, त्यामुळे आता आम्हाला प्रश्न विचारता येणार नाहीत. मला एवढयाच बाबतीत संरक्षण पाहिजे की, ज्यावेळी छाननी करुन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल त्यावेळी त्यावर प्रश्न विचारण्यास आम्हाला संधी मिळाली पाहिजे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, शासनाचा कुठलाही अहवाल ज्यावेळी सदनासमोर येतो, त्यावेळी त्या अहवालाच्या संदर्भात सर्वांचे समाधान होणे आवश्यक आहे. त्यातील सगळी माहिती सदनाला कळली पाहिजे. एक तर आम्ही संपूर्ण अहवाल, त्यातील टर्म्स् ऑफ रेफरन्सेस व त्यावर निघालेले निष्कर्ष हे सविस्तरपणाने सदनासमोर ठेऊ. त्यामुळे आपणांस उप प्रश्न विचारण्याचीही संधी राहणार नाही. परंतु तरीही आपले समाधान झाले नाही तर एक अपवादात्मक बाब म्हणून त्यावर उत्तर देण्याची सरकारची तयारी राहील. ज्या दिवशी आम्ही अहवाल सदनासमोर ठेऊ त्या दिवशी त्यावर सविस्तर प्रश्नही आपण विचारु शकाल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, यामध्ये सकृतदर्शनी काय आढळले, याबाबत माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, त्यांनी ॲडव्हॉन्स दिला होता. परंतु प्रॉपर्टी खरेदी केली नाही, त्यांनी फक्त ॲडव्हॉन्स दिला होता. यातून इन्टेन्शन क्लिअर होते की, ॲडव्हॉन्स दिल्यानंतर प्रॉपर्टी ही खरेदी करणारच. त्यामुळे याबाबतीत आपल्याला असे वाटत नाही का की, त्या अर्थी तो सकृतदर्शनी दोषी होता ?

नंतर श्री.रोझेकर...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.29327 पुढे सुरु...........**

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मालमत्ता खरेदी करण्यास किंवा ॲडव्हान्स देण्यास प्रशासनातील अधिका-यांवर निर्बंध नाहीत. कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, जर एखाद्या अधिका-याने मालमत्ता खरेदी केली किंवा ॲडव्हान्स दिला तर त्याबाबतची माहिती त्यांनी शासनाला कळविली पाहिजे. तसेच आयकर प्रपत्रात देखील त्याबाबतची माहिती दिली पाहिजे. परंतु, शासनाला माहिती न देता परस्पर मालमत्ता खरेदी केली तर ते अधिकारी दोषी ठरतात. यासंदर्भात जी माहिती सदनासमोर आली आहे त्यावरुन असे दिसून येते की, संबंधितांनी शासनाला पूर्वकल्पना देऊन मालमत्ता खरेदी केली आहे. जर शासनाला कल्पना देऊन मालमत्ता खरेदी केली असेल तर तो कायद्यातील तरतुदीचा भंग होतो किंवा कसे, ही सर्व माहिती अहवालामधून स्पष्ट होईल. त्यामुळे यावर अधिक वेळ न घालवता ज्या दिवशी अहवाल पटलावर ठेवला जाईल त्या दिवशी जर काही उपप्रश्न सन्माननीय सदस्यांना विचारावयाचे असतील तर ते त्यांनी विचारावेत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ज्यावेळी या विषयासंबंधी चर्चा झाली होती त्यावेळी एक महत्वाचा मुद्दा उपस्थित झाला होता. आपल्या हे लक्षात असेल की, काही अधिकारी परस्पर द्वेषामुळे आपल्याच सहकारी अधिका-यांची माहिती वृत्तपत्रांना देऊन वादळ निर्माण करतात. यापूर्वी एस.आय.टी.संबंधी अशा प्रकारची चर्चा झाली होती. पोलीस आयुक्तपदी असलेल्या व्यक्तिला जेलमध्ये जावे लागते, नंतर न्यायालयातून निर्दोष सुटल्यानंतर या व्यक्तिच्या आयुष्यात काय घडले असेल, याची कल्पना आपल्याला येऊ शकेल. ज्यावेळी श्री.पसरिचा यांच्यासंदर्भात सभागृहात चर्चा झाली होती त्यावेळी व्यक्तिगत द्वेषापोटी आपल्याच सहकारी अधिका-यांच्या तक्रारी होतात या मुद्याचा समावेश चौकशी समितीला जे टर्म्स ऑफ रेफरन्स दिले जातील त्यामध्ये करावा, अशा प्रकारची मागणी करण्यात आली होती. टर्म्स ऑफ रेफरन्समध्ये या मुद्याचा समावेश करण्यात आला आहे की हा मुद्दा वगळण्यात आला आहे ? उच्च पदावर असलेल्या पोलीस अधिका-यांना जीवनातून उठवण्याची संधी वर्तमानपत्रातून चर्चा करुन साधली जाते व त्यामुळे त्या अधिका-याला भयानक परिणाम आयुष्यभर भोगावे लागतात. त्यामुळे भविष्यात अशा प्रकारे आरोप-प्रत्यारोप करण्यास कोणी अधिकारी धजावणार नाही यासाठी हा मुद्दा टर्म्स ऑफ रेफरन्समध्ये समाविष्ट करावा, असे ठरले होते. ते तसेच आहे काय ?

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.29327 पुढे सुरु...........</u>**

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधानसभेत व विधानपरिषदेत या विषयावर जी चर्चा झाली होती व जे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते ते सर्व टर्म्स ऑफ रेफरन्समध्ये घेण्यात आले आहेत, त्यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. यासंदर्भातील चौकशी समितीचे निष्कर्श काय आहेत ते सर्व अहवालात देण्यात येतील.

----------------

..3..........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.32877**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

**सभापती** : आज दिनांक 19/07/2007 रोजी सभागृहात उपस्थित राहू शकणार नसल्याबाबत सन्माननीय सदस्य, श्री.अरुण गुजराथी यांनी मला पत्राव्दारे सूचित केले आहे.

---------------

..4.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औरंगाबाद शहरातील उघडकीस आलेल्या सेक्स स्कॅंडलबाबत**

**(३) * २९३४८ डॉ. निलम गोऱ्हे , श्री. श्रीकांत जोशी , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. रामनाथ मोते , श्री.विक्रम काळे , श्री. नितीन गडकरी , श्री. जगदीश गुप्ता , श्री. प्रतापराव सोनवणे , डॉ. एम. ए. अझिज , श्री. अनिल परब , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे , मेजर सुधीर सावंत , श्री.सय्यद जामा , श्री. सुधाकर गणगणे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील क्रांतीचौक पोलिस स्टेशन यांनी उघडकीस आणलेल्या सेक्स स्कॅंडल युवतीने दिलेल्या जबानीनुसार संबंधित पोलिस अधिकारी व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशीचा निर्णय काय आहे,

(३) सेक्स स्कॅंडलमधील गुंतलेल्या पोलिस अधिकारी व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांवर तेथील पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) आतापर्यंत किती आरोपींना अटक केली आहे, त्यांची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.सिद्धाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) होय,

(२), (३) व (४) सदर प्रकरणी पिडीत मुलीने दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे क्रांतीचौक, औरंगाबाद, शहर येथे गु.रं.नं. १६०/२००७ कलम ३७६,३७६(२) (ग), ३७२, ३७३, ३६६ (अ), ३५४, ३४२, ३४४, २९२ व ३४ भा.दं.वि. व सह कलम ३,४,५ अनैतिक देह व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये दिनांक २२ एप्रिल, २००७ रोजी गुन्हा दाखल करुन गुन्ह्याचा तपास करण्यात आला. तपासामध्ये तीन पोलीस अधिकारी व तीन पोलीस कर्मचारी यांचे सह एकूण १८ आरोपी निष्पन्न झालेले आहेत. पैकी सात आरोपींना अटक करण्यात आली असून ते सद्य: न्यायालयीन कोठडीत आहेत. दोन आरोपी फरार आहेत व इतर आरोपींनी उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केले आहेत. यातील दोन पोलीस कर्मचाऱ्यास व एक पोलीस अधिकाऱ्यास निलंबित केले असून उर्वरीत दोन पोलीस अधिकारी व एक पोलीस कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई चालू आहे. गुन्ह्याचा तपास दिनांक १ मे, २००७ पासून रा.गु.अ. विभाग करीत आहे.

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उपप्रश्न क्रमांक २, ३ व ४ च्या उत्तरात सुधारणा आहे. या उपप्रश्नांच्या लेखी उत्तरात "पैकी सात आरोपींना अटक करण्यात आली असून ते सद्य: न्यायालयीन कोठडीत आहेत" असे नमूद करण्यात आले आहे. त्याऐवजी "एकूण १९ आरोपी निष्पन्न झाले असून ८ आरोपींना अटक झाली" असे वाचावे. तसेच, त्यापुढे उत्तरात "दोन आरोपी फरार आहेत" असे नमूद करण्यात आले आहे, ही ओळ वगळण्यात यावी. त्यापुढे "दोन पोलीस कर्मचा-यांस व एक पोलीस अधिका-यास निलंबित केले" असे नमूद करण्यात

..५.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.२९३४८ पुढे सुरु................**

श्री.सिद्धाराम म्हेत्रे............

आले आहे. त्याऐवजी तीन पोलीस कर्मचारी व तीन पोलीस अधिकारी यांना निलंबित केले" असे वाचावे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, या प्रकरणाचा पाठपुरावा आम्ही माननीय गृहमंत्री, श्री.आर.आर.पाटील यांच्याकडे गेल्या दोन-तीन महिन्यांपासून केल्यामुळे हे प्रकरण येथपर्यन्त पोहोचले आहे. यासंदर्भात अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी आरोपींनी औरंगाबाद खंडपीठापुढे अर्ज सादर केले होते. त्यांचे जामीन रद्द करावेत, अशी मागणी आम्ही केली होती. त्यानुसार अटकपूर्व जामीन रद्द करण्याबाबत सरकारने कोणती कार्यवाही केली आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, ही घटना २२ एप्रिल रोजी घडली आहे. आरोपींना किती तारखेला अटक केली आहे ? दोन-तीन महिने पोलीस अधिकारी फरार होते, त्यांना निलंबित करण्यात आले नव्हते, या सर्व कारवाईमध्ये दिरंगाई झाली आहे. या दिरंगाईस कोण जबाबदार आहेत ? ही मुलगी ज्या सुधारगृहात रहाते तेथे जाऊन मी तिला भेटून आली आहे. मुलीची मावशी मुलीला ताब्यात द्या, अशी मागणी करीत आहे. याच मावशीच्या छळाला कंटाळून ही मुलगी औरंगाबाद येथे पळून आली होती. त्यानंतर या मुलीने दोन-तीन वेळा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. या मुलीला शिकावयाचे आहे व तिने असे सांगितले आहे की, मला पोलीस व्हायचे आहे. म्हणजे एवढे घडूनही अद्याप पोलिसांवर तिचा विश्वास आहे. सी.आय.डी.क्राईम ब्रँचची ओळख परेड पूर्ण झाली असेल तर या मुलीच्या शिक्षणाच्या दृष्टीने तिला संरक्षण देण्याबाबत पोलिसांकडून पावले उचलली जातील काय ?

सभापती महोदय, मी एकाच वेळी ३/४ उपप्रश्न विचारलेले आहेत. कारण, पुन्हा उपप्रश्न विचारण्यास संधी मिळत नाही व हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. त्यामुळे या सर्व प्रश्नांची उत्तरे शासनाकडून मिळाली पाहिजेत. ही विनंती यासाठी करते की, अनेक वेळा प्रश्न हायजॅक केले जातात व उत्तर बाजूला रहाते.

यानंतर श्री.बोरले............

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या लोकांना जो अटक पूर्व जामीन मिळाला आहे तो रद्द करावा म्हणून दिनांक 13.07.2007 रोजी सुप्रिम कोर्टामध्ये अपिल दाखल केले आहे. यांचा जामीन रद्द करण्यासाठी पोलीस आग्रही आहेत. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांची निवेदने बघितल्यानंतर मी या प्रश्नाकडे बारवाईने बघितलेले आहे. पोलीस इतके दिवस फरारी कसे राहू शकतात आणि त्यांना का पकडले जाऊ शकत नाही हा प्रश्न मलाही विचार करावयास लावणारा आहे. पोलीस दलातील कर्मचा-यांवर कोणी आरोप केल्यानंतर ते लोक फरारी राहत असतील आणि त्यांना पकडण्यामध्ये पोलीस दलाला यश मिळत नसेल तर अप्रत्यक्षपणे कोणी तरी त्यांना सहकार्य करीत आहे, अशी शंका येऊ शकते. 1 मे पासून 27 जून पर्यंत हे आरोपी सी.आय.डी.ला का सापडले नाहीत याची वरिष्ठ स्तरावर चौकशी करण्याच्या मी सूचना दिलेल्या आहेत. जर या आरोपींना पाठीशी घालण्याचा कोणीही प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे प्रयत्न केल्याचे थोडे जरी सिद्ध झाले तरी या प्रकरणातील कर्मचा-यांना केवळ निलंबित करुन सरकार थांबणार नाही तर तपास अधिका-यावर देखील कठोर कारवाई केली जाईल. यातील जे आरोपी आहेत त्यांचा अटकपूर्व जामीन रद्द करुन पुन्हा ताब्यात घेऊन यापूर्वी त्यांनी अशा प्रकारचे गुन्हे केले होते काय, याचाही तपास करण्यात येईल. ज्या मुलीवर अन्याय झालेला आहे त्या मुलीच्या शिक्षणाची व्यवस्था शासनाच्या कोणत्या विभागामार्फत करता येईल याबाबत मी स्वत: लक्ष घालून यासंदर्भातील कार्यवाही करीन.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "तपासामध्ये तीन पोलीस अधिकारी व तीन पोलीस कर्मचारी यांचेसह एकूण 18 आरोपी निष्पन्न झालेले आहेत. एकूण 18 आरोपींपैकी हे 6 आरोपी सोडले तर उर्वरित 12 आरोपी पोलीस दलातील आहेत, राजकीय आहेत की कोणाशी संबंधीत आहेत याबाबत सभागृहाला माहिती द्यावी.

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, एकूण 19 आरोपी आहेत. (1) शमीम ऊर्फ तबस्सूम उर्फ वहाबी, वय 40 वर्षे (2) कैसर सिद्धीकी नसरुद्दीन, वय 40 वर्षे (3) शेख फिरोज कमरुद्दीन, वय 30 वर्षे, (4) युसूफ इफतार खान, वय 30 वर्षे, (5) अजमुद्दीन फिरोज खान, वय 35 वर्षे या सर्व आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. (6) विजूर धोबेवाला ऊर्फ सलीम खान जब्बार खान (7) दिलीप शिवाजी देशमुख यांना अटकार्व जामीन मिळाला आहे. (8) फारुक खलीक हा

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29348 ..........

श्री.सिद्धाराम म्हेत्रे...........

छायाचित्रकार आहे. (9) मोहम्मद साजिद मोहम्मद याकुब ऊर्फ साजीद भीम (10) मोहम्मद साजीद हुसैन मोटर वाहन परिक्षक (11) शिवाजी दगडू कांबळे (12) बी.यु.पालवे, सहायक पोलीस आयुक्त (13) सय्यद अजहर, पोलीस हवालदार (14) तुलबा दादाराव ढाकणे (15) शेख जाफर शेख अहमद (16) अब्दुल अझीज अब्दुल रजाक कुरेशी (17) राजेंद्र लिंगाजी जोंधळे (18) अब्दुल रहमान, पोलीस कॉन्स्टेबल (19) तोशीक अहमद असे एकूण 19 आरोपी आहेत.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, यामध्ये दोन गोष्टी आहेत. एक म्हणजे औरंगाबाद शहरातील पोलीस विभागाने अत्यंत खालच्या दर्जाचे गुन्हे केल्याबाबत हा चौथा प्रश्न आहे. पोलिसांना पाठीशी घालण्याचे काम जे क्रिमीनल माईंडचे पोलीस आहेत ते करीत आहेत. सद्रक्षणाय खलनिग्रहणाय ऐवजी खलरक्षणाय सद्निग्रहणाय अशी पोलीस दलाची परिस्थिती झालेली आहे.

यानंतर श्री.गागरे.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29347.....

श्री.श्रीकांत जोशी.....

श्री.पालवे आणि श्री.कांबळे या पोलिसाविषयी वर्षानुवर्षे तक्रारी असतानाही तक्रारी आहे, त्यांच्यावर कार्यवाही का केली नाही ? माझा दुसरा प्रश्न असा की, श्री.बुधवंत नावाच्या पोलीस आयुक्तांनी घोषीत केले होते की, सर्व दोषी अधिकाऱ्यांना अटक करण्यात येईल. पोलीस आयुक्तांनी त्यांची नावे त्यांनी जाहीर केली नाहीत कारण नावे जाहीर केली तर ते फरार होतील व त्यांना अटक करण्यात अडचणी निर्माण होतील, असे सांगितले होते. असे असतानासुध्दा आरोपींना त्यांना अटक करण्यासाठी वेळ का लागला आहे ? अजूनही त्यातील बरेच आरोपी फरारी आहेत. फरार आरोपींवर आजच्या आज ॲक्शन घेणार का ? औरंगाबाद पोलीस खात्यास पूर्ण किड लागलेली आहे, त्यामुळे त्यांची संपूर्ण चौकशी करणार का ? याची उत्तरे देण्यात यावीत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, औरंगाबाद पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये असे किती महत्वपूर्ण गुन्हे घडलेले आहेत, याची माहिती घेण्यात येईल. काही मुलींवर कर्मचारी किंवा राजकीय कार्यकर्ते व नेत्यांनी अन्याय केलेले आहेत याची चौकशी करण्याकरीता श्रीमती मीरा बोरवणकर यांची पोलीस खात्यात खास नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांना मदत करण्यासाठी आणखी दोन अधिकारी पाठविण्यात येतील. या संपूर्ण प्रकरणाची पाळेमुळे उखडून काढण्यात येतील. जे दोषी आहेत व ज्या कर्मचाऱ्यांवर अशा स्वरुपाचे आरोप किंवा गुन्हे दाखल असतील व त्यांच्यावर सेवातंर्गत कोणतीही कारवाई केली नसेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. असे प्रकार पोलीस दलामध्ये सहन केले जाणार नाहीत. या बाबीची वरीष्ठ पातळीवरुन चौकशी केली जाईल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी बोलताना विचारले आहे की, त्या मुलीला पुढे शिकायचे आहे, परंतु माननीय मंत्री महोदयांनी त्याचे उत्तर दिलेले नाही. तत्पूर्वी आणखी एक प्रश्न विचारला होता की, त्या मुलीची मावशी मुलगी ताब्यात मिळविण्यासाठी आग्रही आहे, त्यासाठी मावशी वारंवार अर्ज करीत आहे. मावशीच्या छळापासून दूर राहावे म्हणून ती औरंगाबादला आली आहे. म्हणून तिला मावसीपासूनही संरक्षण देणे आवश्यक आहे. शासनाने मुलीला मावशीकडे परत देऊ नये याची काळजी घेण्यात येईल का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

19-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) K-2

PNG/ KGS/ MAP/

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, बाल न्यायालयात मुलांना ठेवल्यानंतर तो अधिकार जूव्हनाइल कोर्टाचा असतो, पोलिसांचा नसतो. या मुलीवर मावशीकडून अन्याय होण्याची शक्यता आहे ही गोष्ट शासनामार्फत जूव्हनाइल कोर्टाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल. शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वसतिगृहामध्ये या मुलीच्या शिक्षणाची सोय करण्यात येईल. या गुन्हयामध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मावशीचा सहभाग असल्याचे आढळून आले तर तिला आरोपी करण्यात येईल.

-----

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नाशिक जिल्हयातील सिन्नर जवळील भूसुरूंग निर्मिती कारखान्यात झालेला भिषण स्फोट

**(४) * २९४२१ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री. सुधाकर गणगणे, डॉ. निलम गोऱ्हे , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. अरविंद सावंत , डॉ. दिपक सावंत , श्री. अनिल परब , डॉ. वसंत पवार , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. चंद्रकांत रघुवंशी , श्री. यशवंतराव गडाख , श्री. सुरेशदादा देशमुख :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर ( जि. नाशिक ) येथून १० किलोमिटरवर पास्ते शिवारात असलेल्या भूसुरूंगासाठी दारूगोळा तयार करणाऱ्या ( डिटोनेटर ) कारखान्यात दिनांक ४ मे, २००७ रोजी वा त्यादरम्यान भीषण स्फोट होऊन झालेल्या दुर्घटनेत २० कामगार ठार झाले असून अनेक कामगार जखमी झाले असल्याची भयंकर घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबधी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबांना तसेच जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) अद्यापी,कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) होय. सदर घटनेत २१ कामगार मयत व ५ कामगार गंभीर जखमी झाले आहेत.

(२) होय.

(३) मे.प्रिमियर एक्स्लोकेम लिमिटेड या कंपनीत दि.५.५.२००७ रोजी स्फोट होऊन त्यामध्ये २१ कामगार मयत व ५ कामगार गंभीर जखमी झाले. या प्रकरणी दि.११.५.०७ रोजी सिन्नर पो.ठाणे येथे गु.र.नं.११६/२००७ भा.दं.वि.कलम ३०४अ, ३३७,३३८,२८६,४२७,३४ सह कलम ८,९ (क)(II) भारतीय स्फोटक अधिनियम १८८४ अन्वये गुन्हा दाखल करुन ५ आरोपींना अटक केली होती परंतु अटक झालेल्या ५ आरोपींना न्यायालयाने जामीनावर सोडल्यानंतर या गुन्ह्यात भा.दं.वि.कलम ३०४ हे वाढीव कलम लावून दि.१९.५.०७ रोजी ४ आरोपींना पुन्हा अटक करुन त्यांची २४.५.०७ पर्यंत पो.कोठडी घेऊन ५ व्या आरोपीस दिनांक ३०.५.२००७ रोजी अटक करुन त्यांची दि.३.६.०७ पर्यंत पो.कोठडी घेतली सदर गुन्ह्याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग नाशिक यांचेकडे दि.१.६.२००७ रोजी दिल्यानंतर आणखी एका आरोपीचा शोध घेण्यात आला परंतु त्यास न्यायालयाने दि.२५.६.०७ रोजी अटक पूर्व जामीन दिला असून गुन्ह्याचा तपास चालू आहे. या प्रकरणी मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या कायदेशीर वारसास प्रत्येकी १ लाख व जखमींना प्रत्येकी २५,०००/- या प्रमाणे एकूण २२,२५,०००/- इतके अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहायता निधीतून देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मयत कामगारांच्या वारसांना व जखमी कामगारांना कंपनी व्यवस्थापकाकडून अर्थसहाय्य देण्यात आले आहे का ? असल्यास किती रकमेचे अर्थसहाय्य

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त .....

देण्यात आले आहे ? राज्यात अशा प्रकारे किती व कोठे स्फोट झालेले आहेत ? कारखान्यांमध्ये अशा दुर्घटना परत होऊ म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, कारखान्यांकडून किंवा कंपनी व्यवस्थापनाकडून त्यांना काही नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. परंतु मुख्यमंत्री निधीतून मयतांच्या वारसांना 1 लाख रुपये व जखमींना 25 हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे. स्फोटाचे असे प्रकार राज्यामध्ये सध्या इतरत्र कोठे झालेले नाहीत. असे स्फोट होऊ नयेत म्हणून विविध डिपार्टमेंटकडून काळजी घेतली जाते. उपसंचालक औद्योगिक सुरक्षा विभाग, प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ इत्यादी विभागाकडून एन.ओ.सी. मिळाल्यानंतर कारखाना चालू होतो. हया सर्व बाबी बघण्याचे काम त्यांचे आहे. स्फोट झालेल्या कारखान्याने कोणाकडूनही एन.ओ.सी. घेतले नव्हते, त्यांनी फक्त स्फोटकाचे लायसन्स घेतले होते. या कारखान्याच्या सहा संचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले असून त्यांच्या कारवाई चालू आहे.

**सभापती** : माननीय गृहराज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, या स्फोटामध्ये 21 कामगार मयत झाले आहेत. 5 कामगार गंभीर जखमी झाले आहेत. मुख्यमंत्री फंडातून शासनाने मदत केलेली आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती** ..... ता.प्र.क्र. 29421 ...

किंवा उद्योगपती असतील, की ज्यांच्या कारखान्यामध्येच स्फोट झाला आहे, त्या उद्योजकांकडून या मृत कामगारांच्या कुटुंबियांना किंवा वारसांना तसेच जखमी कामगारांना काही मदत करण्याच्या दृष्टीने शासन कामगार विभागाच्या माध्यमातूनर प्रयत्न करील काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या स्फोटातील मृत कामगारांच्या वारसांना 1 लाख रूपये मदत देण्यासाठी या उद्योजकाशी बोलणी करून यातील 7 लोकांना त्याप्रमाणे मदत देण्याचे ठरविले आहे आणि उरलेल्याना म्हणजे जे 21 कामगार मृत झालेले आहेत त्यांच्या वारसांना देखील सदर उद्योजकाकडून सगळी काही मदत देण्यासाठी म्हणून सूचना देण्यात येतील.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आपण म्हणालात की, सदर उद्योजक वा मालकाकडून या मृत कामगारांच्या वारसांना काही मदत दिली गेलेली नाही, ती दिली जावी म्हणून प्रयत्न केले जातील. सभापती महोदय, ज्या पास्ते गावामध्ये हा स्फोट झाला आहे ते माझे जन्मगाव आहे आणि या कारखान्याच्या मालकांनी त्या स्फोटातील प्रत्येक अपघातग्रस्त कामगारांना खाजगीरित्या आर्थिक मदत केलेली आहे अशी माझी माहिती आहे. आपण वाटल्यास ही बाब आपल्या यंत्रणेकडून तपासून घ्यावी.

**सभापती** : मी आपल्याला सांगू इच्छितो की, या संदर्भात सर्वसाधारण धोरणच असे आहे की, ज्या ज्यावेळी असे अपघात होऊन त्यात जे गंभीर जखमी होतात वा मृत होतात त्यांना त्या उद्योजकाने देखील मदत केली पाहिजे आणि हा कामगार विभागाचा दंडक आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी तेथील प्रांताबरोबर सदर कारखान्याच्या मालकांची एक बैठक घेतली होती आणि त्यामध्ये प्रांत आणि मालक यांची बोलणी होऊन मालकाने संबंधित अपघातग्रस्त कामगारांना मदत करावी असे ठरले आणि त्यानुसार मालकाकडून प्रांताकडे काही रक्कम आणि चेक्स देण्यात आले होते आणि प्रांताने देखील ते कामगारांना दिले आहेत अशी माझी माहिती आहे. तरीही आपण आपल्या यंत्रणेमार्फत ही बाब तपासून घ्यावी.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदर उद्योजकाने 7 लोकांना मदत दिली आहे आणि उरलेल्या 14 लोकांनाही मदत देण्याच्या त्यांना सूचना देण्यात येतील.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा या संबंधात प्रश्न एवढाच आहे की, एवढा मोठा स्फोट तेथे झाला की, त्यात 20-21 कामगार मृत्यूमुखी पडले. महाराष्ट्रामध्ये एखाद्या

....... एल 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 29421 ...

कारखान्यामध्ये असा स्फोट होऊन 22 कामगार मृत्यूमुखी पडणे ही बाब निश्चितच गंभीर आहे. मृत्यू हा इतका स्वस्त झाला आहे का ? ज्या मालकाचा हा कारखाना आहे त्याने हा स्फोटकांचा कारखाना आहे तेव्हा त्यादृष्टीने तेथे कोणत्या संरक्षित उपाय योजना केल्या आहेत ? असे स्फोट घडू नयेत म्हणून कोणती प्रतिबंधात्मक कारवाई या ठिकाणी करण्यात आलेली होती व आहे ? इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज्‌ने या संदर्भात तेथे भेट देऊन कोणते रिमार्क्स त्यांच्या रजिस्टर बुकामध्ये मांडले आहेत ? या सगळ्या बाबींचा आपण शोध घेतला आहे का ? आणि जर त्या कारखान्याच्या प्रिमायसेस मध्ये या कामगारांचे मृत्यू घडले असतील तर त्यांना भरपाई देण्याची जबाबदारी ही त्या मालकाची असते. ती जबाबदारी या मालकाने पूर्ण केली आहे का ? या कामगारांची कुटुंबे उध्वस्त झाली आहेत त्या कुटुंबांना कोणी वाली आहे की नाही ? तेव्हा या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, या सर्व कामगारांच्या कुटुंबियांकडे लक्ष देण्याची गरज आहे. त्यासाठी कंपनीवर कुणी कारवाई केली आहे काय ? फॅक्टरी इन्स्पेक्टरने काही कारवाई केली आहे का ? या कारखान्याचे रजिस्ट्रेशन झाले असेल तर ते कोणत्या कायद्याखाली झाले आहे ? आणि स्फोटकांसंबंधात जर रजिस्ट्रेशन झाले असेल तर ती ॲथॉरिटी कोण आहे ? आणि या संदर्भात त्या सर्वांनी कोणत्या कारवाया केल्या ? तसेच या सर्व मृत आणि जखमी कामगारांना कशा प्रकारे आणखी मदत दिली जाईल या विषयी कृपया आपण माहिती द्यावी, त्यासाठी संबंधित खात्याकडूनही आपण अवश्य तर माहिती घ्यावी.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हा स्फोट झाल्यानंतर संबंधित जे चार विभाग आहेत त्यापैकी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,नासिक यांच्या अधिकाऱ्यांनी तेथे भेट देऊन चौकशी केली आणि त्यांचा अहवाल 28.7.2007 ला प्राप्त देखील झाला आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, या कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया ही सुरक्षित नव्हती. कामगारांना उत्पादनाच्या बाबतीत प्रशिक्षण वा माहिती देण्यात आलेली नव्हती. कामगारांना उत्पादन करताना वापरावयाचे कपडे, बूट इत्यादी साहित्य देण्यात आलेले नव्हते. 25 कामगार कामावर ठेवण्याची परवानगी घेऊन प्रत्यक्षात 72 कामगार कामावर ठेवण्यात आले होते. वरील कारखान्याच्या विरूद्ध फॅक्टरी ॲक्ट, 1948 अन्वये कारवाई करण्यात येत आहे. तसेच दुसरा विभाग बाष्पके विभाग,नासिक यांचा देखील अहवाल 9.7.2007 रोजी प्राप्त झालेला आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, कारखान्यामध्ये

....... एल 3 ...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बॉयलर बसविताना रजिस्टर केलेले नाही व त्याची नोंद केलेली नाही. त्यामुळे बाष्पके अधिनियम 1923 च्या कलम 6, एसइ(13) अंतर्गत त्यांचेवर खटला दाखल करण्यात आला आहे. तसेच प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचाही अहवाल 10.7.2007 रोजी आलेला आहे. त्यांनी या कंपनीविरूद्ध जल प्रदूषण प्रतिबंधक कायदा 1974 च्या कलम 23, 25 व 43 अंतर्गत, हवा प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण कायदा 1981 च्या कलम 21 व 37 च्या अंतर्गत पर्यावरण संरक्षण कायदा च्या कलम 15 अंतर्गत नोटीस बजावून कारवाई करण्यात आली आहे.

( यानंतर श्री. सरफरे ...... एम 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29421...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (पुढे चालू...)

सभापती महोदय, कारखाना पूर्णपणे उद्‌ध्वस्त झाला आहे. स्फोट एवढा मोठा होता की, त्या ठिकाणी आज काहीही शिल्लक राहिले नाही. मंडळाकडून अहवाल आलेला आहे. परंतु डेप्युटी चिफ कंट्रोलर ऑफ एक्स्प्लोसिव्ह यांच्याकडून अंतिम अहवाल आलेला नाही, तो येणे बाकी आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**अमरावती येथे ट्रीक फोटोग्राफीच्या माध्यमातून सेक्सस्कॅंडलद्वारे तरुणींचे ब्लॅकमेलिंग करण्याचा घडलेला प्रकार**

**(५) * २९३६६ श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक, श्री. रमेश निकोसे , मेजर सुधीर सावंत , श्री. सुधाकर गणगणे , श्री. जगदीश गुप्ता , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री. श्रीकांत जोशी , श्रीमती मंदा म्हात्रे , श्रीमती उषाताई दराडे , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे ट्रीक फोटोग्राफीच्या माध्यमातून सेक्सस्कॅंडलद्वारे तरुणींचे ब्लॅकमेलिंग करण्याचा प्रकार दिनांक २८ एप्रिल, २००७ वा त्या सुमारास उघडकीस आला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलीसांनी किती जणांना अटक केली आहे,

(३) याबाबत पोलीसांनी केलेल्या चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) चौकशीच्या अनुषंगाने पोलीसांनी कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१), (२), (३), (४) व (५) दिनांक २७.४.२००४ रोजी एका तरुणीने तिचे एका तरुणाने आक्षेपार्ह फोटो काढून तिला ब्लॅकमेलींग केल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन फेजापूरा पोलिस ठाणे येथे गु.र.क्र. ९५/२००७ भा.द.वि. चे कलम ३५४, ३८४, ५०६ (ब), १०९ नुसार गुन्हा नोंदवून एकूण चार आरोपींना अटक केली आहे. एका आरोपीने फिर्यादीच्या अंगावरील कपडे काढून कॅमेराने फक्त फ्लॅश मारुन फोटो काढल्याचे भासवून निगेटीव्हच्या बदल्यात फिर्यादीकडून पैशाची व दागिन्यांची मागणी केली. तपासात आरोपीने फिर्यादीचे फोटो काढल्याचे निष्पन्न झाले नाही. तसेच या मुली व्यतिरिक्त इतर महाविद्यालयीन तरुणींना ट्रिक फोटोग्राफीच्या माध्यमातून ब्लॅकमेलींग केल्याचे निष्पन्न झाले नाही.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, शासनाने दिलेल्या उत्तरावरुन माझे समाधान होत नाही. या प्रकरणाची माझ्याकडे जी माहिती आहे त्यानुसार श्री. विवेक गजभिये आणि श्री. अमोल इंगळे या आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्या व्यतिरिक्त दोन आरोपी फरारी आहेत त्यांची नावे जाहीर करण्यात येतील काय? या प्रकरणी मुलीचे अश्लिल फोटो काढण्याचा गुन्हा करणाऱ्या आरोपींची सी.आय.डी.मार्फत चौकशी केली जाईल काय? तिसरा प्रश्न असा की, कोणतीही मुलगी आपले अश्लिल फोटो काढून देण्यास तयार होणार नाही. त्यामुळे हा गंभीर प्रकार असल्यामुळे याची सी.आय.डी.मार्फत चौकशी झाली पाहिजे. ती करण्यासंबंधी शासनाची काय भूमिका आहे?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २९३६६...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये चार आरोपींचा सहभाग आहे. त्यामध्ये विवेक सहदेव गजभिये, सचिन किशार बोंडे, अनंत गजानन डिंके, अमोल अरुण इंगळे अशी त्यांची नावे आहेत. यामध्ये डिंके हा त्या मुलीचा मित्र होता त्याचबरोबर बोंडे हा सुध्दा डिंके याचा मित्र होता. त्या मुलीची बोंडेबरोबर ओळख झाल्यानंतर तिने बोंडेशी मैत्री केली. तिला बोंडे हा विवाहीत असल्याचे नंतर समजले. त्यामुळे तिने बोंडेबरोबर असलेली मैत्री तोडली. तसेच, गजभिये याने आपण सागर देशमुख असल्याचे खोटे नाव सांगून त्या मुलीशी मैत्री केली. त्याचबरोबर तिचे आणि बोंडेचे फोटो माझ्याकडे आहेत, ते मी सर्वांना दाखवीन अशाप्रकारची धमकी गजभिये याने त्या मुलीला दिली. त्या फोटोची निगेटीव्ह मुलीला देण्याचे सांगून गजभिये हा व त्याचे मित्र त्या मुलीला घेऊन गेले व त्याठिकाणी त्या मुलीचे आक्षेपार्ह फोटो घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आणि सर्वांना सांगून त्या मुलीला ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न केला. ही बाब त्या मुलीने आपल्या मैत्रिणीला सांगितली, मैत्रिणीने तिच्या शिक्षिकेला सांगितली व शिक्षिकेने एका समाज सेविकेला सांगितल्यानंतर त्यांनी केलेल्या तक्रारीवरुर चौघा आरोपींना अटक करण्यात आली आहे.

श्री. धोडीराम राठोड : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "एका आरोपीने फिर्यादीच्या अंगावरील कपडे काढून कॅमेऱ्याने फक्त फ्लॅश मारुन फोटो काढल्याचे भासवून निगेटीव्हच्या बदल्यात फिर्यादीकडून पैशाची व दागिन्यांची मागणी केली. तपासात आरोपीने फिर्यादीचे फोटो काढल्याचे निष्पन्न झालेले नाही". परंतु त्या मुलीचे नग्नावस्थेतील फोटो काढण्यासाठी कॅमेऱ्याचा फ्लॅश मारला, परंतु तो फोटो निघाला नाही असे त्यांचे म्हणणे आहे. कदाचित फोटो निघालाही असेल याचा आपण तपास करावा. त्या मुलांनी त्या मुलीच्या अंगावरील कपडे काढणे हा देखील गुन्हा आहे. तेव्हा नग्नावस्थेत फोटो काढण्यासाठी फ्लॅश मारणे आणि अंगावरील कपडे काढणे हा गुन्हा असल्यामुळे त्या संदर्भात मंत्रिमहोदयांनी खुलासा केला पाहिजे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्या मुलीने अशी तक्रार केली की, श्री. बोंडे बरोबर एक फोटोग्राफर होता. ते मला एके ठिकाणी घेऊन गेले आणि त्याठिकाणी माझ्या अंगावरील कपडे काढून माझे फोटो घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामध्ये फोटो काढल्याचे निष्पन्न झाले नाही. त्याठिकाणी मुलीला ब्लॅकमेल करण्यासाठी कॅमेऱ्याचा फक्त फ्लॅश मारण्यात आला म्हणून त्यांना अटक करण्यात आली.

श्री. धोंडीराम राठोड : परंतु त्या मुलीच्या अंगावरील कपडे काढल्याचे निष्पन्न झाले आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : म्हणूनच त्या आरोपींविरुध्द विनयभंगाचा गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, छापील उत्तरात म्हटले आहे की, "एका तरुणीने तिचे एका तरुणाने आक्षेपार्ह फोटो काढून तिला ब्लॅकमेलींग केल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन" याठिकाणी "ब्लॅकमेलींग" या शब्दाचा अर्थ कसा लावायचा? एखाद्या गोष्टीसाठी त्या व्यक्तीवर दबाव आणून ती गोष्ट करण्यास भाग पाडले जाणे किंवा ती गोष्ट ओरबाडण्याचा प्रयत्न करणे असा त्याचा अर्थ होतो. याठिकाणी आरोपींनी फोटोग्राफीच्या माध्यमातून ब्लॅकमेलींग केल्याचे निष्पन्न झ ाले नाही असे म्हटले असले तरी ते झालेले आहे म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29366...

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरू..

अशावेळी ब्लॅकमेलिंग झाले नाही, असे म्हटलेले आहे. त्याऐवजी ब्लॅकमेलिंग झाले आहे असे म्हणाल काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : ब्लॅकमेलिंग झाले नाही असे नाही. फोटो काढल्याचे निष्पन्न झाले नाही. परंतु त्यांनी प्लॅश केल्याचे निष्पन्न झालेले आहे. फ्लॅश करून नग्न फोटो आहेत असे भासविण्याचा त्यांनी प्रयत्न करून पैसे मागण्याचा प्रयत्न केलेला आहे.

श्री.सुधाकर गणगणे : माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, मुलीने जी तक्रार केलेली आहे त्या तक्रारीचे प्रत्यक्षात स्वरुप काय आहे ? याबाबतचा खुलासा मंत्री महोदय करतील काय ?

**सभापती** : उत्तराची आवश्यकता नाही. यानंतर पुढचा प्रश्न घेण्यात येईल.

---

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**मुंबई पोलिसांवर गुंडाकडून हल्ला झाल्याच्या तीन दिवसात तीन घटना घडल्याबाबत**

**(6) * 30928 श्रीमती उषाताई दराडे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , प्रा. फौजीया खान , श्री. रमेश निकोसे , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , मेजर सुधीर सावंत , श्री.सय्यद जामा** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई पोलिसांवर गुंडाकडून हल्ला झाल्याच्या तीन दिवसात तीन घटना माहे मे, जुन 2007 या महिन्यात घडल्या हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व उक्त प्रकरणात जखमी झालेल्या पोलीसांना शासनाने तातडीची कोणती मदत केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर. पाटील यांचेकरिता**: (1) होय.

(2) होय. अँटॉप हील पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई सुंदर वाघमारे हे जखमी झाल्याप्रकरणी गु.नों. क्र. 151/07 भा.दं.वि.स . कलम 307,333, 34 अन्वये नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आलेली असून उर्वरित एका आरोपीचा शोध चालू आहे.

कुरार पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक दत्तू उगलमुगले व पोलीस हवालदार सुनिल होसाळकर हे जखमी झाल्याप्रकरणी गु.नों.क्रमांक 164 /07, भा.दं.वि.सं. कलम 353,332, 333, 323 , 504, 506 (2) , 34 अन्वये दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आली असून उर्वरित दोन आरोपींचा शोध चालू आहे.

वाकोला पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई किरण साळूंखे व पोलीस शिपाई त्रिंबक सावंत हे जखमी झाल्याप्रकरणी गु. नों. क्र. 261 /07 , भा.द.वि.सं. कलम 332,353,324,325, 34, अन्वये दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित दोन आरोपींचा शोध चालू आहे.

(3) उपरोक्त घटनांमधील जखमींना तात्काळ औषधोपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांना वैद्यकीय मदत पुरविण्यात आलेली आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मुंबईतील पोलिसांवर गुंडांकडून हल्ला होतो ही नवीन परंपरा महाराष्ट्रामध्ये निर्माण होत आहे. कोणीही उठून पोलिसांवर हल्ला करायचा, हे योग्य नाही. पोलीस शांतपणाने बघतात, की काय करतात ? हे कळत नाही. एकंदरीत पोलिसांच्या मानसिकतेवर याचा परिणाम होतो आहे, असे मला वाटते. या सर्व प्रकारामध्ये नेमके काय आहे, हे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शोधण्याची आवश्यकता आहे. आजच वर्तमानपत्रामधून वाचनात आले की, प्रत्येक इन काऊंटरची चौकशी सीआयडीकडे देणार होता, ती थांबविलेली आहे. या सर्व प्रकारामुळे एकंदरीतच पोलिसांचे नितीधैर्य खच्चीकरण होत आहे. पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर शासन कडक कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना करणार  आहे आणि पोलिसांना कोणते संरक्षण देणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : पोलिसांचे काम हे जिकिरीचेच असते. सराईत गुन्हेगार आहेत, खतरनाक गुन्हेगार आहेत, त्यांना पकडकण्यासाठी पोलीस गेले तर ते गुन्हेगार हल्ला करण्याचे धाडस करत असतात. म्हणून या तीनही प्रकरणामध्ये गस्तीवरील पोलिसांना माहिती मिळाल्याबरोबर काही गुन्हेगारांना पोलिसांनी पकडण्याचा प्रयत्न केला. काही गुन्हेगार आरोपींना पोलिसांनी पकडलेले आहेत. सगळेच गुन्हेगार पळून जाण्यामध्ये यशस्वी झालेले आहेत, असे नाही.

श्री.दिवाकर रावते : प्रत्येक प्रकरणामध्ये दोन-दोन आरोपी फरार आहेत.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : दोन-दोन आरोपी फरार असले तरी या प्रकरणांमध्ये दोन-दोन आरोपी पकडलेलेही आहेत. जखमी अवस्थेमध्येही पोलिसांनी आरोपींना पकडलेले आहे. श्री.साळगाकर, श्री.पवार या पोलिसांच्या डोक्यात आरोपींनी चाकू भोसकला तरी देखील आरोपींना त्यांनी पकडलेले आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : जखमी होणे ही काही मानाची गोष्ट आहे काय ?

**सभापती** : मंत्री महोदय, आपण आपले उत्तर पुढे सुरु ठेवावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : गुन्हेगारांना पकडण्यासाठी एखाद्या ठिकाणी पोलीस गेले तर समोरून आरोपींकडून अचानकपणे हल्ला होणारच. पहिल्या प्रकरणामध्ये वॉन्टेड आरोपी अमुक ठिकाणी लपलेले आहेत अशी पोलिसांना माहिती मिळाली म्हणून पोलीस त्या ठिकाणी गेले. त्या ठिकाणी त्यांनी घराचा दरवाजा ठोठावला असता आरोपी बाहेर आल्याबरोबर त्यांनी पोलिसांवर चाकूने वार केले, दुसऱ्या पोलिसांनी त्या आरोपीला पकडले. त्यानंतर अजून दोघे आरोपी आतून आले आणि दुसऱ्या पोलिसांवर हल्ला केला, आणि ते पळून गेले. तिसऱ्या प्रकरणामध्ये रात्रीच्या गस्तीवर असलेल्या पोलिसांना एकाचा संशय आल्यावरून त्याच्याकडें विचारणा केली.... आरोपी पळून गेले नाही, त्या ठिकाणी दोघांना पकडलेले आहे. ..(अडथळा)...

**सभापती** : राज्यमंत्री महोदय,आपण इकडे मला उद्देशून बोलावे.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

ता.प्र.क्र.30928....

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : त्या आरोपींना पकडण्यात आलेले आहे. त्यांना 307 कलमाखाली अटकही केलेली आहे. बाकीचे आरोपी पळून गेले त्यांचा शोध चालू आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी अतिशय योग्य प्रश्न विचारला. मुंबई पोलिसांवर होणाऱ्या हल्ल्यामुळे आम्हाला लाज वाटावी अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. हल्ला झाल्यानंतर त्याचवेळी पोलिसांनी हल्लेखोर आरोपींना पकडले असे राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. जखमी अवस्थेत पोलिसांनी आरोपीला पकडले हे खरे आहे. परंतु महिनाभरामध्ये दणकट पोलिसांनी फरार आरोपींना का पकडले नाही ?

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30928 ..... श्री. विनोद तावडे ......

माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, दोन प्रकरणांमध्ये दोन दोन आरोपी फरारी आहेत आणि एका प्रकरणामध्ये एक आरोपी फरारी आहे. जे आरोपी पकडले ते ज्यावेळी घटना घडली त्यावेळी पकडले. बाकीच्या आरोपींना महिनाभरात पडकता आले नाही हे खरे आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे त्यांना पकडण्याचा कसोशीने प्रयत्न चालू आहे. ते आरोपी फरार आहेत.

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : अशा प्रकारे सगळे सन्माननीय सदस्य एकदम बोलावयास लागले तर कोणतीही चर्चा होणार नाही. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी सुरुतीला सांगितले की, यामध्ये 3 घटना आहेत. दोन आरोपी सापडले. एक आरोपी पळून जाण्यास यशस्वी झालेला आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : बाकीचे पोलीस काय करीत आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : बाकीचे पोलीस त्यांचा तपास करीत आहेत. सभापती महोदय, उर्वरित जे आरोपी पळून गेलेले आहेत त्यांना पकडण्यासाठी पोलिसांचे कसून प्रयत्न चालू आहेत. त्यांना लवकरच पकडण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. मध्यंतरी एन्काऊंटरच्या बाबतीत असे आदेश दिलेले होते की ते जपून करावे. पोलिसांवर गुंडांचा हल्ला झाल्यानंतर तुम्ही एन्काऊंटर करा असे आदेश परत देणार काय ? स्वत:च्या संरक्षणासाठी एन्काऊंटर केल्यानंतर त्याबाबत कोणातरी मानवतावाद्याने बोंबाबोंब केल्यानंतर चौकशी करणे थांबविणार काय ? एन्काऊंटर करण्याचे आदेश देणार काय ? तसे आदेश नसल्यामुळे गुंडांनी पोलिसांवर हल्ला केला काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, प्रचलित कायद्यानुसार जे जे नियम आहेत त्यानुसार पोलिसांना आदेश आहेत. त्यांना तसे करण्याची मुभा आहे. आरोपी पकडताना मार खा असे कोणी म्हटलेले नाही.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

**मुंबईत टू व्हीलर, फोर व्हीलर तसेच इतर जड वाहने अशा सात हजाराहून अधिक गाड्या चोरीस गेल्याबाबत**

**(7) * 29376 श्री. धनाजी साठे , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे , श्री.सय्यद जामा , श्री. अरविंद सावंत , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. निलम गोऱ्हे , श्री.परशुराम उपरकर** : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गेल्या 2 वर्षात मुंबईतून टू व्हीलर, फोर व्हीलर तसेच इतर जड वाहने अशा सात हजाराहून अधिक गाड्या चोरीस गेल्या असून त्यापैकी 4700 गाड्यांचा अद्यापही शोध न लागल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच यावर्षीही गेल्या 100 दिवसात 1000 गाड्या चोरीला गेल्या असून त्यापैकी केवळ 200 गाड्याच पोलिसांनी हस्तगत केल्याचे दिनांक 20 एप्रिल, 2007 रोजी किंवा त्यासुमारास आढळून आले आहे हे खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात त्यांना काय आढळून आले त्यानुसार वरील घटना घडू नयेत व अशा घटनांना आळा बसावा म्हणून शासनाने कोणता ठोस निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(4) अद्याप, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) होय, हे खरे आहे. गेल्या 2 वर्षामध्ये बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून दुचाकी, चारचाकी व इतर जडवाहने असे मिळून एकूण 7116 वाहने चोरीस गेली त्यापैंकी 2490 वाहनांचा शोध घेण्यात आला असून 4626 वाहनांचा अद्याप शोध लागलेला नाही.

(2) दिनांक 20 एप्रिल, 2007 रोजी पावेतो मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून 1139 वाहने चोरीस गेली आहेत त्यामध्ये शोध घेण्यात आलेल्या 289 वाहनापैकी 222 वाहनाचा शोध पोलिसांनी घेतला आहे.

(3) उक्त प्रकरणामध्ये बृहन्मुंबईतील संबंधीत पोलीस ठाण्यास गुन्हे दाखल करण्यात येवून चोरी संदर्भात तपास करण्यात येतो या घटनाना आळा बसावा व जनतेमध्ये जागृती होण्याकरिता आयुक्तालयाकडून उपाययोजना करण्यात आल्या त्यामध्ये (अ) मागील वर्षापासून माहे जून मध्ये "वाहन चोरी प्रतिबंधक सप्ताह" आयोजित करण्यात आला आहे.

(ब) हिंदी,मराठी,इंग्रजी व गुजराथी या भाषामध्ये वाहन चोरी रोखण्यासाठी करावयाच्या उपाय योजनेबाबतची पत्रके तयार करुन वितरीत केली.

(क) वाहन चोरीस प्रतिबंध आणण्याकरिता गुन्हे शाखे-अंतर्गत एक पथक निर्माण करण्यात आले आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 29376 .......

श्री. धनाजी साठे : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये जवळपास 7 हजार पेक्षा जास्त दुचाकी आणि चारचाकी वाहने चोरीला गेलेली आहेत. त्यापैकी 2490 वाहनांचा शोध घेण्यात आला असून 4626 वाहनांचा अद्याप शोध लागलेला नाही असे पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटले आहे. दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, 1139 वाहने चोरीस गेली आहेत त्यामध्ये शोध घेण्यात आलेल्या 289 वाहनांपैकी 232 वाहनांचा शोध पोलिसांनी घेतला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाहने चोरीस जात असताना 4626 वाहनांचा अद्याप शोध लागावयाचा आहे तसेच 1139 वाहनांपैकी जवळपास 700 वाहनांचा अजून शोध लागावयाचा आहे. या वाहनांचा शोध न लागण्याची कारणे काय आहेत ? यामध्ये काय अडचण आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मुंबईमध्ये वाहनांच्या चोरीचे प्रमाण आकडेवारीनुसार जास्त दिसत असले तरी एकूण जेवढी वाहने आहेत तसेच त्यांच्या पार्किन्गची जी व्यवस्था आहे ते पाहता दुचाकी आणि चारचाकी वाहने किती चोरीला गेली यासंबंधीची माहिती अशी आहे की, मागील दोन वर्षामध्ये बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत 7100 दुचाकी आणि चारचाकी वाहने चोरीस गेली हे खरे आहे. त्यापैकी 2490 वाहनांचा शोध पोलिसांकडून घेण्यात आला. उर्वरित वाहनांचा शोध लागलेला नाही. सदर वाहनांचा कसून शोध घेण्यात येईल. वाहने चोरीला जाण्याची काय कारणे आहेत असे सन्माननीय सदस्यांनी विचारले. मुंबई शहरातील अपुरी आणि असुरक्षित पार्किन्ग व्यवस्था तसेच वाहन चालकांकडून बेजबाबदारपणे वाहने ठेवली तर वाहने चोरीस जातात हे एक कारण आहे. वाहनांची चोरी होऊ नये म्हणून बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून वाहन मालकांनी घ्यावयाच्या काळजीबाबत प्रसिध्दीपत्रक वेळोवेळी प्रसिध्द केले आहे. त्याचे पालन करणे गरजेचे आहे. त्याचे पालन होत नाही.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प.क्र. 29376..... (श्री. सिध्दाराम म्हेत्रे...)

ही चोरीला गेलेली वाहने परराज्यात किंवा परजिल्ह्यात असतात. ती वाहने तेथे जाऊन ती परत घेऊन जाणे जिकिरीचे असते आणि तसे करण्यास मालक उत्सुक नसतात. त्यांना गाड्यांचा इन्शुरन्स मिळतो. यामुळे वाहने परत मिळविणे कठीण जाते. पोलिसांना याबाबतीत सूचना दिलेल्या असून हे चोरीचे प्रमाण कमी होईल.

श्री. दिवाकर रावते : राज्यातील पोलीस हतबल झालेले आहेत हे आधीच्या चर्चेवरुन दिसून आलेले आहे. आता या प्रश्नाच्या संदर्भात मला नको ते शब्द सूचतात, परंतु ते मी वापरु इच्छित नाही. प्रश्न भाग 3च्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "बृहन्मुंबईतील संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात येऊन चोरी संदर्भात तपास करण्यात येतो. या घटनांना आळा बसावा व जनतेमध्ये जागृती होण्याकरिता आयुक्तालयाकडून उपाययोजना करण्यात आल्या त्यामध्ये (अ) मागील वर्षापासून माहे जून मध्ये "वाहन चोरी प्रतिबंधक सप्ताह" आयोजित करण्यात आला आहे" असे नमूद केलेले आहे. ही गांधीगिरी आहे काय ? मी आता शब्द उच्चारीत नाही. दारुबंदी सप्ताह प्रमाणे "वाहन चोरी प्रतिबंधक सप्ताह",. हा सप्ताह म्हणजे काय ? हे काय चालले आहे ? वाहन चोरी रोखण्यासाठी हिंदी, मराठी,इंग्रजी व गुजराथी भाषेतून पत्रके तयार केली आहेत. या राज्याची भाषा मराठी आहे. पत्रके मराठीतून निघाली पाहिजेत. विविध भाषातून पत्रके काढली जातात, याचा अर्थ चोर सर्वधर्मीय आहेत काय ? दागिन्यांच्या चोरीच्या संदर्भात...(अडथळा)...

ज्याला आईच्या पोटी जन्माला येणे एवढेच माहीत असते बाकीचे काही माहीत नसते त्याला काय म्हणतात ते सांगतो...

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा आदर करतो.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावतेसाहेबांनाच बोलता येते काय ? आम्ही प्रत्येक वेळी त्यांचे ऐकून घेतो आणि गप्प राहातो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा आदर करतो. मी सांगू इच्छितो की, जेव्हा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे बसून कॉमेण्टस् करतात त्यावेळी ते मागदर्शन समजून त्या कॉमेण्टस् आम्ही सहन करतो. मी पाहतो

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भास्कर जाधव...)

की, जेव्हा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते बोलत असतात आणि त्यावेळी दुस-या सन्माननीय सदस्यांनी कॉमेण्टस् केले तर त्यांचा गैरसमज होतो, त्यांच्या भाषणामध्ये व्यत्यय आणला जात आहे असा त्यांचा समज होतो. परंतु तसा समज त्यांनी करुन घेऊ नये अशी माझी त्यांना विनंती आहे आणि सभापती महोदय, यासंदर्भात आपणही त्यांना याबाबतीत समज द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे. आता या ठिकाणी कुणाच्या जन्माचा, पैदाशीचा कुठे संबंध येतो ? "चोर सर्वधर्मीय आहेत काय ?" अशी विचारणा त्यांनी केली. मी सन्माननीय सदस्यांचा आदर ठेवून सांगू इच्छितो की, त्यांनी सुध्दा कॉमेण्टस् खेळीमेळीने घ्यायला पाहिजेत. त्यांनीही कॉमेण्टस् सहन करायला पाहिजेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, सभागृहातील एकंदरीत वातावरण हे खेळीमेळीचे असले पाहिजे. काही वेळा आपणाकडून एखाद्या सदस्याच्या संदर्भात एखादा शब्द उच्चारला तरी आपण मार्गदर्शक आहात असा त्यांचा समज असतो. त्यामुळे त्यांच्याकडून एखादी चर्चा झाली तर ती आपण जिव्हारी लावून घेण्याचे टाळले पाहिजे. हे मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनाच सांगतो असे नाही तर हे मी सर्वच सन्मानीय सदस्यांना सांगत आहे. एखादी चर्चा जिव्हारी लावून न घेता स्पिरिटने बोलण्याची आवश्यकता आहे.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : अस्मितेच्या बाबतीत जे कोणी बोलले ते कोणीही कधीही सहन करुन घेऊ नये.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आपण रेकॉर्ड तपासून पाहावे, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे म्हणणे असे होते की, पत्रके गुजराथी,मराठी हिंदी,इंग्रजी या भाषेतून काढलh जाणार आहेत, ती मराठी भाषेतच काढली जावीत इतर भाषेत कशाला ? यावर मी काय बोललो होतो की, मराठी भाषेतूनच कशाला इतर भाषेतूनही सदर पत्रके छापण्यात यावी, मराठी भाषिकच फक्त चोर आहेत का ? यासंदर्भात लगेच आईवर जाण्याचे काय कारण ? हे चूकीचे आहे. मागच्या वेळेसदेखील ज्वलंत चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आईच्या साडीवर उद्‌गार काढले होते, त्यावेळी मी ते देखील सर्व शांतपणे बसून ऐकत होतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनाच बोलता येते, असे नाही तर मलाही बोलता येते वडीलधारी म्हणून त्यांचा मान ठेवणे हे मी माझे कर्तव्य समजतो नाहीतर शब्द आणि तोंड मलाही आहे हे त्यांनी त्यांचे श्रेष्ठत्व अबाधित राखून लक्षात ठेवावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय गृह मंत्री आम्ही त्यांना ज्यावेळी दागिन्यांच्या चोरीच्या बाबतीमध्ये भेटलो, त्या वेळी ते असे म्हणाले होते की, शासनाच्या वतीने एक डिव्हाईस निर्माण करणार आहोत की ते डिव्हाईस जर रात्री एखाद्या सोनाराच्या दुकानात जर ठेवले तर आणि रात्री त्या दुकानात कोणी गेले तरी अलार्म होईल पण जर उंदीर गेला तर काय होणार यावर अद्यापही संशोधन करुन बघतो. गाडयांच्या बाबतीमध्ये देखील असेच आहे गाडयांना एक विशिष्ट प्रकारचे स्पीकर जर लावले तर ती गाडी कुठेही गेली तरी सॅटेलाईटच्या माध्यमातून ती लगेच ट्रेस होते जर समजा एखादी गाडी मग ती कोणत्याही कंपनीची असो ती जरी मर्सिडिज कंपनीची असली आणि त्या कंपनीने किंवा एखाद्या दुस-या कंपनीने जरी आपले एखादे मॉडेल बाजारात विक्रीकरीता आणले तरी त्या मॉडेलवर हे स्टिकर लावणे बंधनकारक केले पाहिजे व ते बंधनकारक होण्याकरिता आवश्यक ती कारवाई आपण करणार का ? तसे केले तर हा गाडी चोरीला जाण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही आणि हा "वाहन चोरी प्रतिबंधक सप्ताह " म्हणजे काय काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य या ठिकाणी सदर सप्ताह चालू केलेला आहे.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे......

श्री.मधुकर चव्हाण : हा भागवत् सप्ताह आहे. हा हरिनाम सप्ताह आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी वाहन चोरी प्रतिबंधासाठी ज्या उपाययोजना आहेत त्या मी सांगतो. मुंबईतील सर्वात जास्त वाहनांच्या चो-या या असुरक्षित नावाच्या पाटीमुळे झालेल्या आहेत. मुंबईमध्ये एकाच चावीचा वापर करणा-या म्हणजे सिंगल की सिस्टम वाहनांची संख्या मोठी आहे अशा वाहनांच्या चोरीवर नियंत्रण राखण्यासाठी सुरक्षा यंत्रणा बसविण्यास सांगण्यात आलेले आहे तसेच,वाहने जुजबी दुरुस्तीकरिता रोड साईड मेकॅनिकच्या ताब्यात द्यावयाची नाहीत.

श्री.मधुकर चव्हाण : हे झाले वाहनमालकांचे पण पोलिसांनी याबाबतीत काय करावयाचे ते तरी सांगा.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : ठीक आहे, ते सांगतो परंतु आधी ऐकून तरी घ्या सप्ताह तरी होऊ द्या नंतर सांगतो.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय, आपला हा सप्ताहाचा उपक्रम अतिशय चांगला आहे पण या ज्या चो-या होतात,गाडया जातात त्या तातडीने निकालात निघाव्यात याकरिता पोलीस विभाग कोणत्या उपाययोजना करणार आहे हा प्रश्न आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी नंबर प्लेटबाबत जे सांगितले त्याबाबत बोलावयाचे झाले तर आता सेंट्रल मोटार वेहिकल रुल याच्यामध्ये बदल करण्यात आलेला आहे. जी नवीन गाडी आहे,त्या गाडीचे रजिस्ट्रेशन झाल्यानंतर त्याच्यावर नंबर पडतो व ती नंबर प्लेट आता अशी तयार करण्यात येणार आहे की, एखाद्या गाडीला जर नंबर प्लेट लावल्यानंतर जर ती दुस-या गाडीला काढून लावावयाची म्हटली तर ती प्लेट काढतांना तुटेल व गाडीच्या मागच्या व पुढच्या काचाला पंचिंग करण्याची देखील व्यवस्था करण्यात आलेली आहे. चेकनाक्यावर येणा-या गाडयांची माहिती व नंबर कळण्याकरिता सीसीटीव्हीची व्यवस्था करण्यात आलेली आहे म्हणजे चेक नाक्यावरती कोणती गाडी आली तर ती गाडी व नंबर याचे ट्रेसिंग लगेच पोलीस कंट्रोलला कळू शकते. यासंदर्भात महाराष्ट्र मोटार व्हेईकल रुलमध्ये अंशत: बदल करण्यात येणार आहे.

यानंतर श्री.कानडे......

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ ता.प्र.क्र. 29376.... 13:25

श्री. सुरेश जेथलिया : सभापती महोदय, गाडयांच्या चोरीचा प्रश्न केवळ मुंबईपुरता मर्यादित नसून तो संपूर्ण मराठवाडयामध्ये आणि पूर्ण महाराष्ट्रात सुध्दा आहे. नुकतीच जालना जिल्हा प्रमुखाची सफारी गाडी त्याच्या घरासमोरुन चोरुन नेण्यात आली. त्याचप्रमाणे समाजसेवक अण्णा हजारे यांची गाडी चोरटयांनी पळवून नेली ती अद्याप सापडलेली नाही. गाडया चोरणारांची फार मोठी टोळी राज्यामध्ये सक्रीय आहे. त्यादृष्टीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. या टोळीचा तपास करण्याच्या दृष्टीने शासन कोणती उपाययोजना लवकरात लवकर करणार आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मुंबई असो किंवा राज्याचा प्रश्न असो चोऱ्या होत आहेत. चोऱ्यांमधून जवळजवळ 35 टक्के रिकव्हरी झालेली आहे. चोऱ्या पकडण्याचे काम सुरुच आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, 20 एप्रिल 2007 पर्यंत मुंबई पोलिसांच्या हद्दीमधून 1139 गाडया चोरीस गेल्या आहेत. शोध घेतलेल्या 289 पैकी 222 वाहनांचा शोध लागला आहे. 289 गाडयांचा शोध कोणी लावला ? पोलिसांनी, मंत्र्यांनी किंवा चोरांनी याचे उत्तर द्यावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, चोरीस गेलेल्या वाहनांपैकी पोलिसांकडून हस्तगत करण्यात आलेली वाहने 222 आहेत. काही वाहने मालकांनी नजरेस आणून दिली अशी 31 वाहने आणि जनतेकडून माहिती मिळाली अशी 36 वाहने म्हणजे एकूण 289 वाहने आहेत.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी प्रतिबंधात्मक सप्ताहाविषयी माहिती दिलेली आहे. यामुळे पोलीस खात्यात घोटाळा होण्याची शक्यता आहे. कारण सप्ताहामध्ये जी कामे सांगितलेली आहेत ती बारमाही कामे आहेत. नाहीतर पोलिसांना वाटेल की ही कामे फक्त हप्ताभर करावयाची आहेत. हा विषय पोलिसांनी गंभीरपणाने घेतला पाहिजे. सप्ताहामध्ये विशेष अशा प्रकारची कोणती कामे घेतली आहेत याचा शासनाने खुलासा करावा.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी यापूर्वीच स्पष्ट केले आहे की, नेहमीची कामे पोलिसांना करावी लागणार आहेतच. त्याव्यतिरिक्त जास्त काळजीपूर्वक विशेष मोहीम या सप्ताहाच्या माध्यमातून घेण्यात आली आहे.

------

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे पोलिस आयुक्तालयातील कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांकरिता असलेल्या ३७ बैठ्या चाळींची प्रचंड दुरावस्था झाल्याबाबत**

**(८) * ३१५१० श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप, श्री.भास्कर जाधव , श्री. राजेंद्र जैन , श्री. सदाशिवराव पोळ , डॉ. वसंत पवार , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जगन्नाथ शेवाळे , प्रा. फौजीया खान :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे पोलिस आयुक्तालयातील कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांकरिता असलेल्या ३७ बैठ्या चाळींची प्रचंड दुरावस्था झालेली असून दुरवर असलेली प्रसाधनगृहे, विजेच्या खांबावर नसलेल्या लाईट, वसाहतीची रंगरंगोटी इ. मुलभूत सोयीसुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याने त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, -श्री.आर.आर. पाटील यांच्याकरिता** : (१) ठाणे पोलीस आयुक्तालयातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी सन १९४० च्या दरम्यान ३७ बैठ्या चाळीचे बांधकाम करण्यात आले आहे. त्यापैकी १० बैठ्या चाळी सन १९८५ मध्ये पाडून त्याठिकाणी ३६० निवासस्थाने असलेल्या नवीन इमारतींचे बांधकाम करण्यांत आले आहे. उर्वरित २७ बैठ्या चाळीचे बांधकाम जुने झाले असून तेथील निवासस्थानांची दुरावस्था झाली आहे.

(२) व (३) सदरहू जुन्या बैठ्या चाळीचे ठिकाणी पोलीस आयुक्त, ठाणे यांनी स्वत: भेट देवून सदर निवासस्थानांची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, पोलिसांचे जे नैतिक अध:पतन होत आहे त्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांची राहण्याची होत असलेली दुरावस्था हे आहे. आज ठाण्यामध्ये जे पोलीस कर्मचारी चाळींमधून रहात आहेत त्यांना घर म्हणावे काय हा माझ्या मनात प्रश्न निर्माण होतो. पांडू हवालदार या सिनेमामध्ये चांगले काम केल्याबद्दल त्या हवालदाराला पारितोषिक दिल्याचे दाखविले आहे. हवालदार म्हणाला मला पारितोषिक देऊ शकता तर शौचालयाची एक जागा द्या. तशी परिस्थिती या चाळीमध्ये राहणाऱ्या पोलिसांची आहे. अत्यंत घाणेरडया अवस्थेमध्ये हे कर्मचारी रहात आहेत. घरांचे रिपेअर नाही, पाणी गळत आहे,रस्ते नाहीत. गुरे सुध्दा चांगल्या ठिकाणी राहतात त्यांच्यापेक्षा वाईट अवस्था या घरांची आहे. अधिकाऱ्यांची घरे मात्र सुसज्ज,अे.सी.लावून टकाटक केलेली असतात. या कर्मचाऱ्यांना आपण न्याय देणार आहात काय ? त्यांची राहण्याची व्यवस्था बीओटी तत्वावर करा. पाटबंधारे आणि बांधकाम खात्याचे भूखंड.......

(नंतर श्री.भोगले

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड....... ता.प्र.क्र.31510....

चांगल्या प्रकारे डेव्हलप होतात. हे मोठे भूखंड आहेत, तेथे पोलीस राहतात, त्यांच्यासाठी उत्तम राहण्याची सोय उपलब्ध करुन दिली पाहिजे. बीओटी तत्वावर घरे बांधावीत. त्यांना चांगली घरे देणार का? त्यांना न्याय मिळेल काय?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब खरी आहे. त्याठिकाणी एकूण 37 बैठ्या चाळी होत्या. त्यापैकी 10 बैठ्या चाळी 1985 च्या दरम्यान तोडण्यात येऊन तेथे 12 नवीन इमारती बांधण्यात आल्या. या इमारतींमध्ये एकूण 360 निवासस्थाने 1990 साली उपलब्ध करुन देण्यात आली. 27 चाळींचा प्रस्ताव डी.जी.कार्यालयाकडे आलेला आहे.

**सभापती** : डी.जी.कार्यालयाकडे जो प्रस्ताव आलेला आहे त्याचा पाठपुरावा करुन तो प्रस्ताव शासनाकडे मागवून घ्यावा.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : जेवढे शक्य आहे त्यापेक्षा जास्त लवकर करण्याचा आम्ही प्रयत्न करु.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, शासनाने तात्काळ प्रस्ताव मागवून घ्यावा असे आपण सुचविले आहे. आपल्या उपस्थितीत साधारणपणे किती कालावधीत प्रस्ताव मागवून घेण्यात येईल आणि त्या प्रस्तावाची पूर्तता करण्यात येईल हे मंत्रीमहोदय सांगतील काय?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, तीन महिन्याच्या काळात त्या कामाला सुरुवात करण्यात येईल.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**राज्यातील कैद्यांना वैद्यकीय सुविधा देण्याबाबत**

**(९) * २९३८८ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री. सुधाकर गणगणे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यभरातील विविध तुरुंगात असलेले सुमारे चाळीस टक्के व्यसनाधिन कैदी एच.आय.व्हि पॉझिटिव्ह असून त्यातील काहीजण मृत्युमुखीपडल्याचे दिनांक १० एप्रिल, २००७ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कैदयांना वैद्यकीय सुविधा देण्यास राज्यसरकार अपयशी ठरल्याने कैदी मरणाच्यादारात आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती उपाय योजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) राज्यात कारागृहात असलेल्या २५८१५ कैद्यांपैकी ११७ कैदी एचआयव्ही बाधीत होते. या कैद्यांपैकी ६ कैदी मयत झाले आहेत.

(२), (३) हे खरे नाही, कारागृहातील सर्व प्रकारच्या रुग्ण कैद्यांना कारागृह रुग्णालय व शासकीय रुग्णालये व शासकीय वैद्यकिय महाविद्यालय यांचेमार्फत वैद्यकिय सुविधा दिल्या जातात. तसेच शासकीय वैद्यकिय अधिकारी यांचे सल्ल्यानुसार खाजगी रुग्णालयातही औषधोपचार करण्यात येतात. एचआयव्ही बाधित कैद्यांना वैद्यकिय सल्ल्यानुसार औषधे, उच्च प्रथिने असलेला आहार देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, राज्यातील तुरुंगात एड्‌सग्रस्त ११७ कैदी आहेत, त्यापैकी ६ कैद्यांचा मृत्यू झाल्याचे उत्तरात नमूद केले आहे. उर्वरित कैद्यांवर कोणते उपचार करण्यात येत आहेत? तुरुंगातील दवाखान्यात नेमलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची माहिती दिली जाईल काय?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, एच.आय.व्ही.बाधित कैद्यांना वैद्यकीय सल्ल्यानुसार औषधोपचार केला जातो. तसेच वैद्यकीय सल्ल्यानुसार उच्च प्रथिने असलेला आहार देण्यात येतो. उदा.अंडी, मटण, फळे व दूध इ.चा त्यामध्ये समावेश असतो. कैद्यांच्या उपचारासाठी सर्व कारागृहांच्या आस्थापनेवर १२५ वैद्यकीय अधिकारी व २० रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिल्या आहेत.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

------

..३..



**पृ.शी./मु.शी.: नियम ९३ अन्वये सूचना**

**सभापती** : माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील मौजे रेडी येथे मायनिंग प्रकल्प सुरु असून तेथे सीआरझेड कायद्याचे उल्लंघन सुरु असणे, मायनिंगची वाया गेलेली माती समुद्रात टाकल्याने समुद्र बुजवून अतिरिक्त जमीन तयार होणे यामुळे पुरातन काळातील हत्तीची सोंड ही ऐतिहासिक वास्तू नष्ट होणे" या विषयावर नियम ९३ अन्वये सूचना दिली आहे. तो नियम ९३ चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असा मी निदेश देत आहे.

यानंतर माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी "आर.ए.पोतदार आयुर्वेदिक महाविद्यालयातील वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागातर्फे दिनांक १७ ते २१ जुलै, २००६ या कालावधीत संस्थेच्या केलेल्या अचानक तपासणीत अनेक गंभीर मुद्दे लक्षात येणे" या विषयावर नियम ९३ अन्वये सूचना दिली आहे. तो नियम ९३ चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असा मी निदेश देत आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MAP/ KGS/ प्रथम श्री. भोगले.. 13:35

**सभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण यांनी "मुंबई शहरात गिरण्यांमध्ये सुमारे 2 लाख 50 हजार कामगार कार्यरत असणे, शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे गिरणी मालकांनी मोठया प्रमाणात गिरण्यांची जमीन विक्री करणे सदर कामगारांना त्यांची कायदेशीर देणी अद्यापपर्यंत न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, श्रीकांत जोशी, प्रतापराव सोनवणे यांनी "शासनाने जून, 2000 पासून शिक्षण क्षेत्रात योजना लागू केली असून मागासवर्गीय अप्रशिक्षित शिक्षण सेवकांच्या नेमणुका करण्यास अनुमती देऊन त्यांना 3 वर्षाच्या आत पत्राद्वारे डी.एड. प्रशिक्षण पूर्ण करण्याची अट असणे. मात्र त्यांना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, संजय केळकर यांनी "मौजे ओवळा, जि.ठाणे येथील कॉसमॉस स्टोन कॉरी या कपनीने वादग्रस्त क्षेत्रात उत्खनन केल्यामुळे जिल्हाधिकारी ठाणे, यांनी सदर कंपनीस महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमान्वये तिप्पट दंडाची रक्कम वसूल का करण्यात येऊ नये अशी नोटीस दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील, डॉ.नीलम गो-हे, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री अनिल परब, अरविंद सावंत यांनी "बोरिवलीच्या पश्चिमेला बाभई नाक्यावर असलेली लक्ष्मी-छाया ही सात मजली इमारत दि. 18.7.2007 रोजी कोसळून त्यात 11 व्यक्तींचा मृत्यू होणे. सदर इमारत ही धोकादायक इमारतींच्या यादीत नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर वेगळी चर्चा घेतली जाणार असल्यामुळे या सूचनेला मी अनुमती नाकारीत आहे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील, श्री.जयंत प्र.पाटील यांनी "शासनाने जाहीर केलेल्या शेतकरी अपघात विमा योजनेतंर्गत राज्यातील अपघातात जखमी अथवा मृत झालेल्या शेतक-यांच्या नातेवाइकांनी कागदपत्राची पूर्तता करुनही विमा कंपनीने अपघात विमा मंजूर न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री. अरविंद सावंत, अनिल परब दीपक सावंत, परशुराम उपरकर, सुरेश जेथलिया यांनी "पुणे जिल्हयातील हिंजबवडी येथील कॉग्निझंट कंपनीत दि. 18.7.2007 रोजी वा त्या दरम्यान एक जिवंत बॉम्बचे पार्सल पोस्टाने आले असून सदर पार्सल पाठविणा-याचा पत्ता पोलिसांना माहिती असूनही याबाबत कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "रायगड जिल्हयातील मुरुड तालुक्यातील शेतकरी इर्शाद हुसेन खतिब यांना आंबोली लघुपाटबंधारे प्रकल्पासाठी तिसली गावातील संपादित केलेल्या जमिनीपोटी शासनाकडून मिळालेले धनादेश न वटता दोन वेळ परत येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, पाशा पटेल यांनी "पैठण जिल्हा औरंगाबाद येथील नाथसागरास पक्षी अभयारण्य म्हणून घोषित करुन इको सेन्सेटीव्ह घोंषित करणे, त्यामुळे पैठण नगरपालिका क्षेत्रात कोणतेही काम करण्यास प्रतिबंध झाल्यामुळे विकास कामे न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SGJ/ MAP/ KGS/ प्रथम श्री. भोगले.. 13:35

**सभापती** ....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे यांनी "दि. 30 जून, 2006 अन्वये राज्यातील बिगर आदिवासी क्षेत्रातील 439 व आदिवासी क्षेत्रातील 44 माध्यमिक शाळांना अद्यापही अनुदानासाठी पात्र ठरल्या असूनही आदिवासी उपयोजना क्षेत्रातील 44 माध्यमिक शाळांना अद्यापही अनुदान मंजूर न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देत आहे.

---------------------

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात माहे जूनच्या शेवटच्या आठवडयात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान व ओला दुष्काळ पडण्याची भिती.

**मु. शी.** : राज्यात माहे जूनच्या शेवटच्या आठवडयात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान व ओला दुष्काळ पडण्याची भिती यासंबंधी सर्वश्री सर्वश्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, संजय दत्त, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, गोविंदराव आदिक, सुरेशदादा देशमुख, रमेश निकोसे, धनाजी साठे, श्रीमती सुधा जोशी, सर्वश्री. राजन तेली, सुधाकर गणगणे, श्रीमती. फौजीया खान, सर्वश्री. गुरुनाथ कुलकर्णी, भास्कर जाधव, वसंत पवार, सदाशिवराव पोळ, लक्ष्मण जगताप, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण, सागर मेघे, पाशा पटेल, रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री. विक्रम काळे, वसंत चव्हाण, जगन्नाथ शेवाळे, राजेंद्र जैन, व्हि.यु.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, जी.एल.अैनापुरे, प्रा.शरद पाटील, सर्वश्री.जयंत प्र.पाटील, जगदीश गुप्ता, वि.प.स. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रणजितसिंह मोहिते पाटील ( सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"माहे जून च्या शेवटच्या आठवडयात मुंबईसह राज्याच्या पुणे, धुळे, नंदूरबार, जळगाव, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यात अतिवृष्टी होणे, यात वीज अंगावर कोसळून व पुरात वाहून जाऊन सुमारे 50 जणांचा मृत्यू होणे व कित्येक जखमी होणे, मुंबई शहर व उपनगरे जलमय होऊन प्रचंड प्रमाणात रस्त्यावर पाणी साठून वाहतूक विस्कळीत होणे, नालेसफाईसाठी मुंबई महापालिकेने कोट्यावधी रुपये खर्च करुनही योग्यरित्या नालेसफाई न झाल्यामुळे पाणी निचरा न होणे, त्याचप्रमाणे पुणे व ठाणे शहरात देखील रस्त्याच्या व नाल्यांच्या कामासाठी कोट्यावधी रुपये खर्च होऊन देखील रस्ते व नाले दुरुस्त न झाल्याने त्यावर पाणी मोठ्या प्रमाणावर साठणे, विदर्भातील अकोला, अमरावती व गडचिरोली जिल्ह्यात जुलैच्या 9 तारखेला प्रचंड प्रमाणात मुसळधार पाऊस झाल्याने पुरात सुमारे 13 जण वाहून जाणे, या जिल्ह्यांतील जवळपास सर्वच नद्यांना मोठ्या प्रमाणावर पुर आल्याने लाखो हेक्टर जमीन पाण्याखाली येऊन प्रचंड प्रमाणात पिकांचे नुकसान होणे, अनेक घरांची पडझड होणे, या अतिवृष्टीत मानवी हानी बरोबरच

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह मोहिते पाटील......

पशुधनाची देखील हानी होणे, यामुळे राज्याच्या अकोला, अमरावती, गडचिरोली, धुळे, नंदूरबार, पुणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी इत्यादी जिल्ह्यात ओला दुष्काळ पडण्याची निर्माण झालेली भिती, सदर अतिवृष्टीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे शासनाकडून योग्यरितीने पुनर्वसन न होणे, शासनाकडून पूर नियंत्रण व नालेसफाई तसेच रस्त्यांचे बांधकाम यात योग्य ते नियंत्रण नसल्याने भविष्यातही असेच पाणी साठून त्यामुळे जनजीवन विस्कळित व मानवी हानी होण्याचा निर्माण झालेला गंभीर धोका, नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. पतंगराव कदम ( पुनर्वसन व मदत कार्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाने गेल्या वर्षी आणि या वर्षी देखील अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली आहे. या सर्व परिस्थितीला सामोरे जात असताना दुसरीकडे ग्लोबल वॉर्मिंग बाबत चर्चा होत आहे. त्याबाबत समिती नेमण्याचा शासन पातळीवर विचार होत आहे काय ? दुसरी गोष्ट म्हणजे धुळे जिल्ह्यात धरणातील पाण्याची निचरा होण्यासाठी ते सांडव्यात, ओढ्यात, किंवा कालव्यात सोडण्याची व्यवस्था केलेली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांत अशाप्रकारची उपाययोजना करण्यात येणार आहे काय ? तसेच धरणांतील गाळ काढण्यासाठी उपाययोजना करण्यात आली आहे काय ? सभापती महोदय, सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे अतिवृष्टीमुळे पेरण्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. तेव्हा दुबार पेरण्या करण्याकरिता शासन शेतकऱ्यांना अनुदान देणार आहे काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मागील दोन वर्षातील अनुभव लक्षात घेताना गेल्या वर्षी मी स्वत: स्टेटमेंट केले होते की, "महाराष्ट्रातील धरणांतील पाण्याचे नियोजन बरोबर होते का हे तपासण्याची गरज आहे." त्यावेळी मी वस्तुनिष्ठ निवेदन केले होते. तसेच आपल्या राज्याला इतर राज्यातील धरणे लागून आहेत त्या धरणातील पाणी योग्य रितीने सोडण्यात येते किंवा कसे याचाही विचार करण्याची आवश्यकता होती. याचा विचार करुन शासनाने माजी सचिव श्री.वडनेरे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीचा अहवाल आता प्राप्त झालेला आहे. त्या अहवालात धरणाचे पाणी कोणत्या पध्दतीने सोडले पाहिजे, पाणी सोडताना कोणती काळजी घेतली पाहिजे यासंबंधी सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, धुळे जिल्ह्यात धरणातील पाण्याचे नियोजन करण्यात आले त्याप्रमाणे इतर जिल्ह्यांत कार्यवाही करण्यात येईल काय ? त्याबाबत सांगू इच्छितो की, इतर जिल्ह्यांतील परिस्थिती अमजावून निर्णय घेण्यात येईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, शासनाचे निवेदन पाहिले तर असे लक्षात येते की, आलेल्या प्रत्येक संकटामध्ये शासनाने सर्वसामान्य लोकांना तसेच शेतकऱ्यांना फार मोठ्या प्रमाणावर मदत केलेली दिसते. गेल्या वर्षी 8 ऑगस्ट रोजी नंदूरबार जिल्ह्यात तापी नदीला पूर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी...........

येऊन प्रकाशातीर्थक्षेत्र, बसस्टॅन्ड तसेच आजुबाजूचा सर्व परिसर पाण्याखाली गेला. जवळपास 200 व्यापाऱ्यांची दुकाने पाण्याखाली होती. बऱ्याच ठिकाणी पाणीच पाणी होते, रस्ता दिसत नव्हता. निवेदनात म्हटले आहे की, "बाधित दुकानदार, टपरीधारक व हातगाडीधारक यांना अनुक्रमे दहा हजार रुपये, पाच हजार रुपये आणि अडीच हजार रुपये मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे." परंतु शहादा येथील दुकानदारांना अद्यापर्यंत एकाही पैशाची मदत मिळालेली नाही. गेल्या वर्षापासून ते तहसिलदार कार्यालयात फेऱ्या मारत आहेत. शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून होत नाही. तेव्हा अशा अधिकाऱ्यांना शासन निलंबित करणार आहे काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, ज्या दुकानदार / टपरीवाल्यांकडे लायसन असेल त्यांनाच मदत देण्यात येत होती. परंतु यामध्ये आता दुरुस्ती करण्यात आलेली आहे. गावातील ग्रामसेवक, तलाठी, ग्रामपंचायत यांचेकडून दुकान असल्याचा दाखला आणल्यास त्यांना देखील मदत दिली पाहिजे असे आदेश काढलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी शहादा येथील दुकानदारांना अद्यापपर्यंत मदत दिली नसल्याचे सांगून संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करणार काय असा प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, या प्रकरणाची चौकशी करण्यात येऊन निर्णय घेण्यात येईल.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी याठिकाणी माननीय पुनर्वसन मंत्र्यांचे अभिनंदन करीन की, त्यांनी जो निर्णय जाहीर केला, तो तसा योग्यच आहे, परंतु आपल्या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. याठिकाणी मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ज्याप्रमाणे आता सन्माननीय सदस्यांनी नंदूरबार जिल्हयाची माहिती दिली, त्याप्रमाणेच अमरावती जिल्हयाचीही परिस्थिती आहे. मी व माननीय मंत्रिमहोदय अमरावती जिल्हयात जाऊन आलो. अमरावती जिल्हयातील दर्यापूर आणि अंजणगावमध्ये पुराने फार मोठया प्रमाणात नुकसान झाले. त्याठिकाणी पूर आल्यानंतर ज्यांची घरे पुरामुळे पूर्णपणे उध्दवस्त झाली, त्यांना संक्रमण शिबीरामध्ये 6 दिवसापर्यंत त्यांच्या जेवणाची किंवा इतर व्यवस्था राज्य शासनामार्फत करण्यात आलेली नाही. मी अमरावती जिल्हयातील 10 गावांचा दौरा केलेला आहे. त्यापैकी कुठल्याही गावांमध्ये शासनामार्फत व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्याठिकाणी सामाजिक संस्थांनी व्यवस्था केली. याबाबतीत मी स्वत: तहसिलदारांना धान्याचे व रॉकेलचे वाटप का केले नाही, असे विचारले असता त्यांनी मला असे सांगितले की, यासंदर्भात शासनाकडून आम्हाला कुठल्याही प्रकारचे आदेश न मिळाल्यामुळे आम्ही धान्याचे व रॉकेलचे वाटप करु शकत नाही, असे उत्तर दिले. त्याठिकाणी 7-7 दिवस पूरग्रस्त उघडयावर पावसात बसून होते. गावकरी, सामाजिक संस्था त्यांची व्यवस्था करीत होते. परंतु त्यांना शासनामार्फत कुठल्याही प्रकारची मदत दिली गेली नाही, त्यामुळे यासंदर्भात माझी विनंती आहे की, यासंबंधीची सर्व चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, याबाबतीत कायमच्या स्टॅण्डींग ऑर्डर आहेत. गेल्या दोन वर्षात स्पेशल ऑर्डर काढलेल्या आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे, मी अमरावती जिल्हयाचा दौरा केल्यानंतर संबंध डिव्हीजनच्या व जिल्हयातील अधिकाऱ्यांची बैठक घेतली. प्रशासन कसे चालते, याची मला माहिती आहे. पहिल्यांदा जी.आर. निघत नाही, निघाला तर तो समजत नाही, समजला तर तो खाली पोहचत नाही, पोहचला तर पैसे मिळत नाहीत, त्याची अंमलबजावणी होत नाही. अशाप्रकारे आम्ही गेल्या दोन वर्षात तोंड दिलेले आहे. याबाबतीत माझ्या अध्यक्षतेखाली कॅबिनेटची एक सब कमिटी केली व त्याची मंगळवारी बैठक होते. यासंदर्भात नोटीस काढून दुपारी 3.00 वाजता बैठक होते. अमरावतीला

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम....

गेल्याच्या दिवशी मला एक जी.आर.ची कॉपी मिळाली नाही, म्हणून मी नाशिकला रेल्वेमध्ये फॅक्स करुन तो जी.आर. मागवून घेतला. सरकारी अधिकाऱ्यांकडे आदेश असल्याशिवाय ते काहीच करत नाहीत. परंतु याबाबतीत स्टॅण्डींग ऑर्डर दिल्या असून याची आम्ही गंभीर दखल घेतलेली आहे. सुरुवातीला कॅम्पमध्ये गेल्यानंतर आम्हाला असे दिसून आले होते की, त्याठिकाणी जी स्वयंसेवी संस्था त्यांची व्यवस्था करण्यासाठी येणार होती, ती अजूनपर्यंत तेथे पोहचली नव्हती. त्यावेळीच सरकारने निर्णय घेतला की, लोकांच्या राहण्याची, खाण्याची सोय करण्यासाठी लेखाशिर्ष-2245 मधून खर्च करण्यात येईल. आयुक्तांमार्फत आपण चौकशी चालू केली असून ज्या अधिकाऱ्यांनी पूरग्रस्त लोकांच्या जेवणाची व राहण्याची व्यवस्था केली नसेल तर त्यांच्यावर ॲक्शन घेण्यात येईल. रॉकेल व धान्य वाटपाचे आदेश मी 9 तारखेस दिलेले आहेत. यासंबंधी मी विभागीय व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांची बैठक घेऊन ताबडतोब पूरग्रस्तांना मदत देण्याच्या दृष्टीने व त्यांना धान्याचे व रॉकेलचे वाटप 2-4 दिवसात करावे अशा सूचना यंत्रणांना दिलेल्या आहेत. कारण, मी अमरावती जिल्हयाचा दौरा करीत असताना कुठलीही यंत्रणा त्याठिकाणी अशाप्रकारचे वाटप करत नसल्याचे दिसून आल्यानंतर माझ्यासोबत असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांना, प्रांत अधिकाऱ्यांना व तहसिलदारांना युध्द पातळीवर धान्याचे, रॉकेलचे व सानुग्रह अनुदान देण्याच्या सूचना केल्या. अशाप्रकारे आपण धान्य व रॉकेल वाटपाची पूर्णपणे व्यवस्था केलेली आहे. मघाशी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी येथे सांगितल्याप्रमाणे, जर अशाप्रकारची व्यवस्था झाली नसेल तर याबाबतीत संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अमरावती जिल्हयात सर्वात जास्त पूर आलेला असून त्याठिकाणी माननीय मंत्रिमहोदय व माननीय विरोधी पक्षनेते जाऊन आलेले आहेत. पिढी आणि भूलेश्वरी या नद्यांना महत्तम पूर येऊन मोठयाप्रमाणात नुकसान झालेले आहे. धरण बांधण्याच्या दृष्टीने आपण 1500 कोटी रुपये खर्च केले.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...........

माझा छोटा प्रश्न असा आहे की, खारपड पट्टा ज्या ठिकाणी आहे त्या भागामध्ये गाळाने नद्या भरुन जातात. दोन झाडांमध्ये गाळ आला की नद्या भरुन जातात. सभापती महोदय, आपणही शेतकरी आहात. नद्या भरल्यानंतर ते पाणी खाली शेतात भरते व सर्व शेती खरडून नेते. यामुळे शेतक-यांचे मोठया प्रमाणावर नुकसान होते. सन्माननीय मुख्यमंत्र्यांकडे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मी हा विषय उपस्थित केला होता. यासंबंधी तीन वेळा चर्चा झाली आहे. विशेषत: गाळाने भरलेला भाग आहे हा ताबडतोबीने उपसण्याची गरज आहे. या गाळामुळे नदीचे पात्र जागेवर रहात नाही. धरणाच्या बाबतीतही प्रश्न आहेत. परंतु, ते मी या ठिकाणी उपस्थित करणार नाही. कारण, एकाच वेळी किती विषय एकत्रित बोलावेत यालाही मर्यादा आहेत. हे सर्व कारण नसतांना झ ाले आहे. मिठी नदीला तरी अतिक्रमणाचे कारण आहे. परंतु, या ठिकाणी निसर्गाची आपत्ती हे कारण आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात तीन-चार वेळा कार्यवाही करण्याबाबत जाहीर केले आहे. माझी या निमित्ताने सन्माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, एक महिन्यामध्ये 4/5 जे.सी.बी.पाठवून हा सर्व गाळ काढण्यात यावा. असे कदाचित होईल की, जिल्हाधिका-यांना सूचना देण्यात येतील, पाटबंधारे विभागाचे अधिकारी अंदाजपत्रक तयार करतील, निधीची मागणी करण्यात येईल व हे सर्व काम आणखी सहा-आठ महिने प्रलंबित राहिल. या नद्या वर्षानुवर्षे गाळाने भरलेल्या आहेत व शेतक-यांना त्रास सुरु आहे. म्हणून माझी स्पेसिफिक विनंती आहे की, हे सर्व न करता 4/5 जे.सी.बी.तातडीने पाठवून हा सर्व गाळ काढण्यात यावा. आता तर नद्यांमध्ये नाल्यांचाही समावेश झाला आहे. भुलेश्वरी नावाची एक नदी आहे. सन्माननीय श्री.सुदाम देशमुख यांनी अशी मागणी केली होती की, या पात्रातील बेशरमची झाडे काढून द्यावीत. यासाठी विशेष शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यानंतर काहीही झाले नाही. आमच्याकडूनही त्याचा पाठपुरावा झाला नाही, आमचाही दोष आहे. हा सर्व विषय वेगळा आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, पावसाळा संपल्याबरोबर नद्यांमधील गाळ काढण्याकरिता 5 जे.सी.बी.ताबडतोबीने पाठवून हे काम विभागामार्फत केले जाईल काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, प्रा.बी.टी.देशमुख यांनी या ठिकाणी अतिशय चांगली सूचना केली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत गाळ

..2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम..........

काढण्याबाबत आश्वासन दिल्याचेही त्यांनी सांगितले. मी अशी माहिती देऊ इच्छितो की, यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे व अमरावती जिल्हयासाठी ताबडतोबीने करावयाच्या कामांसाठी 5 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पावसाळा उलटल्यानंतर ताबडतोबीने नद्यांमधील गाळ काढण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या 5 कोटी रुपयांमधून कामे करुन घेण्याबाबत जिल्हाधिका-यांना सूचना देण्यात येतील.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन 2005-2007 या काळात महापूर आले व मोठी हानी झाली आहे. बाधित लोकांना मदत करण्यासाठी शासनाने पूर्ण प्रयत्न केले आहेत. खास करुन कोकणामध्ये जी शेती वाहून गेली त्यासंदर्भात मला काही सूचना करावयाची आहे. पूर आल्यानंतर शेतक-यांना मदत करण्याच्या दृष्टीने बियाण्यांचे वाटप करण्यात येते. कोकणामध्ये दुबार पीक घेतले जात नसल्यामुळे या बियाणांचा उपयोग होत नाही तसेच खतांचाही उपयोग होत नाही. शेती खचून जाते व त्यामध्ये लागवड करता येत नाही. कोकणामध्ये ज्या मशागत केलेल्या जमिनी असतात, लागवडीयोग्य जमिनी असतात त्यांचा स्तर वरचा असतो व खालचा भाग दगडांचा असतो. त्यामुळे पूरात सर्व माती वाहून जाते. अशा प्रकारे शेतीची हानी होऊ नये म्हणून उपाययोजना केल्या जातील काय ? कोकणातील शेती लागवडीयोग्य करण्याकरिता कोकणातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता कोकणासाठी विशिष्ट मदत करणार काय ? त्याचप्रमाणे शासनाचे असे स्थायी आदेश आहेत की, ज्यांचे बागायतीचे 50 टक्के नुकसान झाले असेल त्याला 5 हजार ते 15 हजार रुपये नुकसान भरपाई दिली जाईल. परंतु, 50 टक्क्यांची व्याख्या शासनाने केलेली नाही. आपल्याला याची माहिती असेल की, कोकणातील जमीन ही तुकडया तुकडयांची असते. गेल्यावर्षी मदतीसाठी 18 कोटी रुपये मंजूर केले होते. त्यामधील दोन कोटी रुपयांचेही वाटप झालेले नाही. बाकीचे पैसे तसेच पडून राहिले आहेत. कोकणातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता शेती सुधारणा करण्याकरिता उपाययोजना करण्यात येतील काय, सध्याच्या स्थायी आदेशामधील अटींमुळे कोकणातील शेतक-यांना मदत मिळत नाही त्यासाठी जेवढे नुकसान झाले असेल तेवढी नुकसान भरपाई देण्याबाबत विचार करण्यात येईल काय ? तसेच 25 हजार रुपयांऐवजी 50 हजार रुपयांपर्यन्त हेक्टरी मदत करण्यात येईल काय ?

यानंतर श्री.बोरले...........

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ KGS/ MAP/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ......... 13:55

( **सभापतीस्थानी माननीय उपसभापती** )

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, कोकणातील परिस्थिती वेगळी आहे, याची मला कल्पना आहे. पूर्वी मी रायगड जिल्हयाचा पालकमंत्री होतो. कोकणामध्ये मोठया प्रमाणावर पाऊस पडतो. पावसाचे पाणी वाहून जाते आणि पिण्यास पाणी राहत नाही. कोकणातील शेतीचा वेगळया पद्धतीने विचार करण्याची आवश्यकता आहे. मी कालच विधानसभेमध्ये शेतीच्या खर्चाची मर्यादा दोन हेक्टर ऐवजी पाच हेक्टर पर्यंत वाढविलेली आहे आणि 25 हजार रुपये हेक्टरी मदत देण्याची घोषणाही केलेली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी गाळ काढण्याची सूचना मान्य केली आहे, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. हा ताबडतोबीचा उपाय केल्यामुळे नद्यांच्या काठावरील लोकांना फार मोठा रिलीफ मिळेल. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी तेथे पत्रकार परिषद घेऊन हा मुद्दा मांडला होता. माननीय मंत्री महोदयांना मला अशी विनंती करावयाची आहे की, इतर ठिकाणच्या जेसीबी मशीन्स काढू नयेत कारण त्या मशीन्स नादुरुस्त असतात. त्यामुळे लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन 5 नवीन जेसीबी मशीन्स खरेदी करुन त्या मशिन्सव्दारा नद्या आणि नाल्यातील गाळ काढण्यात येईल काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना सांगू इच्छितो की, कालच अमरावती जिल्हयासाठी 5 कोटी रुपयांची स्पेशल ग्रँट दिलेली आहे. इतर ठिकाणच्या 5 जेसीबी मशीन्स काढून न घेता व नादुरुस्त मशीन न पाठविता तेथील लोकप्रतिनिधींना विश्वासात घेण्यासंबंधी जिल्हाधिका-यांना सूचना देण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, सभागृहामध्ये अतिशय गंभीर विषयावर लक्षवेधी सूचना आलेली आहे. मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, ठाणे जिल्हयाच्या संदर्भात मी याच विषयावर लक्षवेधी सूचना दिली होती. परंतु ती लक्षवेधी सूचना चर्चेला आलेली नाही. परंतु या लक्षवेधी सूचनेमध्ये देखील ठाणे जिल्हयाचा उल्लेख केलेला नाही. या लक्षवेधी सूचनेच्या लेखी उत्तरामध्ये निर्णय घेण्यात येईल, निर्णय घेतलेला आहे, निर्णय देण्यात येईल, निर्णय घेण्यात येईल, अशी सुंदर उत्तरे अधिका-यांनी दिलेली आहेत. लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये

..2...

श्रीमती मंदा म्हात्रे .........

26 जिल्हे बाधित झाल्याचे नमूद केलेले आहे. कोणत्या जिल्हयाला किती अनुदान दिलेले आहे, याचा उल्लेख लक्षवेधी सूचनेच्या लेखी उत्तरामध्ये करण्यात आलेला नाही. ही माहिती देखील सभागृहासमोर यावयास पाहिजे होती. माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, अमरावती जिल्हयासाठी 5 कोटी रुपये स्पेशल ग्रँट दिलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, ठाणे जिल्हयासाठी किती मदत दिलेली आहे आणि दिली नसेल तर कधी देणार आहात ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, पंचनामा होऊन जेवढी मदत द्यावी लागेल ती सर्व जिल्हयांना दिली जाईल. 26 जिल्हयांच्या जिल्हाधिका-यांचा रिपोर्ट आम्ही मागवून घेतले होते आणि त्याप्रमाणे त्या जिल्हयांसाठी मदत दिलेली आहे. ठाणे जिल्हयाला तीन कोटी रुपये मदत देण्यात आलेली आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, कोकणामध्ये ज्या ठिकाणी समुद्र किनारा आहे त्या समुद्र किना-यावर अतिक्रमण करुन जागा गिळंकृत केल्या जातात. त्या ठिकाणी असलेल्या माड बागायती वाहून जातात.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर .....

या वर्षी शिरोडा येथे 40 मीटर समुद्र आतमध्ये येऊन सुमारे 20 वर्षे आयुष्य असलेली माडाची 50-60 झाडे वाहून गेलेली आहेत. अशा झाडांसाठी आणि समुद्रकिनाऱ्यावर ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना शासनाकडून मदत दिली जाणार आहे का ?

**उपसभापती** : माननीय पुनर्वसन व मदत मंत्र्यांनी माहिती द्यावी की, शिरोडा भागातील समुद्रकिनाऱ्यावरील झाडे वाहून गेलेली आहे, शासन त्यांना नुकसान भरपाई देणार आहे का ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, झालेल्या नुकसानीबाबत शासनाने लेखी आदेश व जी.आर. काढलेले आहेत. अशा प्रकारे नुकसान झाल्याचा सर्व्हे ॲग्रीकल्चरल डिपार्टमेंट करत असते. याबाबत मी सांगू इच्छितो की, नुकसान झाले असेल तर त्याचे पंचनामे करण्यात येतील व मदत देण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नागरीकरण होत असताना छोटया शहरांचा आजूबाजूला विस्तार होत आहे. हा विस्तार होताना प्लॉट एन.ए. केले जातात परंतु याचे नियोजन महसूल खात्याकडून होत नाही. पुनर्वसन खाते हे महसूल खात्याला याबाबत जाणीव करुन देऊन पूरपरिस्थिती निर्माण होणार नाही याची काळजी घेईल का ? तसेच मागील वर्षी पूरपरिस्थितीवर चर्चा करीत असताना मंत्री महोदयांनी सभागृहात एक आश्वासन दिले होते. त्यावेळी चर्चा उपस्थित झाली होती की, पेण तालुक्यामध्ये 11 कोटीचे वाटप झाले आहे. तेथील तहसीलदाराने 2 कोटी रुपये खाल्ले आहेत, एका गावामध्ये 3.5 कोटी रुपयाचे वाटप केले आहे. त्यावेळी मंत्री महोदयांनी या प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. परंतु यावर शासनाकडून अद्यापपर्यंत कारवाई झाली नाही. त्यामुळे पूरग्रस्तांमध्ये बोगस लोक येऊन पैसे खाण्याचे प्रमाण वाढत आहे. हे प्रकार थांबविण्याचे काम शासन करेल का ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, महाराष्ट्रात विविध नद्यांची पूर रेषा म्हणजेच निळी रेषा पूर्वी केव्हा तरी तयार झालेली आहे. मागील दोन वर्षाची अतिवृष्टी लक्षात घेऊन राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना व पाटबंधारे विभागाला सुधारीत पूर रेषा तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, पूररेषेच्या आत जी घरे किंवा गावे येतील त्याचे पुनर्वसन सरकार स्वतःच्या खर्चाने करणार आहे

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम.....

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी दुसरा प्रश्न उपस्थित केला आहे की, पेण तालुक्यात भ्रष्टाचार झाला आहे व एका गावात 3.5 कोटी वाटले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मी जागृत सदस्य मानतो. परंतु त्यांच्या आताच्या बोलण्यावरुन ते जागरुक सदस्य असल्याचे वाटत नाही. कारण त्यांनी कारवाईबाबतचा विषय उशिरा काढला आहे. तरीही याबाबत मी सांगतो की, या प्रकरणाची ताबडतोब चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यात येईल.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य आमचे मित्र श्री.चंद्रकात रघुवंशी यांनी व इतर सदस्यांनी जी लक्षवेधी सूचना मांडली आहे. त्यातील मूळ मुद्याच्या अनुषंगाने खूप सभागृहात चांगली चर्चा झालेली आहे. माननीय मंत्री महोदय डॉ.पतंगराव कदम यांनी अतिशय मनापासून व उत्तम उत्तरे दिलेली आहेत. मंत्री महोदयांना आपत्तीग्रस्तांबद्दल आत्मीयता आहे. परंतु या चर्चेचा गोषवारा पाहिल्यानंतर पुन्हा मूळ मुद्दा राहीला आहे. तो असा की, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितले की, प्रकाशा या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी एक वर्षापूर्वी ज्यांची दुकाने पाण्यामध्ये बुडाली होती त्यांना अद्यापपर्यंत काहीही मदत मिळाली नाही. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, शासनाने आदेश दिले आहेत, जी.आर. काढले आहेत. आपणा सर्वांना माहिती आहे की, दोन वर्षांपूर्वी 26 जुलै रोजी मुंबईमध्ये पुराने थैमान घातले होते. तेंव्हा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी शासनाच्या वतीने निवेदन केले होते की, एखाद्या चुकीच्या माणसाला मदत दिली तरी चालेल परंतु आपत्तीग्रस्तांना त्वरीत मदत मिळाली पाहिजे. तसेच आपत्तीग्रस्तांचे पंचनामे वेळेत व्हावेत असे सांगितले होते. शासनाचा हेतू व जी.आर. चांगले आहेत, परंतु संबंधित अधिकाऱ्यांच्या वागण्यात व कृतीमध्ये उदासीनता आहे. त्याबद्दल गंभीर दखल घेऊन संपूर्ण राज्य पातळीवर शासन काही ठोस निर्णय घेईल का ? माननीय विरोधी पक्ष नेते श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे वर्षानुवर्षे हे पैसे मिळत नसतील, रॉकेल मिळत नसेल, धान्य मिळत नसेल व निसर्गाने निर्माण केलेल्या संकटात सापडलेल्या माणसाबद्दल एवढी उदासीनता असेल.....

अस्सुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.सुंबरे .....

श्री. उल्हास पवार ....

किंवा निसर्गाने निर्माण केलेली संकटे असोत. त्याबाबतीत आपत्तीग्रस्तांना मदत देण्याच्या दृष्टीने शासनाने जी.आर. वगैरे काढले आहेत पण ते जी.आर. पोहोचलेच नाहीत, शेवटी ते मागवून घ्यावे लागले. तेव्हा या सगळ्या गोष्टींची गंभीर दखल घेऊन याबाबत उदासीन असणारे अधिकारी असतील, दिरंगाई करणारे असतील असतील त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी सरकारने काही एक सर्वंकष असे धोरण ठरविले आहे का ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, ज्या ज्यावेळेस लोक अशा प्रकारे अडचणीमध्ये आले त्यावेळेस सरकारने सर्व प्रकारची आर्थिक मदत त्यांना दिलेली आहे आणि ही काही त्यांच्यावर सरकारने मेहरबानी केलेली नाही तर ते एक कर्तव्य म्हणूनच सरकारने ती मदत दिलेली असते. अशा वेळी सरकारने कर्तव्य म्हणून मदत देण्याचे ठरविल्यानंतर, त्यासाठी आदेश दिल्यानंतर, पैसे उपलब्ध करून दिल्यानंतरही ज्या अधिकाऱ्यांकडून त्यांचे वाटप होणार नसेल... म्हणूनच प्रत्येक आठवड्याला जिल्हाधिकाऱ्यांकडून याबाबतची माहिती मागविली जाईल आणि जे अधिकारी या बाबतीत हयगय करतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, या निवेदनामध्ये बाधितांना दिलासा देण्यासाठी शासनाने घेतलेले निर्णय नमूद केलेले आहेत. अतिशय स्तुत्य असेच हे निर्णय आहेत. परंतु प्रत्यक्षात आजपर्यंत किती बाधित गावांना, किती कुटुंबांना वा व्यक्तींना ही मदत दिली गेली आहे ? सभापती महोदय, मुंबईमध्ये दोन आठवड्यापूर्वी, 30 जूनला झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साठले होते. जुहू भागामध्ये तर कमरेच्या वर पाणी साठले होते आणि त्या भागात नेहमीच तसे पाणी साठते. मी स्वत: त्यामध्ये बुडाले होते. मागील 26 जुलैला मुंबईत झालेल्या पावसामुळे ज्याप्रमाणे सर्व मुंबईभर पाणी साठले होते त्यापेक्षा यंदाच्या 3य0 जूनला साठलेले पाणी मुळीच कमी नव्हते. त्या मधल्या काळामध्ये शासन म्हणते की, मुंबईत पावसाळ्यामध्ये पाणी साठू नये म्हणून पुष्कळ योजना केल्या. त्यासाठी वेगवेगळे जी.आर. काढले. त्यानुसार काम केले गेले. पण तरीही 30 जून 2007 रोजी झालेल्या पावसामुळे मागील 26 जुलैची आठवण करून देईल इतके, किंबहुना त्याहीपेक्षा अधिक पाणी साठले होते. त्यामुळे मुंबईत पाणी साठू नये म्हणून ज्या काही योजना आपण राबविल्या त्या कितपत साध्य झाल्या, सफल झाल्या याचा आपण विचार केला पाहिजे, आढावा घेतला पाहिजे. अंधेरीतील एस.व्ही.रोडवर तर एमएमआरडीएने मोठमोठे खड्डे

...... झेड 2 ...

श्रीमती जोशी ....

करून एवढी वाट लावली आहे की, तेथे थोडा पाऊस झाला तरी पाणी साठते. तेव्हा 30 मे पर्यंत या वर्षी सर्व कामे पूर्ण होतील असे एमएमआरडीएने सांगूनही ती कामे पूर्ण केलेली नाहीत. परिणामी पाणी अधिकाधिक साठते आहे त्याबद्दल एमएमआरडीए वर काय कारवाई करण्यात येणार आहे ? तसेच संबंधित विभागांच्या बाबतीत देखील कोणतीही कारवाई केलेली नाही त्याबद्दल आपण काय कारवाई करणार आहात ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, मुंबईमध्ये 2005-2006 मध्ये जो प्रकार घडला त्यावेळेस आपले इन्फ्रास्ट्रक्चर बरोबर नव्हते. अनेक ठिकाणी बेकायदा बांधकामे केली असल्याचेही त्यानंतर लक्षात आले. मी टीव्ही वरील चर्चेमध्ये देखील याबाबत सांगितले आहे, आणि मुंबईच्या मेअरनी देखील ते मान्य केले आहे आणि अशी बेकायदा बांधकामे धडाक्याने पाडून टाकली जावीत म्हणूनही मी बेधडक सांगितले आहे. तेव्हा या पद्धतीने एमएमआरडीए, हौसिंग बोर्ड, नगरविकास विभाग, नगरपालिका, महानगरपालिका या तीन-चार खात्यांचा हा विषय आहे. तेव्हा मुंबईच्या या प्रश्नावर सर्वांनी एकत्रित येऊन समन्वय साधला पाहिजे आणि पुन्हा हा प्रश्न निर्माण होणार नाही या दृष्टीने प्रिकॉशन घेतली पाहिजे.

( यानंतर श्री. सरफरे .... एए 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्यामध्ये निर्माण झालेल्या पूर परिस्थितीसंबंधी ही लक्षवेधी सूचना दिली होती. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये फक्त पूरामध्ये सापडलेल्या व्यक्तींना शासनाने मदत करण्यासंबंधी घेतलेल्या निर्णयाची माहिती दिली आहे. महाराष्ट्रामध्ये गेली तीन वर्षे सातत्याने पूर परिस्थिती निर्माण होत आहे. माननीय सदस्य प्रा. बी. टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे काही ठराविक जिल्हयांमध्ये देखील पूर परिस्थिती निर्माण होत आहे. अतिवृष्टीमुळे काही गावांमध्ये पाणी कां शिरत आहे? याचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे. मागील वेळी या विषयावरील चर्चेला उत्तर देतांना माननीय मुख्यमंत्र्यांनी डिझॅस्टर मॅनेजमेंटची व्यवस्था सक्षम केली जाईल असे जाहीर केले होते. तेव्हा गेल्या तीन-चार वर्षामध्ये ज्या ज्या जिहयांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली आहे, त्या जिल्हयांच्या स्तरावर आपण डिझॅस्टर मॅनेजमेंट कमिटया स्थापन करणार काय? आज नद्या-नाल्यांमध्ये वनस्पती वाढलेली आहे, त्यामुळे पूराचे पाणी गावामध्ये शिरण्याचे प्रकार वाढत आहेत. अमरावती जिल्हयामधील पूर परिस्थितीची पहाणी करीत असतांना कापूसकाढणी गावाच्या मध्यभागी नाला वहातो. दोन गावांना जोडणाऱ्या या नाल्याचे पाणी गावांमध्ये शिरल्यामुळे गावातील घरे उद्ध्वस्त झाली. अशा गावांचा सर्व्हे करुन त्याठिकाणी डिझॅस्टर मॅनेजमेंट कमिटी निर्माण करण्याची आवश्यकता आहे. तशाप्रकारची कमिटी आपण निर्माण करणार काय?

सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा की, पूरामध्ये मृत झालेल्या व्यक्तिच्या वारसांना आपण 1 लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. ही मदत अनेक ठिकाणी पोहोचली आहे. अमरावती जिल्हयामध्ये 12 व्यक्ती पूरामध्ये वाहून गेल्या आहेत. त्यामध्ये लहान मृत मुलांना 25 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. लहान मुलांच्या बाबतीत मदतीचे निकष कशाच्या आधारावर ठरविण्यात आले आहेत? तेव्हा लहान मुलांना कमी मदत आणि मोठया माणसांना जास्त मदत असे निकष न लावता सरसकट सर्व मृत व्यक्तिना 1 लाख रुपयांची मदत देणार काय? तिसरा प्रश्न असा की, या नैसर्गिक संकटामध्ये शेतकऱ्यांचे पशुधन नष्ट झाले आहे. यामध्ये मृत झालेल्या दोन जनावरांकरिता अडीच हजार रुपये दिले आहेत. तसेच, मृत झालेल्या प्रत्येक शेळी व मेंढीकरिता 250 रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. आज बाजारामध्ये रु. 150 किलो या भावाने मटण मिळते. तेव्हा प्रत्येक शेळी व मेंढीकरिता 500 रुपयांची मदत आपण जाहीर करावी. व त्याप्रमाणे शासन निर्णयामध्ये दुरुस्ती करण्यात यावी. तशाप्रकारचा निर्णय आपण घेणार काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या सूचनेबाबत सांगू इच्छितो की, राज्याच्या पातळीवर डिझॅस्टर मॅनेजमेंटची व्यवस्था करण्यात आली आहे त्याप्रमाणे जिल्हा पातळीवर व तालुका पातळीवर देखील डिझॅस्टर मॅनेजमेंटची व्यवस्था करण्यात आली आहे. ज्याप्रमाणे राज्य पातळीवर नियंत्रण कक्ष निर्माण करण्यात आले आहे, त्याप्रमाणे जिल्हा पातळीवर देखील नियंत्रण कक्ष असले पाहिजे. त्याठिकाणी उपजिल्हाधिकारी आलटून-पालटून 24 तास बसले पाहिजेत अशी व्यवस्था केली आहे. त्याचप्रमाणे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मागणी केल्याप्रमाणे प्रत्येक मृत शेळी व मेंढीकरिता 500 रुपयांची मदत जाहीर केलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शहानूर प्रकल्पामधील पाणी सोडण्यापूर्वी शासनाने तेथील ग्रामस्थांना पूर्वसूचना दिलेली नाही. त्यामुळे अमरावती जिल्हयामध्ये पूर येऊन त्यामध्ये 12 लोक वाहून गेले. रात्रीच्या वेळी प्रकल्पामधून पाणी सोडतांना लोकांना त्याची पूर्वसूचना देण्यात आलेली नाही. रात्रीच्या वेळी घरामध्ये अचानक पाणी शिरल्यामुळे लोक घाबरुन सैरावैरा पळावयास लागले व त्यामधून 12 लोक वाहून गेले. जर आपण पूर्वसूचना दिली असती तर 12 लोकांचे प्राण वाचले असते.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, मी अमरावती जिल्हयाच्या दौऱ्यावर असतांना तेथील लोकांनी पाणी सोडण्यापूर्वी आम्हाला पूर्वसूचना देण्यात आलेली नाही असे मला सांगितले. याबाबत मी तेथील पाटबंधारे विभागाच्या व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारले. तेव्हा याबाबत पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाणी सोडण्यापूर्वी लोकांना कां सूचना दिलेली नाही? आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी भोंगे वाजवून लोकांना जागे कां केले नाही? याबाबत विभागीय आयुक्तांना चौकशी करण्यास सांगितले आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे मृत जनावरांमध्ये शेळी व मेंढीकरिता प्रत्येक 250 रुपयांऐवजी 500 रुपयांची मदत दिली जाईल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो की, आपण लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चांगल्याप्रकारे चर्चा घडवून आणली. खरे तर या विषयावर सदनामध्ये दोन तासाची चर्चा होणे आवश्यक आहे. आणीबाणी मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्याकडे पुनर्वसन खाते आहे परंतु त्यांचे वेगळ्या पुनर्वसनाकडे लक्ष आहे. माननीय उपमुख्य मंत्री श्री.आर.आर. पाटील हे कोल्हापूर येथे गेले असताना त्यांनी बी-बियाणे देण्याबाबतची घोषणा केली. परंतु त्यासंबंधीचा उल्लेख या निवेदनामध्ये नाही. जी.आर.मध्ये त्या गोष्टीचा उल्लेख नसेल तर संबंधित अधिकारी काही करणार नाहीत. उपमुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केलेल्या बाबीचा अंतर्भाव यामध्ये केला नाही तर त्याची अंमलबजावणी होणार नाही. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेबांनी जे सांगितले, तसे झाले तर धन्यवाद. परंतु तो धन्यवाद मी राखून ठेवतो. आपण मागच्यावेळी पुराच्या परिस्थितीबाबत चर्चा केली. मंत्री महोदयांनी त्यावेळस छातीवर हात ठेवून सांगितले की, पूर नियंत्रण रेषेच्या आतमध्ये असणाऱ्या लोकांचे पुनवर्सन करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. हे सगळे रेकॉर्डवर आहे. त्याबाबतीत शासनाकडून कोणतीही हालचाल झालेली नाही. पूर नियंत्रण रेषेच्या आत असलेल्या लोकांचे मृत्यू झालेले आहेत त्याची जबाबदारी शासनावर येते, याला आपण जबाबदार आहात. कारण सदनामध्ये जाहीर केल्याप्रमाणे लोकांचे पुनर्वसन केले असते तर लोक मृत्युमुखी पडले नसते. चर्चेच्या अनुषंगाने कायमस्वरुपी उपाययोजना काय करता येईल हे पहाणे महत्वाचे आहे. आता आपण पाच जे.सी.पी. देणार आहात. परंतु ते चालविण्यासाठी कर्मचारी नाहीत म्हणून पडून राहतील, ही माझ्या मनात भीती आहे. मुंबईमध्ये सहा महिने अगोदर रेल्वेच्या खालील नाल्याची सफाई केली जाते, त्याप्रमाणे ग्रामीण भागातील नाल्यांची सफाई केली पाहिजे. पुरामुळे खरडून गेलेल्या जमिनी आहेत, त्या जमिनीवर येत्या दोन-तीन वर्षामध्ये शेतकऱ्यांना कोणतेही पीक घेता येणार नाही. त्यांनी या वर्षी कर्ज घेतलेले आहे. पुढील दोन वर्षे शेतकऱ्यांना काहीच पीक घेता येणार नाही. त्यांनी जे कर्ज काढलेले आहे, त्या संदर्भात शासनाचे काय धोरण राहील ? त्या शेतकऱ्यांना अन्नधान्य देण्याची आवश्यकता आहे. खरडून गेलेल्या जमिनीचे पंचनामे करून रोजगार हमी योजनेतून ती जमीन दुरूस्त करण्याची आवश्यकता आहे. त्या शेतकऱ्यांना पीक घेता येत नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबांना मदत करणे गरजेचे आहे. नाही तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू.....

वाढतील. आपण आता 2 हेक्टरची मर्यादा 5 हेक्टर केलेली आहे. अंधुरा गावामध्ये तीन नद्या एकमेकांना मिळतात. त्या ठिकाणची एकूण 50 हजार हेक्टर जमीन वाहून गेलेली आहे. पूर नियंत्रण रेषेच्या आतमधील जी जमीन खडून गेलेली आहे, त्याबाबत पाच वर्षामध्ये, दोन वर्षामध्ये उपाययोजना करण्याबाबत आराखडा तयार करणार आहात काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, पुनर्वसन विभागाचे काम समजून घेण्याची आवश्यकता आहे. हा विभाग को-ऑर्डिनेशन करणारा आहे. त्यामध्ये कृषी विभाग, बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग यांचा संबंध येतो. बी-बियाणांच्या बाबतीत कृषी विभागाने जी.आर. काढलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : त्याबाबत त्या विभागाने सांगावे.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : माननीय कृषी मंत्री त्यासंबंधी सांगतील. परंतु या सगळ्या विभागांशी समन्वय साधून या आपत्तीच्या काळात लोकांना मदत करण्याची जबाबदारी मदत व पुनर्वसन विभागाची आहे. आपल्याला दोन तऱ्हेचे पुनर्वसन करावे लागते. एक म्हणजे आपत्ती आल्यानंतर त्यांना ताबडतोब योग्य ठिकाणी हलवणे, त्यांच्या जेवणाची व राहण्याची व्यवस्था करण्यासाठी मदत करणे, त्यांना सानुग्रह अनुदान देणे, तात्पुरती शेड उभी करणे हे सर्व करावे लागते. कायमस्वरुपी पुनर्वसनाच्या दृष्टीने पूर्वी एक ब्ल्यू रेषा तयार झालेली आहे. गेल्या दोन वर्षामध्ये अतिवृष्टी झाली. हे तिसरे वर्ष आहे. जिल्हाधिकाऱ्यांना आणि पाटबंधारे विभागाला पुन्हा सूचना दिल्या आहेत की, याबाबत लेटेस्ट पोझीशन घ्यावी. त्यांना पंधरा दिवसांची मुदत दिलेली आहे. हे काम वेगाने झाले पाहिजे. लोकांना हलविण्यासाठी पर्यायी जमीन द्यावी असे जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले आहे. त्यासाठी त्सुनामीच्या नॉर्मप्रमाणे 40 हजार रुपयांचा नॉर्म आपण स्वीकारलेला आहे. रेषेच्या बाहेर घर बांधण्यासाठी 40 हजार रुपये द्यावयाचे असा बदल केलेला आहे. दुसरा बदल असा केलेला आहे की, या रेषेच्या बाहेर गावात घर पडले असेल तर त्यांना 15 हजार रुपये देण्याचा निर्णय घेतलेला आहे. ज्या जमिनी खरडून गेल्या त्याबाबतीत पुढे काय असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विचारला. पुढच्यासंबंधी काही धोरणात्मक निर्णय घेतलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी कर्जाच्या संदर्भात विचारले. त्यांच्याकडे किती कर्ज आहे याची माहिती घेतली जाईल आणि कर्जाच्या बाबतीत ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी मघाशी उत्तर देत असताना हे काम या खात्याचे आहे, ते काम त्या खात्याचे आहे अशा पध्दतीचे उत्तर दिले ते आम्ही समजून घेतले. आता जो प्रश्न विचारलेला आहे तो आपल्या विभागाचा विषय आहे. त्याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी धोरणात्मक सांगावे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे सहकार मंत्री होते. याबाबतीत त्यांना समजते. मी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. भूविकास बँकेच्या बाबतीत कॉम्प्रीहेन्सिव पोलिसी म्हणजे जेवढे कर्ज असेल त्याच्या दामदुप्पट, मग 10 लाख रुपये असतील, 40 लाख रुपये असतील किंवा 2 कोटी रुपये असतील या सगळ्या बाबतीत मी आज सकाळी उत्तर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम ....

दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी आता जो मुद्दा सांगितला त्याबाबत सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांना 6 टक्के दराने कर्ज देण्याचा निर्णय पुढच्या वर्षी लागू केलेला आहे. पंजाबराव देशमुख योजनेच्या बाबतीत आम्ही 25 हजार रुपयांची मर्यादा 3 लाख रुपये केलेली आहे. जे वेळेवर पैसे देतील त्यांना 2 टक्के दराने देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : निर्णयांची अंमलबजावणी होत नाही. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंबंधी, व्याजमाफीसंबंधी अर्बन बँकांनी प्रस्ताव पाठवून तीन-तीन महिने झालेले आहेत परंतु शासनाचा निर्णय अजून होत नाही आणि त्यामुळे ते पैसे खाली पोहोचलेले नाहीत.

डॉ. पतंगराव कदम : जिल्हा मध्यवर्ती बँका शेतकऱ्यांना कर्ज देतात. त्यांच्यासंबंधीचा हा निर्णय आहे. यामध्ये अर्बन बँकांचा काही संबंध नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : माझा हरकतीचा मुद्दा आहे. राष्ट्रीयकृत बँकांकडून जिल्हा बँकांकडे पैसे पाठवून त्या शेतकऱ्यांचे व्याज माफ झालेले आहे परंतु सहकार खात्यातर्फे ते केलेले नाही.

डॉ. पतंगराव कदम : परवाच नाबार्डबरोबर चर्चा झालेली आहे. नाबार्डने तत्वता मान्य केलेले आहे. अर्बन बँकेच्या बाबतीत ते रिएम्बर्समेंटमध्ये इन्क्लूड केलेंले आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी पॉईण्टेड प्रश्न विचारतो. ह्या नद्या भरल्यामुळे आणि पाणी शेतात शिरल्यामुळे शेतातील काळी जमीन फुटून जमिनी खरडून गेल्या. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, या जमिनींचा सर्व्हे झालेला आहे. ज्या जमिनी खरडून गेल्या नाहीत त्यांना मदत द्या असे मी म्हणत नाही. परंतु ज्या जमिनी खरडून गेलेल्या आहेत त्याबाबतीत शासन किती विशेष अनुदान देणार आहे ?

डॉ. पतंगराव कदम : 2 हेक्टरसाठी 25 हजार रुपये असा नॉर्म्स आहे तो आता 5 हेक्टरपर्यन्त करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : 2 हेक्टरसाठी 25 हजार रु. हे बागायतदार शेतक-यांसाठी दिलेले असल्याचे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. मंत्री महोदयांनी खाली बसता बसता 5 हेक्टर असे सांगितले. त्यांनी तसे जाहीर करावे.

डॉ. पतंगराव कदम : मी आता नवीन निर्णय सांगत आहे. 2 एकराची मर्यादा 5 एकरापर्यन्त करण्याचा निर्णय घेतलेला असून तसे आदेश काढले जातील.

श्री. राजन तेली : माहे जूनमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणातील 1500 पेक्षा जास्त गावे आणि 4931 कुटुंबे बाधित झालेली आहेत. कोकणातील बाधित गावांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहेत. या गावातील लोकांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ? तसेच कोकणातील खाड्या आणि नद्यांमधील गाळ उपसण्याचा कार्यक्रम शासन कायमस्वरुपी हाती घेणार आहे काय ?

डॉ. पतंगराव कदम : कोकणातील वेगवेगळे प्रश्न उपस्थित करुन नद्या आणि खाडीतील गाळ काढणार काय अशी विचारणा सन्माननीय सदस्यांनी केली. या संबंधी अद्याप कोणतेही धोरण ठरलेले नाही. धोरण ठरेल त्यावेळी उत्तर देण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी हात वर करतात.)

**उपसभापती** : या लक्षवेधीला 45 मिनिटापेक्षा जास्त वेळ दिलेला आहे. अजून 10 सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारावयाचे आहेत. त्यासाठी कमीत कमी एक तास वेळ लागेल. या विषयी चर्चा घ्यावयाची की नाही याबाबतीत मी माननीय सभापतींची परवानगी घेऊन निर्णय देईन. मी आता दुसरी लक्षवेधी घेतो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नर्मदा विकास विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. अविनाश कुलकर्णी हे जिल्हाधिका-यांनी बोलावलेल्या बैठकीस मद्यधुंद अवस्थेत उपस्थित असणे

**मु. शी.** : नर्मदा विकास विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. अविनाश कुलकर्णी हे जिल्हाधिका-यांनी बोलावलेल्या बैठकीस मद्यधुंद अवस्थेत उपस्थित असणे यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत रघुवंधी व संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नंदूरबार जिल्ह्यातील नर्मदा विकास पुनर्वसनाशी संबंधित जिल्हाधिकाऱ्याच्या समोर दिनांक 20 जून, 2007 रोजी झालेल्या बैठकीत नर्मदा विकास विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.अविनाश कुलकर्णी हे मद्यधुंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास येणे, याप्रकरणी लोकसंघर्ष मोर्चाच्या श्रीमती प्रतिभा शिंदे यांनी सदरहू अधिकाऱ्यांची तातडीने वैद्यकीय तपासणी करण्याची केलेली मागणी, त्यांची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर वैद्यकीय अहवालात त्यांनी मद्यप्राशन केल्याचे स्पष्ट होणे, तद्नंतर त्यांच्यावर जिल्हाधिकारी यांनी पोलीसांत गुन्हा नोंदवून पोलिसांना चौकशीचे आदेश देणे, याबाबत पोलीसांनी कोणती कार्यवाही केली हे अजूनही स्पष्ट न होणे, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन श्री.अविनाश कुलकर्णी यांच्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता तसेच शासनाची प्रतिक्रिया."

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, खरे म्हणजे ही लक्षवेधी सूचना जलसंपदा विभागाची होती. नर्मदा विकास विभागाचे कार्यकारी अभियंता हे जिल्हाधिका-यांनी बोलावलेल्या बैठकीत मद्य प्राशन करुन गेले अशा आशयाची ही लक्षवेधी सूचना आहे. ही लक्षेवधी सूचना गृह विभागाकडे गेलेली आहे. मला वाटते जलसंपदा विभागाच्या मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेला उत्तर द्यावयास पाहिजे. सभापती महोदय, नर्मदा विकास विभाग हा राष्ट्रीय पातळीवरील विषय आहे. सरदार सरोवर प्रकल्पातील बाधित लोकांच्या पुनर्वसनाचा हा विषय आहे. या विभागाचे कार्यकारी अभियंता जिल्हाधिका-यांनी बोलावलेल्या बैठकीत दारु पिऊन आले असतील तर त्यांना ताबडतोबीने निलंबित केले पाहिजे अशी माझी मागणी आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये हे मान्य केलेले आहे की, त्यांच्या श्वासास मद्यार्काचा वास येत होता, उक्त व्यक्तीने मद्यार्काचे सेवन केले होते. तरी देखील नाशिक लॅबोरेटरीमधून "नो अल्कोहोल" असा दाखला येतो. याचा अर्थ आपल्या लॅबोरेटरीमध्ये काय काय चालते याचे हे एक उदाहरण आहे. तेव्हा या कार्यकारी अभियंत्यांना आपण निलंबित करणार काय ?

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याविषयी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाल्यामुळे हा प्रश्न आमच्याकडे आलेला आहे, त्यासबंधी काय करावयाचे विभागीय चौकशी करावयाची की सबंधित अधिका-याला निलंबित करावयाचे यासंबंधी सगळा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे दिनांक 21 जून,2007 रोजी पाठविण्यात आलेला आहे.

**उपसभापती** : कोड ऑफ कंडक्टमध्ये काय लिहिलेले आहे ? एखादा शासकीय अधिकारी जर कामकाजाच्या विहित वेळेत दारु पिऊन आला तर त्याची चौकशी काय करणार ? त्याच्यावर डायरेक्ट ॲक्शनच घेणे आवश्यक आहे अर्थात जर तो खरोखर दारु पिऊन आला असेल तर....

श्री.चंद्रकांत रघुवंशी : जिल्हाधिका-यांनी बोलाविलेल्या बैठकीत तो अधिकारी दारु पिऊन येतो.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : संबंधित अधिकारी दारु पिऊन आला नव्हता त्याच्या फक्त तोंडाला म्हणजे श्वासाला मद्यार्काचा वास येत होता....

(गोंधळ )

**उपसभापती** : माननीय गृह राज्यमंत्री महोदय, संबधित अधिका-याच्या श्वासाला मद्यार्काचा वास येत होता हे सांगायला कोणी त्याचा मुका घेण्याकरिता गेले होते काय ? काहीतरी सांगताय तुम्ही ! त्या अधिका-याची वैद्यकीय तपासणी झाली असेल तर......(गोंधळ) वैद्यकीय तपासणीमध्ये काय आढळून आले ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : प्रथम वैद्यकीय अहवालामध्ये त्यांच्या श्वासाला मद्यार्काचा वास येत होता परंतु त्यांचे बोलणे नेहमीप्रमाणे होते, त्याचे स्थान स्थिर होते व त्यांच्या डोळयाच्या बाहुल्या विस्फारलेल्या होत्या त्या व्यक्तीने मद्यार्काचे सेवन केले होते परंतु तो त्याच्या अंमलाखाली नव्हता.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : म्हणजे काय ? सेवन केले होते आणि तो अंमलाखाली नव्हता ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : संबंधित अधिका-याच्या रक्ताचे आणि मुत्राचे नमुने फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठविण्यात आले होते त्याचा निष्कर्ष असा आला की, " He is not under the influence of alcohol.

(गोंधळ)

श्री.दिवाकर रावते : सर्वांनी शांत बसावे हा माननीय उपसभापतींचा आवडता विषय आहे, असे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण बोलत आहेत.

EE - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना माझी विनंती आहे की, त्यांनी खाली बसून मस्करीत देखील कोणतेही कमेंट्स पास करु नयेत मी असे काहीही बोललो नाही कारण मलाही माननीय उपसभापती पदाचा आदर माहित आहे आणि मी इतक्या खालच्या थराला कधीही जाणार नाही. मी शांतपणे सर्व चर्चा ऐकून मुद्दे लिहून घेण्याचे काम करीत आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : फोरेन्सिक लॅबमध्ये संबंधित अधिका-याच्या रक्ताचे व मुत्राचे नमुने पाठविले असता " No Alchohol " असा निष्कर्ष लॅबमधून आला तरीदेखील यासंदर्भात पोलिसांमध्ये गुन्हा दाखल झालेला आहे आणि यासंबंधात जी काही कारवाई करावयाची आहे त्याच्या संबंधात विभागाला प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, लक्षेवधीच्या स्वरुपामध्ये विचारलेल्या प्रश्नाचे जर सभागृहामध्ये अशा प्रकारे उत्तर येत असेल तर ही लक्षवेधी राखून ठेवली पाहिजे कारण या लक्षवेधीच्या उत्तरामध्ये स्पष्ट आणि शुध्द मराठीत असे म्हटलेले आहे की, सबंधित अधिका-याच्या श्वासाला मद्यार्काचा वास येत होता आणि त्या व्यक्तीने मद्यार्काचे सेवन केले होते पण आमच्या हातात काही नाही यासंबंधी माननीय जलसंपदा मंत्र्यांनी त्याचे उत्तर दिले पाहिजे होते कारण नर्मदा विकास विभाग हा महत्वाचा विषय आहे. सदर बैठकीमध्ये स्वत: कलेक्टर साहेबांनी स्वत: सबंधित अधिका-याला त्यांच्या बॉडीगार्डसोबत मेडीकलला पाठविले. आमचे म्हणणे एवढेच आहे की, शेवटी कुठेतरी न्याय मिळावयाला पहिजे म्हणूनच आपण या सभागृहामध्ये प्रश्न किंवा लक्षवेधी उपस्थित करतो आणि येथेच जर अशी वेळ मारुन नेण्यात येत असेल तर आम्ही कोणाकडे न्याय मागावयाचा ? माझी विनंती अशी आहे की, एकंदरीत या लक्षवेधीचे उत्तर वाचल्यानंतर संबंधित अधिका-याची आपण आजच्या आज बदली तरी करणार आहात की नाही ?

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय,हा प्रश्न असा आहे की, श्रीमती प्रतिभाताई शिंदे या ज्या नर्मदा विकासाच्या कार्यकर्त्या आहेत, मी स्वत: पर्सनली त्यांना ओळखते अनेक वर्ष या लोकांचे म्हणणे आहे की, पुर्नवसन व्हावे तरीदेखील सर्व जग त्यांच्यावर टीका करते की,सरकार पुनर्वसनासाठी सहकार्य करीत नाही आणि आता ते नर्मदा विकासासाठी सहकार्य करण्याकरिता नर्मदा विकास पुनर्वसनासाठी सहकार्य करण्यासाठी बैठकीला गेले आणि तेथे हा प्रकार धडला हे कुठल्या संघटनेचे व संस्थेचे प्रतिनिधी

EE - 2



JPK/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम एम. ....... 14:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.......

आहेत. हा माणूस दिवसा दारु पिऊन कामावर गेलेला आहे. मग तो अधिकारी दारु बाटलीतून पिऊदे किंवा ग्लासातून पिऊदे प्रश्न तो नाही. त्या अधिका-याला ताबडतोब सस्पेंड केले जावे, अशी माझी विनंती आहे.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, आपण निर्देश द्यावेत.

श्री.अरविंद सावंत : या लक्षवेधीचे उत्तर किती भयानक आहे ?

यानंतर श्री.कानडे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना पुढे सुरु...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण यासंदर्भात शासनाला समज देण्याची गरज आहे. आता अशा पध्दतीने लोकांनी सभागृहात आणि विधानभवनाता यायचे काय ? निवेदनात म्हटले आहे की, श्री. कुलकर्णी यांना उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकिय तपासणीकरिता नेले. याबाबत पोलीस ठाणे येथे कळविण्यात आले. या वैद्यकिय तपासणी अहवालात त्यांच्या श्वासाला मद्यार्काचा वास येत होता, त्यांचे बोलणे नेहमीप्रमाणे होते, त्यांची चाल स्थिर होती, त्यांच्या डोळयाच्या बाहुल्या विस्फारीत होत्या व उक्त व्यक्तीने मद्यार्काचे सेवन केले होते, तो मद्यार्काच्या अंमलाखाली नव्हता असे स्पष्ट झाले आहे. म्हणजे तो मद्यार्काच्या अंमलाखाली असला पाहिजे काय? डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे तो एक ग्लास प्यायला काय किंवा एक बाटली प्यायला काय ? सभापती महोदय, याबाबतीत आपण शासनाला मार्गदर्शन करावे.

**उपसभापती** : तो रेग्युलर आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, प्राथमिक अहवालामध्ये मद्यसेवन केल्याचे स्पष्ट म्हटले आहे. रक्ताचे नमुने आणि युरीन नंतर पाठविण्यात आले आहे. मध्यल्या काळाचा फायदा घेऊन या अधिकाऱ्याची सुटका करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न सुरु आहे. त्यामुळे त्याचे संरक्षण होता कामा नये. जिल्हाधिकाऱ्यांनी बोलाविलेल्या बैठकीमध्ये श्री. कुलकर्णी,कार्यकारी अभियंता यांनी मद्यसेवन केल्याचे स्पष्ट झालेले आहे. अशा वेळी जर अधिकारी मनमानी करीत असेल तर त्याला तात्काळ निलंबित केले पाहिजे आणि रक्ताचे नमुने तपासण्यासाठी जे वेळ लावत आहेत त्यांची चौकशी झाली पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या अधिकाऱ्याला जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीला बोलाविले होते आणि त्यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक चालू होती. माननीय सदस्य श्री. रघुवंशी यांनी सांगितल्याप्रमाणे या अधिकाऱ्याची चौकशी करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या बॉडीगार्डसोबत त्याला पाठविले. संपूर्ण प्रशासनात जिल्हयाचा प्रमुख हा जिल्हाधिकारी असतो. जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अशा प्रकारची घटना घडली असेल आणि त्या अधिकाऱ्याने मद्यपान केले असेल तर केवळ पोलिसांमध्ये तक्रार करुन जिल्हाधिकारी का थांबले ? शासनाच्या सेवेतून निलंबित करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे पाठविला काय आणि पाठविला असल्यास संबंधित खात्याने या अधिकाऱ्याविरुध्द काय कारवाई केली ?

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एम.ए.अझीज : सभापती महोदय, मी जे.जे.हॉस्पीटलमध्ये असताना दारु पिण्याच्या ज्या केसेस येत होत्या त्यामध्ये दोन प्रकार आहेत. They are: Consumption of alcohol and under the influence of alcohol. In the first place, तुम्ही दारु घेतली, वास येणारच. डोळे लाल होणे हे सगळे चालते. पण you cannot punish him for this reason. बरीचशी औषधे अशी आहेत की त्याच्यामध्ये अल्कोहोलचे प्रमाण जास्त आहे. म्हणून शासन याच्यावर कडक कारवाई करु शकत नाही. कारवाई तेव्हाच होऊ शकते When the person is under the influence of alcohol. दारुच्या नशेत जर तो नीटपणाने वागला नाही तर त्याच्यावर कारवाई होऊ शकते. So, consumption of alcohol is not that much serious matter.

**The DEPUTY CHAIRMAN:** The consumption of alcohol may not be a serious crime. But, at the same time, the man who is on a duty and he consumes the alcohol then it is a serious offence.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, प्रथम वैद्यकीय अहवाल आणि फॉरेन्सिक वैद्यकशाळेचा अहवाल आला आहे. त्यादृष्टीने संबंधित विभागाला गृहखात्याकडून अहवाल पाठविण्यात आलेला आहे आणि त्या विभागाकडून त्याच्यावर कारवाई होईल.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, कारवाई करणे गृह विभागाच्या अखत्यारित नाही. वर्ग-1 चा अधिकारी आहे जलसंपदा विभागाचा विषय आहे. नर्मदा बचावच्या संदर्भात एवढी आंदोलने झाली. मेधा पाटकर आंदोलने करीत आहेत. एवढा मोठया पुनर्वसनाचा महत्वाचा प्रश्न आहे. असे असताना त्या विषयासंदर्भातच माहिती घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीला कार्यकारी अभियंता यांना बोलाविले होते. त्या बैठकीत जर कार्यकारी अभियंता मद्यप्राशन करुन येत असतील तर आम्ही काय बोलावे तेच कळत नाही. सभापती महोदय, आपण निर्णय द्यावा.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ KGS/ 14:40

लक्षवेधी सूचना क्र.2.............

**उपसभापती** : वास्तविक पाहता खरे सांगावयाचे म्हणजे हा अधिकारी डयुटीवर असताना मद्य प्राशन करुन आला असेल तर त्याला सस्पेंड केले पाहिजे. संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत, त्यामुळे मी यासंबंधी निदेश देऊ शकत नाही. परंतु ताबडतोब कारवाई करण्याच्या दृष्टीने सभागृहाच्या भावना संबंधित विभागाच्या मंत्रीमहोदयांना कळवाव्यात.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : होय.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मौ.किर्लोस, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथील गडनदीवर बांधलेल्या बंधाऱ्याचे निकृष्ट बांधकाम.
**मु.शी.**: मौ.किर्लोस, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथील गडनदीवर बांधलेल्या बंधाऱ्याचे निकृष्ट बांधकाम यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंधारण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"मौजे किर्लोस, ता. मालवण, जि.सिंधूदुर्ग येथील गडनदीवर गोठणे, राजगड किर्लोस आदी गावे ओलिताखाली आणण्यासाठी सुमारे दीड कोटी रुपये खर्च करुन बंधारा बांधणे त्या बंधाऱ्यामध्ये निकृष्ट दर्जाचे बांधकाम होणे, अद्यापपर्यंत सदर बंधाऱ्यात पाण्याचा साठा न होणे, त्यामुळे सदर गावांना अद्यापपर्यंत पाण्याचा पुरवठा न होणे, या गावांतील ग्रामसभेमध्ये या प्रकरणाची तक्रार करण्यात येऊन सुध्दा शासनाने गंभीर दखल न घेणे, सदर बंधाऱ्यावरील शासनाची नियोजित रक्कम फुकट जाणे, त्याचा कुणालाही फायदा न होणे, सदर प्रकरणाची शासनाने त्वरीत चौकशी करुन करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.बाळासाहेब थोरात (जलसंधारण मंत्री) : सभापती महोदय, निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

नि वे द न

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस :येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मौजे किर्लोस, तालुका मालवण येथील बंधाऱ्याचा विषय हा तत्कालीन आमदार श्री.आप्पा गोगटे यांनी सातत्याने लावून धरला होता. आता सन्माननीय आमदार ॲड.अजित गोगटे याबाबत पाठपुरावा करीत आहेत. 1999 मध्ये 110 हेक्टरसाठी 52 कोटी रुपये इतकी रक्कम मंजूर करण्यात आली होती. आता सुधारित अंदाजपत्रक 138 कोटी रुपयांचे करण्यात आले. त्यातील 110 कोटी रुपये खर्च होऊन 95 हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होत आहे. आज कोकणामध्ये अशी चर्चा आहे की, एप्रिल महिन्यात पाणी टंचाई निवारणाच्या नावाखाली गावे ओलिताखाली आणण्यासाठी शासन कोट्यावधी रुपये खर्च करते. मात्र निधीचा योग्यरित्या उपयोग होतो की नाही याचे सोयरसुतक शासनाबरोबरच लोकप्रतिनिधींना नसल्यामुळे शासनाचे कोट्यावधी रुपये पाण्यात जात आहेत. हे प्रकरण रखडत गेले. पाणी वाहून जात आहे. लोकांना पाण्याचा उपयोग होत नाही. 231 गेटपैकी 132 गेट बसविण्यात आले. उर्वरित गेट केव्हा बसविले जातील? बंधाऱ्याची रुंदी 3 मिटरची आहे, त्यावरुन छोटी वाहने जातात. ॲप्रोच रोड अद्याप झालेला नाही. त्यामुळे मोठी वाहने जाऊ शकत नाहीत. या रस्त्याचे काम केव्हा पूर्ण होईल? आज जनतेमध्ये समज निर्माण झाला आहे की, शासनाच्या कोट्यावधी रुपयांचा अपव्यय होत आहे. ज्यासाठी पाणी अडवायचे तो हेतू साध्य होत नाही. या कामाची उच्च अधिकाऱ्यांमार्फत चौकशी केली जाईल का?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हे खरे आहे की, हा प्रकल्प 2003 साली सुरु करण्यात आला. त्यामध्ये काही बदल सुचविल्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. रुंदी आणि लांबी वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. निधीअभावी काम रखडत गेले ही वस्तुस्थिती आहे. 2 वर्षे टप्प्याटप्प्याने पाणी अडविण्याचे काम झाले आहे. यावर्षी पूर्णपणे पाणी अडविले जाईल आणि ते पाणी सिंचनाकरिता उपलब्ध करुन दिले जाईल. निधीचा अपव्यय झाला अशा प्रकारची शंका व्यक्त करण्यात येत आहे. परंतु निधीचा अपव्यय झाल्याचे दिसत नाही. यावर्षी या प्रकल्पातून गळती वगैरे काही होते का याचे पूर्णपणे निरीक्षण केले जाईल. मुख्य अभियंत्यांमार्फत चौकशी केली जाईल आणि काही चुकीचे घडणार नाही याची काळजी घेतली जाईल. ॲप्रोच रोडसाठी भूसंपादनाची आवश्यकता आहे. तो प्रस्ताव पाठवित आहेत. मूळ प्रकल्पामध्ये तो रस्ता नव्हता. आता गाडी रस्ता झाला आहे. साईड वॉल बांधण्याच्या दृष्टीने ओव्हर फ्लँकिंग होत असेल तर माती वाहून जाऊ नये यादृष्टीने सर्व कामे यावर्षी पूर्ण करु.

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मेजर सुधीर सावंत : हा प्रकल्प मंजूर करुन घेण्यामध्ये माझा मोठा रोल होता. माननीय मंत्रीमंहोदयांना प्रकल्पाच्या ठिकाणी घेऊन गेलो तसेच मंत्रीमहोदयांनी या बंधा-याची पाहणी केली तरी सुध्दा इतक्या वर्षापासून हा प्रकल्प कार्यान्वित होत नाही. यासंदर्भात आम्ही मागणी केली होती की, माननीय मंत्रीमहोदयांनी येथे येऊन पाणी पूजन करावे आणि मौजे किर्लोसमध्ये कृषी विद्यान केंद्र असल्यामुळे या प्रकल्पाचे त्या गावासाठी अंत्यत महत्व आहे. त्यामुळे माझे यासंदर्भात एवढेच म्हणणे आहे की, या प्रकल्पाचे काम निकृष्ट झाल्यामुळे मी आपल्याकडे तक्रार केली होती त्या अनुषंगाने काय कार्यवाही झाली तसेच हे पाणीपूजन करण्यासाठी आपण कधी येणार आहात?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, पाणी अडविल्यानंतर पाणीपूजन करण्याची आमची तयारी आहे आणि समुद्र काठी हा भाग असल्यामुळे यासंदर्भात आपण माननीय सभापतीमहोदयांना सुध्दा निमत्रित करावे अशी विनंती आहे. आपल्या मागणीमुळेच या प्रकल्पामध्ये आपण काही बदल केले होते. मेजर सावंत यांच्या मागणीमुळेच या ठिकाणी वरुन रस्ता देखील करण्यात आलेला आहे तसेच स्लॅबची जाडी देखील वाढविण्यात आली तसेच कॉन्क्रीटचे पिलर्स टाकण्याचे काम सुध्दा झालेले आहे. या ठिकाणचे काम निकृष्ठ प्रतीचे झालेले आहे अशी तक्रार नव्हती तरी सुध्दा गुणनियंत्रणाच्या संदर्भात लक्ष असावे म्हणून गुणनियंत्रण पथकाने दोनदा व्हिजिटस केलेल्या असून या महामंडळाचे कार्यकारी संचालक यांनी सुध्दा व्हिजिट केलेली आहे. अजूनही यामध्ये काही शंका असेल तर पुन्हा एकदा तपासून घेण्यात काही अडचण नाही.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या ठिकाणी शासनाचा निगेटीव्ह दृष्टिकोन का आहे हे माहिती नाही. एका बाजूला सिंचन खात्याला 5-6 हजार कोटी रुपयांचा निधी मिळतो आणि दुसरीकडे काही लाखाचे काम असेल तर त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. या ठिकाणी केवळ 28 लक्ष रुपये खर्च करावयाचे आहेत परंतु त्यासाठी सुध्दा शासन निधी देत नाही अशी दुर्दैवी परिस्थिती आहे. खरे म्हणजे वरच्या गेटमध्येच पाणी साठत असते आणि वरचे गेट बसविले नाही तर बंधा-याचा काय उपयोग आहे? त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, महाराष्ट्रात असे बरेच बंधारे बांधून तयार आहेत परंतु त्यांना गेट लावलेले नाही. त्यामुळे जलसंवर्धन खाते बॅकलॉग असलेल्या जिल्हयात आग्रहाने निधी मिळवून सर्व बंधा-यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

श्री. श्रीकांत जोशी ....

या पावसाळयात 100 टक्के पाणी अडविले जाईल अशी कामे करण्याचा धाडसी कार्यक्रम जलसंधारण विभाग करणार आहे का? त्यासाठी मुख्यमंत्री स्तरावर बॅकलॉग असलेल्या भागाला सिंचनाचे पैसे दिले जाणार आहेत काय? विशेषत: मराठवाडा आणि कोकणामध्ये मोठया प्रकल्पासाठी जागा उपलब्ध नसते त्यामुळे 250 हेक्टरच्या आतील प्रकल्प तयार होऊ शकतात त्यामुळे तातडीने मंत्रीमंडळासमोर हा विषय नेऊन यामध्ये काही मार्ग काढणार आहात का?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुचवल्या प्रमाणे यातून निश्चितपणे मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

-----------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : 11 जुलैच्या रेल्वे बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या स्फोटग्रस्तांना मदत वाटपात अक्षम्य दिरंगाई होणे.

**मु. शी.** : 11 जुलैच्या रेल्वेबॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या स्फोटग्रस्तांना मदत वाटपात अक्षम्य दिरंगाई होणे याबाबत श्री.संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महोदय, 11 जुलै, 2006 च्या लोकल बॉम्बस्फोटात 187 नागरिकांचे बळी गेले आणि 490 जण गंभीर जखमी झाले. सदर घटनेस 1 वर्ष पूर्ण होत असून मरण पावलेल्या व जखमी झ ालेल्यांना जाहीर केलेल्या मदत वाटपात रेल्वेकडून अक्षम्य दिरंगाई झाल्याने मृत्यूपावलेल्या आणि जखमी झालेल्या व्यक्तींच्या नातेवाकांमध्ये रेल्वे प्रशासनाबाबत तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. सुशिक्षित तसेच अती शिक्षीत व्यक्तींची कुवत असतांना त्यांना चतुर्थ श्रेणीमध्ये नोक-यांची संधी दिली जात आहे. परिणामी या व्यक्तीमध्ये जाणीवपूर्वक अपमान केला जात असल्याची जाणीव त्यांच्यात निर्माण झालेली आहे. याबाबत राज्यशासनाने केंद्रशासनाकडे गांभीर्याने पाठपुरावा करुन रेल्वे अपघातात ठार झालेल्या व्यक्तीच्या नातेवाइकांना तसेच जखमी व्यक्तींना तातडीने मदत करुन आश्वासन पुर्तीची गरज आहे. सार्वजनिक दृष्टया अत्यंत महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेख सादर करीत आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : शासनाने आपदग्रस्तांना त्वरित मदत पोहोचवावी आणि हे अधिवेशन संपण्यापूर्वी त्या संदर्भातील माहिती सभागृहाला अवगत करावी.

श्री.बाळासाहेब थोरात : होय.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :पर्यटनाच्या दृष्टीने कोकणचा सर्वांगीण विकास करणे

**मु.शी.** : पर्यटनाच्या दृष्टीने कोकणचा सर्वांगीण विकास करणे याबाबत श्री. जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडून दिलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"कोकण विभागाच्या किनारपट्टीवरील जिल्ह्यात भरपूर प्रमाणात असलेली नैसर्गिक साधनसंपत्ती, दळणवळणाची साधने, किल्ले, विविध देव-देवतांची प्राचीन मंदिरे आणि समुद्र किनाऱ्यांमुळे पर्यटनास अनुकूल वातावरण आहे. मात्र तेथील सोयी-सुविधां अभावी त्याचा पर्यटन व्यवसायावर विपरित परिणाम होत असल्याने पर्यटकांची संख्या वाढण्यात अडचण निर्माण होत आहे.

कोकणात येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत वाढ करण्यासाठी आणि पर्यटनाच्या दृष्टीने कोकणचा सर्वांगीण विकास करण्यासाठी एक कालबध्द कार्यक्रम आखून, त्यासाठी पुरेशी तरतूद अर्थसंकल्पात करण्यात यावी.

राज्यातील पुराणवस्तू संशोधन खाते आणि पर्यटन खाते या दोघांनी संयुक्तिकपणे राज्यातील किल्ले व मंदिरे "बांधा, वापरा आणि हस्तांतरीत (बी.ओ.टी.) करा" या तत्वावर विकसित करुन सवलती दिल्यास आणि प्राचीन किल्ले पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांकडून कर घेतल्यास पर्यटक मोठ्या प्रमाणावर येतील.

पर्यटकांचा ओढा ॲग्रीकल्चर टुरिझमकडे वळतो आहे. अलिबाग तालुक्यात दर शनिवार-रविवारी तीन ते चार हजार पर्यटक मुंबईवरुन येतात. त्यापैकी बरेचसे पर्यटक मोठ्या हॉटेल्समध्ये न राहता ठिकठिकाणच्या गावातील नागरिकांच्या घरीच राहणे पसंत करतात, परंतु तेथेही शौचालये आणि पाण्याची सोय नसल्याने पर्यटकांची गैरसोय होते.

.3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..........

तसेच सदर नागरिकांना विजेचे बील वाणिज्य दराने न लावता त्यांना बिलाची आकारणी शेती व्यवसाय समजून करण्यात यावी. शासनाचे या महत्वाची बाबीकडे लक्ष वेधून विशेष कार्यवाही व्हावी यासाठी हा मी विशेष उल्लेख करीत आहे."

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ऊसाला हेक्टरी 40 हजार रुपये अनुदान देण्याबाबत

**मु. शी.** : ऊसाला हेक्टरी 40 हजार रुपये अनुदान देणे याबाबत श्री.विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा झालेला अतिरिक्त ऊसाचा प्रश्न सोडविण्यासाठी उपाययोजना म्हणून गाळपा अभावी उभ्या असलेल्या ऊसाला हेक्टरी 25 हजार रुपये देण्याचे जाहीर केले. हे अनुदान देताना शासनाने काही जाचक अटी घातलेल्या आहेत. शेतकऱ्यांनी ऊस नष्ट केला किंवा कसे, ऊस कापला किंवा कसे याचे व्हीडिओ शुटींग करणार, ऊस कापला असेल तरच अनुदान देण्यात येईल अशा ज्या जाचक अटी टाकण्यात आलेल्या आहेत त्या रद्द करण्यात याव्यात. तसेच हे अनुदान 40 हजार पर्यंत वाढवून द्यावे अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

----------

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पुणे जिल्ह्यातील ऐतिहासिक लोहगडावरील शंकराच्या मंदिरातील नंदीची मूर्ती गायब झाल्याबाबत.

**मु.शी.** : पुणे जिल्ह्यातील ऐतिहासिक लोहगडावरील शंकराच्या मंदिरातील नंदीची मूर्ती गायब झाल्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ा दिली आहे. त्यां□ी ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडून दिलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

" दुर्ग प्रेमींच्या दृष्टीने जिव्हाळ्याचा विषय म्हणजे पुणे जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले. पुणे जिल्ह्यात असलेल्या अनेक ऐतिहासिक किल्ल्यांपैकी लोहगड एक किल्ला आहे. या किल्ल्यावर सुमारे 400 वर्षापूर्वीचे शंकराचे मंदिर आहे. या मंदिरातील नंदीची मूर्ती अचानक गायब झालेली आहे. त्याबाबत दिनांक 12.7.2007 रोजी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार करुनही अद्यापपर्यंत एकाही आरोपिस अटक झालेली नाही. पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर ऐतिहासिक किल्ले आहेत. त्या किल्ल्यांवर काही ऐतिहासिक पुरातन वस्तू आहेत त्या चोरीस जाणार नाहीत याची काळजी लोणावळी ग्रामीण पोलीस स्टेशनने घ्यावी व लोहगडावरील शंकराची मंदिरातील नंदीच्या मूर्तीचा लवकरात लवकर शोध घ्यावा असा मुद्दा मी विशेष उल्लेखाद्वारे मांडत आहे. "

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महाराष्ट्राच्या किनारपट्टीचे वाढत असलेले महत्व

**मु. शी.** : महाराष्ट्राच्या किनारपट्टीचे वाढत असलेले महत्व याबाबत मेजर सुधीर सावंत वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य मेजर सुधीर सावंत यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

मेजर सुधीर सावंत ( नामनियुक्त ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

" महाराष्ट्राच्या संपूर्ण किनारपट्टीला एक वेगळे महत्व आहे. या किनारपट्टीवर मत्स्य व्यवयास,पर्यटन व फलोत्पादन यावर प्रचंड प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक होत आहे. त्यामुळे कोकणचा विकास मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो. परंतु या सर्व गोष्टी साध्य करण्यासाठी दळणवळणाची जी साधने आहेत ती उपयुक्त नाहीत. तेव्हा मुंबई-गोवा हा संपूर्ण सागरी महामार्ग एमएसआरडीसी मार्फत चौपदरी करण्यात यावा असा मी या विशेष उल्लेखाद्वारे मुद्दा उपस्थित करीत आहे."

--------------

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील आय.टी.आय.निदेशक संघटनेच्या समस्यां

**मु. शी.** : राज्यातील आय.टी.आय.निदेशक संघटनेच्या समस्या याबाबत श्री.रामनाथ मोते,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.रामनाथ मोते यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील आय.टी.आय. निदेशक संघटनेने आपल्या विविध समस्यांबाबत यापूर्वी उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण विभागाकडे निवेदने दिली आहेत. या समस्यांमध्ये पदांच्या आढाव्याबाबत झालेला अन्याय दूर करणे, वेतनातील फरकाची रक्कम अदा न करणे, पदोन्नती संबंधीचे धोरण निश्चित करताना आय.टी.आय.च्या निदेशकांना डावलने, मूळ नियुक्ती दिनांकापासून सेवाज्येष्ठता न देणे इत्यादी विषयांबाबत सातत्याने पाठपुरावा करुनही उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दखल घेतलेली नाही. परिणामत: संघटनेने दिनांक 20 मार्च,2007 रोजी राज्यभर निदर्शने व उपोषण केले. परंतु अद्यापही शासनाने लक्ष न दिल्याने दिनांक 21 जुलै,2007 रोजी आय.टी.आय. संघटनेने राज्यव्यापी मोर्चाचे आयोजन केले आहे. म्हणून शासनाने तातडीने चर्चा करुन समस्यांची दखल घ्यावी अशी विनंती मी आपल्या माध्यमातून शासनास करीत आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. आता आपण आजचे विशेष उल्लेख घेऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2....

**पृ. शी.** : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कुटुंबियांवर रोजंदारीसाठी वणवण फिरण्याची आलेली वेळ

**मु. शी.** : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कुटुंबियांवर रोजंदारीसाठी वणवण फिरण्याची आलेली वेळ याबाबत श्री.अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "लोकशाहीस्तव लोकमताने मंत्रीपदी गेले, विसरुन लोक गेले पार, सत्तेने धुंद बनले." असे खडे बोल लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे असून त्यांच्या वारसांचे आज हाल होत आहेत. त्यासंदर्भात विशेष उल्लेख मी सादर करीत आहेत.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची सूनबाई श्रीमती सवित्रा मधुकर साठे व त्यांच्या तीन मुलांवर आज रोजंदारीसाठी वणवण भटकण्याची वेळ आलेली आहे. त्यांना अगोदर संजय गांधी योजनेतून मदत मिळत होती, परंतू ती गेल्या 6 महिन्यांपासून मिळणे बंद झाले आहे. त्यांच्या घरात गॅस नाही, लाकडे पेटवून रोजंदारी करुन वणवण भटकून त्या आपली व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. त्यांना ती मुले असून पहिला 12 वी शिकलेला आहे, दुसरा 10 पास असून तिसरा 8 च्या वर्गात आहे. या तीनही मुलांचे शिक्षण व त्यांचे पालनपोषण त्या रोजंदारीवर करीत आहेत. ज्यांच्या नावाने शासनाने महामंडळ काढले, त्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळात नोकरी मिळण्यासाठी त्यांनी अर्ज केला असून तो अर्ज गेल्या 6 महिन्यांपासून तेथे धूळ खात पडलेला आहे. आज त्यांचे सारे कुटुंब रस्त्यावर आलेले आहे. त्यांना मागे एक छोटे घर मिळालेले आहे. मधल्या काळात श्री.मधुकर साठे व श्री.शंकरराव साठे या चुलत भावांकडे थोडीशी ठेव ठेवली होती. त्यातून त्यांना 600 रुपये मिळतात. त्यातूनच त्या मुलांचे शिक्षण व संबंध कुटुंबांचा उदरनिर्वाह करतात. अशाप्रकारचा विशेष उल्लेख मी आपल्या अनुमतीने येथे सादर करीत आहे.

(..3.....



SSP/ KGS/ MAP/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.अजित... 14:55

श्री.अरविंद सावंत....

"शेतकरी शेतमजुरांनो मते देऊन मोठया आशेने मंत्रीपदी पाठविले ज्यांना, जनतेची कदर नुरली त्यांना, पुरे फावले नोकरशहांना." अशाप्रकारची कणव करणाऱ्यांच्याच कुटुंबाची दुर्दशा होत आहे. माननीय सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शासनाला विनंती करतो की, तातडीने त्यांच्या कुटुंबियांना मदत द्यावी व त्यांना तातडीने महामंडळात नोकरीत सामावून घ्यावे.

----

..4.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : श्री.संजय शहासने यांच्या धाडसी वृत्तीची दखल घेऊन त्यांचा गौरव करण्यासंदर्भात

**मु. शी.** : श्री.संजय शहासने यांच्या धाडसी वृत्तीची दखल घेऊन त्यांचा गौरव करण्यासंदर्भात याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, श्री.संजय गजानन शहासने रा.आंबेघर (ता.पेण, जि.रायगड) या तरुणाने दिनांक 25.7.2005 रोजी अतिवृष्टी आलेल्या पुरामध्ये आंबेघर हद्दीतील पुराच्या पाण्यात अडकून पडलेल्या 14 व्यक्तींचे प्राण वाचविले, तसेच दिनांक 23 जुलै, 1989 रोजी झालेल्या महापुराचे वेळी देखील 18 व्यक्तींचे प्राण वाचविलेले आहेत. परंतु श्री.संजय शहासने यांच्या हया धाडसी वृत्तीची शासनाने कोठेही नोंद घेऊन श्री.संजय शहासने यांचा सन्मान केल्याचे दिसून आलेले नाही. जुलै,2005 मध्ये जिल्हयात आलेल्या पुराचेवेळी पनवेल (जि.रायगड) येथील चार कोळी बांधवांनी असेलच धाडस दाखविल्यामुळे त्यांचा दिनांक 1 मे,2007 रोजी अथोचित सत्कार अलिबाग येथे करण्यात आलेला आहे. श्री.संजय शहासने यांनी वरील प्रमाणे दाखविलेल्या धाडसाबाबत त्यांचा यथोचित गौरव करुन त्यांना शासनाने प्रशस्तीपत्र द्यावे यासाठी मी हा विशेष उल्लेख सादर करीत आहे.

-----

..5....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** : देवबाग-मोबरवाडी वाचविण्यासाठी मेरी टाईम बोर्डाचा संरक्षक बंधारा अयोग्य बांधल्याने तो खचणे

**मु. शी.** : देवबाग-मोबरवाडी वाचविण्यासाठी मेरी टाईम बोर्डाचा संरक्षक बंधारा अयोग्य बांधल्याने तो खचणे याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.परशुराम यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडीलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यातील देवबाग-मोबरवाडी वाचविण्यासाठी मेरी टाईम बोर्डाने घातलेला संरक्षक बंधारा अयोग्य व चुकीच्या पध्दतीने घातल्याने तसेच बंधाऱ्याचे काम निकृष्ट पध्दतीने झाल्याने यंदाच्या पहिल्याच पावसात पाच ठिकाणी खचणे, यामुळे देवबाग-मोबरवाडी ग्रामस्थांचा सागरी अतिक्रमरणाचा धोका कायम असणे, यामुळे यंदाच्या पावसाळयात तेथील ग्रामस्थांना जीव मुठीत घेऊन जगावे लागणे, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे, अशी विनंती करतो.

-----

..6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : व्हीजेटीआयच्या संचाकांनी केलेल्या घोटाळयाच्या तक्रारीची शासनाने दखल न घेणे

**मु. शी.** : व्हीजेटीआयच्या संचाकांनी केलेल्या घोटाळयाच्या तक्रारीची शासनाने दखल न घेणे याबाबत श्री.दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, व्ही.जे.टी.आय.च्या संचालकांनी फार मोठा घोटाळा त्या संस्थेत केला आहे. यासंदर्भात वारंवार तक्रारी देऊनही शासनाने याबाबत दखल घेतलेली नाही.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो आणि यासंदर्भात तातडीने चौकशी समिती नेमावी, समितीचा अहवाल सदनासमोर ठेवावा आणि या भ्रष्टाचाराबद्दल कोणती कारवाई केली त्याची माहिती या सदनाला करुन द्यावी, अशी विनंती करतो.

सभापती महोदय, मुंबईतील सुप्रसिध्द वीर जिजामाता तंत्रशिक्षण संस्था ही संस्था डीम युनिव्हरसिटी झाल्याने तेथील संस्था चालकांनी सर्व नियम धाब्यावर बसवून लाखो रुपयांचे आर्थिक घोटाळे केले आहेत. 15 लाखांची इनोव्हा गाडी टेंडर न मागविता जागतिक बँकेच्या रकमेतून खरेदी करण्यात आली, संचालकांना बंगला दिला असतांना सुध्दा घरभाडे वसूल करुन 35 लाख रुपये घेतले गेले, संस्थेकडे स्वत:ची गाडी असतांना सुध्दा 1 लाख रुपये टॅक्सी भाडयाचे वसूल करण्यात आले, संस्थेकडे असलेली एक एकर जमीन बिल्डरला देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, जर्मनवारीच्या नावाने 2 लाख रुपये खर्च करण्यात आले, त्याचा हिशेब दिलेला नाही, अडीच लाख रुपयांचा कॅमेरा, 70 लाख रुपयांचा लॅप-टॉप खरेदी करण्यात आला. कार्यशाळेसाठी 82 हजार रुपये खर्चापोटी घेतले गेले, त्याचा हिशेब दिलेला नाही. वशिल्याच्या लोकांना पगाराची खिरापत देण्यात आली. मुलाखती, जाहिराती या माध्यमातून खर्च करण्यात आला, पगारापोटी दीड लाख रुपये जागतिक बँकेने दिलेल्या रकमेतून स्वत: घेतले, संतोष या आपल्या मुलाला अर्धवेळ शिक्षक नेमून पूर्वलक्षी प्रभावाने पूर्णवेळ शिक्षकाचे आदेश काढून त्या माध्यमातून पैसे वसूल करणे, स्वत:च्या सेवानिवृत्तीचे वय 60 वर्षे पूर्ण झाल्यानंतरही सेवा चालू ठेवणे, शासनाने नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल येऊनही त्यावर कार्यवाही न होणे, असे अनेक गैरव्यवहार या संस्थेमध्ये झाले आहेत. या गैरव्यवहारांची यादी वाचत बसलो तर वेळ पुरणार नाही. परीक्षेच्या बाबतीत, प्रवेश देण्याच्या बाबतीत संचालकांचा अनिर्बंध भ्रष्टाचार चालू आहे, त्यासंदर्भात चौकशी करावी, अशी या विशेष उल्लेखाचा माध्यमातून शासनाला विनंती करतो.

---------------

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कै.यशवंतराव चव्हाण यांच्या देवराष्ट्रे, ता.कडेगाव येथील राष्ट्रीय स्मारकाची झालेली दुर्दशा

**मु.शी.**: कै.यशवंतराव चव्हाण यांच्या देवराष्ट्रे, ता.कडेगाव येथील राष्ट्रीय स्मारकाची झालेली दुर्दशा याबाबत माननीय सदस्य, श्री.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखासंबंधीची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य, श्री.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिलेली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.रणजितसिंह मोहिते पाटील (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार कै.यशवंतराव चव्हाण यांचे देवराष्ट्रे ता.कडेगाव येथील निवासस्थान दिनांक 8 जानेवारी 2001 रोजी शासनाने राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करणे, यशवंतराव चव्हाण यांचे राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केलेल्या घराकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. घराचा पत्रा, कौले, घराच्या सर्व भिंती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, त्यातच जून 2007 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे घराची भिंत कोसळणे, राष्ट्रीय स्मारकाचा ठेवा चिरंतन ठेवण्यासाठी शासनाने केलेल्या दिरंगाईमुळे व स्मारक जतन करण्यासाठी निधी उपलब्ध न करुन दिल्याने संपूर्ण राज्यातील जनतेमध्ये नाराजीचे वातावरण पसरलेले आहे. यशवंतराव चव्हाणांचे राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केलेले घर जतन करण्यासाठी करावयाची तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी या विशेष उल्लेखाव्दारे मी करीत आहे.

--------------------

..3.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: इंग्रजी माध्यमाच्या शाळातील मराठी भाषेच्या तासिका वाढविण्याबाबत

**मु.शी.**: इंग्रजी माध्यमाच्या शाळातील मराठी भाषेच्या तासिका वाढविण्याबाबत श्री.कपिल पाटील, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखासंबंधीची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य, श्री.कपिल पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिलेली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मराठी भाषेच्या अवहेलनेबाबत या सभागृहाने अनेक वेळा चिंता व्यक्त केली आहे. अशाच एका अवहेलनेबाबत मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्रात इंग्रजी माध्यमाच्या हजारो शाळा आहेत. या शाळांमध्ये मराठी शिकविण्याच्या दृष्टीने अन्याय होत आहे. भाषांमध्ये पहिली इंग्रजी, दुसरी मराठी व तिसरी हिंदी असा भाषांचा क्रम आहे. इंग्रजी विषयासाठी सहा तासिका, मराठी विषयासाठी चार तासिका आणि हिंदी विषयासाठी आठ तासिका शिक्षण मंडळाने जो आराखडा तयार केला आहे त्यानुसार नेमून दिल्या आहेत. वास्तविक पाहता तिन्ही भाषांना समान गुण आहेत, अभ्यासक्रमही सारखा आहे, आराखडाही सारखा आहे. त्यामुळे या तिन्ही भाषांसाठी समान तासिका देणे आवश्यक होते. शिक्षण मंडळाने जाणुनबुजून मराठीला चार तासिका दिलेल्या आहेत. यामुळे इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे आकलन होणे कठीत जात आहे. त्यामुळे ते मराठी सोडून परकीय भाषेकडे वळावयास लागले आहेत. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून दोन मागण्या मी करणार आहे. ताबडतोबीने मराठी विषयासाठी समान तासिका म्हणजे सहा तासिका देण्यात याव्यात व इंग्रजी माध्यमातून मराठी विषय अधिक आनंददायी, सोपा, सुलभ व व्यावहारिक उपयोगाचा केला जावा, यादृष्टीने आपण शासनाला निदेश द्यावेत, अशी विनंती आहे.

---------------

यानंतर श्री.बोरले........

अग्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO. V OF 2007.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949 THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)**

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 5- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948, आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक-5 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-------

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## वि.प.वि.क्रमांक-5 बाबत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक-5 हे विधेयक नगर विकास विभागाचे आहे. वित्त राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी हे विधेयक मांडलेले आहे. नगर विकास विभागाचे मंत्री कोठे आहेत ? नगर विकास विभागाच्या मंत्री महोदयांनी हे विधेयक मांडावयास पाहिजे होते. हे विधेयक कशाकरिता आणण्यात आले आहे, या विधेयकाचा उद्देश काय आहे ? हे सभागृहाला कळले पाहिजे.

**उपसभापती** : आता विधेयक मांडून झालेले आहे.

-------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO.XXXIX OF 2007.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.)

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 39- महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 39- महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अध्यादेश, 2007 दिनांक 30 जून, 2007 रोजी प्रख्यापित झालेला आहे. हा अध्यादेश दिनांक 1 जुलै, 2007 रोजी अंमलात आलेला आहे. या अध्यादेशावर विधानसभेत चर्चा होऊन तो दिनांक 17 जुलै, 2007 रोजी मंजूर झालेला आहे. विधानसभेमध्ये मंजूर झाल्यानंतर आज हे विधेयक विधानपरिषदेमध्ये चर्चेसाठी आलेले आहे. औषधांवर आपण व्हॅट लावतो. औषधांवरील वेस्टनावर जी एम.आर.पी. रहायची त्यावर आपण टॅक्स लावत होतो.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख .....

आता प्रथम उत्पादक, होलसेलर्स आणि त्यानंतर डिस्ट्रीब्युटर्स अशा प्रकारे टॅक्स आकारला जाणार आहे. पूर्वी एम.आर.पी.वर टॅक्स इनक्लुड केला जात होता. उत्पादक एम.आर.पी. किंमतीवरील टॅक्स भरुन टाकायचा. त्यावेळी होलसेलर्स किंवा डिस्ट्रीब्युटरला टॅक्सची काहीही रक्कम भरण्याची गरज नव्हती. परंतु उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल झालेल्या याचिका क्र.2275/2006 द्वारे वस्तुच्या खरेदी व विक्री किंमतीस आव्हान देण्यात आले. यामध्ये शासनातर्फे कायदेशीर भूमिका मांडण्यात आली व त्याप्रमाणे कायद्यात बदल करण्यासाठी अद्यादेश काढण्यात आला आहे. अध्यादेशाचे विधेयकामध्ये रुपांतर करण्यासाठी या सभागृहात हे विधेयक आज मांडण्यात आले आहे. रेग्युलर व्हॅटचे गणन करताना उत्पादक, होलसेलर्स व डिस्ट्रीब्युटरने लावलेल्या किंमतीवर जी व्हॅल्यू ॲड होते, यावर टॅक्स लावला जातो. बहुतेक सर्व वस्तुच्या बाबतीत जसे व्हॅल्यू ॲडीशन होते, तसे ॲडीशन आपण या विधेयकामार्फत केलेले आहे. यामध्ये एक फरक आहे तो असा की, पूर्वी एम.आर.पी.वर उत्पादक टॅक्स भरत होता, त्याऐवजी टप्प्याटप्प्याने टॅक्स भरण्याचा बदल या विधेयकाद्वारे करण्यात आला आहे. या सुधारणांमुळे 1 जुलै, 2007 पासून विक्रीच्या प्रत्यक्ष किंमतीवर प्रत्येक टप्प्यावर कर आकारला जाईल. तसेच पूर्वी मिळत होता तसा खरेदी किंमतीच्या भरलेल्या कराचा परतावा देखील मिळेल. या सुधारणांमुळे औषधाच्या किंमतीतही सुसुत्रता येईल. तसेच पूर्वीच्या किंमतीमुळे होणाऱ्या संदिग्धतेतून व या व्यवहाराच्या व्यापातून व्यापाऱ्यांना दिलासा मिळेल. अशा प्रकारे या विधेयकाद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत.

प्रश्न प्रस्तुत झाला

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या विधेयकाच्या रुपाने व्हॅटबद्दल तरतूद मांडली आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, 2002 मध्ये व्हॅटचा कायदा मंजूर केला आहे. आता मांडण्यात आलेल्या विधेयकामुळे खरेदी आणि विक्रीवर कराचा बोजा येणार आहे. प्रत्येक स्टेजला व्हॅट लावला जाणार असल्याने शेवटी याचा बोजा ग्राहकांवर येणार आहे. हा व्हॅल्यू ॲडेड टॅक्स असल्यामुळे याचा फटका फक्त ग्राहकांना बसणार आहे. याबाबत मंत्री महोदयांनी कोणताही खुलासा केलेला नाही. दुसरे असे की, औषधाचा वापर करणारी माणसे सर्वसाधारण आहेत. त्यामुळे हा सर्व टॅक्स सर्वसाधारण माणसांवर बसणार आहे. सर्वसामान्य माणसांना दिलासा देण्यासाठी आपण काय करणार आहात ? व्हॅटमुळे शासनाचे उत्पन्न वाढले आहे. बारीकसारीक वस्तूवरही व्हॅट लावून त्यातून सरकारचे उत्पन्न वाढेल परंतु सर्वसामान्य माणूस भरडला जाईल. सर्वसामान्य माणसाला औषधे विकत घेणे परवडत नसल्यामुळे तीच माणसे यात भरडली जातील. औषधे ही प्रत्येक माणसाची गरज आहे, दारिद्रय रेषेखालील माणूस असो, सर्वसामान्य माणूस असो, गरीब असो, कामगार असो, मध्यमवर्गीय असो प्रत्येकाला औषधाची गरज आहे. परंतु त्याला ही किंमत मोजावी लागणार आहे. गरीबांना स्वस्त व श्रीमंतांना महाग औषधे देता येतील अशी अर्थव्यवस्था आपल्याकडे नाही. या दृष्टीकोनातून पाहिले तर ही सुधारणा करण्याची आवश्यकता होती का ? हा माझा प्रश्न आहे. 2002 साली शासनाने व्हॅल्यू ॲडेड टॅक्स लावला आहे, या पध्दतीप्रमाणे छापील किंमतीवर टॅक्स लावला जात होता तो आता निरनिराळया स्टेजेसमध्ये लावला जाणार आहे. यामुळे शेवटी वस्तुची किंमत वाढणार आहे. यातून शासनाला टॅक्स मिळेल परंतु सर्वसामान्य ग्राहक मरणार आहे. याबाबत काही स्पष्टीकरण केले तर बरे होईल.

-----

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख (अर्थ व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वप्रथम मी सांगू इच्छितो की, औषधाची किंमत राज्यसरकारकडून निश्चित केली जात नसून ती केंद्र सरकारकडून निश्चित केली जाते. मागील वर्षापर्यत औषधावर 12.5 टक्के व्हॅट होता. यामधून लाईफ सेव्हींग ड्रग्ज करमुक्त करण्यात यावीत असा संपूर्ण महाराष्ट्रातून आग्रह होता. तसेच देशातील प्रत्येक राज्यामधूनही लोकांनी केंद्र सरकारला विनंती होती की, लाईफ सेव्हींग ड्रग्स वर टॅक्स कमी करण्यात यावा. त्यामुळे हा टॅक्स 12.5 टक्क्यावरुन 4 टक्क्यावर आणला आहे. त्यामुळे सर्वसामान्य व गरीब माणसांना लाईफ सेव्हींग ड्रग्जसाठी पुढील काळामध्ये कमी पैसे मोजावे लागणार आहेत.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. देशमुख ....

आता आपल्याला माहिती आहेच की, हिंदुस्थानातील सगळ्याच राज्यांमध्ये वॅट आहे आणि दुसरे म्हणजे कोणत्याही कराचा बोजा हा शेवटी ग्राहकावरच पडतो. म्हणूनच तर आपण साडेबारा टक्क्यावरून 4 टक्के वर 'वॅट' आणला आहे. त्यामुळे एकंदरीत जो काही बोजा यामुळे राहणार आहे, तो सर्वसामान्य ग्राहकावर कमीच राहणार आहे.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, सुरूवातीस आपण उत्पादकावर या कराचा बोजा टाकला होता आणि आता तो आपण उत्पादक, होलसेलर आणि डिस्ट्रीब्यूटर यांच्याकडून टप्प्याटप्प्याने लावून वसूल करणार आहात. अर्थात यामध्ये शेवटी ग्राहकावरच हा बोजा पडणार आहे आणि ग्राहकाकडे जेव्हा औषध पोहोचेल त्यावेळी त्याची जी काही निर्धारित किंमत असेल त्यावर आपला 'वॅट' लागणार आहे की, अगोदरच तो त्या किंमतीत समाविष्ट असणार आहे ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, कोणत्याही कर पद्धतीमध्ये कराचा बोजा हा शेवटी ग्राहकावरच येत असतो. पण या ठिकाणी आपण जी पद्धत यातून स्वीकारली आहे ती अशी की, एमआरपी 200 रूपये असेल तर 200 अधिक 8 टक्के किंवा जो काही 'वॅट' असेल तो कर लागणार आणि होलसेलरकडे येणार आणि त्याच्याकडून डिस्ट्रीब्यूटरकडे जाताना पुन्हा 'वॅट' लागणार आणि पहिल्याने जो कर भरला असेल तो त्याने कापून घ्यावयाचा आहे. सुरूवातीस जेव्हा आपण वॅट लावला होता तेव्हा तो आपण उत्पादकाच्या पातळीवरच वसूल करीत होतो, त्यामुळे होलसेलर आणि डिस्ट्रिब्यूटरला वॅट भरायची गरज पडत नव्हती. त्यामुळेच आता त्यांनाही हा कर भरायला आपण लावले आहे आणि ते करताना ॲक्च्युअल सेल प्राईस असेल त्यावर 4 टक्के कर आपण लावला आहे. आणि त्या त्या पातळीवरील प्रत्येकाने आपापला परतावा घ्यावयाचा आहे. अर्थात असे केल्याने सुरूवातीस जे पैसे आपल्याला कर रूपाने मिळत होते तेवढेच पैसे आपल्याला आताही मिळणार आहेत. त्यात आपण वाढ केली आहे असे `नाही. मात्र आपण या पद्धतीमध्ये केवळ उत्पादकालाच नाही तर होलसेलर आणि डिस्ट्रिब्यूटर आणि किरकोळ व्यापारी यांना देखील समाविष्ट करून घेतले आहे. हे करण्याचे कारण असे आहे की, सुरूवातीस उत्पादकाला आपण सर्व वॅट भरायला लावत होतो आणि त्यावेळी होलसेलर आणि डिस्ट्रिब्यूटरला काहीही पैसे भरायला लागत नव्हते त्यामुळे काही लोकांनी त्या संदर्भात रिट पिटीशन केले असता कोर्टापुढे आपण दिलेल्या सुधारणे प्रमाणे सुधारित पद्धती स्वीकारण्याच्या दृष्टीने आपण अध्यादेश काढला आणि तो आता या विधेयकाच्या रूपाने आपल्यापुढे मान्यतेसाठी आणला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, माझ्या मुद्यावर माननीय मंत्री महोदयांकडून स्पष्टीकरणात्मक खुलासा नीट आलेला नाही. मी त्यांना विचारू इच्छितो की, समजा एखादी औषधाची स्ट्रीप 100 रूपयाची असेल, म्हणजे त्याची एमआरपी 100 रूपये असेल तर ग्राहकाला आज तेवढे द्यावे लागतील की 100 + 4 असे एकूण 104 रूपये द्यावे लागतील ? म्हणजे औषधाची निर्धारित किंमत जी 100 रूपये आहे त्यात वॅटचे 4 टक्के लागून 104 रूपये ग्राहकाला द्यावे लागणार असतील तर ग्राहकाला तो बोजा अधिकचा उचलावा लागणार आहे. व्यापाऱ्यावर त्यात काहीच बोजा नाही. आणि किरकोळ औषध विक्रेता तर त्यात आणखी गोंधळ करू शकतात. 4 टक्के असले तरी तो 8 टक्के देखील घेऊ शकतो, 12 टक्केही घेऊ शकतो. खेडोपाडी दुकानांमध्ये जी आज औषधे विकली जातात त्याचे बिल देखील दिले जात नाही आणि ग्राहक देखील त्याबद्दल विचारीत नाही. त्यामुळे यातून ग्राहकाची फसवणूकच होणार आहे. तेव्हा या विधेयकामध्ये याबाबत स्पष्टता यायला पाहिजे असे मला वाटते. औषधाची जी काही किंमत असेल त्या भावामध्येच ते ग्राहकाला मिळाले पाहिजे. आणि त्या औषधावर त्या औषधाची मूळ किंमत आणि त्यावर आकारण्यात येणारा कर किती आहे ते दोन्ही वेगवेगळे छापले गेले पाहिजे अशी तरतूद यामध्ये आपण केली पाहिजे अशी माझी या निमित्ताने आग्रही मागणी आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, आजवर हजारो वस्तू याप्रमाणे विकल्या जात आहेत आणि त्यात कोठेही गोंधळ उडालेला नाही. केवळ औषधांच्या बाबतीतच गोंधळ उडेल असे म्हणणे म्हणूनच बरोबर होणार नाही. शिवाय औषधांच्या बाबतीत दुकानदाराने औषधाचे बिल दिले पाहिजे आणि ग्राहकाने देखील ते स्वत: मागून घेतले पाहिजे, तो त्याचा अधिकार आहे. त्या बिलामध्ये औषधाचे नाव, बॅच नंबर, 4 टक्के वॅट हे सर्व दाखविलेले असते.

( यानंतर श्री. सरफरे ...... ओओ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, व्हॅटमधील तरतुदीसंबंधीचे हे विधेयक मांडण्यात आले आहे. औषधाच्या बाटलीच्या वेष्टनावर जी माहिती दिलेली असते त्यामध्ये त्या बाटलीमध्ये असलेल्या औषधाच्या घटकासहीत औषधाची किंमत छापलेली असते. गिऱ्हाईकापर्यंत ते औषध पोहोचतांना योग्य किंमतीमध्ये पोहोचले पाहिजे अशी आपली कल्पना आहे. माझ्या समजुतीप्रमाणे त्या वस्तूच्या किंमतीमध्ये पॅकींगसहीत सर्व खर्च समाविष्ट असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार राज्यामध्ये विकल्या जाणाऱ्या प्रत्येक औषधाच्या वेस्टनावर इतर भाषांमध्ये संपूर्ण माहिती छापलेली असते. सदरहू वेष्टनावर मराठीमध्ये माहिती छापणे आवश्यक आहे. तशाप्रकारचा आपला निर्णय असून कायद्यामध्ये देखील तशी तरतूद आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये येणाऱ्या 80 टक्के ओषधांच्या बाबतीत कायद्यातील तरतुदीचे पालन केले जात नाही. तशाप्रकारे अंमलबजावणी करण्या संदर्भात आपल्या खात्यामार्फत आदेश दिले जातील काय? त्या आदेशाची अंमलबजावणी योग्यरितीने करण्यासाठी हे शासन जागरुकपणे काम करील काय?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, राज्यामध्ये विकल्या जाणाऱ्या प्रत्येक औषधाच्या बाटलीतील फोल्डरवर हिंदुस्थानातील सर्व भाषांमध्ये माहिती दिलेली असते. त्या माहितीमध्ये बाटलीमध्ये असलेले औषधाचे घटक व त्या औषधांबाबत घ्यावयाची काळजी यासंबंधीची माहिती दिलेली असते. अशाप्रकारची माहिती छापणे कायदेशीररित्या बंधनकारक असल्यामुळे महाराष्ट्रामध्ये विकल्या जाणाऱ्या सर्व औषधांमध्ये असलेल्या घटकांची माहिती मराठी भाषेमध्ये छापण्याबाबतचे आदेश निर्गमित केले जातील.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात

(खंड 2 व 3, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**तालिका सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येत आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**वि.प.वि. क्रमांक 5 संबंधी**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी विधान परिषद विधेयक क्रमांक 5 हे सभागृहामध्ये मांडण्यात आले. परंतु ते मांडीत असतांना विधेयकाचे उद्देश व कारणे याबाबतचे स्पष्टीकरण करण्याकरिता मंत्रिमहोदय सभागृहामध्ये उपस्थित नव्हते. आता मंत्रिमहोदय सभागृहामध्ये उपस्थित असल्यामुळे त्या विधेयकाचे उद्देश व कारणे यासंबंधीचे स्पष्टीकरण त्यांनी करावे अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : वि.प.वि. क्रमांक 5 हे पुर:स्थापनार्थ होते. त्यामुळे ते विधेयक सभागृहापुढे मांडण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. विधेयकाचा तो टप्पा पूर्ण करुन आपण पुढे गेलेलो आहोत.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.00 वाजता पुन: भरेल.

(3.23 ते 4.00 मध्यंतर)

---

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

**(सभापती स्थानी माननीय उपसभापती)**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, 'झुणका भाकर संघटन'च्या वतीने उद्या सन्माननीय सदस्यांसाठी झुणकाभारची व्यवस्था केलेली आहे. कृपया आपण सदस्यांना निमंत्रण द्यावे.

--

**पृ.शी.** : राज्यात सिंचनाचा वाढत असलेला अनुशेष.

**मु.शी.** : राज्यात सिंचनाचा वाढत असलेला अनुशेष या विषयावर सर्वश्री धोंडीराम राठोड, सुधाकर गणगणे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(गत सत्रातील प्रलंबित प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू......

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, राज्य की सिंचन व्यवस्था के ऊपर हम चर्चा कर रहे हैं. हम सब जानते हैं कि मराठवाडा का 40 प्रतिशत क्षेत्र अवर्षणप्रवण है, जहां पर 8,500 गांवों में से 3,200 गांव अवर्षणप्रवण हैं. मराठवाडा विभाग में पाटबंधारे विभाग का अनुशेष 5,168.71 करोड़ रुपए और सिंचन अनुशेष 1,709.65 करोड़ रुपए का है, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडल का अनुशेष 1,513 करोड़ रुपए का है. मराठवाडा में अन्य विभागों की तुलना में पानी बहुत कम है. अगर हम लोकसंख्या की तुलना करें तो मराठवाडा में खेती और पीने का पानी केवल 12 प्रतिशत ही उपलब्ध है.

सभापति महोदय, पानी जीवन माना जाता है. अमीरी, गरीबी सब का संबंध पानी से है. मराठवाडा का दरडोई उत्पन्न महाराष्ट्र के निर्देशांक के अनुसार सब से कम है. नंदूरबार और गडचिरोली को छोड़ दिया जाए तो मराठवाडा का दरडोई उत्पन्न सब से कम माना जाता है और इसीलिए किस प्रकार की गरीबी यहां पर है, यह बात हम सोच सकते हैं.

"दिल निकलता नहीं है पसती से,
कब्र बेहतर है तंगदस्ती से."

सभापति महोदय, गोदावरी खोरे में पानी की किल्लत को देखते हुए कोंकण की नार,पार

. . PP 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान

और दमणगंगा नदियों का ज्यादा पानी गोदावरी खोरे में डायवर्ट करने का निर्णय लगभग 10 साल पहले लिया गया था. अगर इस पर अमल किया जाता तो इन नदियों के द्वारा लगभग 8 हजार घनफुट पानी गोदावरी खोरे में उपलब्ध हो सकता था. ऐसा कहा जाता है :

"जब जेब में पैसे होते हैं, जब पेट में रोटी होती है,
उस वक्त यह जर्रा हीरा है, उस वक्त यह शबनम मोती है."

मराठवाडा में पानी उपलब्ध होने पर हम वहां से हीरे और मोती निकाल सकते हैं. इस बारे में 1 फरबरी 2000 की राज्य मंत्रिमंडल की बैठक में निर्णय लिया गया था कि इस योजना की जल्दी से जल्दी स्टडी की जाए. लेकिन आज तक कोई स्टडी नहीं हुई है. 7 साल बीत गए लेकिन अभी तक यह स्टडी करने का दिन नहीं आया है.

"तासीर इन्तजार ने ये हाल कर दिया,
आँखें खुली हुई हैं, मगर देखती नहीं."

सभापति महोदय, राज्य के 148 दुष्कालग्रस्त तालुकों का एकत्रित महामंडल स्थापन करने की कोशिश हो रही है. लेकिन जिन तालुकों का अनुशेष दूर हुआ है, ऐसे 45 तालुकों का समावेश इसमें होना उचित नहीं है, ऐसी मराठवाडा की जनता की भावना है. पूरे राज्य के अनुशेष को भरने के लिए महामहिम राज्यपाल महोदय ने 16.5 हजार करोड़ रुपए का कर्ज लेने के लिए शासन को परमीशन दी है. इसमें से विदर्भ को 6,600 करोड़ रुपए और मराठवाडा को 5,000 करोड़ रॅुपए का निधि उपलब्ध होगा. इस निधि का लाभ मराठवाडा के लोअर पेनगंगा, बेंबला, नांदूर , अप्पर पेनगंगा और लोअर दुधना जैसे अपूर्ण प्रकल्पों के लिए हो सकता है. सब से महत्व की बात यह है कि यह निधि 3 साल में ही खर्च करना है. इसका मतलब यह है कि सरकार को हर साल 5.5 हजार करोड़ रुपए की और जरुरत है. यह निधि कर्ज के तौर पर किस संस्था से लिया जाएगा, यह बात शासन को देखनी है. सिंचन प्रकल्प के लिए इस साल के बजट में केवल 4,500 करोड़ रुपए का प्रावधान है. इसमें से जलविद्युत प्रकल्प के लिए 650 करोड़ रुपए, जागतिक बैंक के जल सुधारणा कार्यक्रम के लिए 700 करोड़ रुपए और राज्यपाल के निकष के अनुसार 3,300 करोड़ रुपए खर्च करने हैं. हमारे जल संपदा मंत्री माननीय अजित पवार कार्यक्षम और बोल्ड डिसीजन लेने के लिए जाने जाते हैं.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते )**

अगर उन्होंने इस बारे में पहल की तो मराठवाड़ा और राज्य के अधूरे प्रकल्प पूरे हो सकते हैं, सिंचाई का अनुशेष कम हो सकता है और इसके चलते राज्य के अलग अलग क्षेत्रों के लोगों का मनोमिलन फिर से हो सकता है. इन प्रकल्पों के लिए धनराशि क्रिएट करने के लिए अभी बहुत पापड़ बेलने हैं. सबसे पहले तो केन्द्रीय नियोजन आयोग की मान्यता लेना जरुरी है. दूसरा, इस कसौटी पर महाराष्ट्र सरकार को खरा उतरना होगा. तीसरा, सरकार को गारंटी लेनी होगी. महाराष्ट्र सरकार पर 1 लाख 40 हजार करोड़ रुपये का कर्ज है. इसके बावजूद केन्द्र में अपनी पूरी पत खर्च करके इन प्रकल्पों के लिए मान्यता हासिल करनी है. इसके लिए महाराष्ट्र सरकार को बहुत समय देने की जरुरत है. साथ ही साथ इस संबंध में बोल्ड निर्णय लेने की जरुरत है. क्योंकि " No risk, No gain ". मराठवाड़ा के हित में जब तब महाराष्ट्र शासन पूरी इच्छा शक्ति नहीं लगाएगा तब तक मराठवाड़ा को न्याय नहीं मिलेगा. मैं एक ही बात कहूंगी,

भँवर से लड़ो, तुन्द लहरों से उलझो
कहां तक चलोगे, किनारे किनारे.

इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूं.

............

इसके बाद श्री रावते का भाषण.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाड्याच्या सिंचनाच्या अनुशेषाची बाब या सदनाच्या वारंवार निदर्शनास आलेली आहे. सन्माननीय वित्त राज्यमंत्री हे अमरावतीचे असताना सुध्दा ते विदर्भ आणि मराठवाड्याच्या व्यथा दूर करु शकत नाहीत, ते ज्या पदावर आहेत त्या पदाला ते न्याय देऊ शकत नाहीत ही त्यांचीच खंत आहे. ही चर्चा अंतिम टप्प्यात असताना सन्माननीय सदस्य प्रा. फौजीया खान यांनी जे भाष्य केले त्यावरुन या चर्चेमध्ये मला भाग घेण्याची आवश्यकता नाही असे वाटले होते. पहिल्यांदा मला असे वाटले की, सन्माननीय मंत्री महोदय श्री. अजितदादा पवार यांचा वाढदिवस असल्यामुळे त्या त्यांच्या विषयी कौतुकाने बोलत आहेत, त्यांना शुभेच्छा देत आहेत. श्री. अजितदादा पवार हे महाराष्ट्रातील मर्द मंत्री आहेत. एकदा घेतलेला निर्णय ते कृतीत आणतात, असे भाष्य सन्माननीय सदस्यांनी केले. त्यामुळे आमचे प्रश्न आता सुटले असे मला वाटले. परंतु नंतर त्यांनी आपले भाषण संपविताना असे म्हटले की, मराठवाड्याचे एवढे सर्व पाण्याचे प्रश्न असताना महाराष्ट्रातील मंत्र्यांनी बोल्ड डिसिजन घेण्याची आवश्यकता आहे, अमुक करण्याची गरज आहे, तमुक करण्याची गरज आहे. एका बाजूला मंत्री महोदय श्री. अजितदादा पवार हे निर्णय घेणारे आणि तो कृतीत आणणारे मंत्री आहेत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले तर दुस-या बाजूला मंत्री महोदयांनी बोल्ड डिसिजन घेण्याची आवश्यकता आहे असे त्यांनी सांगितले. या त्यांच्या वक्तव्यामुळे मी संभ्रमित झालो आणि त्यामुळे मी आता बोलण्यासाठी उभा राहिलो आहे...(अडथळा)...

सभापती महोदय, माननीय राजपालांनी 15 डिसेंबर 2001 रोजी आदेश दिले. अनुशेषाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी लढा उभा केला आणि त्यास दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आणि मंत्रिमहोदयांनी पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून साथ दिली. या त्यांच्या भूमिकेबाबत मी सर्वांना मनापासून धन्यवाद देतो. सन्माननीय मंत्री महोदय प्रा. वसंत पुरकेजी, मी आपणासही धन्यवाद देतो. प्रादेशिक न्यायासाठी आपण सर्वजण एकत्र आलो. मी अमुक आहे तमुक आहे असे न बोलता पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून आपण सर्वजण एकत्र आलो. मी पक्षाच्या नेत्यांना देखील धन्यवाद देतो की त्यांनी कोणावरही शिस्तभंगाची कारवाई केली नाही. हा प्रश्न मुळातच गंभीर आहे. मी माननीय राज्यपालांना देखील धन्यवाद देतो. त्यावेळी श्री.पी.सी. अलेक्झांडर हे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 15:40

(श्री. दिवाकर रावते...)

राज्यपाल होते आणि आताचे माननीय राज्यपाल श्री. एस.एम.कृष्णा हे देखील आम्हाला न्याय देत आहेत. माननीय राज्यपालांनी आदेश देऊन देखील ते आदेश पाळले जात नाहीत हे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांन वारंवार या सभागृहामध्ये सांगावे लागत आहे ही आमची केविलवाणी अवस्था आहे. आमचे म्हणणे एवढेच आहे की, घटनेप्रमाणे सरकारने काम करावे. आमच्या महाराष्ट्रामध्ये विदर्भ आणि मराठवाडा असल्यामुळे त्यांना न्याय देण्याबाबत शासनाने घेतलेले निर्णय अंमलात आणावे एवढीच आमची भूमिका आहे. हे निर्णय अंमलात आणले जात नाहीत ही आमची खरी व्यथा आहे. माननीय राज्यपालांनी सूत्रानुसार निधीचे वाटप करण्याचे निर्देश दिले. सन्माननीय वित्त मंत्री श्री. जयंत पाटील हे अनुशेषाच्या चर्चेमुळे कावून गेले होते. त्यांनी सांगितले, "आपण असे करु की, सर्व अनुशेष दूर करण्यासाठी आपण कर्ज घेऊ आणि अनुशेष दूर करु." मी त्यांना म्हटले की, 50 वर्षामध्ये आम्हाला पाणी मिळू शकले नाही, एका रकमेमध्ये ते आम्हाला मिळत असेल तर आम्हाला आनंदच आहे. मग 16 हजार कोटीचे कर्ज उभारण्याच्या संदर्भात माननीय राज्यपालांनी अनुशेषग्रस्त भागाला न्याय देण्याकरिता त्या कर्जाचे मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र या वैधानिक विकास मंडळांसाठी त्या त्या प्रमाणात वाटप करण्याचे निर्देश दिले. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार हे उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष आहेत. माननीय राज्यपाल महोदयांनी 16 हजार कोटी कर्जाचे वाटप करण्याचे जे निर्देश दिले त्यानुसार

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

मला वाटते की, 8,000 ते 9,000 कोटी रुपये विदर्भाला येतात आणि 4,500 - 5,000 कोटी रुपये मराठवाडयाच्या वाटणीला येतात आणि उर्वरित महाराष्ट्राला 2,900 कोटी रुपये येतात मला एका गोष्टीची खंत वाटली की, संपूर्ण उर्वरित महाराष्ट्राच्या वैधानिक विकास महामंडळाचkk अध्यक्ष या नात्याने आपली जबाबदारी कोकणाचीही आहे आणि आपली जबाबदारी खानदेशाचीही आहे. आपली जबाबदारी पश्चिम महाराष्ट्रामध्ये जे काही दोन चार तालुके दुष्काळी आहेत त्याचीही आहे. पश्चिम महाराष्ट्रातील आमदारांनी ताबडतोब विवक्षित मागणी केली की, कृष्णा खो-यातील विवक्षित मागणी केली की, कृष्णा खे-यातील प्रकल्प पूर्ण करण्याकरिता 7000 कोटी रुपयांच्या निधीची गरज असल्याकारणाने हे कर्ज 16,000 कोटी रुपयांच्या ऐवजी 20,000 रुपयांचे कर्ज महाराष्ट्र राज्याने काढावे आणि तो पैसा कृष्णा खो-याला देण्यात यावा. घटनात्मक प्रत्येक गोष्ट पायदळी तुडवावी आणि आपल्या पोळीवर तुप उडवावे. कृष्णा खोरे पूर्ण झालेच पाहिजे कृष्णा खो-याला पैसे मिळावे, याबाबत आपले दुमत नाही, परंतु पश्चिम महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी या सदनाच्या माध्यमातून मला प्रश्न विचारावयाचा आहे की, आपले सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार हे उर्वरित महाराष्ट्राचे म्हणजे उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष या नात्याने आपल्याकडे जो अभ्यास होतो त्या अभ्यासातून मला हे जाणून घेण्याची इच्छा आहे की, आतापर्यंत पश्चिम महाराष्ट्रामध्ये जे प्रकल्प अत्यंत हिमतीने उभे केलेले आहेत, त्याचे विश्लेषण मी यापुढे करणार आहे. त्यामध्ये आपल्या भागामध्ये असलेले साताऱ्यातील माण किंवा इतर जे तालुके आहेत की जे अवर्षणग्रस्त जिल्हयांचे सर्क्यूलर माझ्याकडे आहे त्यांना न्याय देण्याच्या बाबतीमध्ये वंचित का ठेवले याचे उत्तर त्या तालुक्यातील लोकांनाही दिले जात नाही उर्वरित महाराष्ट्राचे सोडूनच द्या. फक्त कृष्णा खो-याकरिताच निधी वाढवून द्यावा, यासोबत तापी खो-याचेही जे खरोखर काम अपूर्ण राहिलेले काम आहे त्याबाबत जर आपण निधीचे बोलला असता तर मी समजू शकलो असतो की उर्वरित महाराष्ट्राला देखील आपल्याला न्याय द्यावयाचा आहे. ही जी प्रवृत्ती आहे त्या प्रवृत्तीमुळे सिंचनाचा अनुशेष महाराष्ट्रात राहिलेला आहे तसेच,आता आपल्या राज्यांतर्गत देखील वाद निर्माण झालेले आहेत. यापूर्वी पाण्यासाठी आपल्या राज्यामध्ये कधीही वाद उत्पन्न झाले नव्हते. तामिळनाडू, कर्नाटक या राज्यांचा वाद असावयाचा. आज आपल्याकडेही पाण्याचा वाद आंध्र आणि कर्नाटक यांच्याशी "पाणी अडविले नाही म्हणून आम्ही ते घेणार नाही" या मुद्यावरुन

श्री.दिवाकर रावते.......

चालू झालेला आहे, तो फार मोठा मुद्दा आहे. सभापती महोदय, आज या मानसिक प्रवृत्तीतून आणि या निर्ढावलेल्या कृतीतून आणि आपल्याच पोळीवर तुप उडवून घेण्याच्या प्रवृत्तीमधून आमच्या मराठवाडयाच्या आणि विदर्भाची ही जी सिंचनाची वाताहत झालेली आहे त्याविषयी ही चर्चा आहे. सभापती महोदय, विभागवार अनुशेष काढण्याकरिता जी सगळी तयारी झाली त्याचे सर्व या सदनामध्ये इथ्यंभूत खडा अन् खडा मी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी आणि प्रा.बी.टी.देशमुख यांना धन्यवाद देतो की त्यांनी हा लढा ज्या ताकदीने लढला नाही तर असे योध्दे मिळाले नसते कारण त्यांनी पाठपुरावा करुन हा लढा समर्थ केला नसता तर मला वाटते की, आज जो काही अंशत: का होईना पण मराठवाडयाला जो काही न्याय मिळत आहे तो मिळाला नसता अनुशेष हा विषय महाराष्ट्रातील कानाकोप-यात पोहोचला नसता. सभापती महोदय, या अनुशेषाच्या निम्नगंगा,पूर्णा,पैनगंगा,मांजरा,या सर्वांचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.राठोड साहेब आपण या सभागृहामध्ये यापूर्वी उपस्थित केलेल्या सिंचनाच्या अनुशेषाच्या संदर्भातील चर्चेमध्ये आला असेल त्यावेळी मी नव्हतो. खर म्हणजे त्रुटीची खोरी कोणती ? सभापती महोदय, 3,000घनमीटर प्रतिहेक्टर पाण्याची उपलब्धी ही त्रूटीची धरली जाते 1500 घनमीटर प्रतिहेक्टर पाण्याची उपलब्धी ही अती त्रूटीची धरली जाते,3 ते 8 हजार घनमीटर प्रतिहेक्टर पाण्याची उपलब्धी हे सर्वसामान्य क्षेत्र धरले जाते. 8,000ते 15,000घनमीटर प्रतिहेक्टर पाण्याची उपलब्धी हे विपूल पाण्याचे क्षेत्र धरले जाते 12,000 घनमीटर प्रतिहेक्टरच्या वर पाण्याची उपलब्धी ही अतिविपूल धरली जाते आपण यापैकी कोणत्या याच्यामध्ये बसतो ? गोदावरी आणि विदर्भामध्ये त्रुटीचे खोरे दोन्ही जाहीर झालेली आहेत कारण या कोष्टकामध्ये बसणारे हे नाही.

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

19-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) TT-1

SSK/ MAP/ KGS/ 16:20

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, कृष्णा खोऱ्याचा विचार करताना लोअर भीमा,येरळा,सीना या लहान प्रकल्पांचा विचार केला. तुटीचे प्रकल्प म्हणून विचारात घेतले. मराठवाडयातील सिंधण,शिवण,कोंडी यांचा विचार केला नाही. तुमच्याकडील शेंबडे पोर असले तरी ते स्कॉलर आणि आमच्याकडील स्कॉलर पोरग शेंबड अशा प्रकारे तुटीचा विचार केला. केंद्रीय सिंचन आयोगाच्या माध्यमातून जी काही उपलब्धी मिळत असेल ती अतितुटीची खोरी आहेत त्यांना मुद्दाम डावलून ती दाखविली तर त्यामध्ये भागीदार निर्माण होतील आणि पैसा मिळण्याचा थांबेल म्हणून मराठवाडयातील तुटीची न दाखविण्याचा विचार केला. प्रत्येक पावलापावलावर विदर्भ आणि मराठवाडयाला डावलण्याची प्रवृत्ती आहे. दोन्ही भागातील लोक विशाल बाजूने त्याकडे बघतात. त्या भागातील मंडही छोटया छोटया गोष्टींचा विचार करुन पाणी मिळविण्याच्या बाबतीत आपण कसे लायक आहोत आणि बाकी कसे नालायक आहेत यासाठी कागदपत्रे जमा केली जातात. मला नितीनजी गडकरी आणि प्रा.बी.टी.देशमुख यांचा खरोखरच अभिमान वाटतो. त्यांनी सिंचनाच्या विषयावर अभ्यास करुन इतिहास निर्माण केला. माझ्यासारख्या एका कार्यकर्त्याला सिंचन विषय समजला. वैधानिक विकास मंडळाचा अध्यक्ष असताना त्या विषयावर थोडी माहिती होती. परंतु विधिमंडळाच्या माध्यमातून जनलढा कसा उभा करावयाचा हे बीटीभाऊंच्या नेतृत्वाखाली आम्ही शिकलो. यामुळे मराठवाडयातील जनता जागृत झाली. पूर्ण सिंचन क्षमता 13 हजार 500 घनफूट प्रतीहेक्टर आहे. मांजरा,निम्नगोदावरी,पूर्णा तुटीने भरलेले असताना सुध्दा ती अतितुटीचे दाखविणे आवश्यक होते ते दाखविले गेले नाही ही आमची तक्रार आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांना माझी याबाबतीत विनंती आहे. आमचे जे हिसकावून घेतले असेल ते आता तरी द्यावे अशी विनवणी करण्याकरिता मी उभा आहे. प्रादेशिक असमतोलाचा विचार केला तर अर्धा विदर्भ मध्यप्रदेशामध्ये होता. मराठवाडयातील काही भाग निजामाच्या अंमलाखाली होता. स्वातंत्र्यानंतरही तो होता. या दोन्ही भागातील विभिन्नता लक्षात घेऊन न्याय देण्याची नैतिक जबाबदारीच नव्हे तर ते माझे कर्तव्य आहे. मला आठवते की, त्यावेळचे मुख्यमंत्री कै.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र निर्मितीनंतरचे पहिले भाषण साताऱ्यामध्ये केले होते.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

मुख्यमंत्री म्हणून किती दूरदृष्टीचा नेता असू शकतो हे कै.यशवंतराव चव्हाणांच्या त्या एका भाषणावरुन समजू शकते. महात्मा गांधी त्यांच्या नतद्रष्ट मुलाबाबत कसे वागले हे मी ज्या दिवशी वाचले त्या दिवसापासून त्यांची महती कळली. ते आदर्श आहेतच. त्या ठराविक बाबतीत अतिउच्च व्यक्तिमत्व कसे वागते यावरुन त्याचा थोरपणा समजू शकतो. कै.यशवंतराव चव्हाण यांनी त्या भाषणामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांना ठणकावून सांगितले, विदर्भ आणि मराठवाडा महाराष्ट्रामध्ये सामील झाले आहेत. विदर्भ सामील होताना करार झाला. परंतु मराठवाडा महाराष्ट्रात बिनशर्त सामील झालेला आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीमागील ही आपली राज्यकर्ते म्हणून नैतिक जबाबदारी आहे की, त्यांच्या भागामध्ये असलेला मागासलेपणा दूर केला पाहिजे, इतके ते सुंदर भाषण आहे. महाराष्ट्र निर्मितीनंतर मुख्यमंत्री म्हणून कै.यशवंतराव चव्हाणांनी विदर्भ आणि मराठवाड्याकडे पहा असे राज्यकर्त्यांना सांगितले असताना केवळ त्यांचा पुतळा विधानभवनाच्या प्रवेशद्वाराजवळ उभा केला. पण त्यांनी सांगितलेले विचार पायदळी तुडविण्यात आले. विदर्भ आणि मराठवाड्याला सिंचनाबाबत अनुशेषामध्ये ठेवण्यात आले. कृष्णा खोऱ्यातील कृष्णा भिमा स्तरीकरणाच्या संदर्भात बोलत असताना या सदनामध्ये यापूर्वी नद्याजोड प्रकल्पाबाबत चर्चा झाली होती. नद्याजोड प्रकल्पाबाबत माजी केंद्रीय मंत्री श्री.सुरेश प्रभू यांची नियुक्ती झाली. त्यांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी भाषणे केली. हा प्रकल्प किती चांगला आहे याबाबत श्री.शरद पवार यांची दूरदृष्टी कामी आली. त्यांनी सांगितले की, नद्याजोड प्रकल्पामध्ये संपूर्ण भारतामध्ये आसेतू हिमाचल सगळीकडे नद्या जोडता येतात. फक्त महाराष्ट्राला त्याचा लाभ मिळत नाही. म्हणून त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राचा देशामध्ये भूभाग हा 10 टक्के आहे. त्यामुळे नद्याजोड प्रकल्पाची जेवढी किंमत आहे त्याच्या 10 टक्के निधी महाराष्ट्राला मिळावा. आम्ही आमचे आंतर नदी जोड प्रकल्प करु आणि महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम करु. त्याप्रमाणे सदनामध्ये घोषणा करण्यात आली. काय करणार हे सांगितले गेले. एक कार्यशाळा घेण्यात आली. महाराष्ट्रातील नद्याजोड प्रकल्प कसा करणार या संदर्भात ठराविक सदस्यांना पुस्तिका देण्यात आली. ही पुस्तिका आम्हाला का नाही? आम्हाला ती पुस्तिका देणार परंतु मागितल्यानंतर. कोकणामध्ये पडणारे पावसाचे अतिरिक्त पाणी इकडे आणायचे आणि इकडचे पाणी तिकडे न्यायचे. यासाठी 57 हजार कोटी नद्याजोड प्रकल्पांतर्गत केंद्र सरकारने महाराष्ट्राला

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

पाण्यासाठी द्यावेत ही संकल्पना चांगली आहे. हा फॉर्म्युला श्री.शरद पवार साहेबांनी सांगितला आहे. मला खूप आनंद झाला. परंतु शासनाने काय केले? केंद्रात नद्याजोड प्रकल्प बासनात गुंडाळला गेला आहे. महाराष्ट्रात मात्र कल्पना अंकुरली. कृष्णा भिमा स्तरीकरण प्रकल्प पश्चिम महाराष्ट्रात सुरु झाला. सिंचन राज्यमंत्री म्हणून आपल्याला कल्पना असेल. नद्याजोड प्रकल्पांतर्गत कृष्णा भिमा स्तरीकरणामुळे कोल्हापूरहून टनेलद्वारे पाणी यायला सुरु होणार आहे. त्याकरिता टनेल बांधले जाणार आहे. ते पाणी कुठे येणार? ते पाणी येणार बारामतीमध्ये. आज ज्या भागामध्ये प्रचंड कारखानदारी आहे..........

(नंतर श्री.अे.शिगम....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते............

त्या भागामध्ये पाणी येणार आहे, माझ्याकडे सर्व नद्यांचे डिटेल्स आहेत. हे पाणी टनेल मधून 80 कि.मी.वेगाने वाहून नेणार आहे. मराठवाडा व विदर्भातील गाडीसुध्दा इतक्या गतीने धावत नाही.

सभापती महोदय, कृष्णा-भीमा स्थैयीकरण प्रकल्प 112 अब्ज घनफूटाचा आहे. कोल्हापूर-सांगली भागातून कोयना, वारणाचे पाणी उजनी धरणात सोडणार आहेत. मी हा उल्लेख कशासाठी केला ते सांगतो. ते काय करतात याला आमची पोटदुखी नाही. पण या प्रकल्पासाठी 12 हजार कोटी रुपये लागणार आहेत. कृष्णा-खोरेचे काम शिवसेना-भाजपने सुरु केले आणि आपणास पाण्यापासून वंचित केलेले आहे अशाप्रकारचा प्रचार निवडणूक जिंकण्यासाठी विदर्भ आणि मराठवाड्यात करण्यात आला. या प्रकल्पासाठी 12 हजार कोटी रुपये लागणार आहेत आणि हे सर्व पाणी उजनी धरणात आणून सोडणार आहे. त्यामुळे या भागात बारमाही पाणी मिळणार आहे. तेव्हा तेथे आणखी 100 साखर कारखाने उभे राहतील. हे काय चालले आहे ?

सभापती महोदय, मी या सदनामध्ये एक लक्षवेधी सूचना मांडली होती. तसेच एका प्रश्नाद्वारे कृष्णा खो-यातून मराठवाड्याला 10 टक्के पाणी द्यावे असा प्रश्न उपस्थित केला होता. संपूर्ण महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्याचे क्षेत्र 10 टक्के आहे तेव्हा आम्हाला 10 टक्के पाणी द्यावे अशी मागणी केली होती. हे सर्व रेकॉर्डवर आहे. श्री.अजित पवार एक कणखर नेते आहेत. महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे यात दुमत नाही. परंतु मराठवाडा आणि विदर्भाच्या छाताडावर कोणी नाचत असेल तर ते आम्ही कधीच सहन करणार नाही. मराठवाड्याला 21 टीएमसी पाणी देण्याकरिता एक मिटींग झाली होती. त्यावेळी डॉ.सुनील देशमुख या खात्याचे मंत्री नव्हते. त्या बैठकीत मराठवाड्याला 21 टीएमसी पाणी देण्याचा निर्णय झाला. परंतु त्यावेळी मंत्रिमहोदय श्री.अजित पवार यांनी सांगितले की, " हे पाणी देता येणार नाही" हे सर्व रेकॉर्डवर आहे. आपले कर्तृत्व मराठवाडा आणि विदर्भातील नंदनवन करीत असेल तर तेथील जनता आपणास डोक्यावर घेईल, आम्ही आपणास डोक्यावर घेऊ. परंतु जर उद्दामपणा करीत असतील तर डोक्यावरुन खाली ठेवण्यास कमी करणार नाही. शेवटी हे सर्व जनतेच्या फायद्याकरिता करीत आहे. जनतेच्या हिताकरिता राज्य चालवावयाचे असते. आता श्री.अजित पवार यांनी सांगितले आहे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते............

की, कृष्णा-भीमा स्थैयीकरण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मराठवाड्याला 21 टीएमसी पाणी देणार आहोत. सुरुवातीला "देणार नाही" असे सांगितले नंतर "देतो" असे म्हणाले ही कोणती प्रथा आहे ?

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

ते कधी मिळेल, याची आम्हाला माहिती नाही. तो प्रकल्प केव्हा पूर्ण केव्हा होणार व उजनी धरणामध्ये केव्हा पाणी येणार व ते आम्हाला कधी मिळणार, हे आम्हाला कळू शकत नाही. कृष्णा-भीमा उर्ध्वीकरणाचा हा अशाप्रकारे आचरटपणा आपण निर्माण केलेला आहे. केंद्र सरकारचा नद्या जोड प्रकल्प रद्द झाला असेल, परंतु हा 12 हजार कोटी रुपयांचा प्रकल्प आपण पश्चिम महाराष्ट्राकडे का राबवित आहात ? याचे उत्तर मिळाले पाहिजे. अशाप्रकारचा प्रकल्प आपण राबवित असाल तर आनंदच आहे, परंतु आमच्या मराठवाडयाचा हक्क आपण डावलू नका. आम्हाला कायद्याप्रमाणे व माननीय शरद पवार यांनी सांगितल्याप्रमाणे, 59 टीएमसी पाणी मिळावयास पाहिजे. परंतु आपण म्हणता की, 21 टीएमसीच पाणी मिळेल. परंतु ते तरी ताबडतोबीने द्या. ते आपण का देत नाहीत ? आज मराठवाडयाच्या बीड जिल्हयातील आष्टी, पाटोदा हे तालुके पूर्णपणे सुकलेले आहेत, त्याठिकाणी पाण्याचा थेंब नाही, लातूरपर्यंत पाणी नाही. लातूर शहराला 2-3 महिने पाणी नसते, आज तेथील मांजरा धरण पूर्णपणे सुकले असून त्याठिकाणी पाण्याचा थेंब नाही. एवढेही देण्याची आपली दानत नसेल तर हा आमच्यासमोरील मोठा प्रश्न आहे. कृष्णा-भीमा उर्ध्वीकरणातून आमची झालेली गळचेपी मांडण्याकरिता मी त्याचा उल्लेख केला. नालपार दमनगंगा खो-यातील पाणी मराठवाडयाला उपलब्ध करुन देण्याबाबत दि.31 जानेवारी, 2000 च्या बैठकीमध्ये नालपार दमनगंगा खोऱ्यातील पाणी पूर्वेकडे वळवून मराठवाडयात पाण्याची उपलब्धता वाढविण्याचे सर्व्हेक्षण करुन घ्यावयाच्या शक्यतेचा अहवाल तयार करण्यात येईल, असे शब्द शासनाने मराठवाडयाला दिले होते. परंतु याबाबतीत 5 वर्षाचा कालावधी लोटल्यानंतरही अंमलबजावणी होत नाही, हे योग्य आहे का ? ज्याप्रमाणे हिंदुस्तान-पाकिस्तान चर्चेतून काही निष्पन्न होत नाही, त्याचप्रमाणे मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्राचे झालेले आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी थोडेसे थांबवतो. सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी आणखी किती वेळ लागणार आहे ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, भरपूर वेळ लागणार आहे. गेल्या 10-12 अधिवेशनानंतर मराठवाडयाचा हा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी मांडलेला आहे. त्यांना प्रथम मी धन्यवाद देतो. याविषयी आम्हाला बोलू द्यावे व आम्हाला आमची व्यथा मांडू द्यावी.

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, आपण 100 कारखाने काढावेत, कृष्णा-भीमा उर्ध्वीकरणातून उजनीत पाणी येतेय आणि आम्ही मात्र पाण्यासाठी तडफडत आहोत, अशी परिस्थिती आहे. सभापती महोदय, यासंदर्भात 5 वर्षे झाली तरी बैठक झालेली नाही. यासंबंधी कार्यालयात चौकशी केल्यानंतर आम्हाला अशी माहिती मिळाली की, 95 च्या जून्या संदर्भात नाशिकच्या मुख्य अभियंत्यांनी ते पाणी नाशिक जिल्हयाला वापरण्याचा प्रस्ताव तयार करुन तो शासनाकडे पाठविला आणि आमच्या तोंडाला पान पुसली.  माननीय राज्यमंत्री महोदयांनी हे तपासून पहावे.  हे आपल्याला नाकारता येणारच नाही.  ठोस माहितीच्या आधारे मी याठिकाणी बोलत आहे.  गोदावरीमध्ये पूर्णा-मांजरा स्थैरीकरण प्रकल्प राबवा. पूर्ण मराठवाडा पाणी तुटीच्या क्षेत्रात येत असल्यामुळे पाण्याची उपलब्धी 1 हजार 510 घन मीटर प्रति हेक्टरी आहे. त्यामानाने मराठवाडयात किमान आवश्यक ते फक्त निम्मेच पाणी आम्हाला उपलब्ध होत आहे, ही आजच्या घडीची परिस्थिती आहे.  आमच्या शंकरराव चव्हाणांना मी भागिरथ पुत्र म्हणतो.  त्यांनी याबाबतीत इच्छाबळ दाखविले आणि पैठणचे जायकवाडी मराठवाडयात आले.  जायकवाडीचे दोन भाग आहेत. गोदावरीच्या वरच्या पाण्याची उपलब्धी जायकवाडीकरिता आणि गोदावरीच्या खालच्या पाण्याची उपलब्धी मराठवाडयाकरिता. पैठणकरिता उपलब्ध असलेले 116 अब्ज घनफुट पाणी  आम्हाला मिळावयास पाहिजे होते,

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

पण वरच्या लोकांनी म्हणजे पश्चिम महाराष्ट्रातील लोकांनी, नाशिक आणि नगर येथील लोकांनी दंडेली करुन, दादागिरी करुन सगळे पाणी अडवून टाकले. किती धरणे बांधली छोटी-मोठी? 7800 धरणे बांधण्यात आली. कोणी दिला हो तुम्हाला अधिकार ? एकदा आमच्या मराठवाडयाच्या पैठणकरता 116 अब्ज घनफुट पाणी देण्याचे मान्य केल्यानंतर किमान ते पाणी आम्हाला मिळेल आणि उर्वरित पाणी आमच्याकडे राहिल, हे ठरल्यानंतर हे पूर्णच्या पूर्ण पाणी अडेल अशा प्रकारची 7800 धरणे बांधली. पाहिजे तर तुम्ही नाकारा. मला हक्कभंग तरी आणता येईल, माझ्याकडे मी सर्व रेकॉर्ड जमा करुन ठेवले आहे. वरचे पाणी अडविल्यामुळे आज ख-या अर्थाने केवळ अतिवृष्टी होते म्हणून नाही तर जायकवाडीमध्ये शून्य पाणी राहिले, हे मी अधिकृतरित्या सांगतो. त्या ठिकाणी 2.78 लक्ष हेक्टरच्या लाभक्षेत्राचे वाळवंट होईल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मी त्यावेळी सभागृहात नव्हतो, कॅनॉल दुरुस्तीची परिस्थिती मी सगळी पाहिली आहे. त्यावर भाष्य करण्यासाठी 2/3 तास देखील पुरणार नाहीत, अशी मराठवाडयाच्या कॅनॉलची परिस्थिती आहे. उर्ध्वकृष्णा खो-यातील मांजरा खो-यात 38 अब्ज घनफुट पाणी उपलब्ध आहे. वैनगंगा खो-यातील पूर्णा खो-यात 60 अब्ज घनफुट पाणी उपलब्ध आहे आणि उत्तर कोकणातून जायकवाडी मध्ये निम्न गोदावरीमध्ये 100 अब्ज घनफुट पाणी वळवावे अशा प्रकारची संकल्पना असतांना त्यासाठी आपण काही करु शकत नाही, ही आमची व्यथा आहे. विष्णुपुरीबाबत आपण या ठिकाणी आपण खूप वेळा बोललो आहोत. या प्रकल्पाचा तिसरा टप्पा रद्द केला गेला, 100 कोटी रुपयांचे पाईप तेथे येऊन पडले आहेत, त्याचे काय करणार आहात, कोणाला माहिती. ते काही मोडता येत नाहीत, तोडता येत नाहीत, ते तिथेच पडले आहेत. मुंबईत असते तर झोपडपट्टीतील लोकांना रहाण्यासाठी उपयोग तरी झाला असता, ते पण नाही, ते तसेच पडलेले आहेत. त्याचे काय करणार, याचे उत्तरही देत नाही. किमान तो टप्पा तरी चालू करा, तेही करीत नाही. सभापती महोदय, आमच्या सदस्यांकडून मराठवाडयाची जी व्यथा मांडली गेली ती अतिशय महत्वाची आहे. मराठवाडयामध्ये सन 2000 पासून अपूर्ण अवस्थेत असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाची किंमत 17 कोटी झाली होती. वेळेवर पैसे दिले नाही म्हणून सन 2005 मध्ये या प्रकल्पांचा अनुशेष 2975 कोटी रुपयांवर गेला. मंत्रीमंडळाने घेतलेल्या

..2........

श्री.दिवाकर रावते..........

निर्णयाप्रमाणे 300 कोटी रुपये प्रतिवर्षी मिळाले असते तर हे प्रकल्प पूर्णावस्थेत जाण्यास मदत झाली असती. हा अनुशेष वाढत जाऊन तो 2534 कोटी रुपयांवर आला आहे. एकंदरीत 30 वर्षांपासून रखडलेले पाटबंधारे प्रकल्प दोन आहेत व त्याची किंमत 751 कोटी रुपये झाली आहे. 20 ते 30 वर्षांहून अधिक काळ रेंगाळलेले प्रकल्प 11 आहेत व त्याची किंमत 1171 कोटी रुपये झाली आहे. 10 ते 20 वर्षामधील रेंगाळलेले प्रकल्प 11 आहेत व त्यांची किंमकत 612 कोटी रुपये झाली आहे आणि हा एकंदरीत राहिलेल्या कामांचा अनुशेष 2534 कोटी रुपयांवर पोहोचला आहे. पुढची कामे तर वेगळीच आहेत. या सर्व प्रकारामुळे मराठवाडयाची सतत आणि सातत्याने होणारी अवहेलना या निमित्ताने मांडत असतांना बाभळी प्रकरण उभे राहिले. काय आहे हे बाभळी प्रकरण ? एवढे मोठे भांडण झाले, शासनाच्या संबंधित खात्याने वर्तमानपत्रातून आपली बाजू मांडणे आवश्यक होते. मंत्र्यांची थोडी बदनामी झाली तर लाखो रुपयांच्या जाहिराती वर्तमानपत्रात देऊन खुलासा करण्यात येतो, तो करणे आवश्यक आहे, त्याबद्दल माझी तक्रार नाही. कर्नाटक आणि मराठवाडयाचा बाभळी प्रकल्प.....मी शब्दयोजना कशी करतो आहे ते बघा....कर्नाटक आणि मराठवाडयाचा बाभळी प्रकल्प....समोर कर्नाटक सरकारने धरण बांधले आहे ते 115 टी.एम.सी.चे आहे. बाभळी प्रकल्पाचा बंधारा 2.75 टी.एम.सी.चा आहे व तो सात किलोमीटर आतमध्ये आहे, बॅकवॉटरमध्ये आहे. पण चंद्राबाबू नायडू यांनी असे काही वातावरण तयार केले की, जणू संपूर्ण आंध्र प्रदेश ओस पडणार आहे. लाखोंचे मोर्चे काढले गेले, का ? तर आम्ही आमच्या पाण्यावर हक्क असलेल्या पावणेतीन टी.एम.सी. पाण्यासाठी बंधारा बांधतो आहोत म्हणून.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ........

काय गुन्हा केला होता ? हे लोकांपर्यंत यावयास पाहिजे होते. टी.व्ही.च्या माध्यमातून निदर्शने दाखववायास पाहिजे होती. परंतु आमच्या मराठवाडयातील जनता सुध्दा कशी झोपलेली आहे ? बाभळी बंधा-याचे 2.75 टी.एम.सी.पाणी हा संपूर्ण आंध्र प्रदेशचा विषय झाला आणि 2.75 टी.एम.सी पाणी हा मराठवाडयातील एका तालुक्याचा सुध्दा विषय झाला नाही. संपूर्ण मराठवाडयाचा विषय होण्याचे तर सोडूनच द्या. पाणी वाटपाच्या विषयात आपण का भांडत आहोत, हे मला कळत नाही. मी त्यादृष्टीने प्रयत्न करीत होतो. परंतु नंतर असे म्हटले की, कोर्टाचा निर्णय आपल्या बाजूने लागलेला आहे त्यामुळे पाणी प्रश्न पेटविण्यात काही अर्थ नाही. म्हणून मी माघार घेतली. या विषयावर मी संपूर्ण मराठवाडा उठविण्याचे ठरविले होते. मी ही व्यथा मांडत असतांना अधिका-यांनी निर्माण केलेली वंचितता मांडतो. जायकवाडी धरणाच्या खालच्या गोदावरी क्षेत्रातील उपलब्ध पाण्याची मराठवाडयाची सिंचन क्षमता 85 टक्के आहे आणि आंध्र प्रदेशची उपलब्ध सिंचन क्षमता 15 टक्के आहे. मला माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर पाहीजे की, पाण्याचे वाटप काय आहे ? जायकवाडी धरणाच्या खालच्या गोदावरी क्षेत्रातील आमचे वाटप किती आणि मराठवाडयाचे वाटप किती याबाबत आम्हाला मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात माहिती द्यावी. 15 टक्क्याला सुध्दा समसमान वाटप ? आम्हाला जेवढे पाणी पैठणच्या खाली नांदेडपर्यंत मिळणार आहे, किमान थोडेसे कमी असेल परंतु तेवढेच 15 टक्के पाणी आमच्या भागासाठी आले पाहिजे. मुळात केंद्रीय सिंचन आयोगाने आंध्र प्रदेशला झुकते माप दिलेच कसे, कोठे कमी पडलो आम्ही, का मिळविले नाही आपल्या हक्काचे सिंचन ? सिंचन क्षमतेच्या उपलब्धतेप्रमाणे आम्हाला 80 टक्के टी.एम.सी. पाणी मिळाले पाहिजे. ते का मिळत नाही ? आपण त्यावेळी का भांडलो नाही. आता ते पाणी आपल्याला मिळणार नाही. शासन लेंडी प्रकल्प पूर्ण करीत नाही. ते पाणी वाहून जात आहे. मला एक कळत नाही की, व्यवहार कसा असावा. 2.75 टी.एम.सी. पाणी मिळविण्यासाठी चंद्रबाबू नायडू संपूर्ण आंध्र प्रदेश उभा करु शकतो. या विषयावर सभागृहामध्ये चर्चा झाली होती. आपल्याला लेंडी प्रकल्पातील ठराविक कोटा कॅनॉलने त्यांना द्यावयाचा आहे. बाकी पाणी आपल्याला मिळणार आहे. लेंडी प्रकल्पामुळे तीन तालुक्यातील एक लाख हेक्टर जमीन ओलीताखाली येणार आहे. संपूर्ण प्रकल्प आपण उभा करणार आणि त्यांनी फक्त 10 कोटी रुपये द्यायचे. का ? तर त्यांना कॅनॉलने पाणी द्यावयाचे आहे म्हणून. मी त्यावेळी अशी सूचना केली होती की, लेंडी प्रकल्पाचा संपूर्ण खर्च

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

महाराष्ट्र शासनानेच करावा आणि हे धरण पूर्ण करावे. त्यामुळे जास्तीत जास्त क्षेत्र ओलीताखाली येईल आणि ते ज्यावेळी पैसे देतील त्यावेळी आपण त्यांना पाणी देऊ. आता माननीय मंत्री महोदय उत्तामध्ये सांगतील की, आमचे ॲग्रीमेंट झालेले आहे. पण ॲग्रीमेंट कधी झाले, किती वर्षाने झाले, का एवढा उशीर झाला, त्यामुळे प्रकल्पाची किंमत किती वाढली आणि कोणामुळे वाढली ? नियोजन आणि नियंत्रण हा विषय शासनाचा असला पाहिजे. अधिका-यांकडून आणि आय.ए.एस. अधिका-यांकडून आमदारांची कामे अडविण्यामध्ये जेवढी बुद्धिमत्ता वापरली जाते तेवढी बुद्धिमत्ता या कामामध्ये वापरली जात नाही.

सभापती महोदय, लता मंगेशकर यांनी आमचा पूल अडविला. तो विषय वेगळा आहे. त्यांनी पूल अडविला त्या दिवसापासून पुलाची जी किंमत वाढली असेल ती त्यांच्याकडून वसूल केली पाहिजे, या मताचा मी आहे. कारण आता तो पूल होणारच आहे.

सभापती महोदय, आमचा परभणीचा लोअर लुधना हा 23.50 कोटीचा मूळ प्रकल्प होता. तो आता 75 कोटीवर गेला. मी वैधानिक विकास मंडळाचा अध्यक्ष असतांना त्या प्रकल्पाची अंदाजे किंमत 232 का 233 कोटी रुपये होती आता 450 कोटी रुपयाच्यावर गेली. योग असा आहे की, हे दोन्ही प्रकल्प ज्या ठेकेदाराकडे आहेत ते ठेकेदार पुरवठा मंत्री आहेत. दोष त्यांचा नाही, मी त्यांना दोष देणार नाही. पण एवढे दुर्लक्ष का ? 23 कोटीचा प्रकल्प 400 कोटीचा होईपर्यंत कामच करावयाचे नाही ?

यानंतर श्री.गागरे ........

अप्रसुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

जालना, परभणी व जवळपासच्या परिसरातील हजारो एकर जमीन ओलिताखाली येणार आहे, परंतु हे करण्याकरिता इच्छाशक्ती व निधीची आवश्यकता आहे. मराठवाडा आणि विदर्भ कसा सुधारेल हे पाहिले पाहिजे. त्याकरिता येथील प्रकल्प पूर्ण होणे गरजेचे आहे. त्यानंतर पर कॅपिटा इनकम राज्याच्या किमान उत्पन्नाच्या जवळपास येईल. शेतकरी कोठून पैसे आणणार आहेत ? शेतकरी आत्महत्या करतील नाही तर काय करतील ? ही सर्व दुरावस्था आहे. मी वेळोवेळी याचा उल्लेख केलेला आहे. काही बाबी करणे कठीण असते परंतु तरीसुध्दा काही करता येत का ते बघा ? पाणी आहे परंतु फक्त ते आणण्याची इच्छाशक्ती पाहिजे. तापी खोऱ्यात 11 टी.एम.सी. पाणी असून 4 टी.एम.सी. पाणी आणवयाचे राहिले आहे. हे पाणी तुम्ही का आणीत नाही ? पाणी विपूल प्रमाणात आहे, सर्व व्यवस्था आहे, परंतु काम होत नाही. कृष्णा खोऱ्यापेक्षा तापी खोऱ्यात जास्त पाणी आहे, परंतु ते देत नाही. किती टिंगळटवाळी चालवली आहे ते पहा. श्री.ना.धो.महानोरांच्या पळसखेडे या गावी जाऊन पाहिले तर समोर तापी खोऱ्याचा कॅनॉल जाताना दिसेल. परंतु अलिकडे मराठवाडयात त्याचे पाणी मिळत नाही. तिकडे पाणी असून संभाजीनगर जिल्हयातील एका तालुक्याला पाणी मिळत नाही. याचे कारण असे सांगितले जाते की, तेथून जवळच अजिंठा लेण्या आहेत. अजिंठा लेणी परिसरात पाणी जमा झाले तर जास्त सूर्यप्रकाश पडेल व त्यामुळे अजिंठयाची सर्व चित्रे खराब होतील असे कोणातरी पर्यावरणवाद्याला वाटले म्हणून तेथे पाण्याचा साठा करावयाचा नाही असे ठरविण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य श्रीमती सुधा जोशी यांना मी सांगू इच्छितो की, हया डोळयात पाणी आणणाऱ्या गोष्टी आहेत. तेथे मी टँकरने पाणी आणून टाकले आहे, टँकरने पाणी आणण्यापूर्वी माझ्यासमोर मोर मरत होते. याचा अर्थ असा आहे की, अजिंठा लेणी परिसरातील पक्ष्यांनासुध्दा पाणी मिळू द्यायचे नाही. असा विचार केला तर तापी खोऱ्याचे पाणी मराठवाडयात कसे येणार ?. त्या तालुक्याचे काय होणार ? सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी त्यांच्या भाषणात व्यथा मांडलेल्या आहेत. एक-एक विचित्र कथा सांगण्यासारख्या आहेत. कृष्णा खोऱ्याचा पाणीसाठा 599 अब्ज घन मीटर असून गोदावरीचा 1318 आहे. पाणीवाटप कसे झाले आहे, हे मी सांगितले आहे. पाणी वाटपसंदर्भात योग्य भूमिका मांडली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते.....

पाहिजे. शासन कोठे तोटयात आहे का ? कृष्णा खोऱ्यामध्ये 1001 अब्ज घन मीटर पाण्यापैकी 591 मिळाले आहे. गोदावरीला 1318 पैकी 1089 मिळाले आहे. तापी खोऱ्याला 446 पैकी 191 मिळाले आहे, तसेच नर्मदेचे 11 पूर्ण मिळाले आहे. कोकणात 2070 घन मीटर पाणी असून ते पूर्णपणे समुद्रामध्ये वाहून जाते. त्याबद्दल आपण काही शकत नाही. एकूण 4647 अब्ज घन मीटर पाणी आपल्याला उपलब्ध आहे. 3960 आपल्या वाटयाला आले आहे. फक्त 1791 घन मीटर पाण्याचे नियोजन आपण केले आहे, अजूनही 2069 घन मीटर पाणी महाराष्ट्रात उपलब्ध आहे, ते आम्ही वापरु शकतो. परंतु नियोजन केले जात नाही. याबाबत मी सूचना करु इच्छितो की, विविध जिल्हयात किंवा राज्यांना विधिमंडळाच्या विविध समित्या भेट देत असतात. विधिमंडळ सदस्यांची एक समितीची सिंचनाचा अभ्यास करण्यासाठी आंध्रप्रदेशमध्ये पाठविण्यात यावी. आंध्रप्रदेशमध्ये आपण पाहिले तर त्यांनी सिंचनाला प्रायोरिटी दिलेली आहे. त्यांच्या अर्थसंकल्पात सिंचनासाठी मोठी तरतूद केली जाते व ती वापरली जाते. बाकी सर्व मातीत गेले तरी चालेल परंतु उपलब्ध असलेले पाणी आपल्या ताब्यात आहे काय, हे तेथे पाहिले जाते. त्यामुळे प्रथम पाणी उपलब्ध करुन दिले पाहिजे, आपल्या ताब्यातील पाणी सोडता कामा नये. 2000 अब्ज घन मीटरपेक्षा जास्त पाणी आपल्याकडे उपलब्ध असताना आपण योग्य नियोजन केले पाहिजे. अधिकारी काय करीत आहेत ?, 30-35 वर्षे गेले आहेत, पिढयानपिढया गेल्या, ते रिटायर झाले आहेत. नवीन पिढी आली तरी अजून कशाचा थांगपत्ता लागत नाही. मराठवाडयातील सिंचनाबाबत एका कार्यालयास मी भेट दिली असता पाहिले की, तेथील कर्मचारी उदबत्त्या लावून बसतात. त्या कर्मचाऱ्यांना मस्टर उघडे आहे व काम काही नाही. सभापती महोदय 1981 चे पाणी वाटपाचे जे नियोजन झाले होते त्यानुसार आपल्याला पाणी उपलब्ध झाले आहे का ? झाले असेल तर हे पाणी अडविले आहे का ? कृष्णेचे 781 घन मीटर, गोदावरीचे 786, तापीचे 150, नर्मदेचे 101, कोकणचे 163 घन मीटर या पाण्याचे आपण नियोजन केले आहे का ? केले असेल तर याचे उत्तर द्या. गोदावरीच्या पाण्यापैकी 1089 घन मीटर पाणी आपल्या वाटयाला आल्याचे सांगितले आहे. लागवडीखालील क्षेत्राचा विचार केला तर मराठवाडयात 46 टक्के, विदर्भात 42 टक्के व, उत्तर महाराष्ट्रात 12 टक्के आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

अधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

विदर्भाचे 42 टक्के, उत्तर महाराष्ट्राचे 12 टक्के आहे आणि मग 490 टीएमसी पाणी मराठवाड्याला आले पाहिजे पण नियोजन मात्र 315 टीएमसीचे केलेले आहे. 175 टीएमसीचे नियोजन केलेलेच नाही. वैनगंगेचे पाणी गृहीत धरून हे सगळे पाणी आहे. मला हे कळत नाही की, कृष्णा खोऱ्याच्या अंतर्गत येणाऱ्या पाण्याच्या नियोजनाचा भाग आणि प्रकल्पांची आखणी ही आहे त्यापेक्षाही 40 टक्के जास्त केलेली आहे, मात्र विदर्भ-मराठवाड्यामध्ये ती कमी आहे. खात्यामार्फत हा दुजाभाव का निर्माण केला जातो ? हा प्रश्न जेव्हा उभा राहतो त्यावेळेस फारच दुर्दैवी परिस्थितीमध्ये आपण सापडलो आहोत याची जाणीव होते.

( वेळ संपल्याची घंटी वाजविण्यात येते. )

सभापती महोदय, मी अधिक डिटेलमध्ये जाणार नाही, कारण त्यात खूप वेळ जाईल. मला एक शेवटचा महत्त्वाचा मुद्दा येथे मांडावयाचा आहे तो मांडून मी भाषण संपविणार आहे. सभापती महोदय, छत्तीसगड म्हणून जे नवीन राज्य झाले आहे, जे आपल्या वरच्या बाजूला आहे, त्याचे पाणी पैनगंगेच्या माध्यमातून आपल्याकडून जाते. चंद्रपूर, गडचिरोली भागातून ते पाणी खाली आंध्र प्रदेशमध्ये जाते. त्यांचे उपलब्ध पाणी 250 घनमीटर आहे ते सारे ते 100 वर्षे वापरू शकतील असे वाटत नाही. तेव्हा आपण तेथे धरण बांधले, ते पाणी अडवले तर वर्धा, यवतमाळ, अमरावती, बुलढाणा यांना आपण 150 घनमीटर पाणी आपण देऊ शकतो. 80 घनमीटर पाणी आपण गोदावरूनमध्ये आणून टाकू शकतो आणि त्यातील पाणी तापी खोऱ्यात जाऊ शकते. कोठलेही धरण बांधले तरी त्याचे आयुष्य 80-90 वर्षे असते. ते अडवे पर्यंत आपल्याला हे पाणी उपलब्ध होईल. नाही तरी ते पाणी वाहून चालले आहे. तेव्हा हा प्रकल्प राबविण्याच्या संदर्भात आपण काही करू शकलात तर विदर्भ-मराठवाड्याचा हा जो आमचा तुटीचा भाग आहे, बुलढाण्यासारखा अति तुटीचा भाग आहे. अर्थात सर्वात जास्त सिंचनाचा अनुशेष अमरावती, प्रॉपर अमरावती जिल्ह्यात आहे आणि वर्धा यवतमाळ हे सगळे जिल्हे त्या विभागात येत असल्याने हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प होतो आणि तो राबविता येणे आपल्याला शक्य आहे. कृष्णा खोऱ्यासाठी नाही तरी आपण आजवर कोट्यवधी रूपये खर्च केलेले आहेत, वाटल्यास आणखी काही हजार कोटी तेथे खर्च करा. पण असा एक प्रकल्प राबवून, उर्वरित अनुशेष भरून काढण्याची क्षमता असलेले हे पाणी आपण उपलब्ध करून द्या. जरूर ते पाणी आपले नाही, पण ते 100 वर्षे तरी आपल्याकडे राहू

...... 3ए 2 ...

श्री. रावते ......

शकते आणि नाही तरी ते तसेच आज वाहून चालले आहे. तेव्हा अशा प्रकारे नियोजनबद्ध काम करा अशी माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, ही चर्चा मागील अधिवेशनापासून सुरू आहे आणि बऱ्याच काळानंतर का होईना प्रथमत:च मराठवाड्याच्या पाण्यासंबंधात चर्चा या सभागृहामध्ये चालू आहे. एकंदरीत पुढील चर्चा लक्षात घेऊन मी माझे भाषण आवरते घेतो, अन्यथा खूप डिटेलमध्ये तास-दोन तास मी यावर बोलणार होतो. परंतु आमचे सिंचन राज्यमंत्री समजूतदार आहेत, जाणीव असलेले आहेत. शिवाय माननीय नामदार प्रा. पुरके साहेबांच्या नेतृत्त्वाखाली आपण हे सभागृह चालवितो आहोत, तसे पाहिले तर तेही त्यांच्या भागातील वंचित आहेत. सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्राला काही मिळू नये असे आमचे म्हणणे नाही. सन्माननीय श्री. अजितदादांचा वाढदिवस होता. संपूर्ण महाराष्ट्राचे नेतृत्त्व तुम्ही करावे अशी तुमची क्षमता आहे आणि आपण ती सिद्ध देखील केलेली आहे. थोडेसे ते माझ्यासारखेच कडवट आहेत. आमच्यासारखी कडवट माणसे सर्वांनाच आवडतात असे नाही. परंतु आम्हाला काय मिळवायचे आहे यापेक्षाही आम्ही आज या क्षेत्रामध्ये आहोत ते प्रमाणिकपणे जनतेचे हित साध्य करण्यासाठी. आणि त्यासाठीच काम करावयाचे असेल तर करायचे अन्यथा घरी बसावे या मताचा मी आहे. थोडक्यात सांगावयाचे तर कार्याशी बेईमानी असता कामा नये. म्हणूनच माझी नामदार अजितदादा पवार यांना नम्र विनंती आहे की, आता तुम्ही महाराष्ट्राचे नेतृत्त्व करीत असताना सिंचनाचे महत्त्व लक्षात घेऊन, तुमचा स्वभाव तसा रोखठोक आहे, वित्त खात्याने थोडे वाकडे पाऊल टाकले होते तेव्हा तुम्ही त्यांना तेथल्या तेथे सुनावले होते हे आम्ही माननीय सभापतींच्याकडे झालेल्या बैठकीमध्ये पाहिलेले आहे. तुमचा हाच स्वभाव आम्हाला आवडतो. आज मराठवाडा-विदर्भाला न्याय द्यावयाचा असेल तर तेवढी क्षमता निश्चितपणे त्यांच्यात आहे. शेवटी आहे त्या राज्यकर्त्यांकडे जनतेला कटोरा घेऊन उभे रहावे लागते आणि मागावे लागते. हे जेव्हा आम्ही येथे मांडत आहोत त्यावेळेस एका जबाबदारीने आम्ही हे बोलतो आहोत. उद्या कदाचित बाजी पलटल्यानंतर आम्ही तुमच्या जागी बसू आणि आज येथे जे बोलतो आहे ते लक्षात घेऊन जबाबदारीनेच काम करू. ती जबाबदारी निश्चितपणे आमच्यावर असेल या जाणीवेतूनच मी हे सांगतो आहे. देव करो आणि ती जबाबदारी आमच्याकडे येवो आणि आम्ही ते करावी अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. परंतु शेवटी हे सारे होणे हे जनतेच्या हातामध्ये असते. पण आज तुम्ही

....... एएए 3 ...



KBS/KGS/ MAP. श्री. गागरे नंतर --- 16:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सत्तेवर आहात. तेव्हा आज तरी आपण ते करावे. मराठवाडा-विदर्भाची पाण्याची तहान आपण भागवा, थांबवा एवढीच विनंती मला या निमित्ताने आपल्याकडे करावयाची आहे. .....

( यानंतर श्री. सरफरे ..... 3बी 1 ...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

जाता जाता मी एका गोष्टीचा उल्लेख करतो. माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख हे मराठवाडयाचे सुपुत्र आहेत. गुणदोष सर्वांकडे असतात. मी त्यांच्या गुणांचा चाहता किंवा दोषांचा विरोधकही नाही. राज्यकर्ते चुकले तरी माझ्यादृष्टीने ते मुख्यमंत्री आहेत. तरीही खालच्या आणि वरच्या सदनातील परिस्थिती पहातांना त्यांनी आपल्या निवासस्थानी परवा या सदनातील व खालच्या सदनातील सदस्यांची एक बैठक बोलाविली होती. ही बैठक रात्री 2 वाजेपर्यंत चालली. त्या बैठकीला अधिकारी उपस्थित होते. त्याचबरोबर पश्चिम महाराष्ट्रातील, मराठवाडयातील, विदर्भातील आमदार उपस्थित होते. मराठवाडा, विदर्भातील आमदार पाणी वाटपाच्या प्रश्नावरुन संतप्त झाल्यानंतर रात्री 2 वाजता त्यांनी ती बैठक उधळून लावीत असतांना त्या टेबलावरील चादर उधळून टाकली होती. याचे स्मरण झाल्यानंतर आपल्याला कोणत्या प्रवृत्तीशी लढावयाचे आहे याची आम्हाला जाण आहे. त्यावरुनही मोठे संकट विदर्भ आणि मराठवाडयावर येऊ पहात आहे. ते संकट म्हणजे येनकेन प्रकारेन क्लृप्त्या लढवून तुमच्या तोंडचा घास काढून घेण्याची पध्दत थांबली पाहिजे. याठिकाणी अवर्षणप्रवण तालुक्यातील पाटबंधारे क्षेत्राच्या अनुशेषासंदर्भात समिती निर्माण करण्यात येत आहे. आमचे तालुके मुळातच अनुशेषग्रस्त आहेत. तुमच्या मेहरबानीवर अनुशेषग्रस्त झालेलो नाही. आम्हाला घटनेच्या 371(2) कलमानुसार वैधानिक अधिकार प्राप्त झाले आहेत. यामध्ये आपण कशासाठी नाक खुपसत आहात? चोर मार्गाने आपल्या भागातील तालुक्यांना यामध्ये आणून पुन्हा या भागातील पाण्यामध्ये त्यांना वाटेकरी बनविण्याचे काम होत आहे. ही सुध्दा भूलथाप आहे. हे राज्यकर्ते अशाप्रकारे बनवाबनवी करणारे असतील असे वाटत नाही. अशाप्रकारचे मंडळ नेमण्याचे गाजर दाखविले जात आहे. मंडळ नेमण्याबाबत दाखविले जाणारे आशेचे गाजर खाणारे जर कुणी आमदार असतील त्यांना मी सांगतो की, राज्यातील अवर्षणप्रवण तालुक्यातील पाटबंधारेचा अनुशेष निश्चित करण्यासाठी नेमण्यात आलेली समिती शिफारस करील. त्या समितीने शिफारस केल्यानंतर पुन्हा वेगळे विकास मंडळ नेमले जाईल. आज तीन वैधानिक विकास मंडळे अस्तित्वात असतांना कोकणासाठी चौथे मंडळ आणि खानदेशासाठी पाचवे मंडळ निर्माण करु असे सांगितले जात आहे. त्याकरिता खालच्या सभागृहामध्ये खुशीची गाजरे वाटली जात आहेत. तशाप्रकारचे ठराव सभागृहामध्ये मंजूर करण्यात येत आहेत. हे सर्व चालू असतांना त्यामध्ये आणखी एक तिसरे पिल्लू आणून सोडण्यात येत आहे. आपण एक गोष्ट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. दिवाकर रावते....

लक्षात ठेवा की, एक तृतियांश बहुमताने घटना बदलली जाते. घटनेतील 371 (2) हे कलम विदर्भ, मराठवाडा आणि गुजरातमधील कच्छ भागापुरतेच मर्यादीत आहे. त्याकरिता आपल्याला घटनेमध्ये सुधारणा करावी लागेल. ती सुधारणा झाल्यानंतर कोकण व खानदेशकरिता वैधानिक मंडळे निर्माण होतील. ती मंडळे निर्माण झाल्यानंतर पुन्हा आपल्याला सुधारणा करावी लागेल. जी गोष्ट कधीच होणार नाही त्याबाबत आत्याबाईच्या मिश्या पिळून तुम्ही लोकांना दाखवीत आहात. अशाप्रकारे आणखी प्रादेशिक भेदभाव आपण निर्माण करीत आहात तो कृपाकरुन आपण थांबवा. अशा नवनवीन क्लृप्त्या लढवून आमदार खूष होतील, परंतु प्रादेशिक असमतोल निर्माण केल्याबद्दल तुमच्याबद्दलचा असंतोष निर्माण झाल्याशिवाय रहाणार नाही. एवढेच मी याठिकाणी नम्रपणे सांगतो. आणि पुन्हा नम्रपणे विनंती करतो की, मराठवाडयाच्या पाणी सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्याकरिता आपल्याला केवळ पैसे नकोत तर प्रकल्पांना मंजूरी देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे गोदावरीवर सात वेगवेगळे बॅरेजेस टाकण्याचे जे प्रयोजन आहे त्याची ताबडतोब अंमलबजावणी करण्याकरिता ती कामे आपण हातामध्ये घ्यावीत अशी विनंती करतो. आणि सभापती महोदय, आपण मला संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. मराठवाडयातील सिंचनाच्या अनुशेषासंबंधी याठिकाणी चर्चा सुरु असतांना एक घडलेली घटना आपणासमोर सादर करतो. मराठवाडयातील लोअर पेनगंगा प्रकल्पाच्या मोजणीसाठी काही अधिकारी गेले असतांना त्यांची नग्न मिरवणूक काढण्याचा घडलेला प्रकार निंदणीय आहे. सभागृहामध्ये माननीय मंत्री चर्चेला उत्तर देणार आहेत. हा प्रकार करणाऱ्या एकाही आरोपीना अजून अटक करण्यात आलेली नाही. एका बाजूला आपण या प्रस्तावावर उत्तर देत असतांना दुसऱ्या बाजूला आपल्या विभागाच्या अभियंत्यांना डिमॉरलाईज करण्याचे काम करणाऱ्या लोकांना अटक होत नाही. हे कृत्य करणारे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते असल्यामुळे अधिकाऱ्यांची त्याठिकाणी काम करण्याची हिंमत होत नाही. आपल्या अभियंत्यांचे मनोबल उंचावण्याकरिता व त्यांना हिंमतीने उभे रहाण्याकरिता संबंधित आरोपींना ताबडतोब अटक करुन त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे अशी माझी आपणास विनंती आहे.

----

(यांनतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मंत्री महोदयांचे उत्तर सुरू होण्यापूर्वी मला एक-दोन सूचना करावयाच्या आहेत.

सभापती महोदय, मराठवाडा, विदर्भ, खानदेश आणि कोकणातील अवर्षण तालुक्यांना सिंचनाच्या राज्य सरासरीबरोबर आणावे यासाठी नियम 260 अन्वये ठराव मांडण्याची मला परवानगी दिली त्याबद्दल आपल्याला आणि सभागृहाला धन्यवाद देतो. मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, महत्प्रयासाने हा ठराव मांडत असताना राज्यातील सिंचन अनुशेषाबाबत शासन उदासिन आहे, याबद्दल माझ्या मनात शंका नाही. पण या सभागृहातील आमचे सहकारीसुध्दा अनुपस्थित असल्यामुळे त्यांच्या मनामध्ये उदासिनता आहे की नाही, असा प्रश्न पडलेला आहे. या चर्चेच्यावेळी जलसंपदा, वित्त, पाणीपुरवठा, उद्योग उर्जा आणि कृषी विभागाचे सचिव आणि त्यात्या विभागाच्या मंत्री महोदयांनी उपस्थित रहावे अशी अपेक्षा होती, परंतु तसे झालेले नाही.

सभापती महोदय, माझ्या परतूर मतदार संघातील तीन लघु पाटबंधारे अपूर्ण आहेत. उस्वद, देवठाणा के.टी.वेअर दिनांक 26-08-2002 रोजी फुटल्यामुळे त्या ठिकाणच्या अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. आता त्या जमिनी उपयोगात येणार नाहीत. सदरचा कोल्हापूर बंधारा पहिल्या वर्षी फुटला त्यावेळेला एका बाजूला 40 मीटर आणि दुसऱ्या बाजूला 15 मीटर होता. सतत पाच वर्षे होऊन गेली, दुरुस्तीची मान्यता न मिळाल्यामुळे दर वर्षी येणाऱ्या पुरामुळे उस्वद गावाकडील बाजू 95 मीटर तर देवठाणा गावाकडील बाजू 25 मीटर झालेली आहे. आता त्यावरील दुरुस्तीचा खर्च वाढलेला आहे. या प्रकरणी सचिव, जलसंपदा, माननीय जलसंपदा मंत्री, सचिव वित्त विभाग, माननीय वित्त राज्यमंत्री या सगळ्यांकडे गेल्या दोन वर्षापासून मी खेटे घालत आहे. माननीय वित्तमंत्री श्री.जयंत पाटील साहेबांनी दिनांक 3-04-2007 रोजी वित्त सचिवांना उचित निर्देश देऊनही त्यांनी ते पाळले नाही, हे मला खेदाने सांगावे लागते. सतत पाच वर्षे या संबंधाने मी खेटा घालून देखील काही उपयोग झाला नाही. उस्वद, देवठाणा गावची पार्श्वभूमी लक्षात घेतली तर उस्वदपासून तळणी हे 7 कि.मी.अंतरावर गाव आहे. त्या ठिकाणी मोठी बाजारपेठ आहे त्याचबरोबर जिनिंग प्रेसिंग, हॉस्पीटल्स, विद्युत उपकेंद्रही आहे त्या ठिकाणच्या लोकांच्या सगळया गरजा या तळणी गावामध्ये भागतात. के.टी.वेअर फुटल्यामुळे उस्वद गावापासून तळणी गावाला जायचे असेल तर, दहीफळ,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड (पुढे सुरू....

गारफळा,सारखेडा असा 30 कि.मी.चा प्रवास करून जावे लागते. विद्यार्थ्यांना शाळेमध्ये जाण्याचीही अडचण झालेली आहे. माझी नम्र विनंती आहे की, या के.टी.वेअरच्या दुरुस्तीसाठी विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? त्याचबरोबर आपण या आठ दिवसात या बंधाऱ्याच्या दुरुस्तीला मान्यता देणार आहात काय ? माझ्या मतदार संघातील तीन लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या कामाच्या संदर्भात प्रधान सचिव,श्री.हुद्दार, सचिव श्री.गायकवाड साहेब यांनी पत्र दिलेले आहे. परंतु हे तीनही लघू पाटबंधरे प्रकल्प पूर्ण झालेले नाहीत. या संदर्भाने मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

----

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री धोंडीराम राठोड आणि सुधाकर गणगणे यांनी विधान परिषद नियम 260 अन्वये महाराष्ट्रातील आणि विशेषत: मराठवाडा आणि विदर्भातील सिंचनाच्या अनुशेषाच्या संदर्भातील अत्यंत महत्वाच्या प्रश्नाला या ठिकाणी वाचा फोडलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते यांनी उल्लेख केल्याप्रमाणे आपणा सर्वांना ज्ञात आहे की, 1960 साली तेव्हा महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेव्हा या महाराष्ट्राची सर्वंकष, न्यायोचित आणि योग्यप्रकारे प्रगती व्हावी, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सिंचनाच्या सोयी योग्य पध्दतीने निर्माण व्हाव्यात अशी तत्कालीन राज्यकर्त्यांची भावना होती. पण प्रत्यक्षात जे उतरले ते मात्र विपरित होते. महाराष्ट्रातील एका भागात सिंचनाच्या सोयी मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या. महाराष्ट्रातील इतर भाग आणि त्यातही प्रामुख्याने मराठवाडा आणि विदर्भ हा भाग या सोयीपासून वंचित राहिला. म्हणून दांडेकर समितीची निर्मिती झाली. त्या सगळ्या डिटेल्समध्ये मी जाणार नाही. पण एक गोष्ट मात्र आपण सर्वार्थाने लक्षात घेतली पाहिजे की, सन 2001 साली माननीय राज्यपालांनी जे निर्देश दिले होते त्याची अंमलबजावणी चार वर्षात करावी असे निर्देश त्यांनी दिले होते. त्या निर्देशाची अंमलबजावणी तेव्हा जरी झाली नसली तरी गेल्या तीन वर्षापासून अत्यंत काटेकोरपणे त्याची अंमलबजावणी होत आहे. सिंचन क्षमतेच्या निर्मितीबाबत जर आपण पाहिले तर 1951 मध्ये 1660 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून 2 लक्ष 74 हजार हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्माण झाली होती. जेव्हा पंचवार्षिक योजना लागू झाल्या तेव्हापासून पाटबंधाऱ्यावर भर देण्याचे या शासनाने ठरविले. जलसिंचन आयोगाने जवळजवळ 25 लाख हेक्टर एवढी अंतिम सिंचन क्षमता अंदाजित केलेली होती. जून, 2000 मधील परिस्थिती पाहिली तर गुंतवणूक 1660 कोटी रुपयांवरुन 40 हजार कोटी रुपयांवर गेली आणि त्या गुंतवणुकीतून सिंचन क्षमता 1951 सालच्या 2 लाख 74 हजार हेक्टरवरुन 40 लाख 96 हजार हेक्टवर गेली. म्हणजे जवळजवळ 41 लाख हेकटर एवढी सिंचन क्षमता या महाराष्ट्रात निर्माण केली. हे सर्व होत असताना आज जवळजवळ 1246 प्रकल्प या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रगतिपथावर आहेत आणि ते प्रकल्प जर आपल्याला पूर्ण करावयाचे असतील तर जवळजवळ 41,315 कोटी रुपये लागतील आणि त्यातून जवळजवळ 32 लाख 31 हजार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

डॉ. सुनील देशमुख .....

हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल. म्हणजे आजची 40 ते 41 हजार हेक्टर सिंचन क्षमता आणि जे प्रकल्प प्रगतिपथावर आहेत किंवा जे प्रकल्प चालू केलेले आहेत त्यातून निर्माण होणारी 32 लाख हेक्टर सिंचन क्षमता अशी जवळजवळ 72 ते 73 लाख हेक्टर सिंचन क्षमता या महाराष्ट्रात येणाऱ्या काळात निर्माण करावयाची आहे. हे करीत असताना जर अनुशेष वाढला आणि ही सिंचन क्षमता जर एकाच विभागात निर्माण झाली तर महाराष्ट्रातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना, अनुशेषग्रस्त शेतकऱ्यांना त्याचा काही फायदा होणार नाही.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 17:15

(डॉ. सुनील देशमुख...)

म्हणून घटनेच्या कलम 371(2) नुसार महामहिम राज्यपालांनी दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरविलेले आहे. आपण पहात आहोत की, मागील तीन-चार वर्षामध्ये आपण अनुशेषग्रस्त क्षेत्रामध्ये जो काही खर्च केलेला आहे त्यामध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहे. हे सर्व करीत असताना महाराष्ट्रातील जे काही सिंचन प्रकल्प पूर्णत्वास पोहोचू शकतात ते पूर्ण करण्यासाठी आणि त्या सिंचन प्रकल्पांच्या कामाना गती देण्यासाठी 16345 कोटींचा प्रस्ताव राज्य शासनाने तयार केलेला असून तो महामहिम राज्यपालांकडे मान्यतेसाठी पाठविलेला आहे. त्यामध्ये गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळासाठी 3994 म्हणजे जवळ जवळ 4 हजार कोटी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळासाठी 3145 कोटी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळासाठी जवळ जवळ 7 हजार कोटी, तापी खोरे विकास महामंडळासाठी 1151 कोटी आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळासाठी 1069 कोटी असा एकूण 16345 कोटीचा महत्वाकांक्षी प्रस्ताव महाराष्ट्र शासनाने तयार केलेला आहे. 2006-07, 2007-08 आणि 2008-09 या तीन वर्षाच्या काळामध्ये हे सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबध्द आहे. मागील अधिवेशनामध्ये हा प्रस्ताव या सदनामध्ये चर्चेला आला होता. त्यावेळी सन्मानीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांनी सिंचन क्षमतेचा कमी वापर होत असल्याची खंत व्यक्त केली होती. ही गोष्ट खरी आहे की, राज्यात 2000 अखेर पर्यन्त 40 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. 2005 अखेर त्यापैकी 22.14 लाख हेक्टर सिंचन क्षमतेचा वापर झालेला आहे. म्हणजे एकूण सिंचन क्षमतेच्या 55 टक्के सिंचन क्षमतेचा वापर झालेला आहे. मराठवाड्यामध्ये 8.80 लाख हेक्टर सिंचन क्षमतेच्या तुलनेत फक्त 3.25 लाख हेक्टर म्हणजे जवळ जवळ 37 टक्के सिंचन क्षमतेचा वापर होत आहे. ही सिंचन क्षमता कमी असण्याची कारणे अनेक आहेत. मधल्या काळात पिण्याच्या पाण्यासाठी प्राधान्य दिले होते. त्यामुळे सिंचनासाठी जे प्रकल्प निर्माण केले होते त्यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी असलेली टक्केवारी वाढविण्यात आली. तसेच औद्योगिकीकरणासाठी पाण्याचे आरक्षण ठेवण्यात आले. जेव्हा हे प्रकल्प तयार करण्यात आले त्यावेळी पीक पध्दती काय असावी, पिकासाठी किती पाणी लागेल याचा अभ्यास केलेला होता. परंतु ती पीक पध्दती सोडून जास्त

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. सुनील देशमुख...)

पाणी लागणारी पिके घेण्याकडे शेतक-यांचा कल होता. त्यामुळे निर्मित सिंचन क्षमतेपेक्षा केवळ 55 टक्के सिंचन क्षमतेचा आपण वापर करु शकलो. येणा-या काळामध्ये या गोष्टीमध्ये सुधारणा होईल. एमडब्ल्यूएमआयपी मार्फत आणि जागतिक बँकेने जे 16000 कोटीचे कर्ज दिलेले आहे त्यामधून जुने प्रकल्प, ज्या प्रकल्पांचे कालवे, पाटचा-या क्षतीग्रस्त झालेल्या आहेत त्यांची दुरुस्ती करुन त्यांच्या देखभालीचे काम पाणी वाटप संस्था निर्माण करुन त्यांच्याकडे देण्याचे ठरविलेले असून त्या दिशेने आपण काम सुरु केलेले आहे.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही ठरविलेल्या सिंचन क्षमतेनुसार जी पिके घ्यायला पाहिजे होती त्यापेक्षा जास्त पाण्याची पिके घेतल्यामुळे पाण्याच्या वापरामध्ये थोडा व्यस्तपणा निर्माण झाला आहे. आपण कोणती पिके ठरविली आणि मराठवाडयातील लोकांनी कोणती पिके घ्यायला पाहिजेत, तसेच आपण ती कोणत्या आधारावर ही पिके ठरविली व त्याला काय प्रमाण होते, काय आधार होता, हे मात्र समजू शकले नाही.

डॉ. सुनील देशमुख : आपण ज्यावेळी एखादा प्रकल्प प्रस्तावित करतो किंवा डिझाईन करतो.....(अडथळा).......मग त्यात बाजरी असो पण पाणी दिसल्यानंतर आपला कल सहज ऊसाकडे वाढतो आणि जे पाणी जास्त क्षेत्रासाठी मग त्यात बाजरीसाठी म्हणा अथवा ज्वारी या पिकांसाठी वापर करु शकले असते तेच पाणी अथवा त्यापेक्षा जास्त पाणी कमी क्षेत्रातील ऊसासाठी वापरतो त्यामुळे सिंचन क्षमता उपलब्धीपेक्षा कमी वापरात येते.

श्री. दिवाकर रावते : मी आपल्या मताशी सहमत होऊ शकत नाही. कारण मराठवाडयाच्या शेतकऱ्यावर अन्याय करणारे हे आपले निवेदन आहे. मी आपल्या निदर्शनास आणले की, आपण जर मी दिलेली आकडेवारी खोडून काढली तर मला आनंदच होईल. मराठवाडयामध्ये पाण्याची उपलब्धी असतांना पूर्वी वापरामध्ये 50 टक्क्याहून कमी सिंचन क्षमता मूळात वापरात आली. परंतु आहे त्या क्षमतेपेक्षा जास्त सिंचन क्षमता वापरात आली असती तर या लोकांना ऊसाचे पीक देखील घेणे शक्य झाले असते, परंतु आपण जे पाणी आहे तेच त्यांना देऊ शकला नाही. पश्चिम महाराष्ट्राने मात्र जन्म:तच ऊस पिकविण्याचा वसा घेतला आहे, हे बरोबर वाटत नाही. माझे म्हणणे आहे की, पश्चिम महाराष्ट्राला ऊस पिकवू द्या आणि आम्हालाही पिकवू द्या. आमची जी पाण्याची क्षमता आहे ती पूर्ण क्षमता कामाला लावा पण ती आपण लावली नाही, ही आपली चूक आहे. आपण मराठवाडयातील लोकांनी ज्वारीचेच पीक घ्यायचे की बाजरीचेच पीक घ्यायचे आणि कोंकणातील लोकांनी फक्त भातच पिकवित रहावयाचे हे धोरण बरोबर नाही. त्यांच्याकडे जी क्षमता आहे त्याचा वापर केला तर तेथील शेतकरी त्याला पाहिजे ती पिके घेऊ शकतो परंतु आपण ती क्षमता मिळवू शकलो नाही, हे सत्य आहे.

डॉ. सुनील देशमुख : सन्माननीय सदस्यांनी अत्यंत मुलभूत असा प्रश्न उपस्थित केला आहे. त्यामध्ये खोरे, तुटीचे खोरे आणि अति तुटीचे खोरे यासंबंधीचे सर्व निकष चितळे समितीने



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख........

दिलेले आहेत. मी असे म्हणणार नाही.....अडथळा..... मी विदर्भाचाच असल्यामुळे असे धाडसी उद्‌गार देखील माझ्या तोंडून निघणार नाहीत. सर्वात जास्त सिंचनाचा अनुशेष अमरावती जिल्हयाचा आहे. तसेच भीमा-कृष्णा स्तरीकरण योजना ही अत्यंत महत्वाची योजना असून सांगितलेला खर्चही या योजनेला अपेक्षित आहे. पण हे करीत असतांना मराठवाडयाला न्याय्य पध्दतीने देय असलेले पाणी मिळेल याची खात्री मी देऊ इच्छितो.

श्री. दिवाकर रावते : हा प्रश्न कृष्णा-भीमा स्तरीकरणाचा नसून मराठवाडयाच्या पाण्यासंबंधीचा आहे आणि तो गेल्या पाच सहा अधिवेशनांपासून मी लावून धरला आहे. आपली बाकीची जी कामे असतील ती होतील पण आम्हाला आमचे 21 टीएमसी पाणी सन 2000 मध्ये ठरल्याप्रमाणे तरी द्यावे. भीमा-कृष्णास्तरीकरण होत राहील त्यानंतर पाणी उपलब्ध होईल व त्यानंतर आपले 21 टीएमसी पाणी आम्हाला मिळेल, हे आम्हाला नको आहे. आमच्या शुभेच्छा आहेत आपल्या नवीन योजनांना. आपण आपले 115 अब्ज घनफूट पाणी आणा, बारामतीला द्या, बारमाही करा आमचे काहीच म्हणणे नाही पण आमचे 21 टीएमसी पाणी कशाला अडवित आहात. आपली योजना जर 50 वर्षे झाली नाही तर आमचे पाणी तोपर्यंत देणारच नाही काय ?

डॉ. सुनील देशमुख : महोदय, सन्माननीय सदस्यांना व आपल्यालाही माहितीच आहे की, जे प्रकल्प आपण हाती घेतलेले आहेत, त्यांना जवळपास 40 हजार कोटी रुपये लागणार आहेत. त्यामुळे आता पुन्हा 5 हजार कोटीचा प्रकल्प.....अडथळा......हया सर्व भविष्यातील गोष्टी आहेत..

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे प्रथम ऐकून घ्यावे व नंतर आपला मुद्दा मांडावा, अशी मी त्यांना विनंती करतो.

यानंतर श्री. एम.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, अत्यंत महत्वाचा असा विषय माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते आणि डॉ. श्रीकांत जोशी यांनी उपस्थित केलेला आहे. मागील भाषणात सुध्दा त्यांनी हा मुद्दा येथे मांडलेला होता.....

श्री. धोंडिराम राठोड : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी कबूल केले आहे की, मराठवाडयामध्ये उपलब्ध सिंचन क्षमतेच्या फक्त 37 टक्के पाणीवापर होत आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, बाभळी बंधाऱ्याचे काम जवळजवळ 30 ते 35 टक्के पूर्ण झालेले आहे. 2009 पर्यंत हे काम शासन पूर्ण करणार आहे. सुप्रीम कोर्टाने स्थगिती न दिल्यामुळे येत्या काळामध्ये बाभळी बंधाऱ्याचे काम होण्यामध्ये काही अडचण होणार नाही आणि प्रकल्प 2009 मध्ये पूर्ण होणार आहे. नवीन छत्तीसगड राज्यातून पाणी वापरण्याचा प्रस्ताव माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडलेला आहे. छत्तीसगड येथील पाणी ते राज्य 100 वर्षे तरी वापरु शकणार नाही. हा प्रस्ताव शासनाकडून तपासून घेण्यात येईल आणि तो फिजीबल असेल तर त्यादृष्टीने शासन जरुर सकारात्मक विचार करील. माननीय सदस्य श्री. धोंडिराम राठोड यांनी त्यांच्या मतदार संघातील आणि जिल्हयातील 3 लघुपाटबंधारे आणि एका मध्यम बंधाऱ्याविषयी प्रश्न उपस्थित केला आहे. मध्यंतरीच्या काळात या बंधाऱ्यांची तूटफूट झाल्यामुळे व त्यावर असलेला पूल वजा बंधारा क्षतीग्रस्त झाल्यामुळे सामान्य शेतकऱ्यांना फेरा मारुन जावे लागते असे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. माननीय सदस्यांना मी एवढेच सांगू इच्छितो की, अधिवेशनानंतर 15 दिवसाच्या आत याबाबतीत अर्थखात्याचे अधिकारी आणि पाटबंधारे खात्याचे अधिकारी यांची संयुक्त बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावू अशी ग्वाही मी शासनाच्या वतीने देतो. माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर आणि डॉ. श्रीकांत जोशी यांनी याबाबतीत आपले विचार व्यक्त केले. डॉ. श्रीकांत जोशी यांनी जायकवाडी धरणाच्या दुरुस्तीसंदर्भात बैठक घेतली नाही असे सांगितले. मी याबाबतीत शब्द दिला होता. त्यादृष्टीने मी 4 आणि 5 जुलै अशी तारीख सुध्दा बैठकीसाठी निश्चित केली होती. परंतु अमरावती जिल्हयामध्ये 1 जुलैपासूनच पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने आणि पुरामध्ये 40 पेक्षा अधिक माणसे दगावल्याने मला जिल्हा सोडता आला नाही. हे अधिवेशन झाल्यानंतर याबाबतीत आपण बैठक आयोजित करु. जायकवाडी प्रकल्पातील क्षतीग्रस्त कॅनॉलच्या बाबतीत निर्णय घेऊ. माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सुध्दा

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख ....

मराठवाडयाच्या अवर्षण प्रवण तालुक्यांबद्दल विचार व्यक्त केले. अनुशेष नसलेले तालुके यामध्ये अंतर्भूत करण्यात आलेले आहेत असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. आधी 94 तालुके होते नंतर 147 झालेले आहेत. रंगनाथन समितीने 166 तालुके निश्चित केले आहेत. त्यांची यादी आलेली आहे. रंगनाथन समितीचे काम अद्याप सुरु आहे. त्या समितीचा रिपोर्ट आल्यानंतर यावर सविस्तर चर्चा विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात होईल. काही जिल्हयांमध्ये 120 ते 150 टक्के सिंचन क्षमता निर्माण झालेली असताना सुध्दा त्याही तालुक्यांचा अवर्षपण प्रवण तालुक्यांमध्ये अंतर्भाव झालेला आहे ही गोष्ट खरी आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर जे तालुके 150-170 टक्के सिंचन क्षमता निर्माण झालेली असताना त्यांचा अंतर्भाव केलेला आहे याचा विचार होऊन याबाबतीत निर्णय घेऊ शकू.

सभापती महोदय, या अतिशय महत्वाच्या अशा प्रश्नाला हात घातल्याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

------

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला आपल्या निदर्शनास आणावयाचे आहे की, या प्रस्तावावरील चर्चा सन्माननीय सदस्य श्री.धोंडिराम राठोड यांनी उपस्थित केली. या चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्यापैकी आता सभागृहामध्ये किती उपस्थित आहेत याची आपण नोंद घ्यावी. मला हे मुद्दाम सभागृहाच्या निदर्शनास आणावयाचे आहे. मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रश्न मार्गी लागावेत यासाठी आम्ही चर्चा उपस्थित करतो. या चर्चेमध्ये भाग घेतलेल्यांपैकी माननीय सदस्य श्री. धोंडिराम राठोड हे प्रथमपासून उपस्थित आहेत. माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, श्रीकांत जोशी उपस्थित आहेत. ज्या माननीय सदस्य किंवा माननीय सदस्या यांनी या चर्चेत भाग घेतला ते उत्तराचे भाषण सुरु असताना कुठे आहेत? माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी चर्चेत भाग घेतला परंतु उत्तराच्या वेळी उपस्थित नाहीत. ज्यांनी चर्चेत भाग घेतला त्यांनी उत्तराच्या वेळी उपस्थित राहिले पाहिजे असा दंडक आहे. हा दंडक जर पाळला जात नसेल तर ते चुकीचे आहे. माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम हे मराठवाडयाचे आहेत त्यांचा पत्ता नाही. माननीय सदस्य श्री.वसंत चव्हाण उपस्थित नाहीत. माननीय सदस्य श्री.दिलीप देशमुख हे मराठवाड्याचे आहेत, त्यांचा पत्ता नाही. माननीय सदस्य श्री.अब्दुल सत्तार हे निवृत्त व्हायचे आहेत. परंतु चर्चेमध्ये भाग घ्यायला हरकत नव्हती. माननीय सदस्य श्री.सुरेश देशमुख हे इतर वेळी सभागृहात उपस्थित असतात. परंतु एवढी महत्वाची चर्चा सुरु असताना सभागृहात उपस्थित नाहीत, हे मी आपल्या निदर्शनास अशासाठी आणू इच्छितो की, कोणत्याही प्रस्तावावरील चर्चेत बोलण्यासाठी आग्रह धरला जातो. अशा वेळी ही सूचना दिली पाहिजे की, प्रस्तावावर बोलायचे असेल तर उत्तराच्या भाषणापर्यंत सभागृहात थांबण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. यासाठीच मी हा विषय मांडला आहे.

श्री.धोंडिराम राठोड : सभापती महोदय, मी या प्रस्तावावर बोलत असताना दिनांक 13 एप्रिल, 2007 रोजी दोन अतिशय महत्वाचे मुद्दे उपस्थित केले होते. मराठवाड्यामध्ये 9 मोठे, 20 मध्यम आणि 300 लघुसिंचन प्रकल्प हे शासनाच्या उदासिनतेमुळे वर्षानुवर्षे रखडले आहेत. ते कधी पूर्ण होतील? विदर्भातील 8 हजार कोटी रुपयांचे प्रकल्प सर्व्हेक्षणामध्ये अडकले आहेत. त्यामध्ये यवतमाळ 17, अमरावती 24, अकोला 9, बुलढाणा 8, वाशिम 7, नागपूर 10, वर्धा 4, चंद्रपूर 15, गडचिरोली 33 असे 127 प्रकल्प केवळ सर्व्हेक्षण होत नाही म्हणून अडकले आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडिराम राठोड.........

कोकणातील 1 मोठा, 4 मध्यम व 33 लघुसिंचन प्रकल्प अपूर्णावस्थेत आहेत. एवढी सगळी आकडेवारी मी माझ्या भाषणात दिलेली होती. त्या संदर्भात मंत्रीमहोदयांनी काहीही भाष्य केले नाही.

(नंतर श्री.ए.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड...........

आमच्या भागातील प्रकल्पांचा सर्व्हे झालेला नाही. सर्व्हे पूर्ण झाल्याशिवाय आपण सिंचनाची व्यवस्था कशी करणार आहात ? मराठवाड्याला इतर भागांबरोबर कधी आणणार आहात ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी माझ्या उत्तराच्या भाषणात सांगितले की, जे प्रकल्प चालू केलेले आहेत, त्यासाठी 16 हजार कोटी रुपयांचा मोठा ॲम्बीशिअस प्रस्ताव तयार केलेला आहे. त्यास कॅबिनेटमध्ये मंजुरी देखील घेतलेली आहे. माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे हे पैसे खर्च होणार आहेत. तीन वर्षात किती पैसे खर्च होणार आहेत याचे डिटेल्स दिलेले आहेत. मी याठिकाणी फक्त प्रत्येक प्रकल्पाचे नाव घेतलेले नाही. परंतु आम्ही 16 हजार कोटी रुपयांचा ॲम्बीशिअस प्रस्ताव तयार केलेला आहे त्यामध्ये हे सर्व प्रकल्प आलेले आहेत.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मागील अधिवेशनात भाषण केले म्हणून आम्हाला आमच्या मुद्यांची उत्तरे मिळालेली नाहीत असे आम्ही समजायचे काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांना सांगू इच्छितो की, मी माझ्या भाषणात बाभळी बंधाऱ्याचा विषय उपस्थित केला तेव्हा आपण सांगितले की, हा विषय संपलेला आहे. जायकवाडी कॅनॉलच्या दुरुस्ती संदर्भात मी बैठक बोलाविली होती, परंतु माझी अडचण असल्यामुळे ती बैठक झाली नाही. 21 टीएमसी पाणी देण्याबाबत सांगू इच्छितो की, जे देय असेल त्याप्रमाणे कार्यवाही होईल. मी सर्व मुद्दे कव्हर केलेले आहेत. पूर्ण कमांड एरियामध्ये स्प्रिंकल पध्दती करावी हा मुद्दा सुटलेला आहे.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, मी माझ्या भाषणात एक महत्वाचा मुद्दा मांडला होता. तो म्हणजे मी लहानपणी हाफपँटमध्ये शाळेत जात असताना माझ्या वडिलांनी मला तळतोंडीचा बंधारा होणार आहे असे सांगितले होते. आता माझा नातू हाफपँटमध्ये फिरत आहे. परंतु अजूनपर्यंत तो बंधारा पूर्ण झालेला नाही. मंत्रिमहोदय सांगत आहेत आम्ही प्रस्ताव तयार केलेला आहे, कार्यवाही लवकर पूर्ण होईल. मला त्यांना विचारावयाचे आहे की, हा बंधारा केव्हा पूर्ण होणार आहे ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी मराठवाड्याला 21 टीएमसी पाणी देण्याबाबत ठोस उत्तर दिलेले नाही. त्यासंदर्भातील त्यांनी त्यांची भूमिका स्पष्टपणे मांडलेली नाही. 21 टीएमसी पाणी देण्याबाबत कालबध्द कार्यक्रम तयार केला आहे काय ? त्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे काय ? या संदर्भात मंत्रिमहोदयांनी काहीही स्पष्टीकरण केलेले नाही.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, कृष्णा-भीमा स्थैयीकरणाच्या प्रकल्प पाच हजार कोटी रुपयांचा आहे. तसेच एकूण 40 हजार प्रकल्प हातात आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले सर्व प्रकल्प त्यात असतील. 21 टीएमसी बाबत सांगू इच्छितो की, जे देय असेल त्याप्रमाणे पाणी मिळेल.

**तालिका सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

आजच्या कामकाजपत्रिकेवरील अर्धा-तास चर्चेच्या सूचना आज घेण्यात येणार नाहीत. उद्या दिनांक 20 जुलै 2007 रोजी सकाळच्या विशेष बैठकीत त्या घेण्यात येतील. आता मी नियम 97 अन्वये प्रस्तावाला सुरुवात करतो.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सदर प्रस्तावास उत्तर कोण देणार ?

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री किंवा नगरविकास विभागाच्या राज्यमंत्र्यांनी या प्रस्तावास उत्तर दिले पाहिजे.

**तालिका सभापती** : संबंधित विभागाचे मंत्रिमहोदय येत आहेत, तोपर्यंत सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी प्रस्तावावरील भाषणास सुरुवात करावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सदनामध्ये संबंधित विभागाचे मंत्रिमहोदय उपस्थित असणे आवश्यक आहे. सकाळी माननीय श्री.आर.आर.पाटील साहेबांनी सांगितले होते की, हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. तेव्हा ही चर्चा आपण सर्वांनी गंभीरपणे घेतली पाहिजे. त्याठिकाणी संपूर्ण बिल्डींग पडलेली असून अजूनही ढिगारे उपसण्याचे काम चालू आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ही शासनाची जबाबदारी आहे.

( माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपे सभागृहामध्ये येतात.)

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी आपले भाषण सुरु करावे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बोरिवली (मुंबई) येथील "लक्ष्मी-छाया" इमारत कोसळून 11 जणांचा झालेला मृत्यू

**मु.शी.**: बोरिवली (मुंबई) येथील "लक्ष्मी-छाया" इमारत कोसळून 11 जणांचा झालेला मृत्यू या विषयावर सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील, शरद पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री दीपक सावंत, अनिल परब, अरविंद सावंत यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**तालिका सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"दिनांक 18 जुलै, 2007 रोजी सायंकाळी 6.30 वाजताच्या सुमारास बोरिवली येथील लक्ष्मी-छाया ही इमारत पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळणे, सदर इमारत सुमारे 20 वर्षापूर्वीची असणे, या इमारतीखाली सुमारे 11 जणांचा झालेला मृत्यू व कित्येक जण जखमी होणे, इमारत कोसळल्यामुळे ढिगाऱ्याखाली 100 हून अधिक जण अडकले असण्याची शक्यता असणे व त्यामुळे मृतांच्या संख्येत भर पडण्याची शक्यता, सदर इमारत ही धोकादायक इमारतींच्या यादीत नसून देखील कोसळली असल्याने जनतेत निर्माण झालेले भीतीचे वातावरण, सदर दुर्घटनेची तातडीने सखोल चौकशी करुन संबंधितांवर कार्यवाही करण्याची आवयश्यकता, तसेच जखमींना वा मृतांच्या नातेवाईकांना तातडीने मदत करण्याची नितांत आवश्यकता, वारंवार घडणाऱ्या अशा घटनांना पायबंद घालण्याचे दृष्टीने ठोस उपाययोजना करण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घ्यावी."

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

सभापती महोदय, मी आपल्याला प्रथम धन्यवाद देतो की, आपण अत्यंत महत्वाच्या विषयावर याठिकाणी चर्चा मान्य केली. काल संध्याकाळी 6.00 वाजण्याच्या सुमारास बोरिवलीच्या बाभईनाक्याजवळील "लक्ष्मी-छाया" इमारत पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली. अजूनही त्याठिकाणी ढिगारे उपसण्याचे काम सुरु असून मृतांचा आकडा 24 च्यावर गेलेला आहे. अजूनही त्याठिकाणी ढिगाऱ्याखालील माणसे मोबाईलद्वारे संपर्क करीत आहेत. त्यांचे प्राण वाचावेत अशी सगळयांची इच्छा आहे. "लक्ष्मी-छाया" इमारत पडल्यामुळे उपनगरामध्ये बांधकामाच्या बाबतीत फार मोठे प्रश्न निर्माण झालेले आहेत. प्रशासन, बिल्डर आणि दुसऱ्या बाजूला व्यापारासाठी जागा घेणारी जी माणसे आहेत व त्यांनी याबाबतीत जी बेफिकिरी केलेली आहे, त्यातून ज्या माणसांचा काहीही दोष नसताना, आज त्यांचा जीव गेलेला आहे. मृतांमध्ये मुलांचा आकडा मोठा आहे. काल रात्री मी त्याठिकाणी गेलो होतो. त्याठिकाणचे दृश्य अतिशय विदारक होते. प्रचंड मोठयाप्रमाणात ढिगारा एकाच ठिकाणी पडलेला आहे. आपल्याला माहीत आहे की, बिल्डींग पडली तर ती कुठेतरी कललेली असते किंवा बिल्डींगचा थोडासा भाग पडलेला असतो. परंतु याठिकाणी या बिल्डींगच्या दोन विंग केक कापल्यासारख्या एकाच जागी येऊन पडल्या. त्याठिकाणी अजूनही ढिगारे उपसण्याचे काम पूर्ण झालेले नाही. ही इमारत पावसामुळे किंवा फार जूनी होती म्हणून पडली अशातला भाग नाही. ही इमारत धोकाग्रस्त किंवा राहण्यालायक नव्हती असे काहीही नाही. बोरिवलीतील गेल्या 10 वर्षामधील ही दुसरी मोठी घटना आहे. ही इमारत 20 वर्षापूर्वीची जूनी आहे. त्या इमारतीचे रंगरंगोटीचे काम झाल्यामुळे ती इमारत नवी दिसत होती. अजूनही काही वर्षे ती टीकली असती. माननीय महापौरांनी व आयुक्तांनी जी शंका व्यक्त केली, त्याबाबतीत मी स्वत: त्याठिकाणी उपस्थित होतो. त्या ढिगाऱ्यामध्ये माझे अनेक परिचित गाडले गेले आहेत. त्यांच्या नातेवाईकांपैकी एक मुलगा त्यामध्ये वाचला आहे. तो पहिल्या मजल्यावरील वर्धमान ज्वेलर्सच्या मालकाला सांगत होता की,

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.रोझेकर....

श्री.कपिल पाटील.........

हे बांधकाम करु नका, दुरुस्ती करु नका, त्यामुळे इमारतीला धोका पोहोचू शकेल. तो स्थापत्य विशारदाचा मुलगा होता त्यामुळे त्याला हे कळत होते की नेमकी अडचण काय आहे. काल संध्याकाळी त्याने पुन्हा हे काम रोखण्याचा प्रयत्न केला, परंतु काम बंद न केल्यामुळे तो तक्रार करण्यासाठी बाहेर पडला म्हणून वाचला, मात्र त्याचे सर्व कुटुंब जीव गमावून बसले. या ठिकाणी असलेल्या ज्वेलरने विनापरवाना तळमजल्याचे व दुरुस्तीचे काम केले. साधारणपणे दुरुस्ती करतांना कॉलम, पिलर आणि बिम यांना हात लावला जात नाही व त्याला परवानगीही मिळत नाही. परंतु, या ज्वेलरचा त्या इमारतीमध्ये 200 फुटाचा गाळा होता, त्या बाजुचाच एक 200 फुटाचा गाळा त्याला मिळाला, त्यामुळे त्याने मधली भिंत पाडली आणि खाली खोदकाम करुन तळघर निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यातून हा अपघात घडला, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्या ठिकाणी रहात असलेली माणसे जीवानिशी गेली. जे सत्य बाहेर आले ते अतिशय विदारक आणि गंभीर आहे व त्याची शासनाने तसेच पालिका प्रशासनाने गंभीर दखल घेण्याची आवश्यकता आहे. या पद्धतीने रिनोवेशनची कामे व्यापारी बिनादिक्कत करतात, मोडतोड करतात, त्याला प्रशासनातील अधिकारी मंजूरी देतात व त्यातून हे अपघात घडतात. त्यामुळे या जबाबदारीतून प्रशासन मोकळे होऊ शकत नाही, हे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. चोवीसहून अधिक माणसे बळी घेण्याचा हा प्रकार घडला आहे. याच पद्धतीने मुंबईतील, उपनगरातील इमारतीत मोठे ज्वेलर्स येत आहेत, ते पूर्णपणे स्ट्रक्चर बदलण्याचा प्रयत्न करीत आहेत. मोठा हॉल करतात, दागिन्यांचे एक्झिबिशन करण्यासाठी बदल करतात, मनमानी करतात. खोदकाम करावयाचे, नियमात नसलेले, इमारतीच्या मूळ आराखडयात नसलेले, बेसमेंट तयार करावयाचे, हे अतिशय धक्कादायक व धोकादायक आहे. ज्वेलर्सकडून अशा प्रकारचे बदल का केले जातात याचा शोध घेतला तर असे लक्षात येईल की, ज्वेलर्सना दागिन्यांचे जोडकाम करावयाचे असते, धातू वितळविण्याचे काम करावयाचे असते, त्यामधून विषारी वायू बाहेर पडत असतो, दुकानांमध्ये अशा प्रकारचे काम करण्यास नियमानुसार परवानगी नाही, दुकानाव्यतिरिक्त वेगळया ठिकाणी असे काम करावे, असे अपेक्षित असते. त्यामुळे ही कामे ज्या ठिकाणी दुकान आहे त्याच ठिकाणी तळघरात करावे, असा या लोकांचा शिरस्ता आहे. माझी या निमित्ताने मागणी

..2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील..........

आहे की, महापालिकेला सांगून उपनगरातील व शहरातील जेवढे ज्वेलर्स आहेत त्यांच्या जागांची पहाणी केली पाहिजे. त्यांनी तळघर तयार केले आहे, खोदकाम केले आहे, स्ट्रक्चरल चेंजेस केले आहेत, परवानगी घेतली आहे किंवा नाही, याची चौकशी केली पाहिजे. आज लक्ष्मीछाया इमारत दुर्देवाने पडली, पण मुंबईत दुसरीकडे कुठेही असा अपघात होऊ शकतो. म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतो आहे. आज ही माणसे जीवानिशी गेली पण पुढच्या माणसांच्या मरणाची वाट मोकळी करणा-यांना पायबंद घातला पाहिजे. ही वाट बंद करणार की नाही ? हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, याबरोबरच मुंबईतील जुन्या इमारतींचाही प्रश्न आहे. ज्या जुन्या इमारती आहेत त्या ठिकाणी राहणा-या सामान्य माणसांना दुरुस्तीची कामे आर्थिकदृष्टया परवडत नाहीत त्यामुळे त्यांचे दुरुस्तीकडे दुर्लक्ष होते आणि मग ते व्यापारीकरणाकडे झुकले जातात, त्यामुळे असे अपघात घडतात. मुंबईसाठी घरदुरुस्ती मंडळ आहे. मुंबईतील वीस हजार जुन्या इमारती रहाण्याला लायक नाहीत, त्यातील सोळा हजार इमारतींची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. परंतु, त्याबाबत कोणताही कृति आराखडा, कोणताही कृति कार्यक्रम शासनाने लोकांसमोर ठेवलेला नाही. या सर्व बाबतीत भरडली जाणारी माणसे सामान्य आहेत व त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासनाची आहे. एका बाजूला जुन्या इमारती, दुस-या बाजूला पावसाळयात धोकादायक बनलेल्या इमारती आणि आता तिस-या बाजूला 15-20 वर्षांच्या जुन्या इमारती, नव्या इमारती यामध्ये आलेले व्यापारी व त्यांनी केलेले स्ट्रक्चरल चेंजेस यामुळे धोकादायक बनलेल्या इमारती अशा प्रकारे तीन वर्गवारीमध्ये विभागणी करुन तपासणी करणे आवश्यक आहे. हे केले नाही तर दरवेळी दुर्घटना घडतील आणि आपण केवळ ढिगारे उपसण्याचे काम करीत राहू. हे होऊ द्यावयाचे नसेल तर मालमत्तेपेक्षा माणसाची किंमत मोठी मानली पाहिजे आणि त्यांची अशा प्रकारे होणारी हानी शासनाने रोखली पाहिजे, अशी या निमित्ताने माझी मागणी आहे.

यानंतर श्री.बोरले..........

अशुध्दप्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.कपिल पाटील .............

मला शासनाकडे अशी मागणी करावयाची आहे की, लक्ष्मीछाया इमारतीच्या दुर्घटनेची चौकशी झालीच पाहिजे. परंतु अशाच पद्धतीने ज्या ज्या इमारतीच्या तळमजल्यावरील व्यापारी गाळयांमध्ये बदल घडविण्यात आले आहेत, त्यांची तपासणी झाली पाहिजे आणि ज्या अधिका-यांनी परवानगी दिली असेल त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्यांच्यावर सदोष मनुष्य वधाचे गुन्हे दाखल केले पाहिजेत. प्रशासनातील दुर्लक्षतेबाबत अधिका-यांवर मामुली खटले दाखल केले जातात आणि नंतरच्या काळामध्ये ते निर्दोष सुटतात. जे बेजबाबदार अधिकारी आहेत त्यांच्यावर सदोष मनुष्य वधाचे गुन्हे दाखल केले पाहिजेत, तरच त्यांना यातून काही तरी धडा मिळू शकेल अन्यथा मिळणार नाही. माझी तिसरी मागणी अशी आहे की, जेवढया धोकादायक इमारती आहेत त्या सर्व इमारतीमधील रहिवाशांना पुन्हा घरबांधणी करावयाची असेल तर ते त्यांना परवडणारे नाही. एस.आर.ए.संबंधी शासनाने जशी योजना आखली त्याच धर्तीवर या सर्व इमारतींच्याबातीत नवीन योजना तयार केली पाहिजे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

---------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, अत्यंत गंभीर अशा विषयावर सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. गोविंदा टॉवर पडल्यानंतर देखील सभागृहात अशी चर्चा झ ाली होती. अशी एखादी दुर्दैवी घटना घडल्यानंतर आपण सभागृहामध्ये श्रध्दांजली अर्पण करतो आणि पुन्हा दुस-या दिवशी आपल्या कामाला लागतो. गोविंदा टॉवर पडल्यानंतर शासनाने श्री.के.सी.श्रीवास्तव समितीचा अहवाल स्वीकारलेला आहे. मुळात म्हणजे शासनाने त्या अहवालाची अंमलबजावणी का केली नाही ? ज्यांनी अहवालाची अंमलबजावणी केली नाही त्यांना प्रथम शिक्षा केली पाहिजे. त्या अहवालामध्ये त्यांनी अशी सूचना केली होती की, मुंबई महानगरपालिकेच्या कायद्यात बदल करुन दरवर्षी असेसमेंट बील देत असतांना स्टॅबिलीटी सर्टिफिकेट घ्यावयास पाहिजे. त्या अहवालाचे काय झाले ? याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिले पाहिजे आणि त्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली पाहिजे. तुमचे सरकार मुडदे उचलणारे सरकार आहे. तुमचे सरकार काहीही करीत नाही.

सभापती महोदय, माटुंग्याची नवरे इमारत पडली त्या दुर्घटनेमध्ये 44 माणसांचा मृत्यू झाला होता. माझ्या माहिती प्रमाणे त्या इमारतीच्या तळमजल्यावर ट्रॅव्हल एजंटचे ऑफिस होते. त्यांनी सुध्दा इमारतीचे प्लींथ तोडण्याचा प्रयत्न केला आणि पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे ती इमारत कोसळली. त्या इमारतीतून 44 मृतदेह बाहेर काढावे लागले. त्यावेळीही शासनाने घोषणा केल्या होत्या. तुमच्या राज्यामध्ये माणसांची, त्यांच्या जीवाची काही किंमत आहे की नाही, कायदे कशासाठी करता, तुम्हाला त्याची अंमलबजावणी करता येत नाही काय ? कोणाची तरी सोय करणासाठी तुम्ही समिती नेमता, त्यांना गाडी देता, भत्ता देता आणि अहवाल बासनात गुंडाळून ठेवता. त्या अहवालाचे नंतर काय झाले हे बघितले जात नाही. समजा एखादी इमारत रिडेव्हलप करण्यासाठी त्या इमारतीतील सर्व लोक एकत्र आले किंवा एखादा बिल्डर पुढे आला तर त्यांची तुम्ही "भिक नको पण कुत्रा आवर" अशी स्थिती करता. श्रीवास्तव समितीने असे सुचविले होते की, दरवर्षी स्टॅबिलीटी सर्टिफिकेट देणा-या इमारतीतील लोकांना किंवा को-ऑपरेटिव्ह सोसायटीला असेसमेंटमध्ये काही इंसेन्टीव्ह दिला पाहिजे. ते तुम्ही केले नाही. माणसाच्या आयुष्याला जर मर्यादा आहे तर कोणत्याही माणसाने निर्माण केलेल्या निर्मितीला नक्कीच मर्यादा आहेत. म्हणजे

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .........

त्या इमारतीला नक्कीच मर्यादा असणार. इमारतीला 25-30 वर्षे झाल्यानंतर त्या इमारतीला नोटीस द्यावयाची असते आणि रिडेव्हलपमेंटसाठी आल्यानंतर डी.सी.रुल्समध्ये बदल करुन त्यांना ताबडतोब इमारत बांधण्याची परवानगी द्यावी लागते. ई वॉर्डमध्ये किंवा उपनगरामध्ये बिल्डींग प्रपोजल डिपार्टमेंट आहे, तेथे पैसे खाल्याशिवाय फाईल हलत नाही. 36 परवानग्या आणाव्या लागतात. फायर ब्रिगेडची परवानगी आणावी लागते, ट्रॅफिकची परवानगी आणावी लागते. 36 ठिकाणी लोकांना तोंडात शेण खायला दिल्यानंतर, तो असंसदीय शब्द असेल तर तो मी मागे घेतो. परंतु त्या शिवाय फाईल हलत होत नाही. गोविंद टॉवर पडल्यानंतर श्रीवास्तव समितीची नियुक्ती करण्यात आली होती. त्या समितीच्या अहवालाची अंमलबजावणी आपण का केली नाही ? याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिले पाहिजे.

सभापती महोदय, नेहमी आम्हाला दोष दिला जातो की, मुंबई महानगरपालिकेमध्ये शिवसेनेचे राज्य आहे. एकमताने मंजूर केलेल्या ठरावाची कृतीत अंमलबजावणी करण्याचे पूर्ण अधिकार आयुक्तांना असतात. ठरावाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार नगरसेवकांना नाहीत. मुंबई महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये कलम 342 आहे.

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार )**

श्री.मधुकर चव्हाण .....

महानगरपालिकेत केलेले चांगले कायदे मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर बसून शासन रद्द करु शकते, असे आणीबाणीच्या काळात कलम केलेले आहे. Every person intends to make addition to building परंतु सामान्य माणूस काही करु शकत नाही. माझ्याकडील कागदपत्रामध्ये उल्लेख आहे की, No lowering of the plinth foundation or floor in the building shall be permitted मुंबईतील कोणत्याही बिल्डींगचे फाऊंडेशन 2-3 फुटापेक्षा खाली जात नाही. मुंबईत 80 टक्के ज्वेलर्स व कमर्शियल लोक आहेत. त्यांना आपल्या जुन्या इमारतीमध्ये ॲडीशनल फ्लोअर करावयाचा झाल्यास 9 फुटाची मर्यादा आहे. तीन फुट खाली गेले की, वर 9 फुट ॲडीशनल फ्लोअर करता येतो. सध्याच्या कायद्यातील कलम 354 नुसार कोणी काही पाहिले आहे की नाही ? महानगरपालिकेच्या आयुक्तांना कोणते अधिकार दिलेले आहेत ? लोकांना उल्लू बनविण्याचे अधिकार दिलेले आहेत. If the Commissioner is satisfied, that the erection of any building or exemption of any such work is described in section 342, कायद्यात लिहिले आहे की, त्यांनी जर गुन्हा केला असेल तर नोटीस देण्यात यावी. नोटीस दिली नाही तर तेथील फावडे, कुदळ उचलून आणा. नाही तर त्याला 5-10-15 रुपये दंड करा. कलम 356 प्रमाणे गुन्हा झाला तर 15 रुपये दंड होतो. आज मसाला पानही 20 रुपयास मिळते. तुम्ही या सेक्शनमध्ये बदल केला आहे का ? शासनाने या सेक्शनमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. 342 सेक्शनचे व्हायलेशन करणाऱ्या माणसाला सदोष मनुष्यवध किंवा 2-3 वर्षे शिक्षा दिली पाहिजे. लोकांना दाखविण्यासाठी तुम्ही कायदे करता, परंतु कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करता का ?. शासनाने महानगरपालिकेला व नागरिकांना काय अधिकार दिले आहेत. प्लींथ अतिरिक्त प्रमाणात खाली तयार केली जाते. कालच्या घटनेत किती माणसे मेली आहेत ? याची तुम्ही कल्पना करावी. मी सकाळी सभागृहात उल्लेख केला आहे की, आम्हाला वाचवा म्हणून ढिगाऱ्याच्या आतून फोन येत आहेत. त्यांनी मरण पत्करावे का ? 24 जण अजूनही या ढिगाऱ्याखाली आहेत. मी त्यांना मोबाईलवर फोन करीत आहे. आत तडफडणाऱ्या माणसाची स्थिती काय असेल ?. Can you imagine ? तुम्ही फक्त मुडदे उचलायचे काम करणार का ?.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

तुम्ही त्यांना काय अधिकार दिले आहेत ? In addition to the action that the Commissioner may take under the Act, he may, without further notice, caused to be removed any materials, equipments, devices, articles, in use process of the erection of the building illegal वगैरे वगैरे. कुदळ, फावडे किंवा सिमेंटच्या गोण्या असतील त्या उचलण्याचे त्यांना अधिकार दिलेले आहेत. ही माणसे लोकांच्या जीवनाशी सरळ-सरळ खेळत आहेत. रिपेअरमध्ये स्ट्रक्चरल चेंजेस करण्याचे अधिकार दिलेले नाहीत. रिपेअर बोर्डालासुध्दा चेंजेस करण्याचे अधिकार नाहीत. बिल्डींग रिपेअर करायला कधी परवानगी दिली जाते ? बाहयदर्शनी म्हणजे कॉस्मेटिक रिपेअरींग जास्त असेल तर रिपेअरींग केली जाते. स्ट्रक्चरल चेंजेसच्या बाबतीत ही इमारत दुरुस्तीच्या पलीकडे गेली असेल तर बोर्डाला अधिकार आहे की, त्या बिल्डींगची दुरुस्ती करावयाची की नाही. बोर्डाचे म्हणणे असते की, चारही बाजूने ट्रापींग करावे. सर्व बाजूने ट्रापींग केल्यानंतर असे दिसते की, कामगार एरियामध्ये 3 x 3 च्या संडासमध्ये 10-10 टेकू लावलेले असतात. टिनपाट घेऊन बसतासुध्दा येत नाही. असे का केले जाते ? हे विचारले तर बोर्डाचा नियम आहे असे सांगितले जाते. हा केवळ विनोदाचा भाग नाही. खर्चही ज्याच्या त्याच्याकडून वसूल करा असे नियमात सांगितले आहे. प्रथम मुंबई महानगरपालिकेच्या कायद्यात पूर्णत: बदल करा. लालबाग किंवा एखाद्या कामगार भागामध्ये कोणी 10 x 10 चा माळा बांधला तर असिस्टंट इंजिनियर, सब इंजिनियर, एक्सीक्युटीव्ह इंजिनियर, बिल्डींग प्रप्रोजर हे पैसे मागतात. मुंबई शहरातील सर्व वार्डातील इंजिनियरला मोटारसायकल दिल्या आहेत, सर्वांना भत्ता दिला जातो. गाडया घेण्यासाठी 4 टक्के व्याजदराने महानगरपालिकेची बँक इंजिनियरींग खात्याच्या लोकांना कर्ज देत आहे. कारण त्यांनी आपापल्या भागामध्ये किंवा बीटमध्ये फिरले पाहिजे. कोठे बेकायदेशीर काम चालले आहे हे त्यांनी बघितले पाहिजे ? शासन एफ.एस.आय. वाढवित आहे परंतु एखादी बिल्डींग जेवढी उंच बांधली जाते, त्यावेळी तेथे ओपन फाऊंडेशन किती केले पाहिजे ? पाईल फाऊंडेशन किती केले पाहिजे ? एक ताटी उभी करावयाची असेल तर पाया किती इंच केला पाहिजे ? जाड बुंधा उभा करावयाचा असेल किंवा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3



PNG/ MAP/ KGS/ KGS/ MAP/

श्री.मधुकर चव्हाण.....

जेवढी उंच इमारत असेल तितका पाया खोल गेला पाहिजे. तुम्ही डी.सी. रुल्समध्ये याची तरतूद केली आहे का ? मुंबई शहरात 22 मजले, 30 मजले आणि 60 मजल्याच्या गगनचुंबी इमारती उद्या उभ्या राहतील व त्यासुध्दा 10-20 वर्षांनी अशाच पडतील आणि मुडदे मोजायला तुम्हाला रांगेत उभे राहावे लागेल.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण

म्हणून इमारत बांधताना परवानगी देताना देखील आपण काळजी घेतली पाहिजे. सभापती महोदय, आम्ही जेव्हा परदेशामध्ये जातो, आम्ही मध्यंतरी मलेशियामध्ये गेलो होतो तेथील कौलालंपूर शहरामध्ये 86 मजल्यांची ट्विन्स टॉवर्स इमारत पाहिली. त्या इमारतीविषयी आम्हाला तेथे सांगण्यात आले की, त्या इमारतीचे फौंडेशन हे जमिनीखाली 3 ते 4 मजल्याचे आहे. म्हणजे जेवढी इमारत उंच तेवढा तिचा पाया मजबूत असला पाहिजे हे तत्त्व तेथे कसोशीने पाळले जाते आहे. म्हणूनच मी आपल्याला या निमित्ताने विचारू इच्छितो की, तुम्ही तुमच्या कायद्यात या दृष्टीने बदल करणार आहात की नाही ? पण आपण तसे करू इच्छित नाही. मात्र तुमच्या फायद्याचे सारे कायदे तुम्ही येथे पटापट आणता आणि चर्चेशिवाय मंजूर करा म्हणून आम्हाला सांगता व एका मिनिटामध्ये कायदे पास करून घेता. मग जनतेच्या हिताचे कायदे तुम्ही का आणत नाही ? ब्रिटिशांच्या काळात झालेले कायदे आहेत ते आपल्याला आजही बदलावेसे वाटत नाही का ? तेव्हा या आजच्या कायद्यात बदल करणे अत्यावश्यक आहे असे माझे मत आहे. सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, ही जी इमारत होती ती दुरूस्त करताना हा जो ज्वेलर्स आहे त्याने स्वत:चा भाग दुरूस्त केला नाही. मग तुम्ही त्याला जेलमध्ये का टाकले नाही ? तुम्ही त्याला परवानगी का दिली ? तिसरी गोष्ट अशी की, मुंबई महानगरपालिकेच्या बिल्डिंग प्रपोजलमध्ये कायदा आहे की, एखादी इमारत बांधत असताना तेथे जाऊन रॅण्डम चेकिंग केले गेले पाहिजे. म्हणजे त्या ठिकाणी इमारत बांधताना बिल्डरने जे मटेरिअल वापरले असेल ते योग्य आहे की नाही, योग्य निकषांमधील आहे की नाही हे समजू शकेल. त्यामध्ये देखील एक शास्त्र आहे. म्हणजे बांधकाम करताना किती प्रमाणात खडी मिक्स करायची, किती सिमेंट आणि वाळू असली पाहिजे., किती जाडीचे लोखंड वापरले गेले पाहिजे, याचे निश्चित असे गणित आहे, निकष आहेत. त्याप्रमाणे मटेरिअल तेथे वापरले जाते की नाही हे पाहिले गेले पाहिजे. पण तसेही आता होत नाही. मी टीका म्हणून हे सांगत नाही. पण श्री.अंतुले साहेबांच्या काळातील काही बिल्डिंग्स बांधल्या गेल्या आहेत. त्या काळात सिमेंटचा तुटवडा झाल्याने सिमेंटमध्ये भेसळ केली जात होती. त्या काळात कोरियाहून सगळे सिमेंट आलेले असे. तेव्हा युसूफ पटेल, बखिया, सुखिया इत्यादी सगळ्या स्मगलर्सना ते

....... 3एन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

दिले जायचे. त्यामुळे गरीबांचे 36 रूपयांचे सिमेंट त्या काळात 75 रूपये झाले होते. परिणामी सिमेंटमध्ये भेसळ होत होती. त्यामुळे कदाचित डायरेक्टली वा इन्डायरेक्टली तुमचे त्या काळचे मुख्यमंत्री देखील या पापाचे धनी असण्याची शक्यता आहे. आता तेथील बांधकाम मटेरिअलचे चेकिंग आपण करणार आहात त्यामध्ये हेही तपासा की, त्यात भेसळ होती किंवा काय ते ...

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण ज्यांचा उल्लेख केला त्यांच्यावर त्याबाबत केस झाली, तिचा निकाल लागला आणि त्यात ते निर्दोष मुक्त देखील झाले आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ठीक आहे. मी हा विषय चर्चेचा करीत नाही. मी हे माझ्या माहितीप्रमाणे येथे बोललो. मी मला मिळालेल्या माहितीनुसार, गायडन्स स्टेटमेंट केले आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, येथे जो काही संवाद होतो तो आपण रेकॉर्ड करतो असे असताना कोठलेही हिस्टॉरिकल रेफरन्सेस चुकू नयेत असे मला वाटते. कारण पुढील पिढी जेव्हा हे रेकॉर्ड पाहील तेव्हा, सन्माननीय सदस्य श्री.मधु चव्हाणांचे भाषण वाचेल तेव्हा अशा प्रकारे चुकीचे रेफरन्सेस मधु चव्हाण यांनी कसे काय दिले असे प्रश्नचिन्हे त्यांच्या मनात निर्माण होऊ नयेत म्हणून मी आपल्याला हे सांगितले.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आदरणीय, वंदनीय, प्रात:स्मरणीय अशा आमच्या मित्रांची सूचना मी या ठिकाणी मान्य करतो. असो. सभापती महोदय, माझी या संदर्भात सूचना अशी आहे की, यापुढे असे अपघात होऊ नयेत यासाठी कायद्यामध्ये बदल करण्यात यावेत आणि त्याच बरोबर मी असे म्हणेन की, हे बांधकाम काही एका रात्रीत झालेले नाही. तेव्हा आजच्या आज त्या एरियाचा जो कोणी संबंधित इंजिनिअर असेल, त्याला तुम्ही सदोष मनुष्यवधाचे कलमाखाली गुन्हा दाखल करून अटक करायला पाहिजे. सस्पेंशन वगैरे काहीही नाही. आताचा हा आधुनिक काळ असल्याने 'सस्पेंशन' असे म्हणता येणार नाही. जेथे डोळ्याला डोळा आणि दाताला दात घेतला पाहिजे तरच अशा लोकांना माणसाच्या जीवाची किंमत कळेल. अन्यथा माणसाच्या जीवाची किंमत कळणार नाही. जी माणसे या घटनेमध्ये मृत्यूमुखी पडली आहेत त्यांचा काय गुन्हा आहे ? वर्तमानपत्रात आलेले फोटो तुम्ही पहा, दोन तीन दिवस आपल्या डोळ्यासमोरून ते जाणार नाहीत. तेथे कुटुंबच्या कुटुंब उद्ध्वस्त झाली आहेत. अगदी घरच्या घर संपलेले आहे. त्यांची उत्तरक्रिया

...... 3एन 3 ...



KBS/KGS/MAP. श्री. गागरे नंतर --- 18:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वा दशक्रिया करण्यासाठी, त्यांच्या अस्थी विसर्जन करण्यासाठीदेखील कोणी शिल्लक राहिलेले नाही. मग अशा गुन्ह्यासाठी आपण काय शिक्षा करणार आहात ? म्हणूनच मुंबई महानगरपालिकेच्या कायद्यात, भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेच्या हातात महापालिकेची सत्ता गेल्याबरोबर त्यांनी केलेला कोठलाही प्रस्ताव सहाव्या मजल्यावर जाऊन तो रद्दबातल करता येईल असे सेक्शन तुम्ही या कायद्यात टाकून घेतले. जे बरखास्तीचे कलम ब्रिटीशांनी देखील घातले नव्हते ते आपण या कायद्यात घातले आहे. श्री.रामराव आदिक मंत्री असताना आणि स्व.वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना त्यांच्या पायात खोडा घालण्यासाठी तुम्ही हे त्यावेळी केले होते. मुंबई ही महाराष्ट्राची राहणार नाही असे स्टेटमेंट शिवसेनेने केल्याबरोबर त्यांना शह देण्यासाठी जो बदल केला आणि 1984 साली मुंबई महानगरपालिकाच बरखास्त करून टाकली. त्यामुळे जनतेच्या हिताच्या अनेक सूचना त्या महापालिकेने नगरविकास खात्याकडे सहाव्या मजल्यावर पाठविले होते. त्याप्रमाणे कधी आपण कायद्यात बदल केला का ? तुम्ही ते बदल करणार नाही. मात्र गिरण्यांच्या जमिनी देण्यासाठी तुम्ही महानगरपालिकेच्या कायद्यात बदल करणार, एक तृतियांश जागा मिळण्यासाठी बदल करणार. ज्या ज्या मुळे तुमच्या पक्षाच्या तिजोरीमध्ये पैसे येऊ शकतील असेच कायदे तुम्ही करणार. जे जनतेच्या सुखामध्ये भर घालतील ते कायदे वा त्याप्रमाणे बदल कायद्यात तुम्ही करणार नाही. म्हणून ही इमारत पडल्याबद्दल सर्वात प्रथम दोषी कोणी असेल तर मुंबई महानगरपालिकेच्या कायद्याची योग्य प्रकारे अमलबजावणी न करणारे आहेत. .....

( यानंतर श्री. सरफरे ..... 3ओ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

या इमारतीच्या दुर्घटनेमध्ये ज्या व्यक्ती मृत झालेल्या आहेत त्यांना भारतीय जनता पक्षाच्या वतीने मी श्रध्दांजली अर्पण करतो. गोविंदा टॉवर पडल्यानंतर त्याबाबत चौकशी करण्याकरिता नेमण्यात आलेल्या श्रीवास्तव समितीने शासनाला दिलेल्या अहवालाची आपण अंमलबजावणी कां केली नाही? हे आम्हाला सांगावे. आणि ही अंमलबजावणी आपण केव्हा करणार आहात? ते देखील सांगावे. या दुर्घटनेची केवळ चौकशी नाही तर या घटनेला जे कुणी संशयित जबाबदार असतील त्यांना 24 तासाच्या आत अटक करावी व त्यानंतर आपल्याला जी काही कारवाई करावयाची असेल ती करावी एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, काल बोरीवली येथे इमारत पडून जी दुर्घटना घडली आहे तो अत्यंत दुर्दैवी प्रकार आहे. या प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेत असतांना यापूर्वी ज्या माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्या विचारांना कलाटणी देऊन माझे विचार मी मांडणार आहे.

सभापती महोदय, यासंबंधीच्या कायद्यामध्ये कोणती तरतूद आहे याची मला माहिती नाही. परंतु कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी करण्याकरिता लोकप्रतिनिधी म्हणून आपणास या सभागृहामध्ये आणि महानगरपालिकेमध्ये नगरसेवकांना बसविले आहे. तेव्हा या कायद्यामध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्याकरिता त्यामध्ये बदल करण्याचा आपल्याला लोकप्रतिनिधी म्हणून अधिकार आहे. सभापती महोदय, या दुर्घटनाग्रस्त इमारतीमध्ये रहात असलेल्या रहिवाश्यांनी तेथील वॉर्ड ऑफिसरकडे इमारतीमध्ये सुरु असलेल्या बेकायदेशीर बांधकामाबाबत तक्रार केली होती. महानगरपालिकेच्या मुख्य अभियंत्यांकडे तक्रार केली होती. परंतु त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही. अशाप्रकारे तक्रारीची दखल न घेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने पोलीस केसेस दाखल केल्या पाहिजेत. सभापती महोदय, उपनगरामध्ये आराखडा तयार करीत असतांना त्यामध्ये देखील अनेक त्रुटी आहेत. उपनगरामधील मलयुक्त जागेवर भराव टाकून त्याठिकाणी नवीन इमारती उभ्या केल्या जात आहेत. त्या दलदलीच्या जागेवर इमारत उभी करीत असतांना इमारतीचे फाऊंडेशन करण्यापूर्वी त्याठिकाणी पाईलींग केले पाहिजे. या दुर्घटनाग्रस्त इमारतीचे बांधकाम करीत असतांना अशाप्रकारे पाईलींग केले होते काय? याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे. तसेच, हे पाईलींग करीत असतांना त्याठिकाणी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची पहाणी केली होती काय? पहाणी न करता त्याबाबतचा खोटा अहवाल तयार करण्यात आला होता काय? याची चौकशी करुन जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला पाहिजे. आपण जे सभागृहामध्ये बोलतो त्याप्रमाणे कारवाई होते असे मंत्रिमहोदयांनी याठिकाणी दाखवून दिले पाहिजे. मुंबई आणि मुंबईच्या परिसरातील मलयुक्त जागेवर भराव टाकून इमारत बांधण्यापूर्वी 18 मीटरपर्यंत पाईलींग करावे लागते. तसे न करता मोठ मोठया मजल्याच्या इमारतींचे बांधकाम सुरु आहे. माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांना सांगू इच्छितो की, आपल्या विभागातील महानगरपालिकेच्या वॉर्डचे क्षेत्र फार मोठे नाही. मला महानगरपालिकेच्या कामकाजाचे चांगल्या प्रकारे ज्ञान नाही. परंतु त्या विभागामध्ये काम करीत

DGS/

श्री. जयंत प्र. पाटील...

असलेले वॉर्ड ऑफिसर बांधकाम सुरु असलेल्या जागेच्या ठिकाणी किती वेळा भेट देतात? एखाद्या इमारतीच्या तळमजल्यावरील दुकानामध्ये जर काही अतिरिक्त बांधकाम केले जात असेल तर त्यावेळी आपले अधिकारी काय करतात? हे पहाण्याची प्रामुख्याने आपल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. तेव्हा याबाबतीत केवळ चौकशी करुन न थांबता माननीय सदस्य श्री. चव्हाण म्हणाल्याप्रमाणे या अधिकाऱ्यांवर तातडीने कलम 302 अन्वये फौजदारी गुन्हे दाखल केले पाहिजेत. जेणेकरुन यापुढे कोणत्याही अधिकाऱ्याला अशाप्रकारे अनधिकृत बांधकाम करण्यास परवानगी देण्याची हिंमत होणार नाही. अशाप्रकारची भूमिका आपल्याला स्वीकारावयाची असेल तर माननीय सदस्य श्री. चव्हाण यांच्या म्हणण्याप्रमाणे कायद्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे.आज ग्रामपंचायतीला जे अधिकार आहे ते पंचायत समितीला नाहीत. आज पंचायत समितीच्या सभापतींना जे अधिकार आहेत ते जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना नाहीत. आज नगरपालिकेच्या नगराध्यक्षांना जे अधिकार आहेत ते महानगरपालिकेच्या महापौरांना नाहीत. याकरिता तुम्ही कायद्यामध्ये बदल करणार आहात की नाही? सरपंचाला असलेले अधिकार नगराध्यक्षांना नाहीत. मी नगरपालिकेमध्ये काम केले आहे परंतु महानगरपालिकेचे कामकाज मला माहीत नाही. महानगरपालिकेमधील वॉर्ड ऑफिसर, मुख्य अभियंता यांचे अधिकार काय आहेत? याची मला माहिती नाही. या दुर्घटनेची आपण न्यायालयीन चौकशी करा, सी.बी.आय. मार्फत चौकशी करा किंवा सी.आय.डी. मार्फत चौकशी करा. परंतु या सभागृहाच्या तीव्र भावना लक्षात घेऊन या इमारतीमधील रहिवाश्यांनी केलेल्या तक्रारीची दखल न घेता त्या इमारतीमधील बेकायदेशीर बांधकामांना परवानगी देऊन ते बांधकाम करण्यास ज्यांनी चालना दिली त्या अधिकाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल केले पाहिजेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ( पुढे सुरू....

जेणे करून उपनगरामध्ये जी घटना घडली ती यापुढे घडणार नाही. आजची परिस्थिती पाहिल्यानंतर मला असे वाटते की, असे अनेक प्रकार पुढे घडण्याची शक्यता आहे. अशा इमारतींची पहाणी करण्याकरिता शासकीय पातळीवर तज्ज्ञ समिती नेमावी. तसा शासनाच्यावतीने ठोस निर्णय जाहीर करावा, अशी या निमित्ताने विनंती करतो.

---

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.मधुकर सरपोतदार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी या विषयावरचा प्रस्ताव मांडलेला आहे. परंतु ते आता सभागृहात उपस्थित नाहीत, बाहेर गेलेले आहेत. याचेच आश्चर्य वाटते की, प्रस्ताव मांडून भाषण करुन निघून जाणे योग्य नाही या प्रस्तावावर इतर सन्माननीय सदस्य काय बोलतात आणि आपण काय बोललो, त्यामध्ये काही त्रुटी होत्या काय, याचा तुलनात्मक अभ्यास प्रस्ताव मांडणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी करण्याची आवश्यकता असते. परंतु तसे घडत नाही. या प्रस्तावावर आमची नावे नाहीत, परंतु त्यास पाठिंबा देण्यासाठी आणि चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आम्ही उपस्थित आहोत.

सभापती महोदय, बोरिवली उपनगरामध्ये जी घटना घडली ती अतिशय भयानक आहे. माझ्या नजरेसमोर 3 ऑगस्ट 1999 साली बांद्रा येथील 'गोविंदा टॉवर' ही इमारत पडली, त्यामध्ये 36 माणसे देवज्ञा झाली तो प्रसंग येतो. ती इमारत पडण्यापूर्वी मी स्वत: मुंबई महानगरपालिकेच्या तीन उपायुक्तांना सातव्या मजल्यापर्यन्त नेवून इमारत दाखविली होती. परंतु मी ती इमारत दाखविल्यानंतर त्या इमारतीचे मालक कारवाई न करण्यासाठी अधिकाऱ्यांना पैसे देऊन गप्प करत असत. माझ्या त्या ठिकाणी जेवढ्या व्हीजिट व्हायच्या तेवढे ते मालक अधिकाऱ्यांना हप्ते देत असत. या अनधिकृत इमारतींकडे त्या भागातील महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचे लक्ष नसेल तर ते अधिकारी कशासाठी नेमायचे ? असा प्रश्न पडतो. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जे सांगितले ते खरे आहे. एका वॉर्ड ऑफिसरकडे 11 वॉर्डचा चार्ज असतो. त्या परिसरात रोज त्यांना फिरता येणे शक्य नाही, परंतु ते अशक्यही नाही. अनधिकृत बांधकाच्याबाबतीत महानगरपालिकेच्या सदस्यांचा अधिकार नसून तो अधिकार महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याचा आहे. मध्यंतरी एका प्रकरणाच्या संदर्भात मी नगरविकास खात्याच्या राज्यमंत्र्यांकडे पत्र दिलेले होते. सन्माननीय मंत्री महोदय, श्री. श्रीकांत सिंह नावाचे अधिकारी आपल्याकडे आलेले होते. ते पश्चिम उपनगराचेही अतिरिक्त आयुक्त आहेत. त्यांच्या अखत्यारितील क्षेत्रामध्ये ही घडलेली आहे. हे आपल्याला माहीत आहे. पाच अनधिकृत आर.सी.सी.स्ट्रक्चरच्या इमारती बांधलेल्या आहेत, मी याबाबत आयुक्तांकडे तक्रार केली. श्री.श्रीकांत सिंह हे त्या वस्तीमध्ये घाबरून जात नाहीत. त्यानंतर मी मंत्री महोदयांकडे तक्रार केलेली आहे. आपल्यासमोर उपायुक्त श्री. पवार आलेले होते. ते चार-पाच वर्षापासून त्या ठिकाणी आहेत. त्यांच्याच क्षेत्रातील उपनगरामध्ये अशा घटना घडत आहेत. असे अधिकारी त्या ठिकाणी असतील तर लोकांचे जीवन कसे सुरक्षित राहील ? हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू....

माझ्यासमोर प्रश्न आहे. जी आज इमारत पडलेली आहे, त्या इमारतीच्या ढिगाऱ्या खालून लोक मोबाईल फोनवरू आम्हाला वाचवा, म्हणून सांगत आहेत. यावरून त्यांची किती केविलवाणी परिस्थिती आहे, याची कल्पना केलेली बरी. त्या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री जाऊन आले. पण शेवटी त्या ठिकाणच्या लोकांचा जीव गेला, त्याचे काय ? हा प्रश्न उभा रहातो. या घटनेला एकमेव कारण आपल्यालाही माहीत आहे. मी एक प्रस्ताव मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी दिला होता.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

मुंबई घरदुरुस्ती मंडळ उपनगराला लागू करावे असा प्रस्ताव या सदनामध्ये आणि बाहेर लेखी स्वरुपात त्यावेळच्या माननीय गृहनिर्माण मंत्र्यांकडे दिलेला आहे. माझ्याकडे त्याच्या प्रती आहेत. या ठिकाणी एकच प्रश्न येतो की, इच्छाशक्ती आहे काय ? या महाराष्ट्रामध्ये फक्त एकच इच्छाशक्ती समर्थपणे काम करीत आहे. मी अन्य देशाच्या बाबतीत बोलत नाही. आज आपल्या महाराष्ट्रामध्ये पैसा कसा कमवावयाचा, कोणत्या माध्यमातून कमवावयाचा हा एकमेव विचार सगळ्यांच्या डोक्यात आहे. ज्या माध्यमातून मिळेल त्या माध्यमातून पैसे घ्यावयाचे. लोकांचा जीव जावो वा राहो, लोकांना जागा मिळो वा न मिळो, कोणाला काही पडलेले नाही. या पार्श्वभूमीवर हे प्रकरण पाहिले पाहिजे. या घटनेमध्ये 24 माणसे मृत्युमुखी पडलेली आहेत. अजूनही ही संख्या वाढत आहे. अनेक लोक जखमी आहेत. त्यामध्ये लहान मुले आहेत. त्या ठिकाणचे दृश्य हृदयद्रावक होते. कोणतीही इमारत पडली की, त्या ठिकाणचे दृश्य असेच असते. मी गोविंद टॉवर बद्दल बोललो. त्यावेळी मी लोकसभेमध्ये होतो. त्यावेळी त्या ठिकाणी बांगलादेशचा प्रश्न चर्चेला आला होता. त्या चर्चेमध्ये गुंतलेलो असताना सभापतींना सांगून बाहेर गेलो. फोनवर बोलून परत सभागृहात आलो. त्यावेळी मला समजले की, गोविद टॉवर ही इमारत पडलेली आहे. त्यामध्ये 36 लोक मृत्युमुखी पडलेले होते. पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे इमारत खाली आली. ज्यांनी त्या ठिकाणी भेट दिली असेल त्यांना याची कल्पना असेल. तशाच पध्दतीने काल ही इमारत पडली. कालची जी इमारत पडली त्या इमारतीचे बांधकाम दुय्यम दर्जाचे होते म्हणून पडली असे मी मानत नाही. त्या इमारतीच्या तळघरामध्ये जास्त स्पेस वाढविण्याच्या प्रयत्नातून काही ठिकाणी कॉलम कापल्यामुळे ती इमारत पडली असावी असा अंदाज आहे. मी त्या ठिकाणी जाऊन पाहिलेले नाही. एवढ्या गर्दीमध्ये आपण जाऊन काही करु शकत नाही. आपल्याकडे काही अधिकार नाही. ज्यांच्या हातात अधिकार आहेत ते माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, हे सगळे त्या ठिकाणी जाऊन आले. माझ्यासमोर एक प्रश्न असा आहे की, आता शासन काय करणार आहे ? महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये काय काय दुरुस्त्या करावयास पाहिजेत याबाबत सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितले. मी त्याची पुनरावृत्ती करणार नाही. माझी अशी सूचना आहे की, मुंबई शहरामध्ये अशा पध्दतीने ज्या ज्या इमारती उभ्या राहात आहेत त्यांचे इन्स्पेक्शन करावे. यासाठी एक स्पेशल टीम तयार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. मधुकर सरपोतदार ...

करावी. यासाठी स्पेशल इंजिनिअर्स घ्यावेत, जे कोणत्याही दबावाखाली येणार नाहीत, भ्रष्टाचाराला बळी पडणार नाहीत आणि खरा अहवाल देतील आणि शासनासमोर वस्तुस्थिती सादर करतील अशी टीम तयार करावी. या पध्दतीने मुंबई शहरामध्ये आणि उपनगरांमध्ये होणारी सगळी बांधकामे पाहिली तर या ठिकाणी सिमेंटच्या जंगलासारख्या इमारती उभ्या राहिलेल्या आहेत. ज्या सात मजली, नऊ मजली, पंधरा मजली इमारती मुंबईमध्ये उभ्या राहतात त्यांचा पाया किती आहे, समोर जागा किती आहे, उद्यानासाठी किती जागा आहे, सोयीसुविधा किती आहेत, पार्किन्गसाठी किती जागा आहे, प्रवेश करण्यासाठी जागा आहे की नाही, याची पाहणी करुन त्या इमारतींना कोणती सुरक्षितता बहाल करण्यात आली आहे या गोष्टी पाहण्याची आवश्यकता आहे. ते जर आपण करु शकलो तर त्यातून काही मार्ग मिळेल. मार्ग मिळाला तर दिशा मिळेल. दिशा मिळाली तर प्रयत्न करुन इलाज करु शकतो. आपले अश्रू नक्राश्रू म्हणून न ढाळता त्याचे रुपांतर खऱ्या अश्रूमध्ये करावे आणि जी माणूसकी नावाची गोष्ट आहे त्याचा विचार करावा. लहान मुलांचा, त्या कुटुंबांचा विचार करावा. ज्यांचे घर गेले ते कोठे राहतील याचा विचार करा. आपण त्यांना कोणती मदत करणार आहात ? आपण सांगितले की, त्यांना संक्रमण शिबिरात ठेवणार. आपली संक्रमण शिबिरे कशी आहेत ते तपासून बघावे. जोगेश्वरीतील म्हशीचे गोठे यापेक्षा चांगले आहेत. अशी संक्रमण शिबिरे महाराष्ट्र शासनाने बांधलेली आहेत. जनावरांसाठी आणि माणसांसाठी एकाच प्रकारची व्यवस्था हा काय प्रकार आहे ? याला भ्रष्टाचार हे एकमेव कारण आहे. चारही बाजूला जबरदस्त भ्रष्टाचार आहे. त्यामध्ये खऱ्या माणुसकीचे दर्शन होत नाही. त्यामध्ये खरे दर्शन हे लक्ष्मीदर्शन आहे. यासाठी सगळे कार्यक्रम चालू आहेत. माझी माननीय मंत्रिमहोदयांना एकच विनंती आहे. आपण सर्व्हे करावा. काल जी इमारत पडली ती एवढी जुनी नव्हती. ती 20-22 वर्षापूर्वीची इमारत आहे. ती इमारत पडण्याला दुसरे कारण नाही. त्या इमारतीचा अर्धा भाग कोसळला आणि अर्धा भाग आजही उभा आहे. जो भाग कोसळला त्याच्या तळमजल्यावर अशा प्रकारे कॉलम कापण्याचा प्रकार केला असे सर्व वर्णनावरुन दिसते. तेच कारण असावे. त्यामुळेच तो संपूर्ण भाग कोसळला. त्या इमारतीचे सात मजले होते. एका मजल्यावर 3 याप्रमाणे 21 कुटुंबे असतील असा माझा प्रथमदर्शनी अंदाज आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

कदाचित हा अंदाज चुकीचा असेल कारण मी वस्तुस्थिती प्रत्यक्ष पाहिलेली नाही. माझी एकच सूचना आहे की, मुंबई उपनगरासाठी देखील अस्तित्वात असलेले घर दुरुस्ती मंडळ तातडतोबीने अंमलात आणावे आणि अशा इमारतींचे संरक्षण करावे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी सांगितले की, मुंबई शहरामध्ये राहाण्यासाठी धोकादायक अशा एकूण 19 हजार इमारती आहेत. त्यातील 16 हजार इमारती तातडीने दुरुस्ती करावयाच्या आहेत. 3 हजार इमारती एक-दोन वर्षांनी दुरुस्त केल्या तरी चालतील. राहाण्यास धोकादायक असलेल्या सर्व इमारतींची पाहणी करण्यात आली होती आणि त्या पार्श्वभूमीवर शिफारशीही करण्यात आल्या होत्या. त्या शिफारशीमध्ये आमचा देखील थोडासा भाग आहे. तेव्हा याबाबतीत शासनाने निर्णय घेण्यासाठी उशीर करु नये. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील शक्यतो लवकर निर्णय घेऊ, फक्त काही फॉरमॅलिटीज पूर्ण व्हावयाच्या आहेत, असे सांगितले होते. या फॉरमॅलिटीज पूर्ण होईपर्यंत आणखी किती इमारती कोसळणार आहेत हे मला माहीत नाही. अशा प्रकारे इमारती कोसळून लोकांचे मुडदे पडतात ते पडू नयेत, मनुष्य हानी होऊ नये, अशा इमारतीतील लोकांना संरक्षण मिळावे, त्यांना चांगला आधार मिळावा, त्यांचे जीवन सुखी व्हावे, समृध्द व्हावे, त्यांना चांगले जीवन जगण्याची संधी मिळावी आणि अशा प्रकारे इमारत कोसळण्याच्या घटना पुन्हा घडू नयेत म्हणून शासनाने काळजी घेण्याची आवश्यकता आहे. नवरे इमारतीची गोष्ट आपणा सर्वांना माहीत आहे. गोविंदा टॉवर ही इमारत पडली. त्या प्लॉटवर आज रॉ-मटेरियल पडलेले आहे. प्रत्यक्षात ती सोसायटी उभी राहिली नाही. सात माळयांची ती इमारत होती. त्या इमारतीच्या दुर्घटनेमध्ये मेले ते सुटले आणि मागे जे शिल्लक राहिले त्यांना आज कोणी आसरा दिलेला नाही. हायकोर्टाने निर्णय दिलेला असताना देखील त्या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. गोविंद टॉवर इमारत जशी कोसळली त्याप्रमाणे ही लक्ष्मी छाया इमारत कोसळली. लक्ष्मी कोणाला भेटली मला माहीत नाही. परंतु लक्ष्मी दर्शन पार पडल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. सन्माननीय राज्यमंत्री महोदय श्री.राजेश टोपे, यांनी माझी यासंदर्भातील विनंती आणि सूचना विचारात घ्यावी. मंत्री महोदय, आपण एक कॉम्प्रेहेन्सिव्ह योजना तयार करा, ती योजना या सदनामध्ये मांडा. कारण अशा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

बाबतीत इलाज करण्यासाठी काही तरी मार्ग शोधला पाहिजे. तसेच शक्यतो लवकरात लवकर घर दुरुस्ती मंडळाचा कारभार संपूर्ण उपनगरामध्ये सुरु करा. या दुर्घटनेमध्ये जी माणसे मरण पावली आहेत, परमेश्वराला प्रिय झाली आहेत त्या सर्वांना विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो आणि जे जिवंत आहेत, जखमी झाले आहेत त्यांना दीर्घायुष्य लाभो, त्यांच्या जीवनात लवकर आराम पडो अशी प्रार्थना करतो. या लोकांचे जीवन सुस्थिर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मदत करावी, त्यांची देखभाल करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मुंबईत आता माणसाच्या मरणाला किंमत राहिलेली नाही. बॉम्बस्फोट झाले, सर्व काही उद्‌ध्वस्त झाले, इमारत कोसळली, माणसे मेली की दुस-या दिवशी वर्तमानपत्रामध्ये मोठी बातमी येते की, मुंबई पुन्हा उभी राहिली. किती मेले आणि किती जगले या पेक्षा मी जगतो की नाही, माझे जगणे कसे असेल असे प्रश्नचिन्ह घेऊन मुंबईचा माणूस जगत असतो. गोविंद टॉवर इमारत पडली. त्यानंतर किती तरी इमारती पडल्या. जे मेले त्यांचे कुटुंबीय आजही त्यांची आठवण काढीत असतील. आपण आज एक दिवस चर्चा करु आणि या चर्चेनंतर  इमारती पडतील, पण गांभीर्याने घेतो कोण, हा मूळ प्रश्न उभा राहातो. मुंबई हे बेट आहे. ठाणे शहर त्याला लागून आहे पण बेटच आहे. या दोन्ही शहरांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. या समस्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्यामुळे आज इमारत कोसळण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. स्ट्रक्चरल इंजिनिअर्स्, वॉर्ड ऑफिसर्स, बिल्डिंग इन्स्पेक्टर काय करतात, कोणाची जबाबदारी काय आहे हे कोण पाहाणार ?ओ.सी. कमेन्समेण्ट सर्टिफिकेट आणि कम्प्लिशन सर्टिफिकेट या तीन गोष्टी देत असताना त्यामध्ये जे काम करावयाचे आहे ते काम करण्याची जबाबदारी कोणी तरी स्वीकारावी.

...नंतर कु. खर्चे..

JPK/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम एम. ..... 18:25

श्री.जितेंद्र आव्हाड.....

महाराष्ट्र शासनाने कायदा केला की, ज्या वॉर्डमध्ये अनधिकृत बांधकाम झाले तेथील वॉर्ड ऑफिसरला ताबडतोब सस्पेंड करण्यात येईल आणि त्या अनधिकृत इमारतींवर कर बसविला जाईल तरीदेखील ठाण्यामध्ये आज अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकाम झालेले आहे. कोणालाही कोणाचा पायबंद नाही. अगदी बिनधास्त ठाण्यामध्ये या आणि कितीही मजले बांधा. ठाण्यामध्ये अनधिकृतपणे इमारतीचा प्लॅन पास होत नाही. ग्राऊंड प्लस एक, ग्राऊंड प्लस नाईन, ग्राऊंड प्लस सेवेन अशा इमारतींचे प्लॅन अगदी बिनधास्तपणे पास होतात, परंतु अधिकृतपणे पास झालेल्या प्लॅनप्रमाणे खरोखर बांधकाम झाले आहे काय ? हे बघावयालाही कोणी अधिकारी जात नाही. आपण जर संबंधित अधिका-याला अनधिकृत बांधकामाबाबत विचारले तर तो ऑफिसर सांगतो की, या बांधकामावर कोर्टाचा स्टे आहे. कोर्टाचा जर स्टे असेल तर मग ती बिल्डींग कशी बांधली जाते ? कोर्ट काय सांगते की, " Status - quo should be maintained " पण कोर्टाने बिल्डींगच्या बांधकामाच्या ज्या अवस्थेमध्ये स्टे दिलेला असतो त्या अवस्थेमध्ये ती बिल्डींग राहते कुठे ? ती तर बांधून पूर्णही झालेली असते. ठाण्यामध्ये साईराज बिल्डींग कोसळली होती त्यावेळी तेथे 26 माणसे मृत्यूमुखी पडली होती. मागच्या अधिवेशनामध्ये याबाबत आश्वासन देण्यात आले होते की वाढीव एफएसआय देण्यात येईल. परंतु आजपर्यंत ते काही झालेले नाही. यावर मला आता एका चित्रपटातील एक डायलॉग आठवतो तो असा की," गरीबोंकी जान क्या जान नहीं होती ?"

सभापती महोदय, उपनगरांसाठी आणि ठाण्याकरिता घर दुरुस्ती आणि पुर्नरचामंडळाची मागणी करुन ठाण्यातील लोक कंटाळले, तरी अद्यापही ते मिळालेले नाही. सभागृहामध्ये " On the floor of the house " याबाबत आश्वासन देण्यात येते आणि नंतर त्याचे काय होते ? हे माझ्यासारख्या सदस्याला देखील समजत नाही. परंतु यामुळे एकंदरीत सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेता राजकारण्यांच्या क्रेडिटीबिलीटीबाबत शंका निर्माण होते. भ्रष्टाचार कोणीही करा पण तेथील आमदारंबाबत शंका निर्माण होते की त्याला मिळाले असतील, नगरसेवकालाही मिळाले असतील. परंतु त्यांना काहीच मिळत नाही. शासकीय अधिकारी याबाबतीत फार हुशार झाले आहेत, हे बोलण्याची हिम्मत आजपर्यंत कोणीही केली नाही मी करीत आहे. आमदारांना कोणीही विचारत नाही, नगरसेवकालाही कोणी विचारत नाही. अनधिकृत बांधकामामध्ये गुंतलेले अधिकारीच

3S - 2

श्री.जितेंद्र आव्हाड.......

यामध्ये दोषी आहेत. या अधिका-यांवर सभापती महोदय, हे ऑन रेकॉर्ड आहे की, जर याबाबत तेथील टेनण्ट कंपलेंट केली तर कलम 304 अंतर्गत पोलिसांनी त्यांना बेडया ठोकल्या पाहिजेत तेव्हाच अनधिकृत बांधकाम थांबेल. इमारतीमध्ये स्ट्रक्चरल चेंजेस केले जाते. यासाठी इमारतीचे मालक सर्व संबंधित याकडे दुर्लक्ष करतात. अरे कुठं फेडाल हे पाप ? आपण कायदे करतो पण त्याची अंमलबजावणी होते की नाही, ते पाहण्याची जबाबदारी कोणावर आहे ? कोणत्या नगरसेवकाला कोणता कमिशनर जुमानतो ? एका ठिकाणी तर एका कमिशनरच्या कार्यालयाच्या बाहेर मी एक पाटी वाचली की भेटण्याची वेळ दुपारी 2 ते 4 म्हणजे यावेळेत लोकांनी किंवा लोकप्रतिनिधींनी कमिशनरला जाऊन भेटावे ? सभापती महोदय, आजकाल लोकप्रतिनिधींना काही किंमतच राहिलेली नाही. कारण लोकप्रतिनिधी,आमदार,नगरसेवक हे काय करु शकतात ? अशी शंका जनमाणसांच्या मनामध्ये निर्माण झालेली आपल्याला आढळून येईल. एकदा विक्रम टॉवर्समध्ये एका माणसाने जीव दिला होता आणि त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे आणि मी दोन वर्षापूर्वी प्रश्न उपस्थित केला होता आणि आम्हाला आश्वासन देण्यात आले होते की, तेथे ॲडिशनल कमिशनर, एन्क्रोचमेंट, देणार आजपर्यंत तेथे ॲडिशनल कमिशनर आलेला नाही. सभापती महोदय, ही बिल्डर लॉबी खूप पॉवरफुल आहे. आमचे म्हणणे असे होते की ठाण्यामध्ये जवळ जवळ 70 टक्के बांधकामे अनधिकृत आहेत, ज्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे होतात तेथील कर्मचारी वर्ग आहे, तो वर्षानुवर्ष तेथे असल्यामुळे त्याचेही त्या ठिकाणी नातगोतं निर्माण होते व काही वेळेला दबावही टाकला जातो आणि यामध्ये त्यांचाही सहभाग असल्यामुळे काही कारवाई होत नाही व भ्रष्टाचार चालू आहे, तरी आमचे म्हणणे असे होते की, तुम्ही तेथे बाहेरुन चांगला असा स्टाफ नेमा की, ज्याच्यावर मॉनिटरी इन्फ्लुएन्स, पॉलिटिकल इन्फ्लुएन्स,सोशल इन्फ्लुएन्स,राहणार नाही याबाबतही सभागृहामध्ये आम्हाला आश्वासन देण्यात आले होते की, तेथे आम्ही ॲडिशनल कमिशनर देऊ परंतु आतापर्यंत तो कमिशनर आलेला नाही, त्यानंतर तेथे तीन इमारती कोसळल्या. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील जे बोलले ते खरे आहे, बिल्डर कशाला तेथे पाईलिंग आणि हार्डरॉक शोधावयाला जाणार आहे? तो विदआऊट क्युरिंग खटाखट सात मजले उभारले की निघाला कारण तेथे अनधिकृत बांधकामासाठी परवानगी मिळण्याकरिता येथे शासकीय अधिका-यांचे रेट्स ठरलेले आहेत. 100 ते 200 रुपये किंवा 100

3S - 3



JPK/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम एम. ..... 18:25

श्री.जितेंद्र आव्हाड......

ते 400 रुपये प्रति फुट या प्रमाणे ते रेट्स आहेत. ठाण्यामध्ये 400 रुपये प्रति स्क्वेअ्र फुट अधिका-याला द्यावयाचे आणि खारेगावला 150 रुपये प्रति स्क्वेअ्र फुट अधिका-याला द्यावयाचे. सदर रेट्स हे जागेवर अवलंबून आहेत, बांधा पाहिजे तेवढया बिल्डींग्स असे प्रकार येथे घडतात. काय करणार तुम्ही या अधिका-यांना ? आणि आम्ही लोकप्रतिनिधींनी मात्र फुकट बदनामीच ओझ घेऊन का जगावयाचे ?

यानंतर श्री कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 18:30

श्री. जितेंद्र आव्हाड ....

सभापती महोदय, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे आणि तो दिवसेंदिवस वाढणार आहे. आज जर ठोस निर्णय घेतला नाही आणि कायद्याचा बडगा उगारला नाही तर हे प्रकरण आणखी गंभीर होईल. वर्षे लोटली जातील,इमारती जुन्या होत जातील आणि त्या लॉजीकली कोसळतील आणि प्रकरण वाढत जाईल. इमारती कोसळू नयेत अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे. पण हे प्रकार कोण रोखणार हा आमच्यापुढे महत्वाचा प्रश्न आहे. बांधकाम करताना जे रॉ मटेरिअल वापरले जाते त्याचे ठराविक एक परसेंटेज आहे. रेती किंवा सिमेंट किती वाळू किती मिक्स करावयाची याचे परसेंटेज आहे. पण बांधकाम करताना कोणीही चेकींगला जात नाही. अधिकारी केबिनमध्ये बसून परवानगी देण्याची उद्योग करीत असतात. दादरपासून पुढे कुलाब्यापर्यंतच्या इमारती का पडत नाहीत ? या भागातील इमारती प्लॅनिंग करुन उभ्या राहतात. या भागात अनधिकृत बांधकामे कमी आहेत. हीच परिस्थिती दहिसर,बोरिवली आणि ठाणे या भागात का नाही ? कारण वरच्यांचे आशिर्वाद आहेत. वरळीच्या समुद्रात भराव टाकून बांधकाम केले जात आहे. मुंबईमध्ये माणसाला किंमत राहिलेली नाही. ऑफीसला लवकर जायचे म्हणून लोक प्रेतावरुन उडया मारुन जातात....

**तालिका सभापती** ( श्री. उल्हास पवार) : माननीय संसदीय कार्यमंत्री कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहात मांडू इच्छितात आणि मी त्यांना तशी परवानगी देत आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, एका अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा चालू असताना संसदीय कार्यमंत्र्यांना अहवाल मांडण्याची एवढी घाई का आहे ? माणसांच्या मृत्यूपेक्षा संसदीय कार्यमंत्र्यांना कामकाज सल्लागार समितीचा अहवाल महत्वाचा वाटतो काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, अधिवेशनासंदर्भात कामकाज सल्लागार समितीची बैठक झालेली आहे. त्याचा अहवाल मी दोन मिनिटात मांडू इच्छितो.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो :-

विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरुवार दिनांक 19 जुलै,2007 रोजी दुपारी 4.30 वाजता विधानभवन,मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने विचार-विनिमय करुन सोमवार दिनांक 23 जुलै,2007 ते गुरुवार दिनांक 2 ऑगस्ट,2007 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला.

**<u>जुलै 2007</u>**

सोमवार, दिनांक 23 : **1.** सन 2007-08 च्या पूरक मागण्यांवर चर्चा(पहिला दिवस)
**2.** शासकीय विधेयके

मंगळवार,दिनांक 24 : सभागृहाची विशेष बैठक( सकाळी 10.00 ते दुपारी 12.00)
सन 2007-08 च्या पूरक मागण्यांवर चर्चा(दुसरा व शेवटचा दिवस)
सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वा.
**1.** शासकीय विधेयके.
**2.** विरोधी पक्षाचा प्रस्ताव (कायदा आणि सुव्यवस्था)

बुधवार, दिनांक 25 : **1.** पुरवणी विनियोजन विधेयक.
**2.**शासकीय विधेयके.

गुरुवार, दिनांक 26 : बैठक होणार नाही.

शुक्रवार, दिनांक 27 : बैठक होणार नाही.

शनिवार, दिनांक 28 : बैठक होणार नाही.

रविवार, दिनांक 29 : सुट्टी

सोमवार, दिनांक 30 : **1.** शासकीय विधेयके
**2.**सत्ताधारी पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा

...3



SSK/ KGS/ MAP/ 18:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संसदीय कार्यमंत्री ...

मंगळवार, दिनांक 31 : 1. शासकीय ठराव(नागरी कमाल जमीन धारणा कायदा रद्द करण्याबाबत)

2. शासकीय विधेयके

3. अशासकीय कामकाज -विधेयके (गत सत्रातील प्रलंबित)

**<u>ऑगस्ट, 2007</u>**

बुधवार, दिनांक 1 : 1. शासकीय विधेयके

2. अंतिम आठवडा प्रस्ताव

गुरुवार, दिनांक 2 : 1. शासकीय विधेयके

2. नवीन गृहनिर्माण धोरणासंबंधातील चर्चा.

**तालिका सभापती** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-------

......4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**.: बोरिवली (मुंबई) येथील "लक्ष्मी-छाया" इमारत कोसळून 11 जणांचा मृत्यू होणे.

**मु.शी**.: बोरिवली (मुंबई) येथील "लक्ष्मी-छाया" इमारत कोसळून 11 जणांचा मृत्यू होणे या विषयावर सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील, शरद पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री दीपक सावंत, अनिल परब, अरविंद सावंत यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

( चर्चा पुढे सुरु...)

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. ठाणे आणि मुंबई येथे जी दलदल आहे त्या दलदलीच्या क्षेत्रामध्ये या बेटांचे रुपांतर शहरात केले गेले आहे. यामध्ये संलग्नता आणली आहे. याठिकाणी रॉक किंवा मातीचे भराव कोठे आहेत हे महानगरपालिकेच्या एखाद्या अभ्यास गटाने तपासून पाहिले आहे काय ?

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड....

मला सांगा, जर या स्ट्रक्चरल चेंजेसबाबत कोणी तक्रार केली असेल, डीएमसीकडे तक्रार केली असेल तर तो याला जबाबदार नाही का? का वॉर्ड ऑफिसरला दोषी धरायचे? जर डीएमसीकडे तक्रार दिली असेल आणि त्याच्या कॉम्प्युटरवर नोंद असेल, अमुक अमुक दिवशी क्ष नावाच्या माणसाने तक्रार केली आहे, मग त्याने नोंद का घेतली नाही. सगळ्यांचे हात वरपासून खालपर्यंत पोहोचलेले आहेत. यामध्ये कोणी सुटलेले नाही. यात प्रत्येक अधिकारी दोषी आहे. प्रत्येकजण यात आहे. स्पर्धा आणि पैसा हे एकमेव कारण आहे. सभागृहाची एक टीम बनवा, मी ठाण्याला आता सुरु असलेली अनधिकृत बांधकामे रात्रीच्या वेळी दाखवायला तयार आहे. गांभीर्याने घेतले नाही तर मृत्यूचे तांडव आज कमी प्रमाणात असले तरी 20 वर्षानंतर प्रचंड प्रमाणात होईल. अनधिकृत बांधकामे गेल्या 10-15 वर्षात झालेली आहेत. मुंबई एवढी बकाल कधी नव्हती. ठाणे एवढे बकाल कधी नव्हते. बिल्डर्सना जेव्हा कळले की यामध्ये प्रचंड पैसा आहे, अधिकाऱ्यांना कळले यामध्ये शासन काही बघत नाही तेव्हा अनधिकृत बांधकामे उभारायला सुरुवात झाली. ठाण्याच्या किसननगरमध्ये एक इमारत पडली तरी किमान 20-25 इमारती आडव्या होतील. पलिकडच्या इमारतीत चपाती- मेथी भाजी द्यायची असेल हात बाहेर काढला तरी चपाती आणि मेथी भाजी दुसरीकडे पोहोचेल. पर्यावरणाची काळजी नाही. इन्फ्रास्ट्रक्चरची सुविधा नाही अशा प्रकारे इमारती उभ्या राहिल्या आहेत. प्रश्न असा आहे की, एवढे गंभीर प्रकरण असताना या इमारतींमध्ये राहणाऱ्या इसमांचे तुम्ही काय करणार आहात? अनधिकृत बांधकामामध्ये ते लाचार रहायला गेले. रिअल इस्टेटचे भाव वर जात आहेत त्यामुळे मध्यमवर्गीय मराठी माणूस स्वत:च्या घराचे स्वप्न बघू शकत नाही. त्यामुळे अनधिकृत बांधकामे निर्माण होत आहेत. प्रत्येक माऊलीला वाटते, आपल्याला झोपायला जागा असावी, शौचालयाची स्वतंत्र सुविधा असावी, झोपडपट्टीमध्ये राहण्यापेक्षा मुंबईच्या पलिकडे ठाण्यामध्ये, दहिसरमध्ये अनधिकृत बांधकाम असले तरी स्वतंत्र एक-दोन रुमचा ब्लॉक मिळाला तर ती खूष होते. आपल्या संसाराचा गाडा चालवते. ती आपल्या कुटुंबासह रहायला जाते. ही स्पर्धेची चूक आहे. मुंबईमध्ये एक फूट जागेला लाख रुपये लागणार अशी बातमी वृत्तपत्रात अभिमानाने छापायला लागलो तर येथील गरीब माणूस कधी वर येणार नाही. स्वस्तात घरे मिळणार नसतील तर अनधिकृत बांधकामामध्ये राहून आपली भूक भागवावी म्हणून माणूस तेथे रहायला जातो. जी अनधिकृत बांधकामे आहेत त्यांचे काय करणार





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड....

आहात? लक्ष्मी-छाया इमारत पडली, ठाण्यामध्ये साईराज इमारत पडली. तेथील कुटुंबे आजही बेघर आहेत. 36 माणसे मृत्यूमुखी पडली. 42 कुटुंबे वाऱ्यावर आली. शासनाने आजपर्यंत काहीही केले नाही. 15 दिवसात ठाण्यामध्ये दोन इमारती कलंडल्या आहेत. लिनिंग टॉवर ऑफ पिसा अशाप्रकारच्या इमारती ठाण्यामध्ये अनेक ठिकाणी पहायला मिळतील. जाणार तरी कुठे? तक्रार कोणाकडे करणार? शासन याबाबतीत गंभीर नाही. ॲडिशनल एफ.एस.आय.ची वारंवार मागणी करुनही ती मान्य केली जात नाही. कधीतरी हे प्रकार थांबवा. काहीतरी निर्णय घ्या. यापुढे एकही अनधिकृत वीट बांधकाम झाले तर डीएमसी सहित आयुक्तांपर्यंत सगळयांना जबाबदार धरले जाईल असा निर्णय झाला तरच हे प्रकार थांबतील. त्यांची इमारत पडल्यानंतर तेथे राहणाऱ्यांना काय करायचे? त्यांच्यासाठी संक्रमण शिबीरे नाहीत. त्यांनी रहायचे कुठे? ठाण्यामध्ये जवळजवळ 892 इमारती अनधिकृत आणि धोकादायक म्हणून जाहीर झालेल्या आहेत. अनधिकृत आणि धोकादायक म्हणजे अनधिकृत इमारतींमध्ये राहणाऱ्यांना तुम्ही संक्रमण शिबीरांमध्ये नेणार नाही, 892 इमारती अशा आहेत ज्या एसआरएमध्ये घ्यायला हरकत नाही. तळमजला अधिक पाच मजले अशा इमारती आहेत. हवा खेळण्याची जागा उरलेली नाही. 1 लाख कुटुंबे अशा इमारतींमध्ये रहात आहेत. जी परिस्थिती काल लक्ष्मी-छाया इमारतीची झाली, साईराज इमारतीची झाली किंवा गोविंद टॉवरची झाली तीच परिस्थिती आज ना उद्या ठाण्यातील या सगळ्या इमारतींची होणार आहे.

(नंतर श्री.ए.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.भोगले...... 18:40

श्री.जितेंद्र आव्हाड..........

मी वारंवार सांगत आहेत की, शासनाने काहीतरी कठोर नियम केले पाहिजेत. ॲडीशनल एफएसआय देता येईल का, घर दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाकडे देता येईल काय ते पहावे. गरिबांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे की नाही याचा शासनाने विचार करावा. अनधिकृत इमारतीमध्ये रहायला गेला ही त्याची चूक आहे, त्यासाठी त्याला दंड करा. परंतु त्याला मृत्युकडे जाण्याचा मार्ग सोपा करुन देऊ नका. आज अत्यंत दयनीय अवस्थेत लोक राहत आहेत, समोर मृत्यू आणि दुसरीकडे आधार देणारा कोणीही नाही. या काळजीत तो दिवसेंदिवस खचत चालला आहे. पण करणार काय ? जाणार कोठे ? बिल्डर त्याची जबाबदारी टाकून निघून गेलेला आहे, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी गलेलठ्ठ पैसे घेतलेले आहे. या विरुध्द लोकप्रतिनिधी बोंबलून काही फायदा होत नाही. सर्वात दु:खाची बाब अशी की, चुकीची कामे करुन जाणारे मोकळे होतात आणि निष्पाप लोकांना त्यांच्या कर्माची फळे भोगावी लागतात. अशा पापांचे आम्हाला धनी व्हायचे नाही. मी हा शब्द अशासाठी वापरीत आहे की, कुठेतरी कायद्याची तलवार अशा लोकांच्या मानेवर चालवा. येथील नोकरशाही हुकूमशाही प्रमाणे वागायला लागली, आपणच कायदे बनवितो आणि आपणच ते वापरावयाचे असतात, लोकप्रतिनिधींची पोलिटीकल विल संपलेली आहे अशा तोऱ्यात वागायला लागली तर त्यास लगाम घालणे आवश्यक आहे. मी सांगू इच्छितो की, हे सभागृह अस्तित्वात आहे. लोकप्रतिनिधींची पोलिटीकल विल संपलेली नाही. तुमची आणि आमची प्रतिमा मलीन होत आहे. जनतेच्या मनात जे प्रश्न उभे राहिले आहेत त्यास कोण जबाबदार आहे ? आपण ही जबाबदारी आपल्या अंगावर घेतो. या जबाबदारीच्या जाणिवेतून आपण असे काही करु या की, यातून गरीब माणसांना मार्ग सापडेल आणि त्यास कुठेतरी आधार मिळेल. ज्यांनी खरोखर वारंवार हात ओले करुन घेतले, ज्यांनी इतरांना मृत्युचा मार्ग मोकळा करुन दिला त्यांना दंडाची शिक्षा करावी अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, आज मुंबई आणि ठाणे शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झालेली आहेत त्याबाबत चौकशी करण्यासाठी एका निवृत्त न्यायाधीशाची समिती नेमावी. त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.जितेंद्र आव्हाड..........

प्रत्यक्ष पाहणीसाठी पाठवावे. प्रत्यक्ष बिल्डींग तपासण्यास सांगावे. खोटे प्लॅन, खोटे शिक्के करुन बँकेकडे ते शिफारशीसाठी पाठविले जातात. त्यावर कर्ज काढले जाते. तेव्हा अशा झारीतील शुक्राचार्यांना वठणीवर आणण्यासाठी आपणास कठोर पावले उचलावी लागतील. या दुर्घटनेमध्ये जे मृत्युमुखी पडले त्यांना श्रध्दांजली अपर्ण करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

------------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( मुंबई पदवीधर ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 97 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ही अतिशय दुर्दैवी घटना आहे. याठिकाणी चर्चा करणे आणि त्यावर कोणतीही उपाययोजना न होणे ही त्यापेक्षा दुर्दैवी बाब आहे. बोरिवली येथील लक्ष्मी छाया ही सात मजल्याची इमारत पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली. मुंबई महानगरपालिका, राज्य शासन, आणि अग्निशमन दल आपले कष्ट पणाला लावून मातीचे ढिगारे उपासण्याचे काम करीत आहेत. परंतु या ढिगाऱ्याची उंची जवळपास 25 ते 30 फूट आहे. मुंबईमध्ये अनेक इमारती वेगवेगळ्या कारणांमुळे कोसळल्या आहेत. परंतु काही कारण नसताना एकाच्या चुकीमुळे ही इमारत कोसळली आहे. अशा व्यक्तीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे. कुणाच्या जीवाशी कुणालाही खेळण्याचा अधिकार नाही.

सभापती महोदय, काही दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात बातमी आली होती की, मालाड पश्चिम येथील लिबर्टी गार्डन जवळील एक इमारत पूर्ण कलली आहे. महानगरपालिकेने ती इमारत खाली केलेली आहे. परंतु ती अद्यापपर्यंत पाडलेली नाही.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

आपण कोणाची वाट पाहत आहात ? ती इमारत पडावी आणि त्या खाली माणसे मरावीत, याची आपण वाट पाहणार आहात का ? याबाबतीत अजूनपर्यंत निर्णय होत नाही. याच पश्चिम उपनगरातील ही गोष्ट आहे. मुंबई महापालिकेतील अधिकारी बेपरवाई आहेत, याचे हे मृतिमंत उदाहरण आहे. मघाशी आमच्या दादांनी सांगितले की, श्री.विठ्ठल पवार हे अधिकारी गेल्या 6 वर्षापासून तेथेच आहेत. वास्ततिक पाहता, 3 वर्षानंतर बदली होणे आवश्यक असते. मग, हा माणूस गेल्या 6 वर्षापासून एकाच ठिकाणी कसा काय राहू शकतो ? कुठल्याही आमदाराने, खासदाराने किंवा नगरसेवकाने शिफारस न करताही हा माणूस तेथे कसा काय राहू शकतो ? यामध्ये काय गौडबंगाल आहे ? वर्धमान ज्वेलर्समध्ये अनधिकृत पिलर्स् बांधणारी ही व्यक्ती कोण आहे ? त्यांना तशी परवानगी देणारी व्यक्ती कोण आहे ? सभापती महोदय, मी सांताक्रुझमध्ये राहतो. मी मध्यंतरी तेथील सहाय्यक कार्यकारी अभियंता श्री.घाटे यांना एक पत्र लिहिले होते. सांताक्रुझ येथे जूनी बिल्डींग असून खाली दुकान व वर घरी अशी पध्दत आहे. परंतु त्याठिकाणी वरचे घर निघून त्यापठिकाणी 1 + 1 दुकाने झालेली आहेत. ती सर्व मेन मार्केटमध्ये झालेले आहे. याबाबतीत त्या अभियंत्याने मला लेखी कळवले की, यापैकी कुठेही अधनिकृत बांधकाम झालेले नाही. परंतु आज त्याठिकाणी मोठमोठे शोरुम झालेले आहेत. सिजन, सखीसारखी मोठमोठी शोरुम्स् तेथे झालेली आहेत. खाली 250-300 फुटाचे दुकान, त्याच्या खाली बेसमेंट व वर 1 + 1 दुकाने झालेली आहेत. अशाप्रकारे लोकप्रतिनिधींनी दिलेल्या पत्रांची ते वासलात लावतात. हे अधिकारी असे माजलेले आहेत. माजलेले हा शब्द वापरणे सुसंस्कृतपणाचे लक्षण होणार नाही, परंतु अशा अधिकाऱ्यांना हाच शब्द लागू पडतो. अशाप्रकारच्या अनेक इमारती आज पश्चिम उपनगरात येत आहेत. अशा इमारती पाहण्यासाठी कुठलाही अधिकारी तेथे जात नाही. मघाशी क्वॉलिटी कंट्रोलचा चांगला विषय निघाला. ज्या ज्या इमारतींना आपण 6 महिन्यांमध्ये परवानगी दिलेली आहे, त्यांची पुन्हा तपासणी करण्याची आवश्यकता आहे. गेल्या 6 महिन्यांमध्ये शेकडो इमारतींना आपण पश्चिम उपनगरात परवानगी दिलेली आहे. मी ज्याठिकाणी राहतो, त्याठिकाणी 4 नवीन इमारती येत आहेत. याबाबतीत मी आपल्याकडे पत्रही दिलेले आहे. या इमारतींचे काम लवकरात लवकर करण्याचे काम काय ? कारण, तेथील रहिवाशांना प्रतिमहा

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

25-26 हजार रुपये भाडे द्यावे लागू नये म्हणून इमारतींचे काम लवकरात लवकर करण्याचे बिल्डरांचे प्रयत्न असतात. लवकर काम होण्याच्या दृष्टीने ते घिसाडघाईने पूर्ण केले जाते व त्यामुळे कामाची क्वॉलिटीही बिघडून जाते. पावसाळयामध्ये नवीन इमारतींना परवानगी दिली जात नाही. मग, या इमारती कशा काय उभ्या राहतात ? याला फक्त मुंबई महापालिकेचा अधिकारीवर्गच जबाबदार आहे, असे मी जबाबदारीने सांगत आहे. एखाद्या माणसाच्या फ्लॅटचे स्ट्रक्चरल चेंजेस किंवा इंटेरिअरचे काम असेल तर त्याठिकाणी आपले अधिकारी 10-10 वेळा येतात. परंतु ते दुकानांमध्ये जात नाहीत. कारण, त्यांना अगोदरच हप्ता पोहचलेला असतो. त्यामुळे याबाबतीत कायद्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. सकाळी चर्चेच्या निमित्ताने माननीय श्री.आर.आर.पाटील साहेबांनी सांगितले की, कोणालाही औषधे कमी पडणार नाहीत, कोणालाही ट्रीटमेंटची कमी पडणार नाही.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत........

अशी व्यवस्था राज्य शासनाने केली आहे. ज्यावेळी हे सर्व संपते, दोन दिवसांनी शांतता होते त्यावेळी त्यांना विचारणारे कुणी नसते, कुणीही त्यांना विचारण्यासाठी जात नाही. बॉम्बस्फोटातील लोक अजूनही मदतीच्या प्रतिक्षेत आहेत. आपण पेपरवर कितीही मदत केल्याचे सांगत असलो तरी वस्तुस्थिती अशी आहे. म्हणून मी आग्रहाने या ठिकाणी सांगू इच्छितो की, दोन दिवसानंतर, हे वादळ शांत झाल्यानंतर देखील आमच्या संवेदनशील उपमुख्यमंत्र्यांनी शेवटपर्यन्त त्यांची काळजी घ्यावी. भगवती रुग्णालयात, करुणा रुग्णालयात त्यांच्यावर औषधोपचार करण्यापुरती मर्यादित ही मदत असू नये. जर या अपघातात कुणी अपंग झाला असेल, ज्याचा काहीही दोष नाही, त्याची देखील काळजी राज्य शासनाने वाहिली पाहिजे. एखाद्याचा अवयव निकामी झाला असेल तर दुसरा अवयव लावण्यासाठी मदत केली पाहिजे. मागील बॉम्बस्फोटातील आपद्ग्रस्तांवर केलेल्या औषधोपचाराची बिले करुणा रुग्णालयाने किती पाठविली होती, याची माहिती माननीय उपमुख्यमंत्र्यांना आहे. माझी एवढीच विनंती आहे की, शेवटपर्यन्त राज्य शासनाने या सर्व लोकांची जबाबदारी स्वीकारावी. जर या अपघातातील मृतांना खरी श्रद्धांजली वहायची असेल तर कायद्यामध्ये आमुलाग्र बदल करावेत, तरच ती त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. एवढे बोलतो आणि थांबतो.

-----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.कपिल पाटील यांनी नियम 97 अन्वये आज बोरिवली येथे जी दुर्घटना घडली त्यासंदर्भातील प्रस्ताव मांडला आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ज्यावेळी सभागृहात ही चर्चा सुरु झाली होती त्यावेळी मृतांचा आकडा चोवीस होता, आता माझ्याकडे जी बातमी प्राप्त झाली आहे त्यानुसार मृतांचा आकडा एकोणतीसवर पोहोचला आहे, जखमींची संख्या बारा आहे तर चार लोक अत्यवस्थ आहेत व या चार लोकांची अतिशय वाईट अवस्था आहे. ज्यावेळी गोविंद टॉवरची घटना घडली त्यावेळी मी सभागृहात उपस्थित होतो. आज ही दुर्घटना घडल्यापासून मनात सारखा विचार येतो की, दहा वर्षामध्ये अनधिकृत बांधकामे आणि त्यावर करावयाची उपाययोजना या संदर्भात सातत्याने सभागृहात चर्चा होत आहे. कायद्यात दुरुस्ती करण्यात आली, पूर्वी वॉर्ड ऑफीसर होते आता त्यांना ऐ.एम.सी.म्हणतात, या अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल, जर लोकप्रतिनिधी अशा अनधिकृत बांधकामांना संरक्षण देत असतील, बांधकामांवर कारवाई करण्यापासून अटकाव करीत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, त्यांचे नगरसेवक पद रद्द करण्यात येईल, येथपर्यन्त कायद्यामध्ये दुरुस्ती केल्यानंतर सुध्दा आज ही परिस्थिती उद्‌भवली आहे. ही सगळी बातमी वाचल्यानंतर मन अस्वस्थ होते. अत्यंत विदारक मनाने, व्यथित मनाने बोलण्यासाठी उभे रहात असतांना मन क्रोधित देखील होत आहे. इतका बेलगामपणा चालला आहे पण कुणालाही त्याची पर्वा नाही. माननीय राज्यमंत्री, श्री.राजेश टोपे यांच्याशी बोलतांना मी त्यांना एकदा सांगितले होते की, केंव्हा तरी मनात विचार आणा, मुंबई शहराची विभागणी करुन, एखादा भाग, जसे दक्षिण मुंबई निवडा, तेथील अनधिकृत बांधकाम पूर्णपणे पाडून टाका, पुन्हा जर अनधिकृत बांधकाम कुणी केले तर सोडले जाणार नाही, अशी सुरुवात करुन कारवाई केली तर मुंबईत अनधिकृत बांधकाम राहणार नाही. एका बाजूला अनधिकृत इमारती आहेत तर दुस-या बाजूला बेलगामपणे वाहने चालवून फुटपाथवरील गरीब माणसे अपघातात मरत आहेत. ही माणसे फुटपाथवर राहतात कारण ती गरीब आहेत. या सर्वांचे मूळ अनधिकृत बांधकामांमध्ये आहे. सन 1997-98 पासून मी पाहतो आहे की, मनोरा आमदार निवासाजवळ झोपडपट्टी आहे. या झोपडपट्टीच्या पूर्वी फक्त तीन रांगा होत्या, सन 2001 सालापर्यन्त सात रांगा झाल्या, आज आठ ते

..3........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत..........

दहा रांगा आहेत, भर समुद्रात ही झोपडपट्टी आहे. या झोपडपट्टीवर, अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचा प्रयत्न झाला त्यावेळी खासदार, श्रीमती शबाना आझमी, दिवंगत सुनील दत्त आले, ही कारवाई रोखली गेली. म्हणजे अधिक अनधिकृत बांधकामे करण्यास मुभा दिली असे होते का ? आज आपण ही बांधकामे तोडली नाहीत तर उद्या एखादी लाट येईल, पूर्ण झोपडपट्टी जमीनदोस्त होईल, अनेक लोक मरतील. मग त्याला जबाबदार कोण ? या बांधकामांवर कारवाई का करीत नाही ?

सभापती महोदय, मी माझे स्वतःचेच उदाहरण या ठिकाणी देतो. मी शिवडी येथे राहतो, त्या ठिकाणी असलेल्या एका इमारतीच्या तळमजल्यावर स्वागत बार ॲण्ड रेस्टॉरंट सुरु आहे.

यानंतर श्री.बोरले........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ..........

तेथे पूर्वी दूध विक्रीचा व्यवसाय चालत होता. आता तेथे बार सुरु झालेला आहे. त्या बार मालकाने त्या इमारतीच्या तळमजल्यावरील शौचालय गायब केले. त्या इमारतीच्या मागच्या बाजूला जे लोक राहत होते ते लोक त्या शौचालयाचा वापर करीत होते. आता त्यांना सार्वजनिक ठिकाणी जावे लागते. तत्कालीन महापौर श्री.महादेव देवळे यांनी यासंदर्भात पत्र व्यवहार केला आणि आज पर्यंत मीही पत्रव्यवहार करीत आहे. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांकडून मला त्यांचे जावक क्रमांक उमुस/व्ही.आय.पी./07/1051, दिनांक 22 मार्च, 2007 रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. त्या पत्रामध्ये असे नमूद केलेले आहे की, "आपले दिनांक 01.03.2007 रोजीचे पत्र मिळाले. सदर पत्र या कार्यालयाच्या पत्र क्र. उमुस/व्ही.आय.पी./07/1051 व दिनांक 22 मार्च, 2007 अन्वये पोलीस आयुक्त, मुंबई यांच्याकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठविले आहे."

सभापती महोदय, सहायक आयुक्त, एफ/दक्षिण विभाग, मुंबई यांच्याकडून देखील मला पत्र आलेले आहे. त्या पत्रामध्ये असे नमूद केलेले आहे की, "उपरोक्त विषयासंदर्भात आपणास असे कळविण्यात येते की, सदर स्वागत रेस्टॉरंट व बार येथील अनधिकृत बांधकामाबाबत या कार्यालयाने महापालिका अधिनियम 351 अन्वये जावक क्र.एफएस/बीएफ-351/184 दिनांक 20.12.2002 रोजी नोटीस बजावण्यात आली आहे. त्यावर सदर हॉटेल मालकाने मुंबई नागरी व दिवाणी न्यायालयातून दावा क्र.4713/2003 अन्वये स्थगिती मिळविली आहे. त्याबाबत या कार्यालयाने महापालिका विधी खाते यांस दिनांक 06.12.2005 व दिनांक 29.12.2005 रोजी निमशासकीय पत्राद्वारे सदर स्थगिती लवकर उठविण्यात यावी यासाठी कळविण्यात आले आहे. दूरध्वनीवरुन देखील पाठपुरावा केला आहे. स्वागत रेस्टॉरंट बार या मालकाविरुध्द एम.आर.टी.पी. कायदा क्र.53(1) अन्वये नोटीस बजावून, सदर प्रकरण आर.ए.किडवाई पोलीस ठाण्यात तक्रार क्र.547/05 दिनांक 16.06.2005 रोजी नोंदविण्यात आली आहे. सदर प्रकरण आर.ए.किडवाई पोलीस ठाण्यात प्रलंबित आहे." सन 2002 पासून आज पर्यंत या प्रकरणी कारवाई झालेली नाही. सभापती महोदय, यासंदर्भात मला पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-4 यांच्या कार्यालयाकडून दिनांक 25/04/2007 रोजी पत्र आलेले आहे. त्या पत्रामध्ये असे नमूद केलेले आहे की,

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ..........

"स्वागत रेस्टॉरंट व बार चे मालक श्री.योगेश रणछोडदास पटेल यांनी विरचंद निवासच्या बिल्डींगच्या तळमजल्यावरील सार्वजनिक शौचालय तोडून त्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम केलेले आहे आणि त्यामुळे तेथे राहणा-या रहिवाशांना नैसर्गिक विधीकरिता त्रास होत आहे, ही बाब महानगरपालिकेच्या अखत्यारीतील असल्याने त्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, र.अ.कि.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांनी सहाय्यक आयुक्त, एफ/दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, परेल, मुंबई-12 यांना त्यांचे पत्र जा.क्र.2454/2007, दिनांक 17.04.2007 अन्वये कळविले आहे. अधिक कारवाई संबंधाने आपण मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई आणि सहाय्यक आयुक्त, एफ/दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, परेल, मुंबई-12 यांचेकडे पाठपुरावा करण्यास विनंती आहे." कारवाई करण्याबाबत या विभागाने त्या विभागाला सांगावयाचे आणि त्या विभागाने या विभागाला सांगावयाचे अशा पध्द्तीने काम सुरु आहे. परंतु कारवाई मात्र होत नाही. मुंबईतील अनेक इमारतीच्या तळमजल्यातील प्लींथ तोडून तेथे बांधकाम करण्यात आलेले आहे. त्यामुळे इमारती कमकुवत होतात. याच कारणामुळे लक्ष्मीछाया इमारतीमध्ये दुर्घना घडली. उद्या दुस-या कोणत्या तरी इमारतीमध्ये दुर्घना घडेल, हे एवढयावर थांबणार नाही. माननीय मंत्री महोदयांनी सांगावे की, आज पर्यंत वार्ड ऑफिसरला किंवा आताच्या ए.एम.सी. ला निलंबित करण्यात आले आहे काय ? श्री.टोपे साहेब आपण जर छत्रपती शिवाजी रेल्वे स्टेशनच्या बाजूला असलेल्या कर्नाक बंदर रोडने गेलात तर किती विदारक स्थित आहे, हे तुम्हाला कळेल. आमच्या इमारतीच्या भिंती एक-एक फुटाच्या आहे.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

जुन्या बांधकाम असलेल्या भिंती मजबूत असल्याने भोक सुध्दा पडत नाही. जुन्या बांधकामातील भिंतीची रुंदी एक-एक फुट असून त्या जाडजूड आहेत.

सभापती महोदय, काल इमारत कोसळण्याची जी घटना घडली आहे त्यातून एकच विदारक सत्य बाहेर येत आहे. ते म्हणजे अनाधिकृत बांधकामांना आलेला ऊत व त्यांना राज्यकर्त्यांचे असलेले आशीर्वाद. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, श्री.कळम-पाटील नावाचे अधिकारी होते. त्यांनी त्यांच्या परीसरात अनाधिकृत हॉटेल बांधताना पाहिले व तोडले त्यामुळे त्यांची बदली झाली आहे. अनाधिकृत बांधकाम तोडणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाते. अनाधिकृत बांधकाम करणारांवर कारवाई केली म्हणून त्या अधिकाऱ्यावर कारवाई होते. आपण अधिकाऱ्यांना पाठिंबा दिला तर तो अधिकारी चांगले काम करु शकतो. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितले की, यामुळे श्री.विक्रम पवार यांच्या सारखा अधिकारी 6-6 वर्ष एका जागेवर राहतो. मला वाटते की, घडलेल्या घटनेबाबत केवळ दुःख व्यक्त करुन चालणार नाही तर या इमारतीतील रहिवाशांच्या पुनर्वसनाचा विषय महत्वाचा आहे. आम्ही दोन मिनिटे दुःख व्यक्त करुन पुन्हा आपापल्या कामाला लागू. जन पळभर म्हणतील हाय हाय, मी जाता राहील काय ? त्याप्रमाणे जन पळभर दुःख करतील व म्हणतील "सूर्य तळपतील, चंद्र झळकतील, तारे आपुला क्रम अचारतील, असेच वारे पुढे वाहतील, मी जाता त्यांचे राहिल काय ?" अशी परिस्थिती आहे. त्यांची दुरावस्था पाहण्यासाठी कोणी नाही. आपण सर्व दुःख व्यक्त करणार आहोतच, शासन त्यांना एक लाख रुपये मदत देईल परंतु आता तेवढयावर भागणार नाही. केव्हातरी चाबूक-आसूड ओढण्याची वेळ आलेली आहे. आम्ही परदेशात दौरे केले आहेत. सिंगापूरमध्ये रस्त्यावर कोणी थुंकले तर चाबकाचे फटके मारतात. मी हाँगकाँगमध्ये प्रचंड सिगारेट ओढणारी माणसे पाहिली परंतु थोटुक टाकायला रेतीच्या कंपाऊंडजवळ ते जायचे. इतकी चांगली शिस्त त्यांच्याकडे आहे. हाँगकाँगहून शांघायला नोकरी करण्यासाठी जायचे असेल तर रोज त्यांना इमीग्रेशनमधून जावे लागते. आपल्याकडे कल्याणवरुन मुंबईत यायचे असेल तर ठाण्याच्या सीमेवर इमीग्रेशन केले पाहिजे. मुंबईत काम करुन संध्याकाळी जाताना पुन्हा इमीग्रेशन करुन दाखवा की मी कल्याणला परत घरी गेलो आहे. असे आपण करु शकतो का ? हे आपल्याकडे होईल का ?

.....2

PNG/ KGS/ KGS/ MAP/ MAP/

श्री.अरविंद सावंत.....

मुंबईत लोंढे येत आहेत, त्यांना येथे राहणे परवडत नाही. जागांचे भाव आकाशला भिडत आहेत, फुगा फुगविल्यासारखे वाटत आहे. सभापती महोदय, मी एक उदाहरण देऊ इच्छितो. हिरानंदानी हे सम्राट आहेत. त्यांनी काहीही केले तरी चालते. त्यांच्याकडून मोठया प्रमाणावर डोंगर कपात सुरु आहे. मी दोन वेळा महानगरपालिकेला पत्र लिहून विचारले आहे की, हिरानंदानी यांचा नक्की काय प्लॅन आहे ? जनतेला व आम्हाला कळू द्या की, ती मनोरंजनाची जागा आहे की, खेळण्याच्या मैदानाची जागा आहे. त्यांना ही जागा शासनाने विकसित करण्यासाठी दिलेली आहे, असे दिसते. माननीय मंत्री महोदय श्री.राजेश टोपे हे आमच्या परिसरात श्री.अर्जून खोतकरांकडे आले होते, आज मी त्यांना विनंती करतो की, आता पुन्हा या परिसरात येऊन पहा की तेथे कोणते नवीन प्रकार सुरु झालेले आहेत. बिल्डर काहीही करु शकतो परंतु मध्यवर्गीय व चाळीत राहणाऱ्या लोकांची ससेहोलपट चालू आहे. एक झोपडपट्टीधारकही मनात येईल ते करतो. शनिवार-रविवार आला तर मजले वाढवितो, कच्चे बांधकाम पक्के करतो. त्याला कोणी विचारत नाही व दुसरीकडे बिल्डरांना कोणी विचारत नाही. परंतु मध्यमवर्गीयांची काळजी घ्यायला कोणी नाही. सभापती महोदय, याबाबत केवळ श्रध्दांजली वाहून नक्राश्रू वाहण्यात काय अर्थ आहे. त्यांचे पुनर्वसन होणे महत्वाचे आहे. ही इमारत पडण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, संबंधित ए.एम.सी. व डी.एम.सी. वर सुध्दा कारवाई झाली पाहिजे. जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे खटले दाखल करावेत. या अधिकाऱ्यांवर शासनाचा वचक नाही, अधिकाऱ्यांच्या दृष्टीने लोकप्रतिनिधिंना किंमत नाही. अशा इमारतीसंबंधी तेथील रहिवासी महानगरपालिकेकडे वारंवार तक्रारी करीत असतात, परंतु त्यांची वेळीच दखल घेतली जात नाही. एका चाळीमध्ये तर ग्राऊंड फ्लोअरवरील शौचालये तोडून हॉटेल मालकाने बार थाटला आहे.

.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

त्याचा तीव्र निषेध करतो आणि या प्रकरणी शासनाने कडक कारवाई संबंधितांवर करावी अशी इच्छा व्यक्त करतो. सभापती महोदय, मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, या संबंधात मी आपल्याला पत्र लिहिलेले आहे. मी काही आपणास सारखी पत्रे लिहित नाही. अगदीच टोकाला गेले की मी आपणास पत्र लिहितो हे आपल्याकडील माझी पत्रे पाहून आपल्या लक्षात येईल. माझी आपणास विनंती आहे की, या संबंधात आपण संबंधितांवर कडक कारवाई करावी आणि त्या कुटुंबियांचे पुनर्वसन कायम स्वरूपी करावे. कोठल्याही तरी पत्र्याच्या शेडमध्ये वा आपल्या पुनर्वसन छावणीतील एखादी सदनिका तात्पुरती देऊन पुनर्वसन करू नका. सभापती महोदय, या घटनेत मृत झालेल्या सर्व मृतात्म्यांना मी या निमित्ताने श्रद्धांजली वाहतो. या कुटुंबियांना सांत्वना देण्यासाठी देखील आता माझ्याकडे शब्द नाहीत पण तरीही या घटनेमधून जे वाचले असतील त्यांनी पुन्हा आयुष्यात उभे रहावे अशी मनोमन इच्छा बाळगतो आणि माझे भाषण संपवितो.

***

........ 4ए 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 97 अन्वये उपस्थित केलेला हा प्रस्ताव आहे, त्यावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यात सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, श्री.जयंत प्र. पाटील, श्री. मधुकर सरपोतदार, श्री.जितेंद्र आव्हाड, डॉ.दीपक सावंत, श्री.अरविंद सावंत आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावावर आपले विचार व्यक्त केले त्याबद्दल मी निश्चितपणे त्यांचा आभारी आहे. या एका अत्यंत महत्त्वाच्या घडलेल्या प्रसंगाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी या चर्चेतून अनेक चांगल्या सूचना केल्या आहेत. मी सुरूवातीलाच शासनाच्या वतीने या घडलेल्या घटनेबद्दल दु:ख व्यक्त करतो आणि या घटनेमध्ये मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करतो. सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे की, या घटनेमध्ये जवळपास 28 जण मृत्यूमुखी पडलेले आहेत. त्यात 8 पुरूष, 15 स्त्रिया आणि 3 लहान मुले आहेत आणि 11 जखमी झाले आहेत. ही घटना साधारणत: सायंकाळी 6.15 वाजण्याच्या सुमारास घडलेली आहे. सभापती महोदय, मी सुरूवातीस या इमारतीसंबंधात माहिती देऊ इच्छितो. ही इमारत एलटी रोड आणि एक्सर रोडच्या जंक्शनवर असून 'लक्ष्मीछाया' असे तिचे नाव आहे. तळमजला आणि 6 मजले असलेली ही इमारत साधारणपणे 28 वर्षे जुनी असून तिला ऑक्युपेशन सर्टिफिकेट 1980 साली दिले गेलेले आहे. या इमारतीमध्ये 28 दुकाने आहेत आणि एकंदर 28 सदनिका आहेत. या इमारतीच्या 'ए' आणि 'बी' अशा दोन विंग्ज आहेत. पैकी 'ए' विंग ची इमारत कोसळली असली दुसरी 'बी' विंग च्या इमारतीस धक्का देखील लागलेला नाही. त्यामुळे एका विंगमधील 24 पैकी 12 सदनिका यामध्ये बाधित झ ालेल्या आहेत. सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर ताबडतोबीने अग्निशमन दल, 11 फायर इंजियन्स, 4 रूग्णवाहिका, 2 जेसीबी, 2 डंपर अशा पद्धतीच्या लो प्रेशर गाड्या आणि अधिकारी वर्ग तेथे पाठविण्यात आलेला आहे. या ठिकाणी खबरदारीचा उपाय म्हणून जवळची हॉस्पिटल्स, रिलायन्स एनर्जीचे कार्यालय, उपनगर जिल्हाधिकारी, घनकचरा नियंत्रण कक्ष, .....

( यानंतर श्री. सरफरे ..... 4बी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

यामध्ये अनिरुध्द ॲकॅडमी ऑफ डिझॅस्टर मॅनेजमेंट ही एक स्वयंसेवी संस्था सहभागी झालेली आहे. याचबरोबर म्हाडाला सुध्दा कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याशिवाय भगवती रुग्णालयामध्ये अतिरिक्त खाटांची सोय करण्यात आली आहे. अति दक्षता विभागामधील खाटांची सुध्दा संख्या वाढविण्यात आली आहे. तसेच, नायर आणि के.ई.एम. रुग्णालयामध्ये अतिरिक्त वैद्यकीय मदत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मदत कार्य करण्याकरिता गृह रक्षक दलाचे 100 जवान कार्यरत आहेत. अनिरुध्द ॲकॅडमी ऑफ डिझॅस्टर मॅनेजमेंटचे स्वयंसेवक घटनास्थळी पाठविण्यात आले आहेत. घटनास्थळी माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्र्यांनी तातडीने भेट दिली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना शासकीय नियमानुसार 1 लाख रुपये आणि अपंगत्व आलेल्यांना 50 हजार रुपयांची मदत दिली आहे. महानगरपालिकेतर्फे दुर्घटनेची तांत्रिक चौकशी करण्याचे तसेच शासनातर्फे न्यायालयीन चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याठिकाणी महानगरपालिकेची पूर्व परवानगी न घेता एका दुकानदाराने आपल्या गाळयामध्ये फेरबदल केल्यामुळे इमारतीचा एक भाग कोसळल्याचा संशय आहे. म्हणून त्याबाबत एफ.आय.आर. दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. .

सभापती महोदय, याठिकाणी चर्चेमध्ये भाग घेत असतांना अनेक माननीय सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले आहेत. माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे त्या इमारतीतील रहिवाश्यांनी महानगरपालिकेकडे तक्रार दाखल केली होती. जर त्यांनी तक्रार केल्या नंतर देखील अधिकाऱ्यांकडून त्या तक्रारीची दखल घेतली गेली नसेल तर ती गंभीर बाब आहे. त्या दृष्टीकोनातून आपण अत्यंत गांभीर्याने चौकशी करु. माझ्याजवळ उपलब्ध असलेल्या माहितीनुसार त्याठिकाणी योग्य स्वरुपामध्ये तक्रार देण्यात आली नव्हती असे मला सांगण्यात आले. परंतु माननीय सदस्य डॉ. सावंत साहेबांनी सांगितल्याप्रमाणे रहिवाश्यांनी केलेल्या तक्रारीची दखल न घेणे ही बाब गंभीर असून त्या संदर्भात निश्चितपणे अतिशय कडक कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, या विषयासंबंधी चर्चा करीत असतांना स्ट्रक्चरल रिपेअरच्या दृष्टीकोनातून अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आले.आज एखादी इमारत धोकादायक असेल तर ती धोकादायक ठरविण्याची कार्यपध्दती काय आहे? त्याठिकाणी महानगरपालिकेचे वॉर्ड ऑफिसर यांचेमार्फत झ ोनवाईज सर्व्हे करण्यात येऊन ते आपला सर्व्हे रिपोर्ट कार्यकारी अभियंत्यांकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.राजेश टोपे...

देतात. त्यांनी दिलेल्या अहवालानुसार इमारतीचे स्ट्रक्चर रिपेअरेबल आहे की नॉन रिपेअरेबल आहे हे कार्यकारी अभियंता यांचेमार्फत ठरवून इमारतीचे डिझाईन आणि दुरुस्तीच्या कामाचे नियोजन करण्याकरिता मुख्य अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली एक सेल निर्माण केला आहे. त्या सेलमार्फत या संबंधात निर्णय घेण्यात येतो. जर ती इमारत नॉन रिपेअरेबल असेल तर ती पूर्णपणे पाडून नवीन इमारत उभी केली पाहिजे. आणि जर रिपेअरेबल इमारत असेल तर ती कशापध्दतीने रिपेअर करावयाची यासंबंधी निर्णय घेंतला जातो.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मुंबई शहरामध्ये मुंबई महानगरपालिका आणि म्हाडा या दोन यंत्रणा आहेत. यांच्यापैकी कोणत्या यंत्रणेमार्फत इमारतींची पहाणी करण्यात येते? मुंबई शहरामध्ये रिपेअर बोर्डाच्या अखत्यारीत हजारो इमारती येतात. या रिपेअर बोर्डाच्या कोणत्या इंजिनिअर्सनी अशा इमारतींना भेटी दिल्या आहेत ते सांगावे? याठिकाणी आपल्याला अधिकाऱ्यांकडून चुकीची माहिती दिली जात आहे म्हणून आपल्या माहितीसाठी मी हे सांगत आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयांना मी स्पर्श करणार आहे. आज ज्या इमारती धोकादायक म्हणून डिक्लेअर केल्या जातात त्या इमारतींचे पहिल्यांदा असिस्टंट इंजिनिअरमार्फत सर्व्हे केला जातो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : मंत्री महोदय जे सांगत आहेत ते म्हाडाशी संबंधित आहे. म्हाडामध्ये सीटी इंजिनियरचे पद नाही. म्हाडामध्ये उपकरप्राप्त 19 हजार इमारती आहेत त्या ठिकाणी ही पध्दती आहे. या खाजगी इमारती आहेत.

श्री.राजेश टोपे : ती खाजगी इमारत असेल किंवा कोणतीही इमारत धोकादयक असेल तर अशा धोकादायक इमारतींचा सर्व्हे करण्याची पध्दती आहे, हे मला सांगावेसे वाटते. मी अगोदरची कार्यपध्दती सांगितली. दुसरा महत्वाचा विषय असा आहे की, जी इमारत पडलेली आहे, ती खाजगी मालकीची आहे. ती इमारत का पडली, हे पहाणे महत्वाचे आहे. या संदर्भात सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे शासनाच्या वतीने याची चौकशी करण्याकरिता तांत्रिक समिती नेमण्यात येणार आहे. खऱ्या अर्थाने तांत्रिक दृष्ट्या काय कारणे आहेत, स्ट्रक्चरल डिफेक्ट होते काय ? दर्जेदार काम नव्हते काय ? हे तांत्रिक समितीकडून तपासण्यात येईल. या व्यतिरिक्त ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटमार्फत चौकशी करण्यात येणार आहे. या संबंधी खाजगी इमारतीच्या दृष्टीकोनातून जी कार्यपध्दती आहे त्यामध्ये एखाद्या विकासकाला किंवा बिल्डरला इमारत बांधायची असेल तर त्या दृष्टीकोनातून जे साईड सुपरवायझर असतात त्यांचे लायसन्स बी.एम.सी.कडून दिले जाते. एखादी इमारत पंधरा मजली, वीस मजली असेल तर त्या इमारतीचे काम आय.एस. कोड प्रमाणे डी.सी.आर.प्रमाणे होत आहे की नाही, त्या ठिकाणी ज्या दर्जाचे मटेरियल वापरणे आवश्यक आहे, ते वापरले जाते की नाही, या गोष्टी तपासण्याच्या दृष्टीने सर्वात महत्वाची जबाबदारी साईट सुपरवायझरची असते. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण साहेबांनी मुद्दा उपस्थित केला तो अत्यंत महत्वाचा आहे. मध्यंतरी 'गोविंदा टॉवर' ही इमारत पडली त्यावेळेस चौकशीसाठी श्रीवास्तव समिती गठीत केली होती. त्यामध्ये सॉईल इन्व्हेस्टीगेशन, आयएस कोडप्रमाणे वापर, बिल्डरचे रजिस्ट्रेशन या गोष्टी पहाणे महत्वाच्या होत्या. ज्योवेळेस भोगवटा प्रमाणपत्र दिले जाते त्यापूर्वी स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट म्हणजे हे स्ट्रक्चर रहाण्यायोग्य आहे, सुरक्षित आहे, असे स्टॅबिलिटी सर्टिफिकेट घेतले पाहिजे, अशी शिफारस होती. त्याची निश्चितपणे अंमलबजावणी केली जाते. भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी आर्किटेक्चर, स्ट्रक्चरल इंजिनियर, साईड सुपरवायझर यांनी सर्टिफिकेट दिले पाहिजे. एवढयावरच थांबून चालणार नाही तर भोगवटा प्रमाणपत्र देण्याअगोदर स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट देतो, त्यानंतर दर पाच वर्षांनी अशा पध्दतीचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.राजेश टोपे (पुढे सुरू......

स्ट्रक्चरल ऑडीटसुध्दा केले पाहिजे, ही सगळयात महत्वाची गोष्ट आहे. हे स्ट्रक्चरल ऑडीट ठराविक काळानंतर होण्याची आवश्यकता आहे. एखादी नवीन इमारत असेल त्या ठिकाणी 10 वर्षे काही झाले नाही असे असले तरी 10 वर्षानंतर त्या ठिकाणी दर पाच वर्षांनी पिरिऑडिकल स्टॅबिलिटी ऑडिट करण्याची तरतूद महापालिकेच्या कायद्यात, नगरपालिकेच्या कायद्यात डीसीआरच्या माध्यमातून अंतर्भूत करण्याची आवश्यकता आहे. शासनाच्या वतीने अशाप्रकारचे पाऊल निश्चितपणे उचलले जाईल, असे मला सभागृहाला जाणीवपूर्वक सांगावेसे वाटते.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण साहेबांनी एक अत्यंत महत्वाचा विषय उपस्थित केला. आपण एखादी इमारतीच्या बाबतीत ती पडायला आली किंवा धोकादायक झाली असे सर्टिफिकेट देतो म्हणजे त्याला प्रॉपींग करावयास लावतो. म्हणजे त्या ठिकाणी टेकू लावण्यास सांगतो. त्यांना सेक्शन 354 ची नोटीस देऊन त्या ठिकाणी इव्हीक्शन करण्यास सांगतो. इमारत जर धोकादायक असेल, राहण्यास योग्य नसेल तर त्या ठिकाणी पूर्ण इव्हीक्शनची नोटीस देऊन त्यांना बाहेर काढण्याची तरतूद आहे. परंतु त्या ठिकाणी जास्तीत जास्त प्रोसिक्युशन करिता सेक्शन 471 च्या अनुषंगाने जो दंड केला जातो तो अत्यंत कमी असतो. त्यामुळे सेक्शन 354 ची परिणामकारक अंमलबजावणी होत नाही. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण साहेबांनी कलम 354 ची परिणामकारक अंमलबजावणी व्हावी असा मुद्दा उपस्थित केला. त्यासंदर्भात अधिक मोठ्या पध्दतीने आणि परिणामकारक कारवाई होण्याच्या दृष्टीने जे बदल करण्याची आवश्यकता असेल, दंड वाढविण्याची आवश्यकता असेल किंवा त्यादृष्टीकोनातून आणखी काही अनुषंगिक बदल करण्याची आवश्यकता असेल, जेणेकरुन यासंदर्भात काही धाक निर्माण व्हावा, तर ते कायदेशीर बदल किंवा कायदेशीर कारवाई करण्याचा शासनाचा निश्चितपणे मानस आहे. कायद्यामध्ये करावयाचा बदल असेल किंवा स्ट्रक्चरल ऑडीटची बाब असेल या दोन्ही गोष्टींबाबत या ठिकाणी जाणीवपूर्वक सांगू इच्छितो की, यादृष्टीकोनातून मला या दोन गोष्टी जास्त महत्वाच्या वाटल्या. आज या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अनधिकृत बांधकामाचा महत्वाचा विषय मांडला. अनधिकृत बांधकामे, त्यामध्ये होत असलेली वाढ आणि जबाबदार लोकांवर होत नसलेली कारवाई यासंदर्भात मी शासनाच्या वतीने हे निश्चितपणे मान्य करीन की, याबाबतीत पाहिजे तेवढी परिणामकारक कारवाई केली जात नाही. याबाबत आपण पोलीस इन्स्पेक्टरवर जबाबदारी निश्चित केलेली आहे. आपण असिस्टंट कमिशनरवर, वॉर्ड ऑफिसरवर जबाबदारी निश्चित केलेली आहे. त्या त्या वॉर्डामध्ये अनधिकृत बांधकाम होत असताना त्यांच्यावर कारवाई केली जात नाही हे मी निश्चितपणे मान्य करतो. शेवटी त्यासंदर्भात महापालिका आयुक्तांनी कारवाई करावयाची असते. या घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने शासनाच्या वतीने मी असे सांगेन की, जे कायदे केले आहेत त्याची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. राजेश टोपे ....

अंमलबजावणी होत नाही. ही कारवाई अतिशय कठोर पध्दतीने कशी केली जाईल यासंदर्भात शासनाकडून पावले उचलली जातील आणि जर हे केले नाही तर निश्चितप्रकारे महापालिका आयुक्त असतील किंवा अनुषंगिक ज्यांच्या ज्यांच्या जवळ कारवाई करण्याचे अधिकार दिलेले असतील आणि ते कारवाई करत नसतील आणि शासनाकडून त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता असेल तर महापालिका आयुक्त किंवा ॲडिशनल कमिशनरवर कारवाई करण्याची पावले उचलण्यास शासन कोठेही कमी पडणार नाही हे मला या ठिकाणी अत्यंत जबाबदारीने सांगावयाचे आहे. कारण ही वस्तुस्थिती आहे की, ज्यावेळी अनधिकृत बांधकाम होते त्यावेळी त्यावर कोणाचाही चेक नसतो. अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत स्ट्रक्चरल सर्टिफिकेट घेतले जात नाही, परवानगी घेतली जात नाही. त्यामुळे ती इमारत पडली तर त्यातून मोठी वित्त व जीवित हानी होते. त्यामुळे दुर्दैवाने निरपराध लोक बळी पडतात. त्यामुळे कारवाईच्या दृष्टीने ज्या पळवाटा असतील, त्या अनुषंगाने खरोखरच कारवाई होत नसेल तर ते तपासून कारवाई करण्याच्या दृष्टीने शासन नक्की काम करील.

सन्माननीय सदस्य श्री. आव्हाड यांनी सांगितले की, अनधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या दृष्टीने शासन पावले उचणार काय ? आज मी सुध्दा अनेक प्रश्नांची उत्तरे देत असताना अतिशय जबाबदारीने सांगितले की, ठाणे महापालिका किंवा ठाणे जिल्ह्याच्या हद्दीपर्यंत ज्या पाच-सहा महानगरपालिका आहेत त्या ठिकाणी खूप मोठ्या संख्येने अनधिकृत बांधकामे आहेत. आज कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर किंवा उल्हासनगर महानगरपालिका घेतली तर त्या ठिकाणी असलेल्या बांधकामांमध्ये 70 ते 80 टक्के बांधकामे अनधिकृत आहेत.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजेश टोपे...)

या सर्व गोष्टींचा आज आपण सरसकट पाढा म्हटला तरी आपणाला माणुसकी आहे की नाही, आपणाला काही करता येणार आहे की नाही अशा परिस्थितीमध्ये आपण येऊन पडलो आहोत. यामध्ये थर्ड पार्टी इण्टरेस्ट क्रिएट झालेला आहे. अनेक गरीब, मध्यमवर्गीय लोकांनी इमारतींमध्ये सदनिका विकत घेतलेल्या आहेत. त्यामुळे या सर्व गोष्टी नियमित करता येतील काय यासंदर्भात डायरेक्टर, टाऊन प्लॅनिंग यांच्याकडून प्रस्ताव मागवित आहोत. हा प्रस्ताव आल्यानंतर कायद्यामध्ये बदल करावयाचा असेल तर तो देखील करता येईल. या संदर्भात गुजरात राज्याने ठराविक कट ऑफ डेट लावलेली आहे. गुजरात राज्याप्रमाणे आपणालाही काही करता येईल का याचा देखील विचार आम्ही करीत आहोत. जुन्या इमारतींची पुनर्बांधणी होण्यासाठी डीसीआर 33(7) खाली विकासकाला जास्त एफएसआय दिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आणि सन्मानीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितल्या प्रमाणे, स्ट्रक्चरल चेंजेस करणे, विशेषत: ज्वेलर्सद्वारे इमारतीखाली प्लिन्थ घेणे हा अक्षम्य गुन्हा आहे. ज्या ज्या लोकांनी आपल्या हातामध्ये कायदा घेऊन अशा प्रकारच्या गोष्टी केलेल्या आहेत ते तपासण्यासाठी सर्वदूर सर्वेक्षण करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारे इमारतीमध्ये बदल केल्याने इमारतीला धोका निर्माण झालेला असेल आणि ज्यांनी अशा गोष्टी कायद्याचे उल्लंघन करुन केलेले असेल त्या सर्वांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल. हे स्ट्रक्चर फिट आहे अशा प्रकारचे सर्टिफिकेट अधिकृत यंत्रणेकडून घेतल्यानंतर त्या बाबतीत पूर्णविराम देण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचे काही स्ट्रक्चरल डिफेक्टस रिपेअर्समुळे निर्माण झाले असतील तर ते दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे हे देखील मला याठिकाणी जाणीवपूर्वक सांगावयाचे आहे. अशा इमारतींचे सर्वेक्षण करुन त्याबाबतीत उचित कारवाई करण्यात येईल. या ठिकाणी एकच मुद्दा उपस्थित होतो की, जे लोक या घटनेला जबाबदार आहेत..... मी पुन्हा सांगतो की, या प्रकरणी ज्युडिशियल इन्क्वायरी आणि तांत्रिक सल्लागार समिती नेमलेली आहे. या समितीचा रिपोर्ट येईल त्यावेळी जे जे कोणी दोषी असतील मग त्यामध्ये असिस्टण्ट कमिशनर असतील, डीसीएम असतील किंवा त्यांच्यावरचे अधिकारी असतील, बिल्डिंग प्रपोझल विभागाचे अधिकारी असतील, वेगवेगळया सेक्शनचे अधिकारी असतील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजेश टोपे...)

तर त्यांना कोणालाही सोडण्याचा विषय असू शकणार नाही. तेव्हा या सर्व लोकांवर जी कारवाई अपेक्षित असेल ती निश्चितपणे करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जातील हेही मी येथे सांगत आहे.

डॉ. दीपक सावंत : ज्युडिशियल इन्क्वायरी टाईम बाऊण्ड असली पाहिजे.

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी उपस्थित केलेला मुद्दा योग्य आहे. ज्युडिशियल इन्क्वायरी आणि टेक्निकल कमिटीचा रिपोर्ट टाईम बाऊण्ड पिरिअडमध्येच दिला जाईल. यामध्ये कोण कोण दोषी आहेत हे समोर आल्यानंतर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम एम. ....... 19:30

श्री.राजेश टोपे.......

आम्ही यामध्ये कोणालाही पाठीशी घालणार नाही. महानगरपालिकेच्या अधिका-यांना देखील यामध्ये पाठीशी घालण्यात येणार नाही. शासनाकडून या संदर्भात योग्य ती कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून पावले उचलले जातील. त्यामुळे ही घटना........

श्री.मधुकर चव्हाण : सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, यासंदर्भात तक्रार कोणीही केली नाही. माझ्या भाषणामध्ये मी उल्लेख केलेला आहे की, जर कोणी तक्रारी केली नाही तर सब इन्स्पेक्टरने त्यांच्या वॉर्डामध्ये फिरावयाचे नाही का ? त्यांच्या वॉर्डामध्ये कोणत्या बिल्डींगमध्ये जर कोठे पाईलिंग केले जात असेल, स्ट्रक्चरल चेंजेस केले जात असतील तर ते तिथे फिरुन शोधून काढणे त्यांचे काम आहे. जर रस्त्यामध्ये एखादा खून होत असेल किंवा झाला असेल तर त्या खूनाबाबत कारवाई करण्यासाठी तेथील इन्सपेक्टर तक्रार करण्याची वाट पाहणार आहे का ? तेथील स्थानिक सब - इन्स्पेक्टरला मोटारसायकल दिलेली असते, त्याला त्या ठिकाणी वाहन भत्ताही सरकारतर्फे देण्यात येतो त्यांनी देखील त्यांच्या वॉर्डामध्ये फिरुन हे बांधकाम अनधिकृत बांधकाम पाईलिंग स्ट्रक्चरल चेंजेस होत असलेले पाहिले नाही का ? त्यासाठी कोणी तक्रार करावायाची काय गरज आहे ?

**तालिका सभापती** : होय, बरोबर आहे, परंतु कोणी त्याबाबत तक्रार केली असती तर कारवाई करणे अधिक सोयीचे झाले असते.

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मांडलेला मुद्दा चुकीचा आहे असे माझे मत नाही. स्थानिक सब इन्स्पेक्टरने त्यांच्या वॉर्डामध्ये होत असलेल्या अनधिकृत बांधकामाची आणि स्ट्रक्चरल चेंजेस किंवा स्ट्रक्चरला धोका होईल असे करण्यात आलेले रिपेअर्स पाहणे व त्याची दखल घेणे हे सब इन्स्पेक्टरचे काम आहे, परंतु काही वेळेला काय होते की, काही स्ट्रक्चरल चेंजेस किंवा स्ट्रक्चरला धोका निर्माण होईल असे रिपेअरचे काम हे इंटेरिअरच्या स्वरुपात जर एखाद्या ज्वेलर्सच्या दुकानामध्ये किंवा हॉटेलमध्ये चाललेले असले तर ती बाब लक्षात येत नसते, असे आपण गृहित धरुन ठेवून या ठिकाणी एवढेच सांगितले की, दोषींवर कारवाई केली जाईल आणि त्या दृष्टीकोनातून यामध्ये कोणालाही पाठीमागे घालण्याचे कारण नाही आम्ही प्रामुख्याने आज या ठिकाणी सांगितले आहे. यासंदर्भात कलम 354 अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीकोनातून कारवाई केली जाईल याकरिता पिरियॉडिकल स्ट्रक्चरल ऑडिट हा महत्वाचा निर्णय

4F - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे......

शासनाने घेतलेला आहे. तसेच, यासदंर्भात एक टेक्निकल बॉडी अपॉईंट करुन त्याचा रिपोर्ट टाईम बाऊंड पध्दत ठेवून लवकरात लवकर मागितलेला आहे. यासंदर्भात शासनाने ज्युडिशियल इन्क्वायरी देखील नेमलेली आहे. या अनुषंगाने यापुढील कारवाई देखील शासनातर्फे लवकरात लवकर केली जाईल. मदतीच्या संदर्भात बोलावयाचे म्हटले तर मी आताच माझ्या भाषणात सांगितल्याप्रमाणे एक लाख रुपये मृतांच्या नातेवाईकांना मदत म्हणून देण्यात येतील आणि परत एकदा या घटनेच्या संदर्भात तीव्र दु:ख व्यक्त करुन अशी घटना पुन्हा घडणार नाही या संदर्भात शासनाकडून लवकरात लवकर पावले उचलण्यात येतील.

श्री.कपिल पाटील : माननीय राज्यमंत्री महोदयांनी जी स्ट्रक्चरल ऑडिटची भूमिका घेतली त्याचे मी स्वागत करतो परंतु जी तक्रार सन्माननीय सदस्यांनी केली की, हॉटेल मालक आणि ज्वेलर्स यांनी जे स्ट्रक्चरल बदल केलेले आहेत. ठाण्यामध्ये, मुंबईमध्ये,उपनगरामध्ये येथील सर्व्हे किती दिवसांमध्ये पूर्ण करणार आहात ? सर्व्हे पूर्ण झाल्यानंतर त्याच्यावर काय कारवाई करणार आहात ? सदोष इमारतींच्या बांधकामाच्या दृष्टीकोनातून आणि ज्या इमारती सदोष आहेत व कोसळलेल्या इमारतीतील किंवा अंशत : कोसळलेल्या इमारतीतील रहिवाशांचया पुर्नवसनाबद्दल काय करणार आहात ? कोणते धोरण आखणार आहात ? बोरीवली येथील लक्ष्मी - छाया या इमारतीचा अर्धा भाग कोसळल्यानंतर उर्वरित अर्ध्या भागातील रहिवाशांना घरे खाली करण्यास सांगितलेले आहे त्यांना कुठे राहावयास देण्यात येणार आहे ? राज्यशासनाचे यांच्या पुनर्वसनाबाबतचे नेमके धोरण काय आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सर्व्हेक्षणाच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर या सर्व्हेक्षणाची व्याप्ती पाहून शासनाच्या वतीने महानगरपालिकेला तातडीने सूचना देण्यात येतील आणि ज्या ज्वेलर्स आणि हॉटेलमालकांनी आपापलया हॉटेलमध्ये आणि दुकानांमध्ये रिपेअर्स करतांना स्ट्रक्चरला धोका निर्माण होईल, असे इंटेरिअर डेकोरेशन किंवा रिपेअर केले असेल आणि त्यामुळे ज्या ठिकाणी खरोखर संपूर्ण बिल्डींगला धोका निर्माण झाला असेल तर तो अक्षम्य अशा प्रकारचा गुन्हा आहे आणि त्याची योग्य ती शिक्षा मिळणे आवश्यक आहे. यासंदर्भात शासनाकडून लवकरात लवकर योग्य ती कारवाई निश्चितप्रकारे केली जाईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : माझ्या भाषणामध्ये मी स्पेसिफिकपणे म्हटले होते की, मुंबई,उपनगर

4F - 3



JPK/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम एम. ....... 19:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड.......

आणि ठाण्यामध्ये देखील वाढणारे अनधिकृत बांधकाम आपण कोणत्याही गांभीर्याने घेत नाही. माझा प्रश्न असा आहे की, जे सायन्टिफिकली प्रुव्हड जे फॅक्ट आहे की, मुंबईमध्ये किंवा उपनगर आणि ठाण्यामध्ये कोणतीही बिल्डींग बांधतांना 15 - 20 फुट खाली हार्ड रॉक जोपर्यंत लागत नाही तोपर्यंत पाया पक्का व पूर्ण होत नाही परंतु आजकाल पाच ते दहा फुट खोदून बिल्डींग बांधल्या जातात आणि दुकानदार हॉटेल मालक पाईलिंग करतात, त्यामुळे या बिल्डींग्स 15 ते 20 वर्षांमध्ये खाली येणार हे नक्की झाले. हे सर्व सरकारने मान्य करुन देखील पुढच्या 20 वर्षात 200 ते 300 बिल्डींग कोसळणार आहेत, हे कोणीही चुकवू शकत नाही. आज देखील बी.एम.सी.च्या आयुक्तांच्या असिस्टंट कमिशनर,व एक्जिक्युटिव्ह इंजिनियरच्या छाताडावर बसून अनधिकृत बांधकाम सुरु आहे.

यानंतर श्री.कानडे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 19:35

श्री. जितेंद्र आव्हाड ....

आमच्या सगळयांची प्रमुख मागणी होती की अनधिकृत बांधकामे रोखा. आयुक्तांना जबाबदार धरु,पोलीस निरीक्षकाला जबाबदार धरु असे सांगितले. परंतु ठाण्यामध्ये आयुक्तांच्या नजरेसमोर अनधिकृत बांधकाम चालू आहे त्याला काय करणार ? ज्युडिशिअल एन्क्वायरी करा. समिती नेमा आणि जबाबदारी फिक्स करा. जोपर्यंत हा विषय शासन गांभीर्याने घेणार नाही तोपर्यंत काहीही होणार नाही. 20 वर्षानंतर अशीच इमारत कोसळून 100 माणसे मृत्युमुखी पडतील आणि श्रध्दांजली वाहिली जाईल. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, ज्युडिशिअल कमिटी नेमा. कारण या लोकांचे हात पार वरपर्यंत पोहोचलेले आहेत. शासनाने माझ्या सूचनेचा विचार करावा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, शासनाने या घटनेनंतर मदत जाहीर केलेली आहे. मृतांना 1 लाख रुपये आणि अपंगत्व आलेल्या जखमींना 50 हजार रु. परंतु अपंग नसेल आणि जखमी झालेला असेल त्याला मदत करणार किंवा नाही ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, नियमानुसार मदत दिली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी या चर्चेमध्ये भाग घेतला नव्हता त्यामुळे आता आपल्या परवानगीने दोन शब्द बोलणार आहे. इमारत काल संध्याकाळी 6 वाजता कोसळली आता या घटनेला जवळजवळ 25 तास झालेले आहेत. अजूनही घटनास्थळी मातीचे ढिगारे उपसण्याचे काम सुरु आहे. पुढील आठवडयात ही चर्चा उपस्थित केली असती तर 7-8 दिवसानंतर काय निर्णय होत आहेत ते कळले असते. परंतु माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी चर्चा उपस्थित केली तो त्यांचा स्वत:चा प्रश्न आहे. माझे मत वेगळे असू शकेल. बेकायदेशीर बांधकामे हा विषय आहे. खाजगी बिल्डींग होती त्यामुळे इंजिनिअरवर काय कारवाई करणार ? सगळे विषय तांत्रिक आहेत. मी ठाणे जिल्हयाचा पालकमंत्री असताना साईराज इमारत कोसळली होती. 200-250 इमारतींना वाढीव एफएसआय देण्याचा प्रस्ताव आहे त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. खाजगी इमारतींमध्ये शासनाला निर्बंध आणता येणार नाही. खाजगी इमारत पडल्यानंतर तक्रार झाली किंवा नाही हे सर्व ज्युडिशिअल चौकशीत येईलच. खाजगी इमारतीमध्ये एखादा सभासद आडकाठी करीत असेल तर त्याच्या बाबतीत काही करता येत नाही. सोसायटीमधील पदाधिकारी ऑनररी असतात. कोण पोलीस स्टेशनला जातो आणि कटकट करतो असे वाटते. म्हणून याबाबतीत अध्यादेश काढणे आवश्यक आहे. खाजगी इमारतीमध्ये अडवणूक होत असेल तर

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 19:35

श्री.दिवाकर रावते....

कारवाई झाली पाहिजे. माननीय मंत्रीमहोदयांनी जे सांगितले त्यांच्या हेतुबद्दल आमच्या मनात शंका नाही. परंतु त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. मुंबईतील बेकायदेशीर बांधकामाबाबत शासन गंभीर असले पाहिजे. एखाद-दुसऱ्या हॉटेलचे अनधिकृत बांधकाम पाडले म्हणून उपायुक्त कळम-पाटील यांची शासनाने बदली केली. अनधिकृत झोपडयांवर कारवाई केली म्हणून उपायुक्त रोकडे यांना तर अकोल्याला पाठविले. त्यांच्या हातून काही चुका झाल्याही असतील. परंतु या अधिकाऱ्यांचा धाक आणि दरारा होता. शासनाला जर खरोखरच या प्रश्नाबाबत लक्ष घालावयाचे असेल तर तात्काळ श्री.कळम-पाटील आणि श्री. रोकडे यांना मुंबईत आणा. श्री. रोकडे यांच्याकडे केवळ झोपडया उभ्या राहतात त्यांच्यावर कारवाई करण्याचे काम द्या.

नंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

ज्या झोपडपट्ट्या उभ्या राहतात तेवढ्याच निष्कासित कराव्यात म्हणजे मग मुंबईमध्ये धाक निर्माण होईल. प्रामाणिकपणाची अपेक्षा तुमच्याकडूनच करु शकतो, अन्यथा उभा राहून बोललो नसतो. लक्ष्मी छाया इमारतीबद्दल जी भूमिका ताबडतोब जाहीर केली त्याबद्दल आभार मानतो. मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी इमारत पडल्यानंतर तातडीने धाव घेऊन 45 मिनिटात 11 जणांना जिवंत बाहेर काढले. त्यांनी अतिशय जिगरबाज काम केले आहे त्याबद्दल चार कौतुकाचे शब्द अपेक्षित आहेत. त्यांच्याविषयी आदरयुक्त बोलले गेले पाहिजे. त्यांना धन्यवाद देऊन माझे बोलणे पूर्ण करतो.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड व श्री.दिवाकर रावते यांनी दोन महत्वाचे मुद्दे मांडले आहेत. अडवणूक करणाऱ्या लोकांविरुध्द क्रिमिनल प्रोसीजरची कारवाई व्हावयास पाहिजे ही सूचना चांगली आहे. या संदर्भात शासनाच्या वतीने सजेशन फॉर ॲक्शन एवढे निश्चित सांगतो. जेवढ्या अनधिकृत इमारती आहेत, निर्माण होत आहेत त्यावर निर्बंध आणण्याच्या दृष्टीने ज्युडिशियल सर्वेक्षण करणे अपेक्षित केले आहे. सर्वेक्षण करण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी सूचना केली ती अत्यंत स्वागतार्ह आहे. तशाप्रकारचे ज्युडिशियल सर्वेक्षण टाईम बाऊंड केले जाईल.

**तालिका सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 20 जुलै, 2007 रोजी सकाळी 9.30 ते 10.45 पर्यंत विशेष बैठक होईल आणि सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 7 वाजून 42 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 20 जुलै, 2007 च्या सकाळी 9.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही